# द्वितीय वर्ष कला

# इतिहास अभ्यासपत्रिका क्र.३

# प्राचीन भारत (१००० पर्यंत)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. एस. व्ही. पाथरकर**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
सेठ जे. एन.पी.पालीवाला महाविद्यालय, पाली, जि. ठाणे.

: **डॉ. बी.डी.शिंदे**
इतिहास विभाग,
रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले, कला व वाणिज्य
महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड

: **श्री. विकास मेहंदळे**
मार्गताम्हाणे शिक्षण संस्थेचे, डॉ. तात्यासाहेब नातू
कला व वाणिज्य महाविद्यालय, मार्ग ताम्हाणे,
ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

: **प्रा. तुळशीदास मोकल**
इतिहास विभाग प्रमुख
डॉ. चिंतामणराव देशमुख महविद्यालय, रोहा, जि. रायगड

**संपादक** : **प्रा. तुळशीदास मोकल**
डॉ. चिंतामणराव देशमुख महविद्यालय, रोहा, जि. रायगड

**नोव्हेंबर २०१९, द्वितीय वर्ष कला, इतिहास अभ्यासपत्रिका क्र. ३,**
**प्राचिन भारत (१००० (पर्यंत)**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | प्राचीन भारतीय इतिहासाची साधने | ०१ |
| २) | सिंधू संस्कृती | १९ |
| ३) | 'वैदिक कालखंड' | ३५ |
| ४) | इ.स. पूर्व सहाव्या शतकानंतरचा भारत | ६४ |
| ५) | मौर्य कालखंड (इ.स. पू. ३२२ ते इ.स. पू. १८५) | ९९ |
| ६) | मौर्योत्तर राजवट-शुंग-कुशाण-सातवहान (इ.स. पू. १८५ ते इ.स. ३२०) | ११९ |
| ७) | 'गुप्त कालखंड' (इ.स. ३२० ते इ.स. ६००) | १४१ |
| ८) | गुप्त प्रशासन व सुवर्ण युग | १५२ |
| ९) | गुप्त कालखंडानंतरचा भारत | १६२ |
| १०) | रजपूतांचा उदय व सिंध मधील अरब साम्राज्य | १७१ |
| ११) | दक्षिण भारताची राजकीय व सांस्कृतिक वाटचाल | १७८ |
| १२) | भारतीय संस्कृतीचा अग्नेय आशियातील प्रसार | १९१ |


❖❖❖❖

# Syllabus

## S.Y.B.A. HISTORY PAPER III

## HISTORY OF ANCIENT INDIA

## (From Earliest Times To 1000 A.D.)

**Duration : 3 Hours** **Total Marks : 100**

**Pattern of Examination : Annual**

**Objectives :**

To acquaint the students with the different sources of Ancient Indian History. To enable the students to understand the Political, Socio-Economic and cultural development in the period under study and appreciate the rich cultural heritage in India.

**Module 1 : Sources of Ancient India and their Importance**

1. Archaeological
2. Literary
3. Foreign Travellers

**Module 2 : Indus Valley Civilization**

1. Socio and Economic Life.
2. Religious Life
3. Town Planning and Decline of the Civilization

**Module 3 : Vedic Age**

1. Janapada
2. Socio and Economic Life
3. Religion

**Module 4 : India after 6$^{th}$ century B.C.**

1. Administration of Mahajanpadas
2. Jainism and Buddhism
3. Persian and Greek Invasions

**Module 5 : Mauryan and Post Mauryan Period (322 B.C. - 320 A.D.)**

1. Chandragupta and Ashoka
2. Mauryan Administration
3. Post Mayrryan Dynasties - Shenga's, Kushanas and Satavana's

**Module 6 : Gupta Age (320 A.D. to 600 A.D.)**

1. Imperial Expansion : Chandragupta I, Samudragupta and Chandragupta II
2. Administration
3. Classical Age

**Module 7 : Post Gupta Period (600 A.D. - 1000 A.D.)**
1. The Age of Harsharvardhan
2. The Rise of Rajputs
3. Arab Invasion of Sind

**Module 8 : Major Dynasties of South India**
1. Chaukyas of Badami and Rashtrakutas
2. Pallavas and Cholas
3. Spread of Indian Culture in South - East Asia

❖❖❖❖

III

## Reading List


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Altekar A. S. | - | Rashtrakutas & Their Times |
| 2. | Ayyanger S. K. | - | Ancient India and South Indian History & Culture<br>Oriental Book Agency, Pune 1941 |
| 3. | Bhattacharya N.N. | - | Ancient Rituals and their Social Contents,<br>(Delhi, Manohar Publication) 1996 |
| 4. | Chakravarti Uma | - | The Social Dimensions of Early Buddhism - Delhi, Mumshiram Manoharilal - 1996 |
| 5. | Chakaravarti K.C. | - | Ancient Indian Culture & Civilization Vora & Co. Bombay 1992 |
| 6. | Jha D. N. | - | Ancient India in Historical Outline Motilal Banarasidas, Publishers Pvt. New Delhi. |
| 7. | Kulkarni C. M. | - | Ancient Indian History & Culture Karnataka Publishing House, Mumbai- 1956. |
| | Pannikar K.M. | - | Harsha & His Times, Bombay, Taraporewalla & Sons Co. 1922 |
| 8. | Kautilya | - | The Arthshatra Penguin Book, 1987 |
| 9. | Luniya B. N. | - | Life & Culture in Ancient India, Lakshmi Narain Agarwal, Agra - 1994 |
| 10. | Majumdar R. C. | - | Ancient India, Motilal Banarasidas, Publishers Pvt. Ltd. New Delhi - 1974 |
| 11. | Mookerjee R. K. | - | Ancient India,<br>Allahabad, Indian Press, 1956 |
| 12. | Mukherjee B. N. | - | Rise and Fall of the Kushanas |
| | | - | Empire |
| 13. | Nilkantha Shastri | - | A History of South India, Madras, OOP 1979 |
| 14. | Nandi R. N. | - | Social Roots of Religion in Ancient India |
| 15. | Pathak V.S. | - | Historians of India (Ancient India) |
| | | - | Asia Publishing Bombay 1966 |
| 16. | Pannikar K.M. | - | Harsha and His Times, Bombay, Taraporewalla and Sons Co. 1922 |

## मराठी संदर्भ ग्रंथ


१. डॉ. मोरबंचीकर आर.एस. - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

२. प्रा. मार्डीकर मदन - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

३. प्रा. डॉ. अनिल सिंगारे - दक्षिण भारताचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद

४. आळतेकर अ. स. - राष्ट्रकुट साम्राजाचा इतिहास (इ.स. ७५० ते ९७४ दामोदर सावळाराम आणि कंपनी १९३८)

५. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

६. डॉ. साहेबराव गाठाळ - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

७. डॉ. खाबडे दिनकर - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

८. डॉ. मोरवंचीकर आर.एस. - सातवाहनकालीन महाराष्ट्र, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

९. डॉ. समदानी ओ.बी. - प्राचीन भारताचा इतिहास चिन्मय प्रकाशन औरंगाबाद

१०.श. गो. कोलारकर - प्राचीन भारताचा इतिहास

११.कोसंबी डी.डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लीशींग पुणे

१२.डॉ. अ. रा. कुलकर्णी - प्राचीन भारत, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

१३.गायधनी र. ना. आणि राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा इतिहास कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे

१४.जोशी पी.जी. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास विद्या प्रकाशन, पुणे.


## हिन्दी


डॉ. एस. एल. नागोरी - प्राचीन भारत-आर.बी.एस.ए.पब्लिशर्स जयपूर १९८०

डॉ. एस. एल. नागोरी - गुप्तोत्तरकालीन भारत-पोईन्टर पब्लिकेशन जयपूर २००८

श्रीनेत्र पाण्डेय - भारत वर्ष का संपूर्ण इतिहास - लोकभारती प्रकाशन इलाहाबाद १९७५


❖❖❖❖

# १

# प्राचीन भारतीय इतिहासाची साधने

**प्रकरणाची रचना:**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ प्राचीन भारतीय इतिहासाची अलिखित भौतिक / पुरातत्वीय साधने.

१.३ भारतीय भाषेतील लिखित वाङमयीन साधने

१.४ परकीय इतिवृत्ते / साहित्य / प्रवासवृत्तांन्त

१.५ साधनांचे महत्व

१.६ सारांश

१.७ दिर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये :

- प्राचीन भारतीय पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास करणे.
- प्राचीन भारतीय वाङमयीन साधनांचा अभ्यास करणे.
- प्राचीन भारतीय परकीय साधनांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना :

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठी लिखित व अलिखित दोन प्रकारची साधने आहेत. लिखित साधनांमध्ये भारतीय भाषेतील साधने व परकिय प्रवासवर्णने यांचा समावेश होतो. लिखित साधनाप्रमाणे अलिखित साधने ही अतिशय महत्त्वाची आहेत. कारण त्या साधनामध्ये कोणत्या ही प्रकारचा बदल करता येत नाही. या साधनांच्या आधारे प्राचीन भारताची राजकिय, सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक परिस्थितीची माहिती मिळते.

## १.२ प्राचीन भारतीय इतिहासाची अलिखित साधने :

प्राचीन भारताच्या इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासाठी अलिखित साधने अतिशय महत्वाची आहेत. अलिखित साधनाना **भौतिक साधने किंवा पुरातत्वीय साधने** असेही म्हणतात. वाङ्मयीन साधना पेक्षा भौतिक साधने अधिक विश्वसनीय असतात. कारण त्यामध्ये कोणताही बदल पुन्हा करता येत नाही. अलिखित साधनाचे पुढीलप्रमाणे प्रकार आहेत

१) **उत्खनन अवशेष :-** भारतीय पुरातत्वखात्याचा महानिरीक्षक म्हणून कनिंगहॅम यांची नेमणूक सन १८६२ मध्ये झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बोधगया, भारहुत, सारनाथ, तक्षशिला इ. ठिकाणी उत्खनन करण्यात आले. लॉर्ड कर्झनने १९०४ मध्ये स्वतंत्र उत्खनन विभाग सुरू केला. त्याच्या प्रमुख म्हणून मार्शलची नियुक्ती केली. डॉ. मार्शल, वोगेळ, स्टाईन, ब्लॉक व स्पुनर यांनी या खात्याची धुरा सांभाळली. **डॉ. मार्शलने** तक्षशिला, डॉ. **स्पूनरने** पाटलीपुत्र, **राखलदास बॅनर्जीने** मोहेंजोदडो, **माध्यस्वरुपवत्स दयारामजीने** हडप्पा **आर. एन. रावने** लोथल, **बी. बी. लालने** कालीबंगण व ओजियाना येथील ठिकाणी उत्खनन केले.

उत्खननात शहराची व्याप्ती, इमारती, बांधकाम, रस्ते, दिवाबत्ती, सांडपाण्याची व्यवस्था, व्यापारीपेठा, धरणबांधणीची रचना इ. ची माहिती मिळाली. त्याच प्रमाणे दैनंदिन जीवना संदर्भात माहिती देणाऱ्या अनेक वस्तू सापडलेल्या आहेत. त्यामध्ये, धान्य, अलंकार, भांडी, मातीची खपरे, कापडे, शिक्के, मूर्ती, खेळणी, टोपली, शेतीची अवजारे, प्राप्त झाली आहेत. हाडाच्या सांगाड्यावरून प्राणी व मानवाचा वंश याची माहिती मिळाली. भूगर्भशास्त्र, प्रस्तरशास्त्र व कार्बन १४ याच्या आधारे कालमापन निश्चित करण्यात आली. अश्मयुगीन मानवापासून ते गुप्त - सातवाहन काळापर्यंतची माहिती उत्खननातून प्राप्त झाली. त्यामध्ये मानव वंश, व त्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीची माहिती मिळने.

२) **स्मारके :-** स्मारके म्हणजे भूतकाळातील बांधकामाचे अवशेष होय. स्मारकांना राजकीय दृष्टीकोनापेक्षा सांस्कृतिक दृष्टीकोनातून अधिक महत्व आहे. प्राचीन भारतामध्ये लेणी, किल्ले, गढ्या, मंदिर, स्तुप, गुफां, तोरण, मूर्ती, स्तंभ, घरे, राजवाडे चित्रे इ. च्या स्वरूपात स्मारके आढळतात. स्मारकाच्या आधारे तत्कालीन बांधकाम पद्धती, त्याचे तंत्र, लोकजीवन, धर्म संकल्पना, युध्दतंत्र, शस्त्रे - अवजारे, मूर्ती, शिक्षण संस्था व त्यांची शिक्षण पद्धत इ. माहिती मिळते. स्मारके भारतात आणि विदेशातही आहेत. **भारतातील स्मारकांचा** विचार करताना उत्खननातून प्राप्त झालेल्या ठिकाणांचा व वस्तूंचा विचार करावा लागतो. पाटलीपुत्र उत्खननातून मौर्य राजधानीची, **सारनाथ** येथील स्तूप व अन्य अवशेषावरून बौद्ध धर्म व सम्राट अशोकाची माहिती मिळते, तक्षशीला येथून विद्यापीठाची, **जमालगडी** येथून गांधारशैलीच्या शिल्पांची **काश्मीरमधील** उत्खननातून बौध्द, स्तुप व मठ आणि भींतीवरील मृतिकापटची माहिती मिळते. वारानसी, कौसंबी श्रीवस्ती अहिकात्र मथूर येतील उत्खननावरून राजकीय व संस्कृतिक विकासाची माहिती मिळते. पूहारपूर, महास्थान, बंगार, कोमिल्ला येथील उत्खननावरून बौध्द मंदिराची माहिती मिळते. उद्यगिरी-खंडगिरी लेण्यापासून वेरूळ - अजिंक्य लेण्यांची माहिती मिळते. गुप्तकालीन मंदिरापासून ते चाणक्य - यादवकालीन मंदिरांपर्यंतचे प्राचीन स्मारके आहेत.

भारताबाहेर जावा, कम्बोज, मलायी, बली इ. देशात स्मारके आहेत. कांबोडियामध्ये अंगरकोरवट, जावामध्ये, बोरोबुहुरमंदिर या संर्दभीत विशेष महत्वाची ठरतात. श्रीलंकेतील अनुराधापूर पोलोनरुवा येथे बौध्द धर्मी संर्दभीत माहिती मिळते. प्राचीन स्थापत्य कलेची समृध्दता, गुणग्राहकता, व्यापकता त्यातून दिसून येते.

३) **कला -** पुरातत्वीय सर्वेक्षणाच्याद्वारे ज्ञात झालेल्या विविध प्रकारच्या वस्तु, मुर्ती, शिल्प, चित्र, इत्यादीच्या आधारे तात्कालीन कलेची माहिती मिळते. दगड, लाकूड, धातू, माती या

स्वरूपात असंख्य अवशेष प्राप्त झाले आहे. मौर्य, सातवाहन, कुशाण, गुप्त, चाल्यूक्य, वाकारटक, राष्ट्रकुट या राजघराण्याच्या कालखंडात निर्माण झालेल्या कला इतिहासाचे बोलके पुरावे आहे. गुप्तकला, गांधारकला, मथूरा कला, पल्लव कला, इ. महत्वाच्या मूर्ती कला होत्या. मूर्तीवरून व चित्रकलेवरून तत्कालीन केशभूषा, वेशभूषास, अलंकार देवतांच्या मूर्तीवरून धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. आजंठा - वेरूळची चित्रकला अप्रतिम आहे. विविध वस्तूमधून तत्कालीन लोकांचे छंद, मनोरंजन, युध्दसाहित्य इ. माहिती मिळते. माती व दगडापासून तयार केलेले शिक्के व मुद्रा प्राप्त झाल्या आहेत. त्यावरील देवदेवता, प्राणी यांची चित्रे व लिपी याची माहिती प्राप्त होते. त्यावरून तत्कालीन धार्मिक संकल्पना, देवदेवतांची कल्पना याचा अभ्यासासाठी उपयोग होतो.

४) **नाणी :-** प्राचीन भारतात राजे, गणराज्ये, व्यापारी संघटना (श्रेणी) यांनी सोने, चांदी, तांबे, शिसे इ. धातूची नाणी तयार केली. १) प्रचलित नाणी साधी व ओबडधोबड असून एका बाजूस आकृतीचे (चित्राचे) ठसे असत. **अलेक्झांडरच्या स्वारीनंतर** नाण्यामध्ये बदल करण्यात आला. नाण्यावर राजाचे नाव, सन व अन्य मजकूर उमटविण्याची पध्दत सुरू झाली. तसेच नाण्याचा आकारमान व वजन निश्चित करण्यात आले. ठसा उमटविलेली भारतीय नाणी खाजगी चलन म्हणून वापरण्यात येत. अशी नाणी विविध श्रेणी व सोनार राजाच्या पूर्वपरवानगीने पाडत असत. या नाण्यावर एकाबाजूला नाणी पाडण्याचे नाव व दुसऱ्या बाजूला राजाचे नाव असत. ज्या प्रदेशात नाणी सापडतात त्यावरून राजाचा साम्राज्यविस्ताराचे ज्ञान होते. नाण्यावरील देवदेवतांच्या प्रतिमांवरून त्या काळातील धार्मिक जीवनाचे ज्ञान मिळू शकते. नाण्याच्या धातूवरून तत्कालीन आर्थिक जीवनाची माहिती मिळते. नाण्यावरील मुद्रावरून राजाची व त्याचे धार्मिक धोरणाची माहीती समजते. नाण्यावरील लिपी मुळे भाषेचे ज्ञान, तसेच लिपीत झालेला बदल याची माहिती मिळते. प्राचीन जनपद व महाजनपदांनी **अहत नाणी** मोठ्या प्रमाणात पाडली. त्या नाण्यावर प्राणी, नदी, सूर्य, चंद्र, फुले व अनेक धार्मिक चित्र कोरली. **इंडो-ग्रीक** नाण्यावर राजाची नावे, चित्रे, कोरली. **सातवाहन नाण्यावर** हात्ती, बैल, राजाची नावे आहेत. कुशाण, गुप्त, राजपुत घराण्यातील राजानी स्वतःची नाणी निर्माण केली. या नाण्याच्या आधारे तत्कालीन राजकीय, आर्थिक, धार्मिक व सामाजीक व सांस्कृती माहिती प्राप्त होती त्यामुळे नाणी इतिहासाचे साधन म्हणून अतिशय महत्वाचे आहे.

५) **आलेख :-** प्राचीन भारताच्या इतिहास लेखनामध्ये आलेखाची महत्वाची भूमिका आहे. हे आलेख पाषाण व ताम्रपट्यावर कोरलेले आहेत. **बोझागकोई** हा मध्य आशियातील इ. स. पूर्व १५०० च्या दरम्यानचा **भारतातील सर्वात प्राचीन** शिलालेख आहे. त्यात ऋग्वेदकालीन मित्र, वरुण इ. आर्यसदृश देवतांचा उल्लेख आहे. आर्यांच्या मूळवसतीस्थानासंबंधीची माहिती मिळते. **सम्राट अशोकाच्या** काळात आलेख कोरण्याची पद्धत अधिक विकसीत झाली.

आलेखामध्ये शिलालेख, गिरीलेख, धातूलेख स्तंभलेख गुहालेख, मूर्तिलेख, मंदिरलेख, पत्रलेख, ताम्रपट, भूर्जपत्रे इत्यादींचा समावेश होतो. आलेखामधून राजकर्त्यांचा विजय, किर्ती, दानधर्म, उत्सव, चांगले कार्य, व्यापार विषयक, अदभूत, प्रशासकीय, प्रासंगिक, धार्मिक, साहित्यीक इ. संदर्भात वर्णन आहे.

i) **शिलालेख :-** प्रामुख्याने पर्वतीय प्रदेशात मोठ्या खडकावर कोरलेल्या आलेखाना शिलालेख म्हणतात. अशोकाच्या चौदा आलेखाचा सर्वप्रथम उल्लेख शिलालेख म्हणून करतात. हे शाहाबजगडी, मानलेहरा, कालसी, गिरनार, सोपारा, धौली, जौगड, येरंगुडी इ. ठिकाणी आहेत. यामध्ये अशोकाच्या विजयाची, हृदयपरिवर्तनाची, धर्मप्रचाराची, आणि सामाजीक व आर्थिक धोरणाची माहिती मिळते. त्याचे **लहान शिलालेख** म्हणजे बैराठ, जटिंग, रामेश्वर, ब्राम्हगिरी इ. होय. **"प्रियदसि"** नावाने कोरलेले आलेख हे सम्राट अशोकाचे आहेत, याची माहिती सर्व प्रथम **मास्की आलेखावरून** मिळते. कारण "प्रियदसि" नावाबरोबर "असोकस" शब्दाचा उल्लेख केलेला आहे. रूद्रदामन व स्कंन्दगुप्ताचा **जुनागढ शिलालेख**, पुष्यमित्र शुंगाचा **अयोध्याचा शिलालेख**, यामधून त्यांची माहिती मिळते. **हाथीगुंफा शिलालेखा**तून कलिंगचा राजा खारवेलची व नाशिकजवळ पांडवलेणी शिलालेखातून सातवाहन व शक क्षत्रप यांच्या सघर्षाची माहिती मिळते.

ii) **स्तंभ लेख :-** एखाद्या ठिकाणी स्तंभ उभा करून त्यावर कोरलेला आलेखाला स्तंभलेख म्हणतात. स्तंभ उभारण्याची **परंपरा सिंधू संस्कृति** पासूनची आहे. परंतू स्तंभावर आलेख कोरण्याची **परंपरा सम्राट अशोकापासून** सुरू झाली. अशोकाचे स्तंभलेख नंदनगढ, लौरिया, दिल्ली, इलाहाबाद येथे प्राप्त झाले. नेपाळमधील रूम्मिनदेई, निगलीवा स्तंभलेखातून अशोकाचे बौध्दधर्म यात्रा यासंदर्भात माहिती मिळते. सांची व सारनाथ स्तंभलेखातून बौध्दधर्मातील मतभेद दूर करण्यासाठी अशोकाने केलेल्या प्रयत्नाची माहिती मिळते. अशोकाचे वायव्यप्रांतातील स्तंभलेख **खारोष्टी लिपीतील** असून बाकी सर्व ब्राम्ही लिपीतील स्तंभलेख आहे.

हेलियोडोरसच्या **बेसनगर स्तंभलेखातून** बौद्ध धर्माची लोकप्रियता, सामाजिक, धार्मिक इ. माहिती मिळते. **अलाहाबाद** येथील अशोकाच्या स्तंभावर कवी हरिसेन याने समुद्रगुप्ताचा स्तंभलेख कोरला. यशोवर्माचा **मंदसोरचा स्तंभलेख**, दुसऱ्या पुलकेशीचा **ऐहोळचा स्तंभलेख**, **स्कंदगुप्ताया भितरीचा स्तंभलेख**, उल्लेखनीय आहे. काही स्तंभलेखात संस्कृत नाटकाचे प्रवेश, संगीतशास्त्राचे नियम, विशिष्ट दान दिल्याची माहिती मिळते. विशिष्ट योध्दयाचे प्रतीक म्हणून काही स्तंभ (विरगळ) उभारलेले दिसतात. सतीचे प्रतीक म्हणूनही काही स्तंभ आहेत.

iii) **गुहालेख :-** प्राचीन काळात गुहालेख अनेक शासकानी कोरले आहेत. त्यामधून त्यांचे राजकीय जीवन तसेच तत्कालीन सामाजीक, धार्मिक स्थितीची माहिती मिळते. अशोकाच्या धार्मिक सहिष्णूतेची, बराबर गुहालेखातून, दशरथाचे जैनधर्मावरील प्रेमाची **नागार्जूनी गुहालेख**, सातवाहनाच्या उत्पत्ति, मुळस्थांना विषयाची माहिती **नासिक गुहालेखातून**, चंद्रगुप्ताच्या गुजराथ विजयाची **उदयगिरी गुहालेखातून** माहिती मिळते. नाणेघाटचा नागनिकाचा लेख, तसेच कार्ले, अमरावती येथील गुहालेख महत्वाचे आहेत.

iv) **मंदिर लेख :-** भारतामध्ये, मंदिर व बौध्दधर्माचे स्तुप निर्माण करण्याची परंपरा सुरू झाली. तेव्हापासून काही धार्मिक तत्वे सुरक्षित ठेवण्यासाठी व प्रचारासाठी मंदिराच्या भिंतीवर दरवाज्यावर कोरले. भरहुत स्तुपची चारी भिंतीवर "सुगन रजे" हा लेख शुंग शासकानी कोरले

आहेत. भितारी येथील स्कंदगुप्ताचा तर ऐहोल मंदिर परिसरातील पुलकेशीचा आलेख महत्वाचा आहे.

v) **मूर्तिलेख :-** मूर्तिनिर्मितीबरोबर मूतिलेख विकसीत झाले. यामध्ये कनिष्कची मूर्तीवरील लेख, जैनमूर्तीवरील राजगुप्ताचा लेख, करमदण्डा व मानकुवरच्या मूर्तीवरीह कुमारगुप्ताचा लेख, इ. महत्वाचे मूर्तीलेख आहेत. पिपरवाच्या अभिलेखात गौतम बुध्दाच्या अस्थिंची माहिती मिळते.

vi) **भूर्जपात्र आलेख :-** धातुच्या पत्र्याप्रमाणे झाडाच्या पानाचा ही उपयोग केला जात होता. यामध्ये **पिप्रा कलश** लेख पात्र, **नळदमयंतीयांची** प्रेमपत्रे प्रसिद्धत आहेत.

vii) **ताम्रपट / धातूलेख :-** प्राचीन काळात राजातर्फे एकादया व्यक्तीला दान देताना ते तांब्याच्या पत्र्यावर कोरून दिले जात त्यास ताम्रपट म्हणतात. ताम्रपत्रवर प्रथम कुलदेवतेची प्रर्थना, वंशावळी, घराण्याचा इतिहास कोरत असे. त्यानंतर तुझ्यासाठी व काय दान दिले याची माहिती असे. **संजन ताम्रपट**, **सांगली** व **काम्बेचे** ताम्रपटातून रामगुप्तची माहिती मिळते. अमोघवर्षांचे **संजन ताम्रपट**, कुमारगुप्ताच्या काळातील **धनैदह ताम्रपट**, व **बैग्राम ताम्रपट**, हर्षवर्धनचा **बॉसखेडा ताम्रपट** महत्वाचा आहे. **कुशीनगर** येथील तेरा ओळीच्या ताम्रपटान उदान सुत्राची माहिती मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१. आलेखाची माहिती द्या.

## १.३ प्राचीन भारतीय इतिहासाची लिखित साधने :

प्राचीन भारताच्या इतिहासाची माहिती देणारी लिखित साधने अतिशय महत्वाची आहेत. लिखित साधनामध्ये विविधता व समृद्धता आहे. भारतीय भाषेतील साधने आणि अभारतीय / विदेशी साधने असे लिखित साधनाचे दोन प्रकार मानले जातात. भारतीय भाषेमध्ये जी साधने उपलब्ध आहेत त्यांचे विभाजन दोन वर्गात करता येते ते म्हणजे **धार्मिक /धर्मग्रंथ आणि धर्मनिरपेक्ष किंवा लौकिक साधने** होय. धर्मग्रंथामधून तत्कालीन धर्माचे स्वरूप आणि समाज रचना यांचे चित्रण रेखाटले आहे. धर्मनिरपेक्ष ग्रंथामधून तत्कालीन आर्थिक, राजकीय आणि ऐतिहासीक घटनांचे संदर्भ दिलेले आहेत.

## अ) हिंदू धर्माचे धार्मिक साहित्य :-

प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये धर्माला अतिशय महत्वाचे स्थान आहे. धर्माचे विचार प्रसार या उद्देशाने धर्मग्रंथाचे लेखन केले. धर्मग्रंथामधून भारतीय राजनिती समाज, धर्म, संस्कृती याची माहिती मिळते. प्राचीन काळात तीन प्रमुख धर्म होते. त्यांनी जे साहित्य निर्माण केले त्याचे विभाजन हिंदु धर्मग्रंथ, बौध्द धर्मग्रंथ, जैन धर्मग्रंथ असे करता येईल. हिंदु धर्मग्रंथामध्ये वैदिक साहित्य, श्रुती वाङमय महाकाव्य, पुराण इ. समावेश होतो. वैदिक साहित्यामध्ये श्रुतीवाङमय सुत्रवाङमय असे दोन प्रकार आहेत. श्रुतीवाङ्मयामध्ये वेद / संहिता, ब्राम्हणग्रंथ, आरण्यके, उपनिषेद, वेदांगे यांचा समावेश होतो.

**१) संहिता / वेद :-** प्राचीन भारताची सर्वात मोठी देणगी म्हणजे **वेद** होय. ते सर्व भारतीय विद्यांचे उगमस्थान आहे. मुळ संस्कृत विद् (जाणणे) धातूपासून वेद हा शब्द-प्रचलीत झाला. वेद या शब्दाचा अर्थ **ज्ञान** असा आहे. धर्मज्ञान संग्रहित करणाऱ्या ग्रंथाना वेद असे संबोधण्यात येऊ लागले. हे ज्ञान पिढ्यानुपिढ्या अखंड **मौखिक परंपरेने** चालत आले आहे म्हणून त्याला **'आगम' किंवा 'श्रुति'** असे म्हणतात. ऋक् / ऋचा म्हणजे श्लोक किंवा छंदोध्द रचना होय. वेदाची रचना लोकांनी केलेली नसून ब्रम्हदेवाच्या मुखातून आलेल्या वाक्यांचा संग्रह होय. वेद हे **अपौरूषेय** आहेत. वेदातील मंत्रांना **संहिता** असे म्हणतात. वैदिक वाङ्मयाचे तीन वर्ग पाडता येतील. **पहिला वर्ग म्हणजे संहिता** होय. (संहिता म्हणजे मंत्रसंग्रह किंवा भिन्न भिन्न देवतांना उद्देशून लिहिलेल्या प्रार्थना होय.) **दुसरावर्ग ब्राम्हणग्रंथ किवा आचारधर्म**. **तिसरा म्हणजे उपनिषदे अथवा तत्वज्ञानविषयक** ग्रंथाचां समावेश होय. संहिता म्हणजे वेद होय. वेदामध्ये ऋग्वेद, सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद असे चार प्रकार आहेत. ते पुढील प्रमाणे.

i) **ऋग्वेद :-** जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ रचना असून त्याची निर्मिती **इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. १०००** च्या दरम्यान झाली. ऋग्वेद हा शब्द **ऋक्+वेद** या दोन शब्दापासून बनलेला आहे. ऋक् याचा अर्थ श्लोक किंवा छदंबध्द रचना आणि वेद म्हणजे ज्ञान होय, श्लोकमध्ये / छंदबद्ध रचनेत असलेले ज्ञान म्हणजे ऋग्वेद होय. आर्यांच्या भारतातील अगमनापूर्वी आणि अगमनानंतरही ऋग्वेदाची रचना केली. अनार्थ ऋचा नष्ट करतील, या भितीपोटी आर्यांनी ऋचाच्या विषयानुसार चार विभाग केले. त्याला **संहिता** म्हणतात. त्यांनंतर ऋग्वेद ऋक्-संहिता नावाने प्रसिद्ध झाला. ऋग्वेदसंहिता म्हणजे इतर तीन वेदांचे उगमस्थान होय. ऋग्वेदातील मंत्र म्हणणाऱ्या पुरोहिताला **'होता'** असे म्हणतात ऋग्वेदात १० मंडले व १०२८ सुक्ते आहेत. ऋग्वेदातील मंडले अनेक ऋषीनी रचली आहेत. पहिल्या, नवव्या, दहाव्या मंडळाचे ऋषी अनेक आहेत. दुसरे मंडळ - **गृत्समद ऋषी,** तिसरे - **विश्वामित्र**, चौथे - वामदेव, पाचवे - **अत्रिऋषी,** सहावे - **भारद्वाज**, सातवे **वासिष्ठ** आठवे मंडळ - **कज्ब व अंगिरसा** ऋषीनी रचले आहे. ऋग्वेदातील कठीण भाषेचा अर्थ समजण्यासाठी **निघण्टू** व **निरूक्त** हे दोन ग्रंथ तयार करण्यात आले. निघण्टू म्हणजे **वैदिक शब्दांचा** कोश असून हा ग्रंथ **कश्यप महर्षीनी** लिहिला आहे. **निघण्टूवरील यास्काचार्यांचे** भाष्य म्हणजे निरूक्त होय. निघण्टुचे चौदा अध्याय आहेत ऋग्वेदातील प्रत्येक सुक्ताच्या प्रसंगी त्याची रचना करणाऱ्या ऋषीचे नाव आणि गोत्र याची माहिती दिलेली आहे. ऋग्वेदातला **मुख्यदेव इंद्र** आहे. त्याच प्रमाणे वरूण देव यांना वाहिलेल्या ऋचा आहे. विश्वाची निर्मिती व विकास यासंदर्भात प्रथम या ग्रंथात

माहिती मिळते. लोकांचे जीवन, राजेरजवाडे, कुटुंबसल्या धर्म, संस्कृती इ. माहिती मिळते. ऋग्वेदाच्या दहाव्यामंडळातीह पुरूषमुक्तात वर्णव्यवस्थेचा उल्लेख आहे.

ii) **सामवेद :-** सामवेदाची रचना इ.स.पू. **१००० ति इ.स.पू. ५००** च्या दरम्यान झाली. साम म्हणजे गायन होय. यज्ञाच्यावेळी गावयाच्या ऋचा संग्रह म्हणजे सामवेद होय. ३६ प्रकारे वेदमंत्र यात सांगितले आहेत. गाण्याच्या चालीवर ऋचा म्हणण्याचे काम ज्या पुरोहिताकडे असे त्यास **उदगाता** असे म्हणतात. सामवेदामध्ये **१५४९ ऋचा** आहेत. त्यामधील ७५ ऋचा वगळता बाकीचे उरलेले सर्व ऋचा ऋग्वेदातील आहेत. सामवेदाच्या कौयुम व जैमिनीय अशा दोन संहिता आज उपलब्ध आहेत. आर्चिक व उत्तरार्चिक असे दोन भाग आहेत. आर्थिकात ५०५ रागांचा संग्रह तर उत्तरार्चिकात ४०० गान आहेत. **यज्ञकर्म** व **भारतीय संगीत** यांचा इतिहास समजण्यास सामवेदाचा उपयोग होतो.

iii) **यजुर्वेद :-** यजु (यज्ञ) वेद (ज्ञान) = यजुर्वेद होय. **यज्ञासंदर्भात ज्ञान देणारा ग्रंथ** म्हणजे यजुर्वेद होय. या वेदातील मंत्रांना **'यजस'** म्हणतात. यजुर्वेदामध्ये **शुक्ल व कृष्ण** असे दोन भाग आहेत. **कृष्ण** यजुर्वेदात मंत्र व त्यावरील गधविवेचनयाचा समावेश आहे. भाषेच्या स्वरूपावरून कृष्ण यजुर्वेद हा शुक्ल यजुर्वेदापेक्षा जुना आहे. कृष्ण यजुर्वेदाच्या **तैत्तरीया, मैत्रायणी, काठक, कपिष्ठलकठ, श्वेताश्वर** अशा पाच संहिता आहेत. शुक्ल यजुर्वेदात फक्त मंत्रांचाच समावेश आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या **काण्व व माधंदीन** अशा दोन संहिता आहेत. शुक्ल यजुर्वेदाचे ४० अध्याय आहेत. प्रार्थना पद्धतीचा प्रारंभ व वाढ, धर्म व त्याचा विकास याची माहिती मिळते या वेदामध्ये कर्मकांडाला प्राधान्य दिलेले आहे. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद यांना **'त्रयी' किंवा 'त्रयी विद्या'** असे म्हणतात.

iv) **अथर्ववेद :-** हा अग्निउपाक पुरोहितांचा वेद आहे. त्याचे मुळ नाव **अथर्वोभिरस** होय. **अथर्वा ऋषीने** रचना केल्याने त्याला अथर्ववेद म्हणतात. अथर्ववेदात ४० अध्याय असून, ७३१ सुक्ते व ६००० ऋचा / मंत्र आहेत. याचा एकूण १/३ भाग ऋग्वेदातूनच घेतला आहे. अथर्ववेदाच्या **शौनक व पिप्पलाद** या दोन शाखा आहेत. यामध्ये जादुटोणा, तंत्रमंत्र, अंधश्रद्ध व्रात्यस्तोम इ. विषयाची माहिती आहे. या शिवाय **आयुर्वेद, अर्थशास्त्र** यांची सुरूवात यामध्ये आढळते. या वेदामध्ये आर्य-अनार्य याच्या विचारांचा समन्वय स्पष्ट स्वरूपात दिसतो हे महत्वाचे आहे.

२) **ब्राम्हणग्रंथ :-** ब्रम्हा म्हणजे यज्ञकर्मातील एखाद्या मुद्द्यावर केलेले विवेचन म्हणजे **ब्राम्हण** होय. ब्राम्हणांचे वर्णन यज्ञशास्त्रग्रंथ असेही करता येईल ब्राम्हाण ग्रंथ जास्त प्रमाणात **गद्यशैली** असून, धर्म व यज्ञाच्या संदर्भात माहित आहे. ब्राम्हण ग्रंथातील विचारसरणी **गुढवादी, प्रतिकात्मक व रूक्ष** आहे. या ग्रंथाचा मुख्य विषय म्हणजे **मूळ वेदातील कठीण विभागाचे स्पष्टीकरण** करणे होय. त्याचे **विधि व अर्थवाद** असे दोन भाग आहेत**. विधि** विभागात यज्ञाचे विधी कसे करावेत तर **अर्थवाद** विभागात यज्ञकर्म, मंत्र यातील हेतू, अर्थ यांचे विवेचन केले आहे. प्रत्येक वेदापासून निरनिराळे ब्राम्हणे तयार झालेले आहेत.

**ऋग्वेदाची ऐतरेय व कौषीतकी** ही दोन ब्राम्हणे आहेत**. ऐतरेय ब्राम्हणात** सोमयाग, अग्निहोत्र, राजसूय यज्ञाचे वर्णन आहे. **कौषीतकि ब्राम्हणात** ऋतुयाग, सोमयाग, अग्नयधान

इ. माहिती आहे. **सामवेदाची** पंचविश (तांड्य) व षड्विंश ही दोन ब्राम्हणे आहेत. **पंचविश ब्राम्हणात** व्रात्यस्तोम विधीचे वर्णन आहे. **यजुर्वेदाची** तैत्तिरीय व शतपथ ही दोन ब्राम्हणे आहेत. **तैत्तिरीय ब्राम्हण** हा कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेचा उत्तरभाग असून, पुरूषमेधाच्या वर्णनावरून वेदकाली यज्ञसंस्थेत नरमेधाय अंतभीव होत असे. सर्व ब्राम्हणात **शतपथ ब्राम्हण** हे प्रमुख ब्राम्हण आहे. शुल्क यजुर्वेदाचा ब्राम्हणग्रंथ आहे. शंभर अध्याय आहेत. **अथर्ववेदाचे गोपथ** ब्राम्हण आहे या मध्ये बराचसा भाग ऐतरेय व शतपथ ब्राम्हणातून घेतला आहे. एकूण सात ब्राम्हणे आहेत ते म्हणजे एतरेय, कौषीतकी, पंचविश, षडविंश, तैत्तिरीय, शंतपथ गोपथ इ. होय. ब्राम्हण ग्रंथातून तत्कालीन बैदिकधर्म, सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनाची माहिती मिळते.

३) **आरण्यके :-** ब्राम्हण ग्रंथाची **पुरवणी** म्हणजे आरण्यके होय. आरण्यके म्हणजे अरण्यात असताना ऋषीमुनीच्या चिंतनातून प्रकटलेले ग्रंथ होय. यज्ञाचे मुळस्वरूप, त्याचे गुढार्थ, तत्वज्ञान याचे विवेचन करणे. उपनिषदाची सुरूवात **आरण्यके पासून** झाली असे म्हणावयास वाटते.

४) **उपनिषदे :-** वैदिक आर्याच्या **तत्वज्ञानाचे पूर्णरूप** म्हणजे उपनिषदे होय. आरण्यकांत ब्राम्हज्ञानाची जेवढी चर्चा झाली, तेवढ्या भागाला **उपनिषद** म्हणतात. ब्राम्हाणग्रंथाच्या नंतर **आरण्यके व उपनिषदे** येतात म्हणून त्यांना **वेदान्त** असेही म्हणतात. वैदिक ज्ञानाचा अंतिम निष्कर्ष व ध्येय यामध्ये सांगीतले आहे. असे शंकराचार्य सांगतात. उपनिषद हा शब्द **उप नि सद** म्हणजे **'जवळ बसणे'** या धातूपासून निघाला असून त्याचा मूळ अर्थ गुढज्ञानाची माहिती घेण्यासाठी छात्राने गुरूजवळ बसणे हा आहे. उपनिषदे ही ब्राम्हणग्रंथाची अंगभूत **अंगे** आहेत. मुख्य उपनिषेद ही इ.स.पू. १२०० ति ६०० पर्यंतच्या काळात रचली आहेत. **जीवात्मा व परमात्मा** या दोन विषयाचे तात्विक विवेचन या ग्रंथातून केलेले आहे. **'तत्वमसि'** हा उपनिषदांच्या तत्वज्ञानाचा गाभा आहे. भारतीय तत्वज्ञानाची बैठक उपनिषदांनी घातली आहे. आत्मज्ञानासाठी तप, संन्यास, योग इ. मार्ग सांगीतले आहे. **वेवरच्या** मने २३५ उपनिषदे आहेत. **मुक्तिकोपनिषदात** १०८ उपनिषदे सांगितली आहे. ईंश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छान्दोग्य, बृहदारण्यक ही **दशोपनिषदे जूनी व महत्वाची** आहेत. कौषीतकी, मैत्रायणी, श्वेताश्वर मिळून **त्रयोदश उपनिषदे** प्रसिद्ध आहेत.

५) **वेदांगे -** वेदाची पुरकशास्त्रे म्हणजे वेदांगे होय. वेद परंपरातील सिद्धांत सुत्ररूपाने एकत्र ग्रंथित करण्यात आले या वाडःमयास सुत्रवाङ्मय असे म्हणतात. श्रवम परंपरेने आलेले ज्ञान स्मरणात राहण्यासाठी हे वाङमय असल्याने त्यास **स्मृती** असे म्हणतात. हे ग्रंथ वेदांच्या अंगभूत असल्याने त्यांना वेदांगे म्हणतात. एकूण ६ वेदांगे आहेत. १) शिक्षाया वेदांगामध्ये स्पष्ट उच्चार आणि संहिता - पाठ कसा घ्यावा याची माहिती आहे. शिक्षेच्या ग्रंथाना **प्रातिशाख्ये** असे म्हणतात. २) **कल्पयाचे** तीन भाग आहे. **श्रौतसुत्र** - यज्ञ व इष्टी संबंधीचे नियम सांगीतले आहे. **गृहसुत्र**-यामध्ये इहलोक व परलोक या संबंधीची कर्तव्य सांगीतली आहे. **धर्मसुत्र**-यामध्ये सामाजिक जीवनासंदर्भातील नियम आहे. शुल्क सुत्र-यामध्ये यज्ञकुंडाच्यी रचनेसंदर्भात माहिती दिलेली आहे. कल्पसुत्रामध्ये धर्म, समाज, राजनिती संदर्भात माहिती सांगीतलेली आहे. ३) **व्याकरण** - यामध्ये व्याकरण विषयक नियमांचे विवेचन केले आहे. पाणिनीच्या

**अष्टाध्यायीलाय** वेदांग व्याकरण मानतात. ४) **निरूक्त** - वेदातील कठिण भाषेचा अर्थ सांगितालेला आहे. निरूक्त हा ग्रंथ यास्काचार्यां लिहिला. ५) **छंद** - वैदिक मंत्र विशिष्ट छंदातच म्हंटला पाहिजे असा दंडक होता. त्यामुळे या शास्त्राचा विकास झाली. पिंगलाची छन्दसुत्रे ही वेदांगे मानली जातात. ६) **ज्योतिष** - यामध्ये ऋग्वेद ज्योतिष, यजुर्वेद ज्योतिष, अर्थवेद ज्योतिष असे तीन भाग आहेत. ग्रह कालगणना, नक्षत्र, युगकल्पाना इ. माहिती आहे. आर्यभट्ट, लल, वराहमिहिर, ब्रम्हगुप्त, भास्कराचार्य इत्यादींना ज्योतिषशास्त्राची प्रगती केली.

६) **उपवेद** - आयुर्वेद, धनुर्विद्या, गांधर्ववेद, शिल्पकला व इतर कला या विषयावरील ग्रंथ म्हणजे **उपवेद** होय. अर्थशास्त्र हा ग्रंथ उपवेदांत यामध्ये समावेश होतो.

७) **धर्मशास्त्रे व स्मृति वाङ्मय** - प्राचीन भारताच्या कायदेविषयक साहित्याला **धर्मशास्त्र** म्हणतात. हिंदू कायदयाची मुळ बिजे **कल्पसुत्रातील धर्मसुत्र**, व गृहसूत्र यामध्ये सापडतात. सर्व धर्मसुत्रांत गौतमाचे धर्मसुत्र हे प्राचीन असावे. बौध्दायन धर्मसूत्र, वाशिष्ठधर्मसुत्र मानवधर्मसुत्र, हारितधर्मसुत्रे इ. धर्मशास्त्रे आहेत. धर्मशास्त्रा प्रमाणेच स्मृतिचे महत्व असाधारण आहे. वारसाहक्क, दानविधान, स्त्रीधन, कुटुंबपद्धत, माहमाना इ. संदर्भात हिंदुकायदा स्मृतिग्रंथ आहेत. मनुस्मृती ही प्राचीन असून याज्ञवलक्य, विष्णू नारद, पराशर, बृहस्पति इ. स्मृतिग्रंथ आहेत.

८) **महाकाव्य** - रामायण व महाभारत ही दोन महाकाव्य आहेत. रामायण हे महाकाव्य वाल्मिकीने रचले असून ते ७ कांड आणि २४००० श्लोक आहेत. त्याला **आदिकाव्य** म्हणतात. महाभारताची रचना **व्यास** यांनी केली. कौरव-पांडव यांच्यातील संघर्ष वर्णन केले आहे. महाभारतामध्ये **१ लाख श्लोक** आहेत म्हणून त्याला **शतसाहस्त्री संहिता** म्हणतात.

९) **पुराण** - पुराणांची रचना इ. स. ४०० च्या दरम्यान झाली असावी. १८ पुराणे व १८ उपपुराणे आज उपलब्ध आहेत. विष्णू, वायू, मत्स्य, ब्रम्ह, भविष्य ही पुराणे इतिहायाची साधन म्हणून उपयुक्त आहेत. प्रत्येक पुराणाचे पाच भाग पाडले आहेत. पुराणातून राजकीय, सामाजिक, धार्मिक माहिती मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

**१.** हिंदू धर्मातील वेदांची माहिती द्या.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**ब) धर्मनिरपेक्ष किंवा लौकिक साधने** - धर्मग्रंथाशिवाय जी इतर साहित्य आहेत ती धर्मनिरपेक्ष साधने होय. ही साधने संस्कृत, प्राकृत, अप्रभ्रंश, द्राविड कन्नड इ. भाषेत आहेत. या शिवाय प्राकृत भाषेच्या पाली, अर्धमागधी, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री इ. अनेक उपप्रकारच्या भाषेतीह साधनामध्ये लेखन झालेले आहे. धर्मनिरपेक्ष साधनामध्ये चरित्रे, काव्य, कथा कादंबरी, नाटक, शास्त्रीय साधने महत्वाची आहेत.

१) **चरित्र ग्रंथ** - प्राचीन भारतामधील चरित्रग्रंथ हे महत्वाचे साधन आहे. अश्वघोषचे **बुद्धचरित्र** हा सर्वात प्राचीन चरित्रग्रंथ आहे. बाणभटाच्या हर्षचरित्र मधून हर्षवर्धनाची माहिती मिळते. **वाक्पतीने** कनोजच्या यशोधर्मनच्या जीवनावर गौडवह या चरित ग्रंथाचे लेखन केले. बिलहाणाने चालुक्य राजा विक्रमादित्याच्या जीवनावर **विक्रमाकदेवचरित्र**, जयसिंहाने – कुमारपालचरित्र, भोजप्रबंध इ. महत्वाचे चरित्र ग्रंथ आहेत. त्यामधून ऐतिहासिक माहिती मिळते.

२) **काव्य** - संस्कृत काव्याचा उद्या इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात झाला असावा. संस्कृत काव्याची बीज वैदिक वाङमयात आढळते. आज सर्वात जुने असे उपलब्ध काव्य म्हणजे अश्वघोषचे **बुद्ध चरित्र** होय. **अश्वघोषचे** सौदशनंद, बुद्धचरित्र, **कुमारलाटचे** सुत्रालंकार, **कालिदासचे** कुमार संभव, मेधदुत, रघुवंश, **भारविचे** - किरातार्जुनीय इ. प्रमुख काव्य आहेत. या शिवाय काही **लौकिकगीते** आहेत. त्यामध्ये नलोदय, शृंगारतिलक, इ. समावेश होतो. प्राचीन काळातील **कविता संग्रहामध्ये** कवीन्द्र - समुच्यय, सदुक्तिकरणामृत, सुभाषित मुक्तावली इ. काव्य संग्रहाचा समावेश होतो. या काव्यामधून तत्कालीन संस्कृतीचे स्वरूप पहावयास मिळते.

३) **नाटक** - भारतीय नाट्याचे उगमस्थान **ऋग्वेदात** आहे. वेदकालीन मुकाभिनय व करमणूकीकरता सांगितलेल्या दंतकथा यांच्या संयोगामुळे नाटकाचा उदय झाला असे म्हणता येईल. भारतीय नाट्याची जन्मभूमी **शैरसेनची** राजधानी **मथूरा** होय. अश्वघोष हा सर्वात प्राचीन नाटककार असून त्याचे सारीपुत्त - प्रकरण हे नाट्य वाङमयातील पहिले नाटक मानले जाते. **भासाने** १३ नाटके लिहिली. **कालिदासने** शाकुंतला, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय ही नाटके लिहिली. **विशाखादत्ताने** मुद्राराक्षस हे चंद्रगुप्ताच्या जीवनावर नाटक लिहिले आहे. **हर्षवर्धनाची** नागनंदा, रत्नावली, प्रियदर्शका ही नाटके आहे. **भट्टनारायणचे** वेणीसंहार, **भवभूतिचे** मालतीमाधव, महावीरेचरित्र, उत्तररामचरित्र इ. नाटके आहेत. नाटकामधून तत्कालीन राजकीय, सामाजीक, धार्मिक जीवनाची माहिती प्राप्त होती.

४) **कथा - कादंबरी** - कथा वाङमयाची सुरूवात वेदामधील **पुरूरवा-उर्वशीच्या** कथापासून झाली. दंतकथा, आख्यायिका, गोष्टी, परिकथा, उपदेखपद कथा इ. **कथाचे प्रकार** आहेत. **अतिप्राचीन कथासंग्रह** म्हणजे बौद्धधर्मीयांचे **अवदान** हा होय. पंचतंत्र, जातककथा, बृहदकथासंग्रह या दंतकथा आहेत. आंध्रप्रदेशाचा प्रधान **गुणाढ्याने** बृहकथा पैशाच्या भाषेत लिहिली आहे. **सोमदेवाचे** कथासरितसागर **क्षमेन्द्राचे** बृहतकथामंजरी **दंडीचे** दशकुमारचरित्र **सुबन्धुने** वासवदात्ता कथा लिहिली. शुकसप्तती या कथेचे फारशी भाषांतर **तुतीनाम** या नावाने केले आहे. श्रीहर्षांच्या दरबाराचा राजकवी **बाणभट्टाने** कादंबरी व हर्ष चरित्र दोन ग्रंथ

लिहिले. या साहित्यातून लोकजीवन, लोकसमजूती, राजा - सामान्य माणसाचे जीवन याची माहिती मिळते. कादंबरी हा प्रकार **बाणभट्टाने लोकप्रिय** केला.

५) **शास्त्रीय वाङ्मय -** शास्त्रीय वाङमयाची सुरूवात वैदिककाळात झालेला दिसते. शास्त्रीय वाङमयाच्या अनेकशाखा आहेत **१) व्याकरण** - भारतीयांचे **आद्यशास्त्र** म्हणजे व्याकरण होय. त्याच्या अभ्यासाची सुरूवात शाकल्याच्या ऋग्वेदाच्या पदाने झाली. **निरुक्त** हा या विषयावरील **पहिला ग्रंथ** आहे. **पाणिनीचे** अष्टाध्याची (शब्दानुशासन), **कात्यायनाचे** वार्तिक, **पंताजलीचे** महाभाष्य **भर्तुहरीचे** वाक्यपदीय इ. महात्वाचे ग्रंथ आहेत. पंतंजलिचे महाभाष्य हे सर्वात जुने भाष्य होय. **२) कोष** - भारतामध्ये कोषरचनेची सुरूवात **कश्यपमुनीच्या निधण्टू** ग्रंथापासून झाली. **धातुपाठ व गणपाठ** ही कोशाची पूर्वतयारी असे म्हणावे लागले. प्राचीन काळातील **आद्यकोष** म्हणजे **अमरसिंहाचे** नामलिंगानुशासन (अमरकोश) होय. या ग्रंथावरील सर्वात प्राचीन टिका लिहिली ते म्हणजे क्षीरस्वामींची **उदघाटन** होय. सर्वानंदाने टीकासर्वस्व या नावाने ही टिका लिहीली सुभूतीची कामधेनू **बृहस्थति रायमुक्तामणीची** पदचंद्रिका इ. महत्वाचे ग्रंथ आहे. **३) धर्मशास्त्र** - प्राचीन भारताच्या कायदेविषयक साहित्याला धर्मशास्त्र हे नाव आहे. कल्पसुत्रातील धर्मसुत्रे व गृहसुत्रे यामध्ये **कायद्याचा उगम** झाली. **गौतमाचे** धर्मसुत्र, वाशिष्ठचे धर्मसुत्र, बैधायनचे धर्मसुत्र, वैष्णावचे धर्मसुत्र इ. महत्वाची आहेत. **४) स्मृति -** धर्मशास्त्रावरील सर्वात लोकप्रिय ग्रंथ म्हणजे मनुस्मृति होय. याज्ञवलक्य स्मृति, नारदस्मृति बृहस्पतिस्मृत इ. ग्रंथ महत्वाचे आहेत. हिंदु **कायदा स्मृतिवर** आधारलेला आहे. कायदे विषयक माहिती आहे. **५) छंदशास्त्र पिंगलाचा छंद -** सुत्र हा छंदशाष्यावरील पहिला ग्रंथ होय. भरत, जयदेव, वराहमिहिर, उत्पलाने ही छंदशास्त्राच लेखन केले. **६) नाट्यशास्त्र** - भरतमुनीचे नाट्यशास्त्र हा यावरील पहिला ग्रंथ होय त्याला **नाट्यवेद किंवा पाचवावेद** असेही म्हणतात. **धनंजयचा** दशरुपक **विश्वनाथचा** साहित्यदर्पन हे नाट्य शास्त्राचे प्रमुख आहेत. **धनिकाने** अवलोक नावाची टिका लिहिली. नाट्यशास्त्राबद्दलची माहिती आहे. **७) साहित्यशास्त्र** - साहित्यशास्त्रावरील **सर्वात प्राचीन ग्रंथ** म्हणजे **अग्निपुराण** होय. भामह व **दडीयांनी** साहित्यशास्त्रावर स्वतंत्रपणे ग्रंथनिर्मिती केली. **भामहाचे** काव्यालंकार, **दण्डिचे** काव्यादर्श, उद्भटाचे अलंकारसारसंग्रह, वामनचे काव्यालंकारसुत्र रुद्रटचे काव्यालंकार, **राजशेखरचे** काव्यमीमांसे इ. महत्त्वाचे ग्रंथ आहेत. ८) **राज्यशास्त्र -** राज्यशास्त्रात अर्थशास्त्र, दंडनिती, राजनिती, नितीशास्त्र असेही म्हणतात. कायदा, अर्थशास्त्र व समाजशास्त्र इ. माहीती या शास्त्रामध्ये येते. महाभारताच्या शांतिपूर्व धर्मसूत्र, धर्मशास्त्र यामध्ये याची माहिती मिळते. राज्यशास्त्रामधील कौटिलीयाचे अर्थशास्त्र हा महत्त्वाचा ग्रंथ आहे. **कामन्दकचे** नितिसार **सोमेश्वराचे** 'अभिलाषितार्थ - चिंतामणी, भोजाचे 'युक्तिकल्पतरू' लक्ष्मीधरचे राजनितीकल्पतरू **कृष्णदेवरायचे** 'अनुक्तमाल्यद इ. ग्रंथ आहेत. **९) जोतिषशास्त्रा -** भारतीय ज्योतिषाशास्त्राची सुरुवात वैदिक ऋच्यात आढळते. यजुर्वेदात ४३ ऋग्वेदात ३६ श्लोक ज्योतिष शास्त्रा आढळतात. गार्गीसंहिता , वृध्दगर्गसंहिता (सर्वात जूना ग्रंथ) सुरिप्यपण्णती, महाभारतातील काही भागामध्ये, मानवधर्मशास्त्र यामध्ये माहिती आढळते. **१०) कामशास्त्र –** सुसंस्कृत व रसिक नागरिक, राजकन्या, उच्चपदवीच्या मुली व गणिका यांच्यासाठी कामशास्त्र आहे असा उल्लेख सापडतो कामशास्त्र ग्रंथामध्ये स्त्रीपुरुष संबंध हा मुख्य

विषय असाल तरीही लोकजीवनाची माहिती मिळते. मल्लनाथ-वात्स्यायनाचे 'कामसुत्र' हा **सर्वात** प्राचीन ग्रंथ होय. यशोधर इंद्रपादचे **जयमंगल** कोकाचे **रतिशास्त्र** कल्याणमल्लचे **अनंगरंग** हे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. जयमंगला हा ग्रंथ कामसुत्रावरील टीका होय **११) वैधक शास्त्र** - याचा प्रारंभ अर्थवेदातील **कौशिकसुत्र** मध्ये झाला. अथर्ववेद व शतपथब्राम्हण यामध्ये आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र या संदर्भात माहीती आहे प्रथम श्रेणीचा अत्रिय याला मानले जाते. भारतीय वैधकशास्त्राताचे तीन तज्ञ म्हणजे चरक, सुश्रूत वाग्भट इ. होय त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाना संहिता म्हणतात. चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, अष्टांगहृदयसंहिता (वाग्भटची) इ. महत्वाचे ग्रंथ आहेत. **१२) खगोलशास्त्र** – भारतीय खगोलशास्त्राच्या विकास मुख्यत्वेकरून **उत्तरवेदकाळात** झाला 'सिध्दांन्त' व कारण या संदर्भात ग्रंथ लिहिले. ब्राह्मणग्रंथामधून विश्वरचनेसंबंधीची मालिका त्यामध्ये उगम झालेली आहे. आर्यभट्टांचा **'आर्यभटीया (आर्य सिध्दांत)'** वराहमिहिरचा **पंचश्रध्दा न्तिका** ब्रह्मगुप्ताने **ब्रह्म-स्फुट सिध्दांनत'** भास्कराचार्याने **सिध्दांन्तशिरोमणी** हा ग्रंथ लिहिला. **१३) गणितशास्त्र** - आर्यभट्ट ब्रम्हगुप्त भास्कर हे प्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ आमि गणितीही होते. अंककणित बीजगणित, भूमिती याचा अभ्यास ग्रंथामध्ये आहे. ब्रह्मगुप्ताचा **ब्रम्हस्फुटसिध्दांन्त** भास्कराचा **सिध्दांन्त शिरोमणी** हे ग्रंथ आहेत ब्रह्मगुप्ताच्या ग्रंथात **कुट्टक** हे अध्यायान **बीजगणिताचा** विषय आहे. भास्कराच्या ग्रंथातील **लिलावती** अध्यायात **अंकगणिताची** चर्चा केली आहे. **दशमान पध्दतीचा** पुरस्कार प्रथम भारतीयांनी केला. **शुन्याच्या शोद** भारतीयांनी लावला. **त्रिकोणितीचा उपयोग** खगोलशास्त्रासाठी कला. शुल्कसुत्रामध्ये भूमितीशास्त्राचा उगम स्थान आहे. **१४) रसायनशास्त्र** – भारतीय रसायन शास्त्राचा उदय **अर्थवेदकाळा** पासून असावा. या विषयावरील प्रमुख ग्रंथ म्हणजे नागार्जूनचा 'सिध्दनागार्जून' होय. त्यामध्ये पाऱ्यासंबंधीचे विचार मांडले आहेत.

**६) संगमसाहित्य** – दक्षिण भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात उपयुक्त ठरणारे **तामिळी भाषेतील** संगम साहित्य होय. **पांड्य राजाद्वारे मदुराई** येथे विद्वानांची साहित्य परिषद भरवली. त्यामधून ज्यासाहित्याची निर्मीती झाली त्यास संगम साहित्य असे म्हणतात. **पहिली परिषद /संगम मदुराई /मदुरा** येथे भरते. ५४९ लेखकांनी लेखन केले. आज एकही ग्रंथ उपलब्ध नाही. दुसरे **संगम** कपाटपुरम / अलईवई येथे भरले त्यामध्ये ४४९९ लेखकांच्या ग्रंथाचे परिक्षण केले. तामिळी भाषचे व्याकरण 'तोलकाप्पिय' नावाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. तिसरे संगम उत्तरी मदुराई येथे भरले असून, पत्थूप्पातू, एतुत्थोकई पदिनेनकीलकनक्कू हे महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

**१.** हिंदू धर्माच्या लौकिक वाङमयातील शास्त्रीय साहित्या सांगा

**क) बौद्ध धर्माचे धर्मग्रंथ व लौकिक साहित्य :**

बौद्ध धर्माचे धर्मग्रंथ पाली, मागधी, संस्कृत इ. भाषेत लिहिले आहेत. त्रिपिटक, दीपवंश, महावंश, महावस्तू, ललित-विस्तार, बुद्धचरित मिलिन्दपन्हा इ. महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

**त्रिपिटक :**

बौद्ध धर्मग्रंथामध्ये महत्त्वाचे साहित्य आहे. विनय पिटक, सुत्तपिटक, अभिधम्मपिटक या तीन पिटकांना त्रिपिटक म्हणतात. त्रिपिटकाचे एकूण तीन भाग आहेत. ते पुढीलप्रमाणे.

**१) विनयपिटक :** भिक्षू - भिक्षूणी यांना पाळावयाच्या शिस्तीसंबंधीचे नियम सांगितले आहे. प्रारंभ ० ते १५२ असून, नंतरच्या काळात २२७ नियम झाले. विनयपिटकाचे तीन भाग आहेत.

**i) सुतविभाग :** याचे माहविभंग, भिक्षुणी विभंग दोन भाग आहेत. माहविभंगमध्ये प्रायश्चित्त विषयी माहिती असून आठ प्रकरणे आहेत. भिक्षुणी विभंगमध्ये नियम आहेत.

**ii) खण्दक :** याचे दोन भाग आहेत. महावग्गमये संघाची स्थापना, प्रवेश, नियम या संदर्भात दहा प्रकरणे आहेत. चुल्लवग्गमध्ये बुद्ध जीवन, संघाचा इतिहास भिक्षूचे नियम या संदर्भात बारा प्रकरणे आहेत.

**iii) परिवार :** यामध्ये वरील तीन भागाची माहिती प्रश्नोत्तर पद्धतीची आहे.

**२) सुत्तपिटक :** बौद्ध धर्माचे तत्वज्ञान असून धर्माची रुपरेषा स्पष्ट करते. याचे पाच संग्रह आहेत त्यांना निकाय असे म्हणतात.

**i) दीघनिकाय :** गौतमाच्या ३४ प्रवचनांचा संग्रह आहे. शिलाखंड, महावग्ग, पातिकवग्ग असे तीन उपविभाग आहेत. महापरिनिब्बानसूत हे प्रमूख असून बुद्धाच्या अंतिम जीवनाची कथा आहे.

**ii) मज्झिमनिकाय :** यामध्ये ५० सुत्र आहेत. बौद्धधर्माचे सिद्धांत व भिक्षूचे जीवनासंदर्भात माहिती आहे. धर्म कल्पना व समाजशास्त्राची माहिती आहे.

**iii) संयुक्तनिकाय :** बुद्धाच्या जीवनातील घटना, देवी-देवता, बौद्धधर्म सिद्धांत या संदर्भात माहिती आहे.

**iv) अंगुतरनिकाय :** यामध्ये ११ निपात म्हणजे भाग आहेत. प्रत्येत निपाकाचे अनेक भाग म्हणजे उपविभाग आहेत. बुद्धाच्या प्रवचनाची गुणानुक्रमाने मांडणी केली आहे.

**v) खुद्दनिकाय :** पुरवणी स्वरुपाचा संग्रहात्मक भाग आहे. धर्माची शिकवण, बुद्धाचे जीवन, धर्माची लोकप्रियता या संदर्भात माहिती आहे. खुद्दकपाठ, धम्मपद, उदान, इतिउत्तक, सुत्नीपात, विमानवथ्थू, पेटवथ्थू, थेरगाथा, थेरीगाथा, जातक, निद्देश, पतिसंविधामग्ग, अपदान, बुद्धवंश, चरियपिटक इ. खुद्दनिकायचे उपविभाग आहेत. धम्मपद हा सर्वात लोकप्रिय व प्रसिद्ध ग्रंथ आहे.

**उदान :** बौद्ध नितीचे विवेचन, इतिउत्तक : गौतमाच्या वचनांचा संग्रह, सुत्तनिपतात सुंदर संवाद सुक्ते व ब्रहोघे आहेत. थेरगाथा-थेरीगाथा - भिक्षू-भिक्षणी यांनी रचलेल्या कवितांचे संग्रह आहेत. जातक - बुद्धाच्या पूर्वजन्माच्या कथांचा विग्रह आहे.

जातकामध्ये ५४९ कथा आहेत. जातक कथांनी वाङ्मय शिल्प, कला यांना अनेक विषय पुरवले आहेत. आपदानमध्ये वीर व उदात्त कृत्यांच्या कथा आहेत.

**३) अभिधम्मपिटक :** सुत्तपिटकातील विषय प्रश्नोत्तर स्वरुपाने हाताळले आहेत. धम्मसंगणी, विभंग, धातुकला, पुग्गलपण्णात्ति, कथावस्तू, यमक, पठ्ठाण ही सात प्रकरणे आहेत. मोग्गलिपुत्र तिस्सने तिसऱ्या बौद्ध परिषदेत संकलित केलेला 'कथावस्तू' हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे.

**बौद्धधर्माचे लौकिक साधने :**

**दीपवंश :** याची रचना ४-५ शतकाच्या दरम्यान झाली. सिंहलीद्विपचा इतिहास आहे.

**महावंश :** महानाम कविने ५ व्या शतकात याची रचना केली.

**महावस्तू :** बुद्धाचे जीवनवृत्तांत सांगितला आहे. मिश्रित संस्कृत भाषेत लिहिला आहे. हीनायान पंथाच्या संबंधीत असूनही महायानपंथाची माहिती आहे.

**ललितविस्तर :** बुद्धाचे लौकिक जीवन मांडले आहे. बुद्धाला दिव्यशक्तिच्या रुपाने मानले.

**बुद्धचरित :** अश्वघोषने संस्कृत भाषेमध्ये बुद्धाचे चरित्र लिहिले आहे.

**सौन्दरनंद :** अश्वघोषने हे महाकाव्य संस्कृत भाषेत रचले आहे. बुद्धाचे जीवन, बौद्ध धर्माचे सिद्धांत मांडले आहेत.

**भवदान साहित्य :** अशोकाच्या उत्तराधिकारीपासून ते पूज्यमित्र शृंगापर्यंतची राजकीय माहिती आहे.

**मिलिन्द पन्हो :** मिलिन्द आणि नागसेन यांच्यातील धार्मिक प्रश्नोत्तर स्वरुपात आहे.

**पाली भाषेतील लौकिक ग्रंथ :** महाकश्यप याने नेत्तिकपकरण, पेटकोपदेश हे ग्रंथ लिहिले आहेत. बुद्धघोष याने विशुद्दिमग्ग, सामन्तपाशादिका, सुमंगलविलसिनी इ. ग्रंथ लिहिले. त्रिपिटकावर अनेक टीका ग्रंथ लिहिले. बुद्धदत्ताने विनयविनश्रय, उत्तरविनिश्रय, अभिधम्मावतार, रुपारुपविभंग, जीनालंकार इ. ग्रंथ रचना केली. कावेरी तीरावर कन्हदासाने बोधीच्या संघारामात वास्तव्य होते. आनंदने मूलटीका ग्रंथ लिहिला. धम्मपालाने परमथ्यदीपणि, खुद्दकनिकायावर टिका; परमथ्यमंजुष, इ. ग्रंथ लिहिले. उपसेनाने सघम्मप्पज्योतिका, चुल्लधम्मपालाने सज्जसंखेप इ. रचना केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) पाली भाषेतील साहित्य सांगा.

**ड) जैन धर्माचे धर्मग्रंथ व लौकिक साहित्य :** महावीराची शिकवण मौखिक पद्धतीने संग्रहीत केले त्यास संग्रहास पूर्व म्हणतात. त्याची १४ संख्या आहे. जैन वाङ्मयाचे सहा भाग असून ते १२ अंगे, १२ उपांगे, १० परिकरना, ६ छेदसुत्र, मुळसुत्र, अन्य संकिर्ण वाङ्मय होय. जैन आगम मध्ये १२ अंगे महत्त्वाची आहे. यामध्ये भिक्षूचे नियम, जीवन पद्धत महावीराचे जीवन व कार्य, शिकवण याची माहिती आहे. आयारंगसुत्रमध्ये धर्मगुरुच्या आचारविषयीचे नियम. भगवती सुत्रामध्ये सिद्धांत व तत्व सविस्तर मांडली आहे. १२ उपांगमध्ये पौराणिक घटना, भूगोल, खगोलशास्त्र विश्व या संदर्भात चर्चा केली आहे. १० परिकरनांमध्ये अनेक विध सिद्धांताची माहिती आहे. ६ छेदसुत्रामध्ये धर्मगुरुंच्या आचार, नियम यांची माहिती आहे. मुळसुत्रामध्ये धर्माची तत्वे वेगळ्या पद्धतीने मोडली आहेत. संकिर्ण वाङ्मयामध्ये कथा, काव्य, यांचा समावेश होते. (हरिभद्रचे समरादित्यकथा, धुताख्यान ग्रंथ आहेत. उघोतनसुरीने कुवलमाला ही धर्म कथा लिहिली. महेश्वरसूरीचे जिनपंचमीकता, शीलाचार्याने महापुरुषस् हा ५४ संताचा चरित्र ग्रंथ लिहिला आहे.)

## १.४ परकीय इतिवृत्ते / प्रवासवृत्तांत / साहित्य

प्राचीन भारतीय इतिहासासंबंधी ज्ञान देण्याच्या दृष्टीने परकिय लिखाणही अतिशय महत्त्वाचे आहे. निरनिराळ्या कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवाशांनी वेगवेगळ्या कारणासाठी भेटी दिल्या. त्यांनी भेटीचे वृत्तांत लिहून ठेवले. त्यातून आपणाला तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते.

**i) ग्रीक प्रवास वृत्तांत :** ग्रीक प्रवासांनी व लेखकांनी भारतासंबंधी लेखन केले आहे. हिरोडाटस्च्या 'हिस्टोरिका' ग्रंथात भारतविषयक प्रथम माहिती आहे. त्याने पर्शिया व भारत यांच्यातील संबंधाची माहिती दिली आहे. सम्राट डेरियसचा सैनिक स्काइलैक्सने आपल्या वृत्तांत सिंधू संस्कृतीची माहिती दिली आहे. हिलेटिअस मिलेटसने 'भूगोल' या ग्रंथामध्ये स्काइलैक्सच्या वृत्तांताच्या आधारे सिंधू संस्कृतीची माहिती दिली आहे. अलेक्झांडर बरोबर भारतात आलेल्या निआर्कस, ओनोसिक्रटस्, ऐरिमन इ. इतिहासकारांनी तात्कालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक, जीवनाविषयी माहिती लिहिली आहे. भारतीय राज्ये, रीतीरीवाज, चंद्रगुप्त मौर्य यांची माहिती आहे. निआर्कसचे मुळ लेखन उपलब्ध नाही. परंतु एरियन व स्टेनेच्या लेखनात उल्लेख आहे. ओनोसिक्रटसने 'सिंकदरचे जीवन' ग्रंथ लिहिला आहे. एरिस्टोब्युलसने

'युद्धाचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला आहे. एरियनच्या ग्रंथामध्ये अलेक्झांडरची स्वारी, समकालीन राजे आणि तत्कालीन परिस्थितीची माहिती आहे. ग्रीक सेनापती सेल्यूकस निकटरचा राजदुत मॅगेस्थेनिस हा इ. स. पूर्व ३०४ ते इ.स. पूर्व २११ या काळात चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी होता. त्याने 'इंडियन' नावाचे प्रवासवृत्तांत लिहिले. त्यामध्ये मौर्य प्रशासन, सैन्य, युद्धपद्धती, नगर प्रशासन, राजधानी, समाजरचना इ. माहिती आहे. मेगॅस्थेनिस चंद्रगुप्त मौर्याच्या, डायमाचूस बिंदुसारच्या, तर नंतरच्या काळात डायनोशियस भारतात आला. त्यांनी लेखन केले. भारतीय सुंदरी असल्याच्या उल्लेख डायनोशियसने केला.

इ.स. ८० च्या दरम्यान एका ग्रीक खलाशाने 'पेरिप्लस ऑफ दी युरेथ्रियन सी' ग्रंथ लिहिला. त्याने सात वाहन राजाविषयी व व्यापाराविषयी माहिती दिली आहे. भारतातील बंदरे, व्यापारी केंद्र, बाजारपेठा, विनिमय होणाऱ्या वस्तू इ. माहिती आहे. टॉलेमी ने 'भूगोल' या ग्रंथामध्ये भारताचा भूगोल लिहिला असून त्यामध्ये अनेक नकाशे काढलेले आहेत. प्लिनीने 'प्राकृतिक इतिहास' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये तत्कालीन वनस्पती, प्राणी, खनिजे यांची माहिती आहे.

**ii) चीनी व तिबेट प्रवासी :** भारतातील बौद्ध तीर्थ क्षेत्रांना भेटी, मुळ ग्रंथाचा अभ्यास करणे व चिनीभाषेत भाषांतर करण्याच्या हेतूने अनेक चीनी प्रवासी भारतात आले. त्यातील प्रमुख प्रवासी म्हणजे फाहियान - हा चीनी प्रवासी इ.स. ३९९ मध्ये दुसरा विक्रमादित्यच्या काळात आला. तो १५ वर्षे भारतात आला. त्याने फोक्बोकी या प्रवास वर्णनामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय माहिती दिली आहे. सुंग-युन हा चीनी प्रवासी बौद्ध धर्माचा शोध घेण्यासाठी आला. त्याने ३ वर्षात १७० धर्मग्रंथ एकत्र केले, त्याने प्रवास वर्णन लिहिले. यूआन च्वांग हा चीन प्रवासी इ.स. ६२९-३० च्या दरम्यान भारतात आला. हर्षवर्धनाच्या दरबारी राहिला होता. त्याने तातांगसियुकी (पाश्चित्य जगाच्या नोंदी) नावाचा ग्रंथ लिहिला. त्याने चालुक्य राजा दुसरा पुलकेशी, पल्लव राजा महेंद्रवर्मन यांच्या दरबाराला भेटी दिल्या. त्याच्या प्रवास वर्णनामध्ये, वर्धन, चाणुक्ये, पल्लव घराण्याची माहिती आहे. समाज, शासन व्यवस्था, राजनिती, धर्म, अर्थव्यवस्था इ. माहिती मिळते. इत्सिंग हा चीनी प्रवासी इ.स. ६७३ मध्ये भारतात आला. त्याने आणि युआन च्वांग याने भारतातील नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला विद्यापीठांना भेटी दिल्या. त्याच्या प्रवासवर्णनामध्ये राजकीय, सामाजिक, शिक्षण-पद्धत; परीक्षा पद्धत याची माहिती मिळते. हूली - त्याने युआन च्वांगच्या प्रवासवर्णनाच्या आधारे ग्रंथ लिहिला. सुमाचीन यास चीनी इतिहासाच्या पिता म्हणतात. त्याने प्राचीन भारतीय इतिहासावर लेखन केले आहे.

लामा तारानाथ या तिबेटी इतिहासकाराने 'तिबेटचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये मौर्यात्तर भारतीय इतिहासाची माहिती मिळते. शक, पार्थियन, कुशाण यांची माहिती आहे.

**iii) अरबी प्रवासवृत्तांत :** व्यापाऱ्याच्या निमित्ताने अनेक अरब व्यापारी भारतात येत असत. त्यापैकी अलबेरुणी, अलूमसुदी, सुलेमान इ. प्रवासवर्णन लिहून ठेवली आहेत. महंमद गझनी बरोबर अलबेरुणी भारतात आला त्याने 'तहकीक-एक-हिंद' (तारीख-इ-हिंद) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामधये भारतीय गणित, भौतिक, खगोल, धर्म, समाज जीवन शिक्षण इ. माहिती आहे. अलविलाहुस, सुलेमान, हसन निजामी, फरिश्ता, निजामुद्दीन इ. अरब लेखकाने इतिवृत्तांत लिहिलेले आहे.

प्राचीन भारतीय समाजातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, जीवनाची व संस्थाची माहिती वरील साधनांच्या आधारे मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१) परकीय भाषेतील साधनांचा आढावा घ्या.

## १.५ साधनांचे महत्त्व

प्राचीन भारताचा इतिहास समजावून घेण्यासाठी लिखित व अलिखत साधनावर अवलंबून राहावे लागते. त्या आधारे आपणाला प्राचीन काळाची माहिती पुढीलप्रमाणे मिळते म्हणून त्या साधनाचे महत्त्व आहे.

१) प्राचीन काळातील घराण्याचा क्रम, त्यांचा कालखंड, वंशावळ, घराण्यातील राजा, त्यांची धोरणे इ. माहिती आपणास मिळते.
२) प्राचीन काळातील राजकीय परिस्थिती, युद्ध, त्याची कारणे, त्याचे परिणाम इ. माहिती प्राप्त होते.
३) प्राचीन काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, परिस्थितीची माहिती मिळते.
४) चलनव्यवस्था, वजन, मापे, रस्ते, दळणवळण, बंदरे, आयात-निर्यात इ.
५) साहित्य, शिक्षण, कला, स्थापत्यकला, विज्ञान व तंत्रज्ञान इ.
६) भाषा, लिपी, त्याचे प्रकार आणि विकास इ.
७) परकीय आक्रमण - त्यांचे भारताशी संबंध याची माहिती मिळते.

वरील परिस्थितीची माहिती आपणाला साधनाच्या आधारे प्राप्त होते. जर साधने नसतील तर आपणाला सत्य व योग्य इतिहास मांडता आला नसता. प्राचीन भारताचा अभ्यास करताना आपल्या मनात सतत शंका निर्माण झाल्या असत्या. त्यामुळे असे घडले असावे. कदाचीत असे घडले असावे अशी मांडणी आपणाला नेहमीच करावी लागली असती कारण संशोधन करताना सबळ पुराव्याची गरज असते. तो पुरावा मिळाला नाही तर भाकित केल्या सारखा इतिहास झाला असता. यावरुन इतिहासाचा अभ्यास, संशोधन करताना साधने महत्त्वाची आहेत हे स्पष्ट होते.

## १.६ सारांश

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठी दोन प्राकारचे साहित्य महत्त्वाचे आहेत. लिखित साधनामध्ये भारतीय भाषेतील हिंदू, बौध्द, जैन धर्मीयांनी निर्माण केलेले धार्मिक व लौकिक साधने महत्त्वाचे आहे. भारतीया प्रमाणे परकीय साधने ही महत्त्वाची आहेत. लिखित साधना प्रमाणेच अलिखित पुरातत्त्वीय विविध प्रकारचे साधने आहे.

## १.७ दिर्घोत्तरी प्रश्न

१. प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची लिखित साधने सांगा.
२. पुरातत्त्वीय साधनांचा आढावा घ्या.
३. प्राचीन भारताच्या इतिहास अभ्यासाच्या परकीय साधनांची माहिती सांगा.

❖❖❖❖

# २

# सिंधू संस्कृती

**प्रकारणाची रचना:**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ सिंधू संस्कृतीचे सामाजिक जीवन
२.२ सिंधू संस्कृतीचे आर्थिक जीवन
२.३ सिंधू संस्कृताचे धार्मिक जीवन
२.४ सिंधू संस्कृतीची नगररचना
२.५ सिंधू संस्कृतीचा ऱ्हास
२.६ सारांश
२.७ दिर्घोत्तरी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये :

- सिंधू संस्कृतीच्या सामाजिक जीवनाची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या आर्थिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या धार्मिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या नगररचनेची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला हे समजून घेणे.

## २.१ सिंधू संस्कृतीचे सामाजिक जीवन (SOCIAL LIFE)

मोहेंजोदडो, हडप्पा व अन्य ठिकाणच्या उत्खननातून ज्या वस्तू प्राप्त झाल्या त्याचे विश्लेषण करून सामाजिक जीवनाची माहिती मिळते. सिंधू संस्कृतीमध्ये सामाजिक जीवन शांतता व सहकार्याचे होते. सामाजिक प्रगतीला येथील आर्थिक स्थैर्य प्रामुख्याने जबाबदार होते.
१) **सिंधू संस्कृतीचे लोक / वंश** – भारतातील विविध ठिकाणच्या उत्खनानात सापडलेली हाडे व हाडांचे सापळे यावरून हे लोक **चाल्कोलिथिक** काळातील असावेत असा अंदाज आहे. मानवी वंशशास्त्राच्या आधारे परिक्षण केले असता चार वंशाचे लोक रहात असावेत. ते म्हणजे १) प्रोटो ऑस्ट्रलॉईड २) मेडिटरेनियन ३) मंगोलॉईन्ड ४) अल्पिनॉईड या संस्कृतीचा जमिनीमार्गे व जलमार्गाने बाहेरच्या देशाशी संबंध येत असल्याने, मिश्र वंशाचे लोक असावेत. **शिल्पकृतीवरून** शहरे बहुभाषिक व बहुवाशिक असावीत.

२) **समाजरजना / सामाजिक वर्ग** – उत्खननावरून सिंधू संस्कृतीच्या समाजात निरनिराळे वर्ग असावेत. हे वर्ग **आर्थिक व्यवस्थेवरून** निर्माण झाले असावेत. प्रामुख्याने राज्यकर्त्यांचा व व्यापाऱ्यांचा वर्ग प्रभावशाली असावा. दुसरा वर्ग म्हणजे शेतकरी, कारागीर, मजूर यांचा असावा. डॉ. **विमलचंद्र पांडे व डॉ. ए. डी. पुसळकर** यांच्या मते – "सिंधू संस्कृती कालीन समाजात चार वर्ग असून विद्वजनांचा, लढाऊ, व्यापारी व कारागिराचा आणि कामगारांचा वर्ग होय."

**विद्वजनांच्या वर्गात प्रामुख्याने पुरोहित**, वैश्य, भविष्यवेता, **लढाऊ वर्गामध्ये** शिपाई **व्यापारी व कारागीर वर्गात** विविध लोकांचा समावेश होता. **कामगार वर्गात** नोकर, सफाई कामागर, शेतकरी, मासे पकडणारे इ. लोक होय.

३) **आहर /अन्न** – विस्तीर्ण व सुपीक जमिन आणि मुबलक पाणी यामुळे लोकवस्ती वाढली. नागरी विकास झाला. लोकांच्या अन्नामध्ये शाकाहारी व मांसाहारी अशा दोन्ही प्रकारच्या पदार्थांचा समावेश होता. **शाकाहारी अन्नामध्ये** गहू, तांदूळ, बार्ली, जव, तीळ, वाटाणा, खजूर, दुध व दुधाचे पदार्थ, फळे, भाजीपाला इ. समावेश होता. गहू व बार्ली ही **प्रमुख पिके** होती. **हडप्पा** येथे **तीळ व वाटाणा** सापडला आहे. **मांसाहारामध्ये** कोबंड्या, शेळ्या, बदक, ससा, बैल, डुक्कर, कासव, घार, मेंढे इ. प्राण्याचे मांस असे.

४) **वेशभूषा** – सिंधू संस्कृतीत लोकांच्या वस्त्रांचे प्रत्यक्ष अवशेष प्राप्त झाले नाही. **मूर्ती व चित्रावरुन** वस्त्रांच्या स्वरूपाविषयीची माहिती मिळते. स्त्री-पुरुष सामान्यता दोन वस्त्रे परिधान करीत. एक धोतरासारखे वस्त्र कमरे खाली गुंडाळीत व दुसरे उपरण्यासारखे डाव्या खांद्यावरून व उजव्या काखखालून घेत असे. वस्त्र प्रामुख्याने **कापसाचे** व कदाचित **लोकरीचे** असावे. अंगावर घ्यावयाच्या शालीच्या टोकावर **कशिदाकाम** केलेल असे. **स्त्रीया** घागरा व ओढणी व ओढणीसारखे वस्त्र वापरत असे. उत्खननात सुया सापडलेल्या आहेत. त्यावरून वस्त्र **शिवण्याची पध्दत** असावी हे **विणकाम स्त्रीया** करता असाव्यात.

५) **केशभूषा** – उत्खननात प्राप्त झालेल्या मानवी मूर्तीच्या व इतर साधनांच्या आधारे केशभूषाची कल्पना येते. स्त्रियांचे जे पुतळे आहेत. त्यापैकी काहीच्या मस्तकांवर मुकुटाकार अलंकार आहेत. अलंकार न घातलेल्या पुतळ्यांच्या डोळ्यावरील केसांची वेणी वळून मानेच्या पाठीवर वेणीचा बो बांधला आहे. स्त्रिया केसांची निगा ठेवत असे. वेगवेगळ्या पध्दतीने केशरचना करत. त्यासाठी पिना, आकडे यांचा उपयोग करत असे. टोपासारखे सर्व केस डोक्यावर बांधण्याची पध्दत होती.

६) **आलंकार** – सिंधू संस्कृतीतील स्त्रि-पुरुष दोघेही अलंकार वापरत असे. अलंकारासाठी **सोन, रुपे, तांबे, ब्रॉझ** या धातूचा व मूल्यवान रत्नांचा उपयोग करत असत. तसेच शंख, शिंपले, हस्तिदंत, मणी इ. पासून दागिने बनवत. स्त्रिया आपल्या मस्तकांवर पंख्यासारखा दागिना घालीत. कपाळाभोवती सोन्याचा किंवा रूप्याचा पट्टा बांदत. कंठहार, बिंदी, बाजूबंद, बांगड्या, पैंजण, कमरपट्टे, कडी, गळ्यातील हार, अंगठ्या कर्णभूषणे, बाहुभूषणे,साखळी, मेखला, पायातील नुपूर व वाळे इ. अलंकारांचा समावेश होता.

पुरुषांच्या गळ्यात हार, बोटात अंगठ्या, हातात कडी इ. वापरीत असे. **डॉ. जॉन मार्शलच्या मते** – येथील सोन्याचे दागिने इतके सुरेख व कलाकुसर असलेले आहेत की ते सुमारे ५००० वर्षापूर्वीच्या घरापेक्षा लंडनमधील बॉन्ड स्ट्रीट मधील सोनाराकडून ते आले असावेत असे वाटते."

७) **सौंदर्यप्रसाधने** – या काळात स्त्रिया व पुरुष सौंदर्यप्रसाधनात विशेष दक्ष असत. हस्तिदंताच्या, धातूच्या, मातीच्या व दगडाच्या लहान लहान पेट्या / बरण्यांतून व शिंपांच्या डब्यातून निरनिराळे सौंदर्यप्रसाधने सापडलेली आहेत. काजळ, चेहऱ्याला लावण्याची पांढरी पावडर, गालांना व ओठांना लावण्याचे लाल रंग आणि हिरव्या रंगाचे मातीचे गोळे मिळालेले आहेत. **चन्हुदडो** येथे शृंगारपेटी /ओष्ठशलाका मिळाली असून, त्यात आरसा, फणी व सौंदर्यप्रसाधने आहेत. सौंदर्यप्रसाधन करण्यासाठी ड्रेसिंग टेबल व त्यावर ब्रॉझ धातूचे आरसे, हस्तिदंती फण्या व सौंदर्यप्रसाधन साहित्य असे. **हडप्पा** येथील शृंगारपेटीत कान-कोरणे, दात कोरणे, चिमटा इ. वस्तू सापडल्या आहेत.

८) **प्राणी (Animals)** – उत्खननात सापडलेल्या हाडांच्या सापळ्यावरून त्या काळातील प्राण्यांची माहीती मिळते. मोठ्या शिंगाचे बैल, रेडे, मेंढे, बकरे, डुक्कर, हत्ती, गेंडे, उंट, गाय इ. प्राणी होते. घोडा त्यांना माहित होता की नाही याबाबत वाद आहे. चित्रावरून व मातीच्या प्रतिमावरून त्यांना गाय, वाघ, अस्वल, माकड, ससा, गाढव मुंगूस, खार, मोर, पोपट माहित असावा. **शिक्क्यावरून** प्रामुख्याने प्रतिमा बैलाची असून धार्मिक महत्त्व असावे.

९) **घरातील विविध वस्तू** – उत्खननामध्ये माती, दगड, शिंपले, हस्तिदंत व धातू यांची अनेक भांडी व गृहपयोगी उपकरणे सापडली आहे. मातीची अनेक प्रकारीची स्वयंपाकाची व जेवणाची भांडी, त्यावर शिंपल्यांच्या झाकण्या, शिंपल्याच्या पळ्या, स्नानगृहातील रांजण आहेत. तसेच सुऱ्या, कुऱ्हाडी, करवत, चाकू, मासे मारण्याचे गळ / फासे सापडले आहेत.

गृहसजावटीमध्ये विविध खुर्च्या, बेडशीट, पलंग, कपाटे, चटया इ. वस्तु सापडल्या आहेत. तांबे, माती, हस्तिदंत या पासून बनवलेले विविध प्रकारचे दिवे सापडतात. लोकांना मेणबत्ती माहित असावी.

१०) **क्रिडा व मनोरंजनाची साधने** – उत्खननामध्ये गोट्या, सोंगट्या, हस्तिदंती किंवा धातूचे फासे, चेंडू इ. खेळांची साधने सापडली आहेत. **फाश्यांचा खेळ** हा लोकप्रिय होता. लहान मुलांच्या खेळण्या विविध प्रकारच्या आहेत. नृत्य, गायन ही करमणूकीची साधने असून, शिकार, कोंबडे किंवा बैलाची झूंज यासारखे खेळ लोकप्रिय होते. **मातीच्या लहान गाडा** हा मुलांचा अतिशय आवडता खेळ असावा. नर्तकी, ढोलाच्या तालावर नाचणाऱ्या मूर्ती आहेत. तंतूवाद्य असावे. सामुहिक नृत्याची आवड लोकांना होती, हालत्या मानेचा बैल, झाडावर चढणारे माकड, पशुपक्षांच्या प्रतिमा, शिट्या, वाजंत्री इ. वस्तू मिळालेल्या आहेत.

११) **शस्त्रे / हत्यारे** – सिंधू संस्कृतीतील लोक वेगवेगळे शस्त्रे वापरीत असावे. कुऱ्हाडी, भाले, गदा, जांबिया, गोफण, धनुष्यबाण, परशू, तलवार, चाकू, सुरी, बाणाचे टोके इ. शस्त्रे होती. बहुतेक शस्त्रे **तांब्याची किंवा ब्राँझची** केलेली असत. काही दुधारी हत्यारे होती. गदा

मातीच्या किंवा चुनखडीच्या किंवा हिरव्या कठीण दगडाचा असे. स्वरंक्षणाकरिता तांब्याचे चिलखत व ढाली यांचा उपयोग करण्यात येत होता.

१२) **औषध** – सिंधू संस्कृतीतील लोकांना अनेक प्रकारची औषधे माहित होती. हे उत्खननावरून सिध्द होते. काळ्या रंगाच्या गोळ्या सापडलेल्या आहेत. शिलाजीत, समुद्रफेन, हरणाची व सांबराची शिंगे सापडलेली आहेत. प्रबाळ/ पोवळी व कडूनिंबाचा उपयोग औषध म्हणून केला जात असे. **डॉ. ए. डी. पुसळकराच्या मते** – "ही सर्व वैशिट्ये आर्युवेदातील औषधात सांगितलेली आहेत. भारतीय प्राचीन औषधी पध्दतीचा उगम हा थेट सिंधूसंस्कृती पर्यंत जाऊन भिडतो."

१३) **स्त्रियांची स्थिती** – सिंधू संस्कृतीमध्ये स्त्रीयांची स्थिती चांगली होती. समाजामध्ये आदर व सन्मानाचे स्थान होते. कारण की मातृदेवताची पूजा केली जात होती. स्त्रीया मुलांचे पालन-पोषण करीत असे. आपल्या कुटुंबाची देखरेख करत असे. सर्व **समाज मातृप्रधान** होता.

## २.२ सिंधू संस्कृतीचे आर्थिक जीवन (ECONOMIC LIFE)

मोहेंजोदडो, हडप्पा, लोथल येथील उत्खननावरून आर्थिक जीवन अतिशय समृध्द आणि प्रगत होते असे दिसून येते. आर्थिक जीवनामध्ये शेती व व्यापार यांना समान महत्त्व होते. **आर्थिक जीवनाच्या वैशिट्यामध्ये** शेती, पशुपालन, व्यवसाय/उद्योगधंदे, व्यापार, शिकार, दळणवळणाची साधने, वजन व मापे, चलनव्यवस्था इ. घटक होय. यांचा सविस्तर विचार पुढील प्रमाणे आहे.

१) **शेती व्यवसाय** – सिंधू संस्कृतीतील लोकांचा **मुख्य व्यवसाय** शेती होता. सिंधू नदीमुळे जमिन सुपीक होती. नदीमुळे शेतीला पाणीपुरवठा होत असे. शेती मधून गहू,तांदूळ, जव, कापूस, बार्ली भात, वाटाणे, तीळ, मोहरी इ. पिके घेतली जात असे. **बनवली** येथे बार्लीचा शोध लागला. **हडप्पा** येथे नारळाच्या सारखे मातीचे भांडे सापडले त्यावरून नारळाची शेती असावी. **लोथल** येथे तांदळाचे कण सापडले आहेत. **मोंहजोदडो व हडप्पा** येथे धान्याचे कोठार सापडले आहे. **मोहेंजदडो** येथे चांदीच्या कलशाला सुती कापड चिकटलेले सापडलेले आहे. **डॉ. ए. डी. पुसळकर यांच्या मते**– "या लोकांच्या शेतीव्यवस्थेबद्दल फारशी माहिती नसली तरा। गहू व बार्ली यांच्या नमुन्यावरून हे लोक जंगली प्रकारचे नव्हते. आजही पंजाबमध्ये याच दर्जाच्या गव्हाचे उत्पादन केले जाते."

२) **पशुपालन** – शेतीबरोबर पशुपालनाचा व्यवसाय करत असत. शेतीसाठी बैलाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करत असल्याने त्याला देवता मानत असे. **कलीबंगन** येथे नांगराचे अवशेष सापडले आहेत. पशुपालन मध्ये बैल, गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुत्रा, रेडा, डुक्कर, उंट इ. **प्राणी पाळत** असावेत. या शिवाय हत्ती, गेंडा, सिंह, वाघ, हरिण, गवा, सांबर इ. **जंगली प्राणी** माहित असावेत. ससा, माकड, पोपट, कोबंडी, मोर, हंस इ. **पक्षी** माहित असावेत.

इ.स.पू. २००० च्या दरम्यान **सूतकौतडा** येथे घोड्याचे अवशेष प्राप्त झाले आहेत. **मोहेंजोदडो** येथे हाथीच्या डोक्याचा पिंजरा मिळाला आहे.

३) **व्यवसाय/उद्योगधंदे** – शेती व्यवसायाबरोबर समाजाच्या विविध गरजा भागवण्यासाठी अनेक उद्योगधंदे होते. त्यामध्ये कुंभारकाम, विणकाम, धातूउद्योग, शिल्पउद्योग, अलंकार, भांडी, वस्त्र इ. उद्योगधंदे सुरु होते. कापसापासून सुत कातण्याचा **व्यवसाय मोठा** होता. मातीची भांडी उपकरणे बनवण्याचे व्यवसाय होते. **चन्हुदडो** हे खेळाच्या उत्पादनाचे केंद्र असावे. सोनाराचा व्यवसाय **लोकप्रिय** होता. पक्क्या विटा तयार करणे, बांधकाम व्यवसाय, शेती अवजारे निर्मिती व्यवसाय, शस्त्रे तयार करणे, जहाज बांधणे व दुरुस्ती व्यवसाय, अशुध्द धातू शुध्द करणे. इ. उद्योगधंदे होते. लोथल येथे मेण तयार करण्याचा उद्योग होता.

४) **दळणवळणाची साधने** – सिंधू संस्कृती मध्ये व्यापार हा **स्थलमार्ग व जलमार्गाने** करत असावेत. **स्थलमार्गाने** प्रवास करण्याकरिता घोडे, गाढव, बैलगाडी यांचा वापर होत असावा. **मोहेंजोदडो** येथे बैलगाडीच्या मातीच्या प्रतिकृती तर **हडप्पा** येथे तांब्याचा बैलगाडीची छोटी प्रतिकृती सापडली आहे. **हडप्पा** येथे ब्रांझचा टांगा (एक्का) उपलब्ध झाला आहे. असाच टांगा **चुन्हदडो** येथे सापडला आहे. आज **सिंध-पंजाबमध्ये** आढळणाऱ्या गाड्यासारखाच आहेत. **जलमार्गाच्या** प्रवास हा जहाज व नौका याने होत असावा कारण मुद्रा व भांड्यावर अशी चित्रे कोरलेली आहेत.

५) **वजन-मापे** – सिंधू संस्कृतीच्या उत्खननामध्ये अनेक प्रकारचे वजनमापांचे अवशेष प्राप्त झाले आहेत. ही वजने अतिशय अवजड ते अतिशय लहान वजनापर्यंत विविध प्रकारची होती. ही वजने पाषाणाची होती. काही वजने मेसोपोटेमिया वजनासारखी होती. **सर्वात लहान वजन** ८७५० ग्रॅम इतक्या भाराचे असून **सर्वात मोठे वजन** १०,९७० ग्रॅम इतक्या वजनाचे आहे. १३.६४ ग्रॅमचे वजन **सर्वात जास्त प्रचलित** होते. हे वजन सर्वात लहान वजनाच्या **१६पट** आहे. **घनाकृती** वजनमाप अधिक प्रचलित होते. लहान वजनामध्ये **दशमान पध्दत** व मोठ्या वजनामध्ये **दशांश पध्दत** दिसून येते. मोहेंजदडो, हडप्पा, चुन्हुदडो, लोथल, कलिबंगन येथे एकाच प्रकारची मोठ्या प्रमाणात वजन व मापे मिळालेली आहेत. **तराजूचे अवशेष** सापडले असून, त्यांची दांडी **ब्रॉझ** व पारडी **तांब्याची** होती. मोठे तराजू लाकडी दांडीचे असावेत.

मापनासंबंधीची माहिती निश्चित मिळवणे कठीण आहे. **मोहेंजोदडो** येथे २० सें.मी. (६.६२ इंच) लांबीची व ९ समभाग केलेली **शिंपल्याची** पट्टी सापडली आहे. हडप्पा येथे ४ सेंमी. (१.५ इंच) लांबीची दोन्ही बाजूनी तुटलेली ब्रॉझची कांडी/तुकडा सापडला आहे. तिचे ४ भाग समान केलेले आहेत.

६) **चलन व्यवस्था** – उत्खननात कोठेही तांबे किंवा ब्रॉझची नाणी सापडलेली नाहीत. यावरून आर्थिक व्यवहारासाठी कोणती चलन पध्दत असावी याबाबत निश्चित सांगता येत नाही. तरीपण वस्तुविनिमयाची पध्दत असावीत. व्यवहारासाठी शिक्क्यांना चलन म्हणून उपयोग करीत असावेत.

७) **व्यापार** – सिंधु संस्कृतीतील उत्खनननान प्राप्त झालेले शिक्के, लिपी प्रमाणबध्द वजनमापे इ. आधारे व्यापाराची कल्पना येते. या काळात भारतात अंतर्गत व परदेशी व्यापार सुरु होता.

**१) अंतर्गत व्यापार** -सिंधू वासीयाचा अंतर्गत व्यापार **जनावरांच्या पाठीवरुन** (उंट, गाढव) व बैलगाडीतून खुष्किच्या मार्गाने चालत असत. मालाच्या संरक्षणासाठी गाडीला छत असे. अश्या बैलगाडयाचे अवशेष **मोहेंजोदडो व हडप्पा** येथे प्राप्त झाले आहेत. काश्मीर, दक्षिण भारत, राजपुतान, इ. राज्यांशी व्यापार सुरु होता. सिंधू संस्कृतीतील लोक पुढील प्रमाणे विविध राज्यातून मालाची **आयाता** करत असे. **सोने** - कोलार, अनंतपूर भागातून, **चांदी** - अफगाणिस्तान, अमैनिया, पर्शियाभागातून, **तांबे** - राजपूताना बलुचीस्तान, अफगाणिस्तानमधून, लॅपिस-लॅझली(वैदुर्य)- बदकशानमधून **टर्कोसा किंवा फिरोजा** - इराणमधून, **अमेथेस्ट किंवा नील** - महाराष्ट्रातून, **फार्नेलियन किंवा अकीक व कॅलेसेडॉनी किंवा लसण्या** हे सौराष्ट्र किंवा पश्चिम भारतातून। **जेड किंवा मर्गझ** - मध्यआशियातून आयात केले जात असत.

सिंधू संस्कृतीचे **बाहय संस्कृतीशी** व्यापारी संबंध होते.याचे अनेक पुरावे प्राप्त झाले आहेत. मेसोपोटेमिया येथे अनेक शिक्के सिंधू संस्कृतीतील सापडले आहेत.तसेच साहित्या मध्ये हडप्पा येथील **उरचे व्यापारी** हे तीलमन, मगन, मेल्हूहा इ.देशाशी व्यापार करीत असल्याचा उल्लेख आलेला आहे.

सिंधू संस्कृतीच्या परिसरात मेसोपोटेनिया येथील शिक्क्यासारखे शिक्के, शृंगारपेटी, वजने, इ.साम्य असणाऱ्या वस्तु सापडलेल्या आहेत. **मेसोपोटेनिया, इजिप्त, कोट** येथील समकालीन संस्कृतीशी व्यापारी संबंध होते.

व्यापार हा **जमिनी व समुद्रमार्ग** चालत असे. उरकिश व इजिप्त यांच्याशी व्यापार करणारे **प्रमुख केंद्र मोहेंजोदडो** हे होते.सिंधू संस्कृतीमध्ये परदेशी व्यापाराचे कार्य पणी हा वर्ग करत असावा. बॅबिलोन (मोसोपोटोनिया) संस्कृतीच्या आलेखात सिंधू संस्कृतीच्या प्रदेशाचा उल्लेख **यनुटा** केलेला आहे. येथील **आसरानी** या व्यापाऱ्याचे नाव आहे. व्यापाऱ्याची **अडतदुकाने** व पेढया असाव्यात कापूस, कापड, गहू, इ. **निर्यात** होत असे. सांबरशिंगे, शिलाजित, देवदार, नीळ, चांदी, जस्त, शिसे, शिंपले, गोमदे, सोने, पाचू इ. **आयात** होत असे. **वस्तुविनिमयाची** पध्दत परदेशी व्यापारात असावी.

## २.३ सिंधू संस्कृतीचे धार्मिक जीवन (RELIGION LIFE)

प्राचीन संस्कृतीमध्ये धर्माला महत्वाचे स्थान असून ही, मोहोजोदडो, हडप्पा येथे उत्खननात धर्म व पंथासंबंधी वास्तू किंवा मंदिर याचे अवशेष प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे समाजातील धार्मिक आचार, विचार आणि प्राबल्या यासंदर्भात कोणतेही मत मांडता येत नाही. केवळ उपलब्ध झालेल्या अवशेषामध्ये, शिक्के, ताईत, विविध देवदेवतांच्या मातीच्या व धातूच्या मूर्ती याच्या आधारेचे **धार्मिक जीवनातील कल्पना व प्रथा** (Religious Ideus and beliefs)

या विषयी निष्कर्ष काढता येतात. या निष्कर्षावरुन धार्मिक जीवनात **मातृदेवता, शिवदेवता, लिंग पुजा व योनिपुजा, प्राणीपुजा, निसर्गपुजा, अग्निपुजा, पितृपुजा, धार्मिक आचार, पाणीपुजा, बलिप्रथा. देवतांचे मानवीकरण, अंत्यसंस्कार इत्यादीची** माहिती होते.

१) **मातृदेवता /शक्ति देवता/ स्त्रीदेवता** - सिंधू संस्कृतीतील समाजात मातृदेवतेला धार्मिक जीवनातील अतिशय महत्व होते. **आदिमाता व भ्रमाता** या स्वरुपात पुजा केली जात होती. **सर्व शक्तीमान** परमेश्वर म्हणजे मातृदेवता ही कल्पना करण्यात आली होती. उत्खननामध्ये बऱ्याचशा **लाल व नरम दगडांच्या** शिक्क्यावरील स्त्रीप्रतिमा सापडलेल्या आहेत. त्यापैकी काही पुढील प्रमाणे आहे.

अ) सिंधू संस्कृतीत शिक्क्यावर असलेल्या सर्व स्त्रीय प्रतिमा अर्धनग्न असून तिच्या कमरेभोवती कमरपट्टा आहे. तिच्या डोक्यापासून सर्व अंगावर वेगवेगळे अलंकार आहेत. डोक्यावर पंखाकृती नागाफणा आहे. यावरुन **नागमाता कद्रुचे** हे रुप असावे या स्वरुपाच्या मूर्ती अनेक ठिकाणी सापडल्या त्यावरुन **आदिमातेच्या मूर्ती असून प्रमुख देवता** असावी अशी कल्पना येते.

ब) हडप्पा येथे सापडलेल्या स्त्रीप्रतिमेच्या गर्भाशयातून एक वनस्पती उगवलेली दिसते. तिच्या मागे एक शेतकरी कोयत्याने स्त्रीचा बळी देत असल्याचे दृश्य दिसते यावरुन **भूमाता / पृथ्वी देवतांची प्रतिमा** असावी. अन्नधान्याच्या समृध्दीसाठी बळी समर्पण करीत असावेत.

क) अनेक मातृदेवतांच्या समीप धूपवलयाच्या खुणा आढळतात. त्यावरुन पुजा विधिमध्ये देवासमोर तेल / धूप जाळत असावेत.

ड) मोहेंजोदडो व हडप्पा येथील एका शिक्क्यावर पिंपळाच्या पानातून प्रकट झालेली **वृक्षदेवता/भूमातेची** प्रतिमा असून, तिच्या पुढे एक भक्त बसलेला आहे. खालील जागेवर भक्तांच्या एकसारख्याच सात प्रतिमा आहेत. भूमाते नग्न असून तिच्या डोक्यावर पानांचे/पिसाचे तुरे असलेली शिंग आढळतात.

इ) एका शिक्क्यावर दुभंगलेल्या पिंपळाच्या झाडामध्ये एक नग्न स्त्री उभी असलेली दाखवलेली आहे. तिच्या समोर बकरा उभा आहे व बाजूला बरीच माणसे आहेत. देवाला **बळी देण्याची प्रथा** असावी. बळी प्रथेच्या आधारे देवतेला प्रसन्न करण्याची परंपरा होती.

२) **शिवदेवता / शिवपुजा / पुरुष देवता पुजा** - मातृदेवतेच्या बरोबर **हडप्पा संस्कृतीतील** नागरीक पुरुष देवतांची ही पुजा करत होते. १९३० मध्ये **डॉ. जे. एच मॅके** यांना मोहेंजोदडो येथे ४२० क्रमांकाचा शिक्का सापडला. या शिक्क्यामध्ये उच्यासनावर तीन मुखे असलेली एक नग्न पुरुष पदयासन घालून बसलेला आहे. त्याच्या डोक्यावर शिंगासारखे एक शिरोभूषण आहे. त्याच्या भोवती हत्ती, रेडा, गेंडा, वाघ याची चित्रे आहेत. त्याच्या आसनाखाली हरीण दाखवलेली आहे. या मुर्तीच्या हातात बरीच कंकणे आहेत. व छातीवर आच्छादन आहे. ही मूर्ती **पशुपती, त्रिमुखी** किंवा **योगीश्वर (शिव)** देवाची असावी. “हे शिवाचे मुळ स्वरुप किंवा अश्वत्थ-निवासी देवाचे असावे” असे मत **जॉन मार्शल** यांनी मांडले. या प्रतिमेच्या वरच्या बाजुस **सात अक्षरांचा एक लेख** आहे. नंतरच्या काळातील शिव या देवतेशी निगडित त्रिमुख, पशुपती, योगेश्वर, महायोगी या सारख्या कल्पना निर्माण झाल्या.

शिवाच्या आणखी दोन प्रतिमा सापडल्या आहेत. एका प्रतिमेतील मूर्तीला तीन मुखे असून, ती ठेंगण्या आसनावर बसली आहे. दुसऱ्या मुर्तीच्या चेहऱ्याची फक्त एकच बाजु दाखवलेली आहे. दोन्ही प्रतिमेतील मूर्ती नग्न असून डोक्यावर शिंगे असलेला टोप आहे. त्या शिंगाच्या मध्ये लहानशी झाडाची फांदी उगवलेली दिसते. यावरुन ही देवता **सर्जन शक्तीची / निसर्गाची सर्जन** क्षमतेचे प्रतिक मानले जाते.

वल्कले नेसलेल्या एका धनुर्धारी वीराची एक प्रतिमा सापडली आहे. या मूर्तीच्या मस्तकावर देखील शिंगे आहेत. कदाचित **किरातरुपी शंकराचे** हे प्राचीन रुप असल्याचा संभव आहे. एक मुर्तीचे डोके शिंगधारी रेडयाचे आणि हातपाय गोमेच असून पायाच्या जागी दोन सर्प आहेत. त्याच्या अंगावर वाघाचे कातडे आहे. हे **संहारक रुद्राचे** प्रतिक आहे. रेडा हे यमाचे वाहन तर उष्ण प्रदेशात गोम व सर्प हे  मृत्यूचे दूत असतात. विश्वनिर्मितीचे श्रेष्ठ सामर्थ्य असल्याने शिवाची  पुजा रुढ झाली.

३) **लिंग पुजा व योनीपुजा** -

उत्खनना मध्ये अनेक लिंग प्राप्त झालेली आहेत. यावरुन लोक लिंगपुजा करत असावेत. शिव पशुपतीची आराधना केवळ मूर्तीच्या स्वरुपातच नव्हेतर लिंग स्वरुपातही होत असे **शंकू व दंड गोलाकार** आकाराच्या लिंगाच्या आकृत्या सापडल्या आहेत. कदाचित ते प्रजनन शक्तीचे प्रतिक अनेक ऋग्वेदात लिंगपुजकांचा **शिस्नदेवा** या सारख्या तिरस्कारमुक्त शब्दांनी उल्लेख केलेला आढळतो. काही गोल आकाराच्या दगडी आकृत्या सापडल्या आहेत. यावरुन स्त्री प्रतिक म्हणून **योनीपुजा** देखील प्रचलित असावी.परतु लिंगा इतके मोठया प्रमाणात योनीपुजा नसावी.

४) **प्राणिदेवता पुजा** - सिंधू संस्कृती मधील धर्मामध्ये प्राणीपुजेला महत्व असावे असे अनेक मुद्रांवरील प्राण्यावरुन वाटते. मुद्रा, शिक्के, दगडी मूर्ती यावरील प्राण्याच्या आकृतीवरुन तीन गट केले आहेत.

**अ) काल्पनिक प्राणी** - अर्धा मानव व अर्धा प्राणी किंवा अनेक डोकी असलेला एक प्राणी .

**ब) विचित्र स्वरुपाचा प्राणी** - संदिग्ध स्वरुपाचा प्राणी म्हणजे वराह किंवा एक शिंग असलेला प्राणी बहुधा  **ग्रामदेवता** म्हणून या प्राण्याला महत्व असावे.

**क) प्रत्यक्षात असणारा प्राणी** - गेंडा, वाघ, हत्ती, रेडा, बैल, इ. प्राणी होय.

संस्कृतीच्या प्रगतीबरोबर पशुदेवता, देवताची वाहने म्हणून काही प्राण्यात येत. अनेक मुद्रावर उंच वशिंडाच्या व लोंबते पोळ असलेल्या बैलाचे चित्र आहे हेच कोठेही आढळत नसली तरी शिवलिंग मात्र अनेक आढळतात.

५) **निसर्ग पुजा** -   निसर्ग पुजामध्ये वृक्षापुजा, जलपुजा, अग्नीपुजा, सूर्यपुजा, नागपुजा, इत्यादी देवी देवताचे रुप देऊन, त्यांचे पुजन करण्याची पध्दत सिंधू लोकाच्यात आढळते. यावरुन लोकांच्या जीवनात त्याना अतिशय महत्व होते.

अ) **वृक्षपुजा** - हडप्पा संस्कृतीतील मुद्रावर अनेक वृक्षाच्या आकृत्या कोरल्या आहेत. त्यावरुन वृक्षाला धार्मिक जीवनात महत्व होते असे वाटते. **पिंपळाला** अतिशय महत्वाचे स्थान होते. मातृदेवता या वृक्षा भोवताली किंवा वृक्षावर आढळतात. हडप्पा येथील झाडाच्या चित्राभोवती भिंत किंवा कुपणासारखे चित्र दिसते. मोहेजोंदडो येथील शिक्क्यावर पिंपळाच्या पानावर अनेक डोके असलेले शरीर आहे. मुंद्रावर कडूलिंब, बाभूळ, खजूर यांची चित्रे कोरलेली आहेत. आजही वटसावित्रीला होणारी पुजा सिंधू संस्कृतीच्या परंपरेची साक्ष देते.

ब) **जलपुजा** - मोहेंजोदडो येथे सापडलेले महास्नानगृह हे नदी देवतेचे मंदिर असावे असाही अंदाज करण्यात येतो. **मगर** हा जलचर प्राणी सिंधू नदीचे प्रतीक मानला जात असावा. महास्नानगृह व घरोघरी स्नानगृहामुळे धर्माचारामध्ये स्नानाला महत्व असावे.

क) **अग्नीपुजा** - उत्खननामध्ये यज्ञकुंडाप्रमाणे काही चौकोन आढळतात. याचा उपयोग बहुधा अग्नी प्रज्वलित करुन बळी प्रथेबरोबरच आहुती देण्याकरीता होत असावा. यज्ञ प्रथा अस्तित्वात असल्याचे पुरावे सिंधू संस्कृतीत मिळत नाही.

ड) **सूर्यपुजा** - अनेक प्राचीन संस्कृतीमध्ये सुर्याला देवता मानत असत. सिंधू संस्कृतीत सूर्यपुजा होती की नाही हे निश्चितपणे सांगता येत नाही. उत्खननात सापडलेल्या काही शिक्क्यावर **स्वास्तिक व चक्र** याच्या आकृती कोरल्या आहेत. ही सूर्याची प्रतिके मानून त्याची पुजा केली जात असावी.

इ) **नागपुजा** - काही मुद्रांवर नागाचे चित्र असल्याने नागपुजेचे संकेत मिळतात. एका मुद्रेवर एक बसलेली देवता त्याच्या दोन बाजूस भक्त आणि त्याच्या डोक्यावर नगाचा फणा असा देखावा आहे. यावरुन नागदेवतेची पुजा रुढ असावी.

६) **देवी-देवताचे मानवीकरण :-** अनेक मुद्रावर पुरुष व मातृदेवताचे चित्र साधारण मनुष्याच्या रुपात कोरलेल्या आहेत. देवांची माणसाच्या रुपात कल्पना करुन, त्याची पुजा करणे याचा अर्थ मनुष्य आणि देवता यांचा जवळचा संबंध आहे.

७) **बहुदेवतावाद** - उत्खननात सापडलेल्या वस्तुंच्या पुराव्यावरुन सिंधू संस्कृतीत एकेश्वर वाद नसून बहुदेवतावाद प्राथमिक स्वरुपात असावा. त्याही **मातृदेवता व शिव** यांना विशेष महत्व असावे. तसेच स्थानिक स्वरुपांच्या अनेक देवता आणि समाईक अशा निसर्ग देवता यांचेही प्राबल्य असावे असे म्हणता येईल.

८) **धार्मिक आचार / आराधान पध्दत** - सिंधू संस्कृतीतील देवदेवताच्या विषयी माहिती मिळते परंतु त्याच्या / पुजाविधी संबंध माहिती मिळत नाही. सिंधू नागरीक मूर्तीपुजक होते. विविध देवदेवतांच्या मूर्ती करुन त्याची आराधना करत असत. असे अनेक शिक्क्यावरील आकृतीने स्पष्ट होते. शिक्क्यांवर आढळणाऱ्या धुराच्या डागावरुन देवासमोर दिवा लावणे, धुप जाळणे आणि पुजा करणे. प्राण्यांना बळी देण्याची प्रथा असावी. वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपात देवदेवतांची पुजा कशी केली जात हे निश्चित सांगता येत नाही.

९) **पितृपुजा** - घरातील मृतव्यक्तीचे आशिर्वाद मिळावेत या हेतूने सिंधू संस्कृतीत पितृ पुजा रुढ झाली असावी. मृत व्यक्तीच्या काही वस्तूचे जतन केले जात असावे. त्या स्वरुपात पितृपुजा केली जात असावी.

१०) **सिंधू संस्कृतीतील अंत्यसंस्कार पध्दत :-** सिंधू संस्कृतीमधील लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता असे त्याच्या अंत्यसंस्काराच्या पध्दतीवरुन दिसून येते. प्रत्येक शहरात दफनभूमी ही शहराच्या बाहेर असे. मोहेंजोदडो पेक्षा हडप्पा येथे जास्त पुरावे मिळाले आहेत. पंरतु ते उत्तर काळातील असावेत. मोहेंजोदडो येथील अवशेषान प्रेत दफनाच्या तीन पध्दती आढळतात.

१) **पुर्ण दफन पध्दत** - एका खोल खड्डुयात मृतदेहाचे डोके उत्तरेकडे तर पाय दक्षिणेकडे ठेवले जात. **हडप्पा** येथ देवदारी शवपेटी सापडली. त्यावरुन त्यात दफन केले जात असत. ३० व्यक्तीचे दफन केलेले मृतदेह **मोहेंजोदडो** येथे सापडले आहेत. मृतदेहाबरोबर अन्नपदार्थ, अलंकार, आयुधे. भाडी यांचे ही दफन केले जात असे. **लोथल** स्त्री-पुरुष याचे एकत्र सांगाडे सापडलेले आहेत. यावरुन सहगमनाची पध्दत अस्तित्वात असावी असे दिसते.

२) **अंशदफन पध्दत** - मृत शरीर प्रथम पशुपक्षाना खाण्यास देत. नंतर अस्थि गोळा करुन पुरुन ठेवीत याच्यासोबत अनेक वस्तुही प्राप्त झाल्या आहेत.

३) **दहनोत्तर दफन -** मृत शरीराचे दहन करुन अस्थि एका मातीच्या भांड्यात पुरत असत. रक्षा नदीत पात्रात विसर्जन करीत. काही भांडयात प्राणी, पक्षी, मासे यांच्या अस्थिही आढळतात.

## २.४ सिंधू संस्कृतीची नगररचना (Town planning):

जगातील कोणत्याही ज्ञात संस्कृतीपेक्षा रेखीव नगररचना हे सिंधू संस्कृतीचे खास वैशिट्य होय. पुरातत्वीय साधनांच्या आधारे या संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे इ. स. ५००० वर्षापूर्वीची सुनियोजित नगररचना असणारी सिंधू संस्कृतीची माहिती झाली. हडप्पा, मोहेंजोदडो, रोपड, कालीबंगज, लोथल इ. ठिकाणी सुनियोजित नगररचना आढळते. **सुनियोजित नगररचनेचे विभाग पुढीलप्रमाणे –**

अ) मैदानातील नगररचना –

ब) प्रचंड इमारत बांधकाम –

अ) **<u>नगररचना</u> (Town Planning)** – सिंधू संस्कृतीमध्ये नगररचनेत तटबंदी, रस्ते, घराचे बांधकाम, सांडपाणी व्यवस्था, विहीर, दिवाबत्तीची सोय, कामगार वस्त्या, पाणीपुरवठा इ. विभागात केलेली होती. शहराची व्यवस्थीतपणे व योजनापूर्वक आखणी करून नंतर शहरे वसवली आहेत. नगररचनेमध्ये पुढील बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

१) **तटबंदी** – मोहेंजोदडो येथे तटबंदीचे अवशेष **डॉ. जॉन मार्शल** यांना न मिळाल्याने या संस्कृतीचे लोक शांतताप्रिय होते असे मत व्यक्त केले. हडप्पा शहराच्या एका घराभोवती, कालीबंगन व लोथल येथे कही शहराभोवती तटबंदीचे अवशेष मिळालेले आहेत. तटबंदीचा पाया सामान्यतः **१८ मीटर रूंद** असून वरच्या बाजूला निमूळता होता. याचे बांधकाम प्रथम मातीचे, नंतर मातीच्या विटांचे व भाजलेल्या पक्क्या विटांचे केलेले दिसते. तटावर बुरुज असून त्यावर मातीचे लहान गोळे असावेत.

२) **रस्ते** – मोहेंजोदडो, हडप्पा, लोथल इ. ठिकाणच्या उत्खननातून रस्त्याची माहीती मिळते. मोहंजदडो, हडप्पा येथे **७ वेळा** नवीन वस्ती झाल्याचे दिसून येते. या नगराची रचना पूर्वनियोजित आरोग्यविषयक काळजी घेतली जात असे. मोहेंजदडो या शहराचा **मुख्य रस्ता** बरोबर मध्य भागातून **दक्षिणत्तर** असून हा ३३ फूट रूंदीचा आहे. या रस्त्याला छेदून जाणारे रस्ते पूर्व-पश्चिम असून ते ५ ते ११ मीटर रूंदीचे आहेत. सर्व महत्त्वाचे रस्ते शहराच्या परिघाला मिळणारे आहेत. रस्त्याची रूंदी १४ फुटापासून ३३ फुटापर्यंत लांबी व सरळ अर्धा मैलापर्यंत होते. सर्व रस्ते एकमेकांना **काटकोनांत** छेदणारे असल्यामुळे शहरांचे चौकोनी विभाग झाले. काही ठिकाणी कचरा एकत्र केलेला दिसतो. त्यावरून रस्ते स्वच्छतेकडे लक्ष दिले जात असावे. **मॅके यांच्या मते** वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन रस्त्यांची आखणी केलेली असल्यामुळे येथील वातावरण मोकळे स्वच्छ राहत होते व रस्तेही स्वच्छ होत असावेत ?

३) **दिवाबत्तीची सोय** – सिंधू संस्कृतीकालीन रस्त्यावर अनेक ठिकाणी दिव्यांचे खांब विशिष्ट अंतरावर होते, असे उत्खननात दिसून आले. रस्त्यावरील दिवायोजनेकरिता व वाहतूकीच्या सोयीकरीता या दिवाबत्या असाव्यात.

४) **गृहरचना/घरबांधणी** – मोहेंजोदडो व हडप्पा येथील अनेक घरे दुमजली व तिमजली होती. साधारणपणे प्रत्येक घरात मध्यभागी एक चौक व त्याच्या सभोवती राहण्याच्या खोल्या असत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी बाहेरून उंच व अरूंद जीना असे. प्रत्येक घरामध्ये एक स्नानगृह व मोरी असे. मधल्या चौकोनात विहिर असे. प्रत्येक मजल्यावर स्वतंत्र कुटुंब असावे.

घराचे व इतर इमारतीचे बांधकाम प्रामुख्याने **भाजलेल्या विटाने** केलेली आहे. बांधकामासाठी **चिकणमाती, चुना, पांढरीमाती** यांचा वापर करण्यात येई. घराची बांधणी साधी परंतु भक्कम असे. प्रत्येक दोन घरामध्ये अंतर असे. या बोळाच्या दोन्ही बाजूस उंच बांधकाम केलेले असे. घराचे प्रवेशद्वार व खिडक्या मुख्य रस्त्याच्या विरूध्द बाजूच्या गल्लीच्या दिशेस असे. कारण रस्त्यावरील धुळ व चोर, दरोडेखोर यांच्यापासून सरंक्षण व्हावे.

बहुतेक घरे **धाब्याची** असून गच्चीवरील पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी मातीचे पन्हळ असे. प्रत्येक घरातील मोरी व स्नानगृह रस्त्याच्या बाजूस असे. स्नानगृहाचे बांधकाम पक्के असून अर्ध्या भिंतीपर्यंत पक्की चुनेबंदी करून त्यावर डांबराचा थर देत असे. स्नानगृह व मोरीतील पाणी मातीच्या नळावाटे रस्त्याच्या गटारात सोडलेले असे. उंचवटा किंवा गढीतील घरे सर्वसामान्य नागरीकांच्या घरापेक्षा जास्त प्रशस्त व जास्त खोल्यांची होती. तळमजल्याचा उपयोग **स्वयंपाकगृह** म्हणून व वरच्या मजल्याचा उपयोग **शयनगृह** म्हणून केला जात असावा.

५) **कामगार वस्त्या** – मोहेंजोदडो व हडप्पा या ठिकाणी कामगार वस्त्यांचे अवशेष आढळतात. या वस्त्यातील घरे दोन खोल्यांची व ३०’ x २७’ या आकाराची असत. ही घरे औद्योगिक कामगारांच्या चाळीसारखी वाटतात. हडप्पा येथील कामगार वस्ती जवळ विटांनी बांधलेले **उखळ** सापडले आहे. मोठया मुसळानी धान्य कांडून त्याचे पिठ करीत.

किल्ल्यावर राहणारे सरकारी अधिकारी व अन्य सेवक यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे काम कामगार करत असावेत. या उखळा जवळ १५०' x २००' आकाराचे धान्याचे कोठार आहे. पाण्यासाठी लहान लहान व मोठ्या विहिरी असे.

६) **सांडपाण्याची व्यवस्था** – सिंधू संस्कृतीतील सांडपाण्याची व्यवस्था ही तत्कालीन जगातील **क्रीटबेट** वगळता अन्य कोणत्याही संस्कृतीमध्ये आढळत नाही. शहराचे आरोग्य व स्वास्थ टिकून राहणेसाठी सांडपाण्याची तंत्रशुध्द, नियोजीत व्यवस्था हडप्पा, मोहेंजदडो येथे आढळून येते. घरातील सांडपाणी, सार्वजनिक स्नानगृहातील पाणी, रस्त्यावरील पाणी, पावसाचे पाणी इत्यादी ठिकाणचे पाणी गावाबाहेर वाहून नेण्यासाठी **मोठ्या भुयारी गटारांची व्यवस्था** होती. शहरातील गटारी रस्त्याशी समांतर असून त्या पक्क्या विटांनी व चुनखडीने गटारे बांधलेली असे. या गटाराची रूंदी ९ इंच असून उंची १२ इंच आहे. गटारे साफ करण्यासाठी ठिकठिकाणी मोकळी जागा असे. त्यावर **दगडी झाकणी** असे या गटारातील पाणी गावाच्या बाहेर नदीच्या पात्रात सोडले जात असे.

सांडपाणाच्या व्यवस्थेमध्ये **एक त्रुटी** आढळते ती म्हणजे सांडपाण्याचा नाला हा बहुधा विहिरीजवळ असे. यातून पाणी साठण्याचा धोका जाणवतो तरी पण, लोकांच्या हितांच्या विचार करता व स्वच्छतेच्या दृष्टीने ही नियोजन व्यवस्थीत होते. **सर जॉन मार्शलच्या मते** – "सांडपाण्याची इतकी सुव्यवस्थीत योजना तत्काली कोणत्याही संस्कृती अंतर्गत नव्हती". **डॉ. ए. एल बाशम** – "प्राचीन कोणत्याही संस्कृतीत व रोमन संस्कृतीच्या पूर्वी या प्रकाराची भूयारी गटारांची व्यवस्था नव्हती."

७) **मुबलक पाणीपुरवठा/विहीर** – काही विशाल घरांमध्ये असलेल्या **वैयक्तिक विहीर** व दोन घरामध्ये एक **सार्वजनिक विहिर** या व्यवस्थेमुळे शहरांना मुबलक पाणी पुरवठा होत असे. उत्खननात चौरसाकृती, अंडाकृती विहिरी प्राप्त झाल्या आहेत. विहीरीमधून दोऱ्याने पाणी काढण्याच्या खूणा अद्यापी दिसतात. ३ फूट रूंदीच्या विहिरी असे. **मोहेंजोदडोच्या तुलनेने हडप्पा येथे कमी प्रमाणात** विहिरी आहेत.

ब) **प्रचंड इमारती बांधकाम** – सिंधू संस्कृतीच्या ठिकिठकाणच्या उत्खननात प्रचंड इमारतीचे अवशेष प्राप्त झालेले आहेत. या इमारती रेखीव नगररचनेप्रमाणे प्रचंड इमारतींची निर्मिती हे वैशिट्ये या संस्कृतीचे होय. मोहेंजोदडो व हडप्पा येथे या इमारती आढळतात. या प्रचंड बांधकामात रेखीवता, प्रमाणबध्दता, सौंदर्यवादी दृष्टीकोन व लोकोपयुक्त इ. घटकांचा समावेश केलेला आहे. उत्खननातील काही उल्लेखनीय वास्तुंविषयी पुढीलप्रमाणे माहिती मिळते.

१) **महास्नानगृह** – सिंधू संस्कृतीमधील सर्वात भव्य व आश्चर्यकारक वास्तू म्हणजे मोहेंजोदडो येथील महास्नानगृह होय. हे महास्नानगृह **दक्षिणत्तर** सुमारे ६० मीटर (१०८० फुट) लांब व **पूर्व पश्चिम** रूंदी ३६ मीटर (१०८ फूट) आणि २.४३ मीटर **खोल** आहे. बाजूच्या भिंती भव्य असून तळाशी ७ ते ८ फूट रूंद आहेत. बाजूला पाण्याच्या तळापर्यंत पायऱ्या आहेत. महास्नानगृहाच्या **मध्यभागी पोहण्याचा तलाव** १३ मीटर (३९ फुट) लांब, ८ मीटर (२३ फुट) रूंद व ३ मीटर (८ फुट) खोल आहे. तलावाच्या भिंती २ ते ३ मीटर रूंद आहेत.

तलावाच्या चारही बाजूला व्हरांडे आहेत. त्यामध्ये दक्षिणेला खोल्या असून त्याचा उपयोग कपडे बदलण्याकरिता होत असावा. **पूर्वेला** पाणीपुरवठयासाठी विहिर आहे. विहिरीद्वारेच तलावात सतत स्वच्छ पाण्याचा पुरवा होत असावा. तलावातील पाणी बाहेर काढण्यासाठी मोऱ्यांचे बांधकाम केलेले आहे. तलाव बांधताना पाणी झिरपू नये व बाहेरचे पाणी तलावात येऊ नये याची विशेष काळजी घेतलेली होती.

या महास्नानगृहाचा उपयोग दैनंदिन लौकिक स्नानासाठी होता की, धार्मिक कार्यासाठी होता हे सांगता येत नाही. स्नानगृहाच्या **आग्नेयेच्या बाजूस** उघड्यावर सूर्यस्नानाची व्यवस्था होती**. डॉ. मॅके यांच्या मते** – "या स्नानगृहातला धार्मिक महत्त्व असावे". **कार्लटनच्या मते** – "समुद्रकिनाऱ्यावरील अद्यावत हॉटेल असावे."

२) **सभागृह** – मोहेंजोदडो येथे महास्नानगृहाच्या शेजारी सुमारे २५ मी. लांब (८० फूट) व २५ मी. (८० फूट) रूंदीच्या सभागृह इमारतीचे अवशेष मिळालेले आहेत. मध्यभागी प्रमुख आसन आहे. या इमारतीला महाविद्यालयीन इमारत किंवा विहार असे नाव इतिहासकारांनी दिले आहे. परंतु तिचा उपयोग शैक्षणिक, प्रशासकीय, धार्मिक या पैकी कोणत्या कामासाठी वापरला जाई ते सांगता येत नाही.

३) **धान्याचे कोठार** – मोहेंजोदडो व हडप्पा येथे विशाल धान्याच्या कोठारीचे अवशेष मिळालेले आहेत. **मोहेंजोदडोचे कोठार** गढीच्या विभागात असून ते ४५.७१ मीटर लांब व २२.५० मीटर रूंद आहे. त्याचे दोन विभाग करून धान्य साठवण्यासाठी खोल्या केलेल्या आहेत. **हडप्पा येथील धान्याचे कोठार** दक्षिणोत्तर ५६ मीटर लांब व पूर्व-पश्चिम ४५ मीटर रूंद आहे. यामध्ये ८ मीटर रूंदीचा रस्ता आहे. प्रत्येक विभागात ६ खोल्या असून दोन खोल्यामध्ये २ मीटर रूंदीचा रस्ता आहे. कोठाराच्या जवळ धान्य उतरवण्यासाठी कट्टे बांधलेले आहेत. भिंतीना समोरासमोर खिडक्या आहेत. ही इमारत सार्वजनिक महत्त्वाची होती. कराच्या रूपाने गोळा केलेले धान्य साठवले जाई. शेजारीच **उखळ** आहे. त्याचा उपयोग धान्य कुंटण्यासाठी केला जात असावा. हडप्पा येथे कोठाऱ्या शेजारी मजुरांची वसतिगृहे सापडलेली आहेत.

४) **जहाजाची गोदी** – गुजराथमध्ये सापडलेल्या शिक्क्यावरून लोथल व रंगपूर येथून बॅबिलोनियाबरोबर समुद्रमार्गे व्यापार सुरु होता हे स्पष्ट होते. **श्री आर. एन. भटाचार्य** यांनी रंगपूरमधील शिक्क्याच्या आधारे कुंटासी, धोलवारी, लोथल, रंगपूर ही परदेशाशी व्यापार करणारी बंदरे होती असे मत मांडले. जहाज बांधणी व दुरूस्ती करण्यासाठी **लोथल** येथे पक्क्या विटांनी बांधलेली गोदी होती. ही गोदी सुमारे **उत्तर-दक्षिण** २३५ मीटर लांब व **पूर्व-पश्चिम** ४० मीटर रूंद आणि १४ फूट उंचीच्या भिंती आहेत. समुद्राच्या भरतीच्या लाटेबरोबर पाणी व जहाज आत येईल व ओहोटीच्या वेळी हे पाणी बाहेर जाणार नाही अशी व्यवस्था केलेली होती यावरून समुद्र प्रवासाचे, जहाज बांधणीचे, भरती-ओहोटीचे ज्ञान लोकांना होते असे दिसून येते.

५) **शासन केंद्र** – सिंधू संस्कृतीच्या एक इमारतीत एका बाजूस प्रमुखास बसण्यासाठी जागा आहे. त्याच्या भोवती काही जणांना बसण्यासाठी जागा आहे. या इमारतीचा उपयोग प्रामुख्याने शासन केंद्र किंवा शिक्षण म्हणून केलेला असावा पण निश्चित सांगता येत नाही.

६) **बांधकामाचे साहित्य** – सिंधू संस्कृतीतील बांधकामाचा विचार केल्यास या बांधकामात प्रथम भाजलेल्या विटांचा उल्लेख करावा लागेल या विटा भक्कम व लाल रंगाच्या आहेत. या विटामध्ये **कमाल आकाराच्या विटा** २० १/२'' x १० १/२'' x ३ १/२'' **मध्य आकाराच्या विटा** १० १/२'' x ५'' x २ १/४'', **किमान आकाराच्या विटा** २१ १/२'' x ४'' x २'' इतक्या आहेत. याशिवाय मानी, जिप्सम मॉर्टर इ. वापर केला जात असे. मजबूतीसाठी मातीत चून्याचे मिश्रण केले जात असे. पर्वता जवळील बांधकामात २ ते ३ फूटांचे दगडाचा पाया असे. विविध कामासाठी लाकूड वापरत.

वरील सर्व बांधकामामध्ये मोठ्या प्रमाणात पक्क्या विटांचा उपयोग केलेला असे. आखीव नगररचना, आरोग्य रक्षण करणारी भूयारी गटारांची व्यवस्था व प्रचंड इमारती हे खास वैशिट्ये दिसून येतात.

## २.५ सिंधू संस्कृतीचा ऱ्हास :

सिंधू संस्कृतीचा उदय व निर्माता याबाबत जसे वाद आहेत तसेच तिच्या विनाशाबाबतही वाद आहे. एवढया प्रगत, प्रगल्भ व भरभराटीस गेलेल्या सिंधू संस्कृतीचा नाश होणे ही खेदाची बाब आहे हीसंस्कृती सुमारे इ.स.पू १७५० ते इ.स.पू. १५०० च्या दरम्यान नष्ट झाली असावी याबाबत इतिहास काराच्यात एकमत नाही सिंधू संस्कृतीच्या विनाशाबाबत पुढील प्रमाणे कारणे / सिध्दांत माडले जातात.

१) **युयुत्सू या परकीयांचे आक्रमण** - संरक्षण तटबदी किंवा संरक्षणाच्या अन्य साधनाचा व शस्त्रास्त्राचा अभाव होता. यावरुन सिंधू संस्कृतीतील लोक शांतता प्रिय असावेत. तेथील संपन्न, सखवस्तू पंरतू संरक्षणास सिध्द नसलेल्या रहिवाशावर परचक्राचे म्हणजे युयुत्सूचे संकट आले असावे. त्यापुढे त्याच निभाव न लागल्याने संस्कृतीच ऱ्हास झाला असावा.

२) **आर्यानी सिंधू संस्कृती नष्ट केली** - सर जॉन मार्शल यांना मोहेजोदडो येथे काही मानवी हाडाचे सापले मिळाले त्याच्या आधारे **मॉर्टिअर कीलरने** मत मांडलेली, “आर्यानी या संस्कृतीचा विनाश केला असावा. अनार्याची शहरे व तटबदी उदध्वस्त करणारा म्हणून इंद्राला पुरंदर म्हटले गेलेले असावे असे मत मांडली पंरतु हे अयोग्य वाटते.कारण आर्य हे **लोहयुगात भारतात** आले. सिंधू संस्कृती ही ताम्रयुगातील आहे.

३) **कायदा व सुव्यवस्था उध्वस्त** - मोहेंजोदाडो येथे रस्त्यावर अतिक्रमणे सुरु झाली. जड जवाहर व अन्य मौल्यवान वस्तू पुरुन ठेवण्याची पध्दत वाढू लागली. यावरुन शहरात निर्वासिताची गर्दी वाढून कायदा सुव्यवस्था नष्ट झाली होती. त्याच वेळी परकीयानी आक्रमण केल्याने लोकांनी घरेदारे सोडून पळून गेले. जे मागे राहिलेल्याची कातळ केली. त्यामुळे या संस्कृतीचा विनाश झाला.

४) **व्यापार बंद** - सिंधू संस्कृतीचा व्यापार परदेशात मोठया प्रमाणात सुरु होता. तेव्हा ही संस्कृती समृध्द व सधन होती. पंरतु अखेरच्या टप्प्यात व्यापार बंद झाल्याने, सर्व क्षेत्रावर दुष्यपरिणाम झाला. त्यामुळे संस्कृतीचा नाश झाला.

५) **लोकसंख्या वाढ व मलेरियाचा प्रभाव** - सिंधू संस्कृती मध्ये प्रचंड लोकसंख्येची वाढ झाल्याने त्याचा परिणाम सामाजिक व आर्थिक जीवनावर झाला. तसेच मलेरिया रोगाचा प्रभाव वाढल्याने पूर्ण गावे नष्ट झाली त्यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला.

६) **तत्रज्ञानावरील मक्तेदारी संपली** - विविध नैसर्गिक कारणामुळे खेडी ओस पडली नागराना अवकला प्राप्त झाली. व्यापारी, कारागीरानी स्थलांतर केले असावे. त्यामुळे नगरांची तत्कालीन तंत्रज्ञानावरची मक्तेदारी संपून त्याचा इतरत्र फौलाव झाला असावा त्यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला असावा.

७) **नैसर्गिक संकटामुळे संस्कृतीचा नाश** - उत्खनित पुराव्याच्या आधारे सिंधूचा नाश क्रमशःन होता अचानक झाल्याने जाणवते आणि हा अपघात नैसर्गिक आपातीतून उदभवल्याचे स्पष्ट होते नैसर्गिक संकटामध्ये विविध कारणे मांडली आहे.

**अ)नदी प्रवाहाचे मार्ग बदल** - आधुनिक काळात पुरावे प्राप्त झाले आहेत का सिंधू नदीने आपला प्रवाह मार्ग बदलला होता. माधो स्वरुप वत्सने हडप्पा नगराच्या विनाशाला रावी नदीने मार्ग बदलला हे कारण मानले आहे. पाण्याचे पात्र दुर गेल्याने समृध्दीवर परिणाम झाला काही वेळा भूकंपामुळे नदीने प्रवाह मार्ग बदलला त्याचा परिणाम व्यापारावर झाला. संस्कृती नष्ट झाली.

**ब) महापुरामुळे संस्कृतीचा नाश** - हिमालयातील बर्फ वितळून सिंधूत तिच्या उपनदयाना आलेला महापूर या महापूराने प्रथम मोठी नगरे उध्वस्त झाली नतंर खेडी नाश झाली या पुरामुळे मोंहजोदडो ओसाड पडले असावे त्यामुळे संस्कृतीचा नाश झाला.

**क) भूकंपामुळे संस्कृतीचा विनाश** - मोहेंजोदडो शहराच्या विनाशाला भूकंप कारणीभूत असावा. हा भूकंप मोहेंजोदडो पासून १६० किमी अंतरावर झाला असावा. त्यामुळे पाण्याची पातळी वाढली व वसाहतीला धोका निर्माण झाला.

**ड) वाळवंटी प्रदेशात रुपातर** - सिंधू नदीच्या खोऱ्यातील दक्षिणेच्या प्रदेशाचे झपाट्याने होणारे शुष्क वाळवंटात रुपातर, लोथल येथील बंदर समुद्राच्या तळाची उंची वाढून काही काळानंतर गाळाने भरुन गेले. त्यामुळे लोथलचा व्यापार बंद झाला. तसेच यामुळे विस्थापनेस प्रारंभ झाला. सिंधूसंस्कृतीचा नाश झाला.

**इ) दुष्काळ निर्माण झाला** - प्रारंभीच्या काळात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने शेतीचे उत्पादन वाढले. लोकांचे जीवन सुख-समृध्द झाले. या जीवनासाठी लोकांनी जंगले नष्ट केली. उपयोगी असलेली सृष्टी नष्ट झाली त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. परिणामी लोकांनी स्थलातर केले. काळीबंगन हे शहर यामुळे उद्‌ध्वस्त झाले.

वरील विविध कारणामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला . या काळात गुजराथ, राजस्थान, महाराष्ट मध्यप्रदेश येथे ताम्र-पाषाण युगीन ग्रामीण संस्कृती उदयास येत होती त्यामुळे या संस्कृतीवर सिंधू संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. सिंधू संस्कृती नष्ट झाली की विनाश की स्थलांतरीत झाली, याबाबत अदयापी निश्चित सांगता येत नाही.

## २.६ सारांश :

सिंधू संस्कृतीचा १९२२ मध्ये शोध लागल्यामुळे प्राचीन काळातील प्रगत संस्कृतीची माहिती झाली. उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या अवशेषावरून त्याकाळातील सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक जीवनाची ओळख झाली. त्याच्या आधारे जागातील अतिप्राचीन व नागरी संस्कृती सिंधू संस्कृती होती हे सिध्द झालेले दिसून येते. प्राचीन काळात जगाशी व्यापारी संबंध असल्याचे आढळून आलेले आहे.

## २.७ दिर्घोत्तरी प्रश्न :

१. सिंधू संस्कृतीच्या सामाजिक जीवनाची माहिती स्पष्ट करा.

२. सिंधू संस्कृतीच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या.

३. सिंधू संस्कृतीच्या धार्मिक परिस्थितीवर भाष्य करा.

४. सिंधू संस्कृतीच्या नगररचनेची वैशिष्ट्ये सांगा.

५. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासास जबाबदार ठरलेल्या घटकांची माहिती लिहा.

❖❖❖❖

# ३

# 'वैदिक कालखंड'

**प्रकरणाची रचनाः**


३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना.
३.२ आर्यांच्या मुळ वस्तीस्थानाबद्दलचे सिद्धांत
३.३ जनपदाबाबतची माहिती
३.४ वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती
३.५ वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती
३.६ वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती
३.७ सारांश
३.८ दिर्घोत्तरी प्रश्न


## ३.० उद्दिष्ट्ये :

- आर्यांचे आगमन व वस्तीस्थानाबद्दलची माहिती जाणून घेणे.
- जनपदांबद्दलची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

प्राचीन कालखंडातील एक महत्त्वपूर्ण संस्कृती म्हणून वैदिक संस्कृतीकडे पाहिले जाते. या संस्कृतीतील लोक स्वतःला आर्य असे समजत होते. म्हणूनच या संस्कृतीला आर्य संस्कृती असे म्हटले जाते. वेदातून प्रतीत होणारी ही संस्कृती असल्या कारणे या संस्कृतीला वैदिक संस्कृती असे ही म्हटले जाते. या संस्कृतीने भारतीयांना वर्ण, आश्रम, संस्कार, विवाह प्रकार व एकत्र कुटुंब व्यवस्थेची जडण-घडण दिल्याने भारतीय इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने या संस्कृतीला अनन्य साधारण महत्त्व आहे.

## ३.३ आर्यांच्या मुळ वस्तीस्थानाबद्दलचे सिध्दांत

आर्यांचा मुळ प्रदेश/मुळस्थान भारत की युरोप किंवा मध्य आशिया असावा यावर मतभेद आहेत. युरोपीय इतिहासकारांच्या मते, आर्य युरोपातून एशिया मार्गे भारतात आणि इराणमध्ये गेले तर भारतीय इतिहासकारांच्या मते आर्य हे मुळचे भारतातील असून ते येथूनच जगात अनेक ठिकाणी गेले. या संदर्भात पुढीलप्रमाणे सिध्दांत मांडले आहेत.

**अ) आर्यांचे मुळ वसतिस्थान-भारत** - सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. तो ग्रंथ आर्यांचा आहे. या ग्रंथात **सप्त सिंधूचा** उल्लेख आहे. कोणीही आपला मुळ प्रदेश विसरत नाही. या ग्रंथात आर्यांनी मुळ प्रदेशाचा उल्ल्ेख कोठेही केला नाही या संदर्भात इतिहासकारांची मते.

**१) डॉ अविनाशचंद्र दास** - आर्यांचे मुळ स्थान म्हणजे **सप्तसिंधू नदयांचा** (सिंधू, झेलम, रावी, बियाझ, चिनाब, सतलज, सरस्वती) प्रदेश होय. **उत्तरेला** - काश्मीर, **पश्चिमेकडे**-गांधार, **दक्षिणेकडे**-राजस्थान, **पूर्वेला** गंगेचे खोर होय. गांधार-काबूल असा जोडणारा प्रदेश आणि येथूनच आर्यांच्या अनेक टोळ्या एशिया, युरोपकडे गेल्या. त्यांच्या मताला **संपूर्णानंद, लक्ष्मीधर झा** यांनी पाठींबा दिला.

**डॉ.डी.एस.त्रिवेदी** - आर्यांचा मुळ प्रदेश मुलतान प्रंतातील **देविका नदीच्या** परिसरात होता हा विचार ऋग्वेदाच्या आधारे मांडला आहे. **पंडित गंगानाथ** झा यांच्यामते, ब्रहर्षि देश हा मुळप्रदेश असून। भारत हीच आर्यांची मातृभूमी, धर्मभूमी होय. **श्रीयुत एल.डी.कल्लाच्या मते** - काश्मीर किंवा हिमालय प्रदेश आर्यांचा मुळ प्रदेश असावा. वैदिक साहित्यात हिमालयातील वनस्पतीचे वर्णन आलेले आहे. त्यावरुन हे मत मांडले आहे.

**डॉ राजबली पांडेच्या मते** - आर्यांचा मुळ प्रदेश **मध्यप्रदेश** असावा. संपूर्ण भारतीय साहित्यात, परंपरागत कथा, काव्यात आर्य बाहेरुन आले असा उल्लेख नाही. आर्यांचा मुळ प्रदेश मध्यप्रदेश असावा. हा मुळ प्रदेश सोडून **पंजाबमध्ये** गेल्यानंतर **ऋग्वेदाची रचना** केलî. पंजाबमधून पश्चिम भारत , मध्य आशिया, पश्चिम आशियात आर्य गेले. स्वामी दयानंद सरस्वती, पार्जीटरच्या मते आर्य हे मुळचे **तिबेटमधील** असावेत.

अनेक भारतीय विचारवंतांनी आर्यांची मूळ भूमी भारत आहे असे सांगितले. आर्यांच्या ऋग्वेदात केवळ पंजाब व आसपासच्या प्रदेशाचे वर्णन केले आहे. उत्तर पंजाबात असलेली मंजान पर्वतश्रेणî, यज्ञयागाची वाढ होणारा प्रदेश, इंडो-युरोपीय भाषांचे मुळ वर्णोचार हे संस्कृत व तत्सम भाषांशी जुळतात. त्यामुळे भाषा वैज्ञानिक आधारे आर्य हे मुळचे भारतीय होते. हे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

आर्यांचा मुळ प्रदेश भारत नाही असे मत मांडणाऱ्यानी काही तर्क मांडले आहेत. आर्य जर मुळ भारतीय होते तर, त्यांनी संपूर्ण भारताचे आर्यीकरण का केले नाही. केवळ उत्तरभारताचे आर्यीकरण केले. दक्षिण भारतात द्रविड भाषा बोलतात म्हणून, भारत हा मुळ द्रविड संस्कृतीचे केंद्र होता.आर्यांने **पश्चिमोत्तर संस्कृतीचा** प्रसार केला. कोणी भारतीय बाहेर जाऊन बसलेला

नाही. उलट बाहेरचे भारतात आलेले आहेत. ऋग्वेदात वाघाचा, तांदळाचा, मिठाचा उल्लेख नाही यावरुन ते परकीय असावेत.

**ब) आर्यांचा मुळ प्रदेश - उत्तर ध्रुव/(लोकमान्य टिळकांचा सिध्दांत -**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी **"आर्क्टिव होम इन द वेदाज"** या आपल्या ग्रंथात आर्यांचे मुळस्थान उत्तर ध्रुवाचा प्रदेश असावा असा सिध्दांत मांडला. ऋग्वेदातील इंद्र व वृत्तसुराचे युध्द, बर्फाळ प्रदेशाचे वर्णन, दीर्घकालीन रात्र व दिवस, उषःकालाचे वर्णन अग्निउपासनेचे अग्निहोम इ. पुराव्यांच्या आधारे आर्यांचा उत्तरध्रुव हा मुळवसतिस्थान असावेत. तेथूनच ते इराण व भारतात सप्त सिंधूच्या परिसरात आले असावेत.

अनेक विव्दांनानी लोकमान्य टिळकांचे मत अमान्य केलेले आहे. कारण जर आर्यांचा मुळ प्रदेश उत्तर ध्रुव मानला तर आर्य सप्तसिंधू प्रदेशाला कधीही **देवकृतयोनि** म्हणणार नाहीत. त्यांचा तो प्रदेश असता तर, त्यांनी उत्तरध्रुवाचे स्पष्ट वर्णन केले असते. परंतु तसे त्यांनी केलेले नाही त्यामुळे तो मुळप्रदेश आर्यांचा नसावा.

**क) आर्यांचा मुळ प्रदेश** - युरोप :- भारतीय इतिहासात आर्यांचा मूळ वसतिस्थान हा एक वादाचा प्रश्न आहे. हा प्रश्न १६व्या शतकात प्रथम निर्माण झाला. **फिलिपो सासेटी** नावाच्या इटालियन व्यापाऱ्याचे १५५३-८८ या काळात गोव्यात वास्तव्य होते. त्याने प्रथम संस्कृत व युरोपातील काही भाषा यांच्यात साम्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. याचे कारण या भाषांचे मूळ एक असावे असे १७८६ मध्ये सर विल्यम जोन्स याने मत मांडले. ग्रीक, लॅटिन, गोथिक, संस्कृत इ भाषांना विव्दानानी **इंडो-युरोपीयन** किंवा **इंडोजॅर्मनीक** नाव दिले. त्यातून तौलनिक भाषाशास्त्राच्या अभ्यासाला चालना मिळाली. या भाषांमधील मातृ-पितृ वाचक शब्दांमध्ये मोठ्या प्रमाणात साम्य आढळते. युरोपातील प्रचलित भाषांपैकी **लिथुआनियम** या भाषेचे संस्कृत भाषेशी खूपच साम्य आहे. त्यामुळे आर्यांचे मुळ वसतिस्थान भारताबाहेर असावे, असे विव्दानांचे मत आहे.

**डॉ.पी.गाईल्स** याने सर्वप्रथम भाषाशास्त्राच्या आधारे आपले मत मांडले ऑस्ट्रीया-हंगेरीचा गवताळ मैदानी प्रदेश किंवा डेन्यून नदीकाठचा प्रदेश आर्याचा मुळप्रदेश असावा. त्याने काही भौगोलिक निष्कर्ष काढले. ते म्हणजे आर्यांचा व्दीपसमुह व समुद्रकाठाचा संबंध नाही. नदीचा डोंगराळ प्रदेश मुळप्रदेश असावा. आर्य गहू व जव अन्न म्हणून वापरत. गाय, बैल, कुत्रा, हरीण, भेड, घोडा, माकड इ. प्राणी परिचीत असून, हत्ती, वाग, गाढव हे प्राणी माहित नसावेत या प्रदेशातून एशिया मायनर, मेसोपोटानिया, इराण, आणि भारत या प्रदेशात आर्य आले असावेत. **रॅप्सनच्या** मते आर्य मूळचे ईशान्य युरापातील असावेत. **जर्मन पंडित पेन्का** याने अनेक स्पष्टीकरणाच्या आधारे जर्मनीचा प्रदेश हा आर्यांचे मूळस्थान असावे. **हर्टच्यामते** आर्याचे मुळवस्तीस्थान युरोपातील असून काही टोळ्या इराण व भारतात स्थलांतरित झाल्या. **नेहरिंगच्या मते** - दक्षिण रशियातील गवताळ प्रदेशाला आर्यांचे मुळस्थान कल्पिले आहे. युक्रेनमध्ये इ.स.पू.३०० मधील सापडलेल्या मातीच्या भांड्याच्या आधारे मत मांडले ऋग्वेदात वर्णन केलेल्या भौगोलिक आणि वनस्पतीच्या विषयी वैशिष्ट्यांच्या अभावे आर्यांचा मुळप्रदेश युरोप नसावा.

**आपली प्रगती तपासा**

१. आर्यांचा मुळप्रदेश भारत.

## ३.३ जनपदाबाबतची माहिती

जनपद जनराज्याशी संबंधीत असून जनपदाचा अर्थ जनावरी सत्ता अथवा लोकांवरील सत्ता असा होतो. या पद्धतीमध्ये आपल्या कुलबांधवापैकी एका व्यक्तीची जनपदावर नियुक्ती केली जात होती व त्या व्यक्तीला शासन करण्याचे अधिकार प्राप्त होत होते. जनपद कर्त्याचे स्थान सामान्य लोकांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे होते. जनपदाच्या कालखंडात जनकुल व राज्य समरुप समजली जात होती.

### १) जनपदाच्या उदयाची पार्श्वभूमी :

सुरुवातीच्या कालखंडात मानव अर्थभटक्या अवस्थेत होता. शेती पेक्षा त्याचे पशुपालन हे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते. त्यामुळे मानव आपल्या गायींसह एकाच गोठ्यात राहत होतो. मात्र असे गाईंच्या गोठ्यात राहणारे सर्वच लोक आपल्याला एकाच वंशातील व समगोत्री मानत नसत. परिणामी या लोकात द्वेशभावना निर्माण होत असत व यातूनच संघर्ष उद्‌भवत होते. तसेच गोधनावरुनही या लोकांमध्ये संघर्ष उद्‌भवत होते. परिणामी या लोकांना मोठे स्थीर राज्य निर्माण करत आली नाही. उलट या लोकांनी छोटी छोटी जनराज्य निर्माण केली व यातून जनपदाचा उदय झाला.

### २) पूर्व वैदिक जनकुलीय रचना :

पूर्व वैदिक सामाजिक रचनेतील जनकुलीय जीवनाचे वर्चस्व जन व विश या ऋग्वेदात वापरलेल्या शब्दांवरुन दिसून येते. वैदिक जन हा सर्वात मोठा समाजाचा भाग मानला जातो. या कालखंडात सप्तसिंधूने व्यापलेल्या पंजाब आणि उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात छोटी जनकुलीय राज्य निर्माण झाली होती. ही राज्य गोधनासाठी राज्य करत होती. पूर्व वैदिक कालखंडात राजपद ही प्रामुख्याने जनकुलीय संख्या होती. तो आपल्या लोकांवर राज्य करतो म्हणून त्याला त्या कालखंडात रक्षणकर्ता म्हटले जात होते. सभा आणि समितीमुळे या पदाला मोठ्या मर्यादा होत्या.

### ३) उत्तर वैदिक जनकुलीय रचनेतील फरक :

उत्तर वैदिक कालखंडात आर्याची कर्मभूमी उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागापर्यंत पोहचली होती. लोखंडी शस्त्रांच्या वापरामुळे त्यांचा हा विस्तार सुलभ झाला होता. उत्तर वैदिक कालखंडात छोटी छोटी जनकुले मोठ्या मोठ्या विभागात एकत्रीत झाली होती. या कालखंडात

किवी व पुर हे एकत्र येवू त्यांनी त्यांचे जनकुल निर्माण केले होते व त्यांनी उत्तर प्रदेशचा पूर्ण भाग आपल्या ताब्यात आणला होता. टप्प्या टप्प्याने जनकुलामध्य प्रादेशिक प्रवृत्ती बलावली होती. जनपद या संकल्पनेला महत्त्व प्राप्त होवू लागले.

**४) जनपदाकडे वाटचाल :**

प्रादेशिक प्रवृत्तीमध्ये झालेली वाढ व लोखंडाचा वाढलेला वापर यामुळे पुढे मोठी राज्य निर्माण झाली. ही राज्य पुढे लष्करी व आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनली. या राज्यामध्ये क्षत्रीयांची भूमिका महत्त्वाची ठरु लागली. राजगीरी, राजघाट, चिरंद, व कौसंबी या ठिकाणी नागरी वसाहती निर्माण झाल्या. उजैन, कोसल व मगध यांचाही विस्तार झाला. या विकास व विस्तारामुळे जनकुला ऐवजी जनपदाची निर्मिती झाली.

**आपली प्रगती तपासा**

१. जनपदाबद्दलची माहिती सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.४ वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती

**पूर्व वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती :**

आर्य सिंधू परिसरात स्थायिक झाले. तेव्हापासून सामुदायिक पध्दतीने जीवन जगत होते. तेथेच शेती व्यवसायाला प्ररंभ केला. उत्पादन वाढताच श्रम विभागणी क्रमप्राप्त झाली. आर्याचे सामाजिक जीवन जसजसे विकसित होऊ लागले तसतसे नवनवीन व्यवसाय सुरु झाले. आर्यांची सामाजिक परिस्थिती पुढीलप्रमाणे दिसून येते.

**१) आर्यांची कुटूंब संस्था -** आर्यांनी भटकंती जीवनाचा त्याग करुन स्थिर झाले. सामाजिक स्वस्थाच्या जीवनाचा आधार म्हणजे कुटूंब होय. आर्यांची एकत्र कुटूंब पध्दत असून साधारण तीन पिढ्या एकत्र राहात होत्या. कुटूंबाला **कुल किंवा गृह** म्हणत असे, त्याच्या प्रमुखाला **गृहपती/पिता/दम्पति** म्हणत असे. कुटूंब पध्दत **पितृ सत्ताक** होते आई-वडिलांना लाडाने **नना व तत** ही नावे होती. आदरातिथ्य हे कुटूंबाचे वैशिष्ट्ये होते. गृहपती आपल्या पत्नीबरोबर सर्व प्रकारचे धार्मिक विधी करत असे. कुटुंबामध्ये पिता, मुलगा, मुलगी बहिण, भाऊ, आजा-आजी इ. असे. मुला-मुलींच्या लग्नात वडिलांची महत्वाची भूमिका असे. वडिलांच्या नंतर मोठा मुलगा प्रमुख असे. त्या वडिलांची संपत्ती वारसाला मिळत असे. मुलगा नसेल तर मुलीला प्राप्त होत असे. कुटूंब प्रमुखास अपत्य नसल्यास त्यास दत्तक घेण्याचा अधिकार होता.

**२)आर्यांची वर्णव्यवस्था** - आर्याची समाजरचना ही सामाजिक समुहांची बनलेली होती. या सामाजिक समुहांना **वर्ण** असे म्हणत. हे वर्ण त्यांच्या कामावरुन पडलेले होते. परंतु ते पुढे वंश परंपरेने ठरले जाऊ लागले. ऋग्वेदातील **पुरुषसुक्त** नावाच्या दहाव्या मंडळांत चातुर्वर्ण पध्दतीचा **प्रथम उल्लेख** मिळतो. परंतु या काळात जाति संस्थेचे अस्तित्वही नव्हते. समाजाच्या गरजा वाढल्या त्या भागवण्यासाठी स्वतंत्र व्यवसाय करणारी वर्णव्यवस्था निर्माण झाली. प्रारंभी तीन वर्ण म्हणजे ब्राम्हत्व, क्षत्रिय, वैश्य हे होय. ऋग्वेदात जे सामाजिक जीवनप्रतिबिंबित झाले. आहे त्यामुळे वर्ण व जाती असा उल्लेख नाही. यावेळी युध्द, अध्ययन, शेत- व्यापार व उद्योग हे प्रमुख व्यवसाय होते त्यावरुन हे तीन वर्ण निर्माण झाले असावेत. **ब्राम्हण**-वेद, विद्या, अध्ययन, धर्मविधी, मंत्रतंत्र व अन्य बौध्दिक कामे या वर्गाकडे दिली. समाजातील अतिशय प्रतिष्ठा व समाजपररुषांचे मुख समजल्या जाऊ लागला. **क्षत्रिय** जे धाडसी, धडधाकट, लढाऊ वृत्तीचे होते त्यांच्याकडे समाजाच्या संरक्षणाची जबाबदारी दिली, ते क्षत्रिय होय. समाजपुरुषाचे बाहू क्षत्रिय ठरले. **वैश्य** - जे शेती, व्यापार व इतर उद्योग करीत असत त्यांचा वैश्य वर्ण तयार झाला. या तीन वर्णाची रचना जन्माधिष्ठित नसून **गुणकर्मावर आधरित** होते. गुणानुसार कोणताही वर्ण निवडण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला होते. त्यांच्या रोटी-बेटीचे व्यवहार चालत असत. **दास/शुद्र**-आर्यांनी अनार्यांचा पराभव केल्यानंतर आर्यांच्या दृष्टीने अनार्य दास (गुलाम) ठरलेत. त्यामुळे त्यांनी अतिशय हीन वागणूक दिली. निकृष्ट दर्जाची कामे करावी लागत. ते आर्यांच्या दृष्टीने अस्पृश्य ठरले. या वर्गाला **शुद्र** म्हणण्यात येऊ लागले ते समाज पुरुषाचे पाय होते.

**३) वर्ण संकर** - प्रारंभीच्या काळात एका वर्णातून दुसऱ्या वर्णामध्ये जाता येते. उदा. विश्वामित्र हा क्षत्रिय नंतर ब्राम्हण झाला. अखेरच्या काळात वर्णभेद झाले. वर्ण शुध्दता राखण्याचा प्रयत्न केला परंतु पुढच्या काळात उच्च वर व कनिष्ठ वधू यांच्यात विवाह होऊ लागले. त्यास **अनुलोम विवाह** म्हणतात. कनिष्ठ पुरुष व वरिष्ठ स्त्री यांचा विवाह प्रतिलोम विवाह म्हणतात. प्रतिलोन विवाहीत संततीला समाजात मान नव्हता. शुद्र पुरुष व ब्राम्हण स्त्री यांच्या संततीला **चांडाळ** समजतात. क्षत्रिय पुरुष व ब्राम्हण स्त्री यांच्या संततीला **सूत** म्हणतात. वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या संततीला **मागध** म्हणतात. यातूनच वर्ण संकर होऊ लागले. त्यामुळे अनेक जाती पुढच्या काळात निर्माण झाल्या.

**४) स्त्री जीवन** - ऋग्वेद काळातील समाज पुरुषप्रधान संस्कृतीवर आधारलेला असूनही स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान होते. मुलाप्रमाणे शिक्षण व संगेपन केले जात असे. आवडीनुसार जीवन साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. पुरुषाबरोबर बौध्दिक, आध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक अधिकार स्त्रीयांना होते. स्त्री म्हणजे घराचे सर्वस्वच (जाया इदू अतम) असे विश्वामित्र सांगतात. मेजवान्या, नृत्य, धार्मिक कार्यक्रम यामध्ये स्त्रीया सहभागी होत असे. आध्यात्मिक उन्नतीसाठी आजन्म अविवाहित राहू शकत असे. **विश्ववारा, घोसा, अपाला,इन्द्राणी, लोवामुद्रा, सिकता, निनावसी इ. सुक्तकर्त्या** (ऋचा रचना) विदूषी ऋग्वेदात आढळतात. **बालहत्या, सती पध्दत, पडदा पध्दत इ.पध्दती ऋग्वेद काळात नव्हती. विष्पला** नावाची स्त्री **युध्दावर** गेल्याचा उल्लेख मिळतो. ती घायाळ झाली तेव्हा, आश्विनीने सेवा केली. बालविवाह पध्दत नव्हती. मुलीचा उपनयन संस्कार केला जात असे. एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व विवाह पध्दत आणि विधवा विवाह पध्दत होती. पुत्र नसलेल्या विधवा

स्त्रीला आपल्या दीराशी **नियोग पध्दतीने** विवाह करता येत असे. काहीवेळा प्रेमविवाह होत असे. स्त्रीयांना पिता, पती यांच्या मालमत्तेत वारसाहक्क नव्हता. सभा-समितीमध्ये प्रवेश करुन राज्यकारभार करता येत नसे. **जनक** राजाच्या सभेत **ब्रम्हावादिनी** स्त्रियांचे दल असून, त्याची प्रमुख **गार्गी** होती. घरातील मुलगी गाईचे दूध काढण्याचे काम करत असल्याने तिला **दुहिती (दुहित्री)** असे म्हटले होते.

**५) विवाह संस्कार** - ऋग्वेद काळात विवाह संस्था विकसित झाली होती. विवाह हा एक धार्मिक समस्कार समजला जाई. ऋग्वेदामधील **विवाहसुक्तात** विवाहबद्दल माहिती दिलेली आहे. साधारणपणे एकपत्नी विवाह प्रथा होती. परंतु राजे व श्रीमंत लोक अनेक विवाह करत असे. **दस्यू किंवा शत्रूशी विवाह** संबंध निषिध मानल्या जात. **अग्नी** देवतेला साक्ष मानून विवाह केला जात असे. **स्वयंवर विवाह** पध्दत होती. स्त्रीला पती निवडण्याचा अधिकार होता. अविवाहित मुलीला **अमाजू** म्हणत. चर्म रोगामुळे घोषा हिने फार उशीरा विवाह केला. असा ऋग्वेदात उल्लेख आहे. विवाह विधी बहुधा **वधुगृही** होत असत. बालविवाह, सगोत्र विवाह प्रचलित नव्हता. मुलीचे वय १६ ते २० वर्षाचे असताना विवाह होत असे. विवाहाच्या वेळी हुंडा देण्याची प्रथा होती. तो गायीच्या स्वरुपात दिला जात असे. सवर्ण, सगोत्र आणि निकट संबंधीत विवाह होत नसे. अविवाहित असलेल्या मुली आपल्या वडिलांच्या घरी राहून त्यांच्या कुटुंबाची सेवा करत असे. पुत्रहीन विधवेला पुत्रप्राप्तीपर्यंत आपल्या दीराशी शरारसंबंध ठेवता येत असे. ही प्रथा **नियोग प्रथा** म्हणून ओळखतात.

**६) भोजन** - ऋग्वेदातील उल्लेखावरुन समाजाच्या आहारात शाकाहार व मांसाहार होता. त्यांच्या आहारात गहू, तांदूळ, तीळ, जव, सातू या धान्याचा उपयोग केला जाई. दुध, दुधाचे पदार्थ, फळे, भाजीपाला यांचाही उपयोग होता. **मांसाहारामध्ये** बकरी, मेंढ्या, बैल, मासे यांचा उपयोग केला जाई. **अश्वमेधाच्या वेळी** घोड्याचे मांस खाण्याची प्रथा होती. लग्न, उत्सव, यज्ञ इ. प्रसंगी मांस व मद्य सेवन करत. **सोमरस** हा लोकप्रिय असून यज्ञ व युध्द प्रसंगी प्रशन केला जाई. त्यामुळे क्षत्रियवृत्ती वाढते असा समज होता. **बैल** व **गोऱ्हा** यांचे मांस लोकप्रिय हेते. मद्य धान्यापासून बनवीत. मद्यपान हे दुर्व्यसन समजले जाई. **किकाटो** प्रदेश व **मूजवत्** पर्वतावर सोमवल्ली मोठ्या प्रमाणावर उगवत असे. **गहू व यव** हे प्रमुख अन्न होते.

**७) वेशभूषा** - आर्याच्या पोशाखात बहुधा दोन किंवा तीन वस्त्रे असत. **कापूस, लोकर, हरीणीची कातडी** यांच्यापासून बनविलेली व विविध रंगांची असत. कमरेभोवती गुंडाळलेली निवि, अंगात घातलेले वस्त्र म्हणजेच **अधोवस्त्र** म्हणजे **वासस** किंवा **परिधान** होय. ओढणीसारखे परिधान केलेले वस्त्र **अधिवास (उत्तरीय)** होय त्यास अल्क किंवा दुपी म्हणतात. साधारणपणे आकाशातील ताऱ्यांचे त्यावर कशिद काढलेले असे. **ब्रम्हचारी** हरणाची कातडी वापरत यज्ञाच्या वेळी **तर्प्य (रेशमी अन्तर्वस्त्र)** वापरत असत. स्त्री पुरुष दोघेही **पगडी** वापरत असत. पुरुष धोतर, कुर्ता, पगडी तर स्त्रिया चोळी, ओढणी वापरत असे. **पेशस्कारी** नावाच्या स्त्रीया सुईने कशिदे वस्त्रावर करत असत.

८) **केशभूषा** - स्त्री व पुरुष दोघेही डोक्यावर केस राखत असत. दोघेही केसाची चांगली निगा ठेवत. स्त्रिया केसाच्या २,३,४ वेण्या घालत. तेल लावून केस विंचरायची प्रथा होती. पुरुष केसाचा चुडा डोक्यावर बांधत. पुरुष दाढी व मिशा राखत असत.

९) **अलंकार** - स्त्री पुरुष दोघेही अलंकार वापरत असत. त्यामध्ये कर्णफुले, कंठे, बांगड्या, मोत्यांचे हार, केसात कुरीर, तोडे, गळ्यात निस्क, सर्व रत्नांचे मणी, नुपूर, बाजूबंद, अंगठी इ.अलंकार होते. सोने, चांदी, रत्न, मणी इ. अलंकार असे.

१०) **प्रसाधने** - आर्यांना साज शृंगारात विशेष आवड असत. स्त्रीया भांगात सिंदूर भरत असत. शरीरशुध्दीसाठी चंदनाचा वापर करत असत. काजळ, पावडर , लाली, सुगंधीद्रव्ये फुलांच्या माळा वापरत. ओठ, गाल, नखे, पाय रंगवित. चुडाकर्मन (जावळ काढणे) व गोदा (शेंडी राखणे) असे दोन वेळा केस कापण्याचे विधी होत.

११) **मनोरंजनाची साधने** - रथस्पर्धा, घोड्यांची स्पर्धा, पासे(धुत),नृत्य, गायन, शिकार, संगीत, मुष्टियुध्द ही आर्यांची प्रमुख मनोरंजनाची साधने होती. धुतात भांडणे, कर्जबाजारीपणा, जननिंदा, सर्वनाश इ. अनर्थ ओढवतात. याची जाणीव होती. स्पर्धा यासाठी **आजि** शब्द होता. स्पर्धाच्या मैदानात **काष्ठा/सप्त्य** म्हणत **विश्पला** नावाच्या जलद धावणाऱ्या घोड्याचा उल्लेख आहे. **संगीतामध्ये** नृत्य गायन, वाद्य यांचा समावेश होता. वाद्यामध्ये ढोल, बासरी, सारंगी, वीणा, शंख, झाँझ मृदंग व दुन्दुभी हे महत्वाचे होते. **आनंदोत्सावाच्या** प्रसंगी स्त्री पुरुष नृत्य करत. **वीर पुरुषांना शिकारीचा** नाद होता. शिकारीसाठी धनुष्यबाण, पिंजरे, जाळी, भाला, परशू यांचा उपयोग केला जात असे.

१२) **आश्रम व्यवस्था** - ऋग्वेदाच्या शेवटच्या कालखंडात जीवन जगण्याच्या उद्देशाने आश्रमव्यवस्था स्थापन झाली. परंतु याचा उल्लेख मिळत नाही. आश्रम व्यवस्थेचे चार भाग असून प्रथम तीन वर्णांच्या (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य) लोकांना प्रवेश होता. शुद्रांना यांमध्ये प्रवेश नव्हता.)

१३) **नैतिकता** - आर्याची नैतिकता चांगली होती. त्याचे आचार विचार पवित्र होते. अतिथि सत्कार व समाज सेवा आपली कर्तव्य मानत होते. सत्य बोलणे हा धर्म होता. चोरी व व्याभिचार हिन समजत असे.

१४) **गृहव्यवस्था** - भारतात आल्यावर आर्य स्थायिक झाले. त्यांची घरे, लाकूड, बांबू, वेत यांनी बनवलेली असत. प्रत्येक घरात **अग्निशाळा** असे. त्यामध्ये सतत अग्निजवळ असत. त्यांच्या भोवती बसण्याउठण्याची खोली असत. घराजवळच गुरांसाठी गोठा असत. घर बांधणीसाठी दगड, मातीचा क्वचित उपयोग केला जाई. घरासाठी प्रामुख्याने विटांचा वापर केला जाई. वस्ती भोवती तटबंदी असत.

१५) **आर्यांची कला** - आर्यांना विविध प्रकारच्या कलेमध्ये रुची होती. कलेसंदर्भात आर्य जागृत असून कलेच्या विकासासाठी प्रयत्नशील होते. या काळात भटकतींचे जीवन संपून ते

स्थिर झाले होते. त्यांच्याकडे वेळ होता. त्यांना ज्या ज्या गरजा निर्माण झाल्या त्या सोडवण्याच्या प्रयत्नातून त्यांच्या कलेचा किंवा सांस्कृतिक विकास झाला.

**१) काव्य कला** - आर्यांनी काव्य कलेमध्ये खूप प्रगती केली होती. त्याचे उदाहरण म्हणजे ऋग्वेद ग्रंथ होय. ऋग्वेदातील काव्य संगीतामय व विविध भावनांचे तरंग दाखवणारे होते. निसर्गदृष्यांचे देवतीकरण केले. त्यांची आराधना करण्यासाठी काव्य रचना केली. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरव्दाज, वसिष्ठ, कण्व या कवींच्या कित्येक पिढ्यांत कवित्व होते. उषा देवतेवरील कवने म्हणजे भावगीतातील टपोरे मोतीच होय. **वरुण सुक्ते** भक्तिरस परिपूर्ण आहेत.

**२) लेखनकला** - ऋग्वेदातील लेखनकला माहित होती की नाही. हे सांगण कठीण आहे. कारण त्याचा उपयोग करीत असत किंवा नसत याबाबत माहिती कोठेही नाही. वेदमंत्र गुरुकडून शिष्याने घ्यावेत व मुखोदत कारावयाचे असल्यामुळे लेखनकलेला फारसे महत्व नसावे.

**३) स्थापत्य कला** - ऋग्वेदात **पुर** शब्दांचा उल्लेख मोठ्या **भवनांसाठी** केलेला असतो. या काळात गृह, राजमहल, नगर याचे ज्ञान आर्यांना होते. हर्म्य शब्द राज प्रासाद यासाठी वापरला जात. आर्यांनी **इंद्राच्या** भव्य प्रासादाचे वर्णन साहस्त्र खांबांचे व अनेक प्रवेशव्दारांचे निवास स्थान असे केले. त्यामुळे ती कला आर्यांना अवगत होती. ऋग्वेदात दुर्ग, आयस, अश्चमय, सुदृढभवन या शब्दांचा उल्लेख येतो. त्यावरुन त्यांना ही कला अवगत होती.

**४) वाद्य- नृत्यकला** - आर्यांनी वेगवेगळी वाद्य निर्माण केली होती. विशेष कार्यक्रम उत्सवाच्या वेळी नृत्य केले जात असे. त्यावरुन वाद्य-नृत्यकला ज्ञात होती.

५) विविध धातूचे अलंकार बनवण्याची कला होती.त्या संदर्भात अलंकाराची माहिती

६) कापड विणणे, शिवणे आणि रंग देण्याची कला ही माहीत होती

७) विविध धातूची साहित्य बनवण्याची कला - भांडी, शिकारीचे साहित्य, आयुध्दे, इ.

**१६) आर्यांचे विज्ञान/वैज्ञनिक प्रगती** - ऋग्वेदकालीन आर्यांनी वैधक, काव्य, ज्योतिष इ. शास्त्रामध्ये मोठी प्रगती केली. विशेषतः आर्यांनी वैद्यकशास्त्रात मोठी प्रगती केली. काही रोगासंबंधी माहिती होती. **यक्षमा** म्हणजे क्षयरोग हा फार भयंकर समजण्यात येई. कावीळ व अति मद्यपानामुळे होणारे रोग याची माहिती ऋग्वेदात आहे. कामला, ज्वर या रोगाची माहिती व औषधी वनस्पतीची दिली आहे. ऋग्वेदात **देवांचा वैद्य** म्हणून **अश्विनीकुमारचा** उल्लेख केला आहे. अश्विनीकुमार आंधळ्याला दृष्टी देतो, तुटलेला पाय पुन्हा जोडतो. माणसाला शक्तीमान बनवितो असा उल्लेख **अश्विन सुक्त** सापडतो. दुषित पाण्यापासून होणारा रोग म्हणजे **श्लीपद** होय, याची माहिती आर्यांना होती. प्रार्थना व मंत्रविद्या याचा हा उपयोग केला जात असे. मंत्रांचा उपयोग विषबाधेपासून मुक्तता, वाईट स्वप्नांचा व अपशकुनांचा परिणाम टाळण्यासाठी करीत. अश्विनीकुमार एक कुशल चिकित्सक म्हणून त्याचा उल्लेख आहे. त्याने **विशप्ला** हिचा तुटलेला पाय जोडलेला उल्लेख आहे. प्रसिध्द विदुषी घोषा ही कुष्ठरोग चिकित्सा करत असत.ऋग्वेदात परार्धापर्यंतच्या सर्व संख्या, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी यांचा उल्लेख आहे. यावरुन

आर्यांनी **गणित शास्त्रात** ही मोठी प्रगती केली होती. आर्यांनी **ज्योतिषशास्त्रातही** खूप प्रगती केली त्यांनी वर्षाची विभागणी १२ महिन्यात केली. प्रत्येक महिना ३० दिवसाचा होता. १३ वा अधिक महिन्याचा उल्लेख योतो. सूर्य ग्रहणासंबंधीचा उल्लेख **पाचव्या मंडलात** आहे. **स्वर्भानू** नावाच्या राक्षसाने सूर्यास झाकून टाकते, तेव्हा अत्रि ऋषींनी मंत्र म्हणून सूर्याची सुटका केली. हे सूर्यग्रहण इ.स. पू. ३९२८ या वर्षी झाले असावे असे **डॉ. सेनगुप्ता** याने गणितशासृत्राच्या आधारे मांडले. वसंत, ग्रीष्म, शरद या ऋतुंचा उल्लेख **पुरुषसुक्तात** आढळतो.

**१७) आर्यांची शिक्षण पध्दत -** ऋग्वेद काळात आचार्यांचे घर म्हणजे शाळा होती. तेथे सर्व विद्यार्थी शिक्षणासाठी योत असत. या गुरुकुल शिक्षण पध्दतीत गुरुने शिष्य समुहाला अध्यायनाची संथा देण्याचा उल्लेख आढळतो. उपनयन संस्कारानंतर विद्यार्थी गुरुगृही जात वैदिक व शास्त्रीय ग्रंथांचा अभ्यास जीवनविषयक शिक्षण असे. ब्राम्हणांना ब्राम्हविद्या, क्षत्रियांना युध्दविधा वैश्यांना व्यवसायोपयोगी शिक्षण दिले जात. विद्यार्थी गुरुदक्षिणा अर्पण करत. ऋग्वेदात संघ नावाची उच्च शिक्षण संस्थांचे वर्णन आढळते. वैदिकज्ञान व इतर सर्वज्ञान मौखिक स्वरुपात दिले जात. कला व विद्याचे आर्य उपासक असून ऋग्वेदातील **१० मंडळातील ९७ व्या सुक्तात** याची माहिती प्राप्त होते.

**उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक कालखंडात समाज जीवनाचे सुसंघटीत नियमन आर्याने केल्याने या कालखंडातील सामाजिक परिस्थिती अत्यंत चांगली होती. वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, संस्कार, विवाह पद्धती आदी समाज जीवनाशी संबंधित असणाऱ्या संकल्पना पूर्ण विकसित अवस्थेला पोहोचल्या होत्या. पुढील घटकांच्या आधारे आपण ब्राह्मण कालखंडातील सामाजिक परिस्थिती स्पष्ट करणार आहोत.

१) **वर्णव्यवस्थेचे जातीव्यवस्थेत रुपांतर :-** उत्तर वैदिक कालखंडात जातीव्यवस्था दृढ झाली होती. कारण वर्णव्यवस्थेचे रुपांत जातीव्यवस्थेमध्ये झाले होते. ज्या वर्णात जन्म होत असे त्या अनुसार कामे करणे बंधनकारक होऊ लागल्याने जन्मानुसार जातीचे विभाजन होऊ लागले. ब्राह्मण कालखंडात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र अशा प्रमुख चार जाती प्रचलित होत्या. मूळ चार वर्णाच्या संकरापासून पुढे आणखी १२ जाती निर्माण झाल्या. पुढे दोन पिढ्यातच या १२ जातीपासून संकर प्रक्रियेतून २०४ जाती पुढे उदयाला आल्या.

वर्णव्यवस्थेनुसार कर्म करावे लागल्याने प्रत्येक वर्णीयांची कामे विभागली गेली होती. या ठिकाणी आपण त्यांच्या कामाची माहिती पाहणार आहोत.

अ) **ब्राह्मण :-** ब्राह्मण हा समाजातील प्रतिष्ठीत वर्ण होता. या वर्णातील लोक अध्ययन, अध्यापन, यज्ञ करणे आदी कामे करत होता. या वर्गाकडे वेदपठण करुन त्याचे जतन करण्याचे कामही होते. हे लोक चरितार्थ चालविण्यासाठी प्रसंगी दान घेत होते. तर प्रसंगी स्वतः दान करीत होते.

ब) **क्षत्रिय :-** क्षत्रिय हा समाजातील प्रतिष्ठित वर्ण होता. प्रजापालन, प्रजारक्षण व युद्ध करणे ही त्यांची प्रमुख कामे होती. अध्ययन व यज्ञ करणे ही त्यांची प्रमुख कर्तव्य होती.

**क) वैश्य :-** 'वैश्य' हा शब्द व्यापारी अर्थाने रुढ झाला असून व्यापार करणारे ते वैश्य असे त्या कालखंडात समीकरण बनले होते. शेती, व्यापार, उद्योगव्यवसाय, पशुपालन ही या वर्गाची कामे होती. धार्मिक विधी, संस्कार हे या वर्गाचे हक्क होते. ब्राह्मण, क्षत्रियांपेक्षा या वर्गाचा दर्जा कमी होता.

**ड) क्षुद्र :-** दास, दस्यू, गुलाम, सेवक या नावाने हा वर्ण ओळखला जात होता. हा अनार्यांचा वंश होता. वरील तीन वर्णीयांची सेवा करणे हे या वर्गाचे काम होते. या वर्णास विवाह, मालमत्ता, संस्कार, धार्मिक विधी या बाबींचे अधिकार नव्हते.

**२) आश्रम व्यवस्था :-** उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक जीवनाचे नियमन करण्यासाठी उदय व विकास पावलेली सामाजिक संस्था म्हणजे आश्रम व्यवस्था होय. मानवाच्या वैयक्तिक आयुष्याला वळण लावण्यासाठी आर्यांनी आश्रम व्यवस्थेची योजना केली होती. "बालवयात शिक्षण, तरुण वयात कुटुंब व्यवस्था, उतार वयात समाजसेवा व शेवटी सर्वसंग परित्याग करुन परमेश्वराचे चिंतन असेच सामान्य व्यक्तीचे जीवन असावे असे ठरवून आर्यांनी जे जीवनाचे रेखीव स्वरुप तयार केले होते या स्वरुपालाच आश्रमव्यवस्था असे म्हणतात." मानवाचे आयुष्य रेखीव, सुसंघटीत व सुरळीत चालून त्याला ऐहिक व पारमार्थिक जीवनाचा आनंद लुटता यावा हा या आश्रम व्यवस्थेचा प्रमुख उद्देश होता.

आश्रम म्हणजे 'श्रम करण्याची जागा' होय. मानवी जीवनाची ध्येय साध्य करण्यासाठी जेथे श्रम केले जाते अशी जीवनसंस्था म्हणजे आश्रमव्यवस्था होय. आश्रमव्यवस्थेसाठी मनुष्याच्या आयुष्याचे चार भाग सांगून प्रत्येक भागात मनुष्याने कोणते कर्म करावे हे ठरवून दिले आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, सन्यासाश्रम असे हे आश्रमांचे चार भाग आहेत.

**१) ब्रह्मचर्याश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या बौद्धिक व शिक्षित आयुष्यासाठी ब्रह्मचर्याश्रम होता. मुलांच्या उपनयन संस्कारानंतर या आश्रमाची सुरुवात होत असे. धर्मशास्त्र या ग्रहसूत्रातील माहितीनुसार या आश्रमातील ब्राह्मण मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या आठव्या वर्षी होत असे तर क्षत्रिय मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या अकराव्या वर्षी व वैश्य मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या तेराव्या वर्षी होत असे. सर्वच मुलांना वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत गुरुगृही शिक्षणासाठी रहावे लागत होते.

या आश्रमात ब्राह्मण शिष्यांना वेदाभ्यासाशिवाय ज्योतिष, वैद्यक आदी विद्या शिकविल्या जात होत्या. क्षत्रिय शिष्यांना वेदाभ्यासाबरोबरच धनुर्विद्या, राजनिती व दंडनितीचे शिक्षण दिले जात होते. तर वैश्य शिष्यांना वेदाभ्यासाबरोबरच शेती व व्यापारविषयक शिक्षण दिले जात होते.

ब्रह्मचर्याश्रमात शिष्यांसाठी खालील नियम होते.

१) आश्रमात प्रवेश घेतलेल्या शिष्याने गुरु, गुरुपत्नी व गुरुच्या घरातील इतर माणसांचा आदर करावा.

२) आश्रमातील शिष्याने आहार व निद्रेबाबत संयम पाळावा.

३) आश्रमातील शिष्याने सूर्योदयापूर्वी उठावे, स्नान करावे व नित्याच्या धार्मिक विधी पूर्ण कराव्यात.

४) आश्रमातील शिष्याने मद्य, मांस, स्त्रिया, गायन, वादन, नृत्य, सुगंधी द्रव्य यापासून दूर रहावे.

५) आश्रमातील शिष्याने अहिंसा तत्त्वाचा अंगीकार करावा.

६) आश्रमातील शिष्याने कामक्रोध भावनांपासून दूर रहावे.

७) आश्रमातील शिष्यांने संयमी, नियमित व साधे जीवन जगावे.

८) आश्रमातील शिष्याने ३ वेळा स्नान करुन सूर्य, अग्नी व इतर देवतांची पूजा करावी.

ब्रह्मचर्याश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आश्रमात समावर्तन समारंभाचे आयोजन करण्यात येत असे. या समारंभात गुरु शिष्यांना त्यांच्या भावी आयुष्याबद्ल मार्गदर्शन करत असे समारंभ संपल्यानंतर शिष्य गुरुना गुरुदक्षिणा देऊन आपल्या स्वगृही परतत असे. साधारणतः आठ ते पंचवीस वर्ष असा या आश्रमाचा कालखंड मानला जात होता.

**२) गृहस्थाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या सांसारीक जीवनासाठी गृहस्थाश्रम होता. ब्रह्मचर्याश्रमातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर व समावर्तनाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मनुष्याला या आश्रमात प्रवेश करावा लागत असे. विवाह केल्याने मनुष्याचा या आश्रमात आपोआपच प्रवेश होत असे.

मनुने या आश्रमाला महत्व दिले आहे. मनुने असे म्हटले आहे की, ज्याप्रमाणे प्राणवायूच्या मदतीने सर्व जीव जगतात. त्याचप्रमाणे गृहस्थाश्रमाच्या मदतीने सर्व मानव आपला उदरनिर्वाह करतात. गृहस्थाश्रमाच्या मदतीने मानवाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची खऱ्या अर्थाने प्राप्ती होते. धर्मसुत्र व स्मृतीग्रंथांनी या आश्रमव्यवस्थेला महत्त्व दिले आहे.

या आश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाला स्मृतीकार व धर्मशास्त्रकारांनी काही सूचना केल्या आहेत. या सूचना खाली नमूद करण्यात आल्या आहेत.

१) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने कुटुंबाचे पालनपोषण करावे.

२) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने प्रजोत्पादन करुन वंशवेल वाढवावी.

३) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने मन, शरीर व वाणी पवित्र ठेवावी.

४) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवानी परस्त्रीची अभिलाषा करु नये.

५) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीनी ब्रह्मचारी, सन्याशी यांना अन्नदान करावे, यथाशक्ती दान करावे.

६) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मनुष्याने दिवसा, पूर्वरात्री किंवा उत्तररात्री झोपू नये.

७) गृहस्थाश्रमात प्रवेश केलेल्या मनुष्याने शेवटच्या वर्षात आपल्या प्रपंचाची जबाबदारी आपल्या पुत्रांवर टाकून आपल्या प्रपंचातून मुक्त व्हावे.

मनुष्याच्या सांसारीक जीवनाशी या आश्रमाचा संबंध असल्याने या आश्रमाला जास्त महत्त्व होते. साधारणतः २५ ते ५० वर्ष असा या आश्रमाचा कालखंड होता.

**३) वानप्रस्थाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या सन्यासाश्रमाच्या पूर्व तयारीसाठी वानप्रस्थाश्रम निर्माण करण्यात आला होता. गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्य पूर्ण केल्यानंतर मनुष्य या आश्रमात प्रवेश करतो. या बाबत मनुस्मृतीचा कर्ता मनू म्हणतो "केस पांढरे होणे यासारखी वृद्धत्वाची लक्षणे दिसू लागल्यानंतर व मुलांना मुले झाल्यानंतर मनुष्य वानप्रस्थाश्रमाच्या योग्य होतो." या आश्रमात प्रवेश केलेल्या मनुष्याने सत्ता, संपत्ती, संसार, मुले, घरदार, इत्यादींचा मोह टाळून वानप्रस्थाचे नियम पाळावेत.

वानप्रस्थाश्रमाचा जो आचारधर्म सांगितला आहे तो असा आहे –

१) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवावा.

२) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने शरीर व मन यांच्या वृद्धीसाठी उपवास करावेत, व्रतवैफल्य करावेत.

३) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने प्राणीमात्रांवर प्रेम करावे.

४) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने अध्ययन, मनन व चिंतन यात वेळ घालवावा.

५) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीने एकाकीपणाने राहण्याची तयारी करावी.

या आश्रमातील मनुष्याचे जीवन क्लेशदायक असते. क्लेश सोसत असताना या आश्रमात मनुष्याचा मृत्यू आला तर व्यक्तीला ब्रह्मलोकाची प्राप्ती होते असे मनुने म्हटले आहे. मात्र क्लेश सोसून जर मनुष्य जिवंत रहात असेल तर तो पुढील सन्यासाश्रमासाठी पात्र ठरतो.

'वानप्रस्थ' म्हणजे वनात प्रस्थापित झालेल्या मनुष्याचा जीवनक्रम होय. मनुष्याच्या जीवनातील ५० ते ६० वर्ष असा या आश्रमाचा कालखंड मानला जातो.

**४) सन्यासाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडातील आश्रमव्यवस्थेतील शेवटचा आश्रम म्हणजे सन्यासाश्रम होय. सर्वसंगपरित्याग हे या आश्रमाचे लक्षण आहे. सुरुवातीला हा आश्रम आर्यांच्या त्रैवर्णिकांसाठी होता. पुढे तो फक्त ब्राह्मणवर्गापुरताच मर्यादित राहिला. सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने घर, पत्नी, मुले-मुली, नातेवाईक, मित्र, समाज या सर्वांपासून दूर रहावे. भगवी वस्त्रे, मुंडण, त्रिदंडधारण व कमंडलू ही जी सन्याशांची बाह्यांगे आहेत याचा स्विकार करावा.

सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्यांसाठी या आश्रमाच्या ज्या आचारसंहिता निर्माण करण्यात आल्या होत्या त्या अत्यंत महत्त्वाच्या होत्या. त्याचे पालन जर मनुष्याने काटेकोरपणे केले तर मनुष्याला मोक्षप्राप्तीपर्यंत जात येत असे, असे धर्मसूत्रकारांनी व स्मृतीकाराने सांगितले आहे. या आचारसंहिता पुढीलप्रमाणे आहेत.

१) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने सहृदयतेने वागावे.

२) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने आपल्या इंद्रियांवर ताबा ठेवावा.

३) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने एका ठिकाणी एकच दिवस मुक्काम करावा.

४) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने गतगोष्टीबद्दल शोक करु नये.

५) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने कोणास उपदेशही करु नये.

६) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीनी अरण्यात, नदीकाठी, वृक्षाखाली रहावे.

७) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीनी कोणाचाही द्वेश करु नये, तसेच कोणाच्याही संदर्भात चहाडी करु नये.

८) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीने ब्रह्मचर्य, सत्य, अहिंसा यांचे काटेकोरपणे पालन करावे.

या आश्रमातील आचारसंहितेच्या पालनासाठी मनोनिग्रहाची गरज असे. ज्या मनुष्याचा मनोनिग्रह अढळ असे तो या कर्मकृत्यावर मात करत असे. मात्र ही आचारसंहिता खडतर असल्याने पुढे ही आश्रमव्यवस्था मोडकळीस आली. या आश्रम व्यवस्थेचा कालखंड वय वर्ष ६० ते पुढे मनुष्याच्या मृत्यूपर्यंतचा होता.

उत्तर वैदिक कालखंडात निर्माण झालेली आश्रमव्यवस्था एक आदर्श अशी समाजरचना होती. जगातील कोणत्याही मानव समाजात अशा प्रकारची मानवी समाजाच्या नियमनासाठी संस्था निर्माण झाली नाही. म्हणूनच या आश्रमसंस्थेला महत्त्व आहे.

### आपली प्रगती तपासा

१. ब्राम्हण कालखंडातील आश्रम व्यवस्था कशी होती.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**३) संस्कार :-** उत्तर वैदिक कालखंडात वर्णधर्म व आश्रमधर्माने मनुष्याच्या जीवनाचे नियमन झाले होते. मनुष्याच्या जीवनाला सुसंगती प्राप्त झाली होती. मात्र खऱ्या अर्थाने मानवी जीवन खुलविण्यासाठी संस्कारांची गरज होती. यातूनच संस्कार ही संकल्पना उदयास आली.
"ज्या क्रियेने व्यक्तीच्या ठिकाणी गुण निर्माण होतात व दोष नष्ट होऊन ती व्यक्ती विशिष्ट कार्यास लायक केली जाते त्या क्रियेस संस्कार असे म्हटले जाते."

"संस्कार या शब्दाचा अर्थ शुद्धता अथवा पवित्रता होय."

संस्कारांच्या संख्येबद्दल मतभेद आहेत.

- गौतमधर्मसूत्रात ४० संस्कार सांगितले आहेत.
- वेदव्यास स्मृतीत १६ संस्कार सांगितले आहेत.

- वैखानसच्या मते संस्कारांची संख्या १८ आहे.
- धर्मशास्त्रकारांच्या मते संस्कारांची संख्या १६ आहे.

उत्तर वैदिक कालखंडात मनुष्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी, उन्नतीसाठी संस्कारांचे नियमित आयोजन केले जात होते.

संस्कारांमुळे व्यक्तीचे जीवन उन्नत, परिकृत व सुसंस्कृत बनत असे.
ब्राह्मण कालखंडात प्रचलीत असणारे सोळा संस्कार पुढील प्रमाणे आहेत.

१) **गर्भदान :-** शुद्ध संतती होण्यासाठी माता-पित्यांवर जो संस्कार केला जातो त्या संस्कारास गर्भदान संस्कार असे म्हटले जाते.

२) **पुसंवन :-** पुत्र व्हावा यासाठी गर्भधारणेनंतर दोन किंवा चार महिन्यात गर्भवती स्त्रीवर जो संस्कार केला जात होता त्या संस्कारास पुसंवन असे म्हटले जाते.

३) **सीमंतोन्नयन :-** गर्भवती स्त्रीला शारिरीक स्वास्थ्य व मानसिक प्रसन्नता मिळावी यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला सीमंतोन्नयन संस्कार असे म्हटले जाते.

४) **जातकर्म :-** स्त्री प्रसुतीनंतर नवजात बालक तेजस्वी व्हावे यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला जातकर्म संस्कार असे म्हटले जाते.

५) **नामकर्म :-** अपत्याच्या जन्मानंतर बाराव्या दिवशी त्याचे समारंभपूर्वक बारसे करुन त्याचे नांव ठेवण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला नामकर्म संस्कार असे म्हटले जाते.

६) **निष्कर्मण :-** अपत्याच्या जन्मानंतर त्याला चौथ्या महिन्यात प्रथमच घराबाहेर नेण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला निष्क्रमण संस्कार असे म्हटले जाते.

७) **अन्नप्राशन :-** अपत्यास सहा महिन्यानंतर अन्न देण्याची सुरुवात करण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्कारास अन्नप्राशन संस्कार असे म्हटले जाते. यास उष्टावण असेसुद्धा म्हटले जाते.

८) **वपणक्रिया :-** अपत्याचे वयाच्या चौथ्या वर्षी जावळ काढून शेंडी ठेवण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला वपणक्रिया संस्कार असे म्हटले जाते. या संस्काराला चूडाकरण संस्कार, मुण्डन संस्कार, चौल संस्कार ही इतर नांवे आहेत.

९) **कर्णवेध :-** अपत्याचे नवव्या किंवा दहाव्या महिन्यात कान टोचण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला कर्णवेध संस्कार असे म्हटले जाते.

१०) **उपनयन :-** अपत्यास आठ वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्याला ब्रह्मचर्य आश्रमात पाठविण्यासाठी जो संस्कार केला जात होता त्या संस्काराला उपनयन संस्कार असे म्हटले जाते. या संस्कारास व्रतादेश संस्कार तसेच मौजीबंधन संस्कार असेही म्हटल जाते.

११) **वेदारंभ :-** अपत्याच्या वेदअभ्यास आरंभापूर्वी अपत्यावर गुरुकुलात जो संस्कार केला जातो त्या संस्कारास वेदारंभ संस्कार असे म्हटले जाते.

१२) **केशांत :-** अपत्याची सोळा वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रथम अपत्याला दाढी करण्याची संधी प्राप्त होते अशा प्रसंगी त्याच्यावर जो संस्कार केला जातो त्याला केशांत संस्कार असे म्हटले जाते.

१३) **समावर्तन :-** अपत्याने ब्रह्मचर्याश्रमात विद्या पूर्ण केल्यानंतर त्याच्या गृहस्थाश्रमातील प्रवेशासाठी जो विधीवत संस्कार केला जात होता त्या सस्काराला सभावर्तन संस्कार असे म्हटले जाते. याचे स्नान संस्कार असेही नांव आहे.

१४) **विवाह :-** अपल्याला प्रपंच बंधनात अडकविण्यासाठी तसेच त्यांच्या गृहस्थाश्रम प्रवेशासाठी विवाहाचा जो विधीवत संस्कार केला जात होता. त्याला विवाह संस्कार असे म्हटले जाते.

१५) **अग्नीपरिग्रहण :-** अपत्याच्या विवाहानंतर अग्नी देवतेच्या स्थापनेसाठी जो विधीवत संस्कार केला जातो त्या संस्काराला अग्नीपरिग्रहण संस्कार असे म्हटले जाते.

१६) **अंत्येष्टी :-** मनुष्याच्या मृत्यूनंतर मनुष्याच्या देहावर जो अग्नीसंस्कार केला जातो त्या संस्काराला अंत्येष्टी असे म्हटले जाते. या संस्कारास त्रेताग्निसंग्रह संस्कार असेही म्हटले जाते.

उत्तर वैदिक कालखंडातील संस्काराने मानवी जीवन सुसंस्कृत झाले होते. मानवी जीवनामध्ये शिस्त निर्माण झाली होती. मानवी समाजामध्ये श्रद्धा निर्माण झाली होती. मानवी समाजात एकजिनसीपणा निर्माण झाला होता.

४) **विवाह :-** उत्तर वैदिक कालखंडात विवाह संस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तन होऊन विवाहाचे आठ प्रकार प्रचलित झाले होते. त्यापैकी पहिले चार प्रकार समाजमान्य होते तर उर्वरित चार प्रकार समाजमान्य नव्हते.

**आपली प्रगती तपासा**

१. ब्राम्हण कालखंडातील संस्काराची माहिती सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**समाज मान्य विवाहप्रकार :-**

१) **बाह्म विवाह :-** या विवाह प्रकारात पिता आपल्या कन्येसाठी विद्वान, सदाचारी व सर्वार्थाने अनुरुप वर शोधतो व आपल्या कन्येचा विवाह विधीवत पद्धतीने पूर्ण करतो. या विवाह प्रकाराला ब्राह्म विवाह असे म्हटले जाते.

२) **दैव विवाह :-** या विवाह प्रकारात पिता आपल्या कन्येच्या विवाहासाठी यज्ञाचे आयोजन करत असे. यज्ञप्रसंगी पौरोहित्य करण्यासाठी अनेक तरुण ब्राह्मण येत असत. या अनेक

ब्राह्मण तरुणांपैकी पिता एका विद्वान ब्राह्मण तरुणाची निवड करत असे व या तरुण ब्राह्मणाला आपली कन्या दान करुन तिचा विवाह त्याच्याबरोबर लावत असे. हा विवाह प्रकार ब्राह्मणवर्गापुरताच मर्यादित होता.

३) **आर्ष विवाह :-** या विवाह प्रकारात पिता वराकडून गाय-बैलाची एक जोडी किंवा दोन जोड्या घेऊन आपली कन्या वराला देऊन तिचा विधीवत विवाह करीत असे. प्राचीन काळातील कन्याविक्रयाचे हे एक सुसंस्कृत रुप आहे.

४) **प्रजापत्य विवाह :-** या विवाह प्रकारात वधू-वर पिता एकमेकांकडून कोणत्याही प्रकारी विवाह शुल्क न घेता एकमेकांच्या संमतीने आपल्या अपत्यांचे विवाह करीत होते.

**समाज अमान्य विवाहप्रकार :-**

१) **असुर विवाह :-** या विवाह प्रकारात वर वधू पित्यास पैसे देऊन वधू मिळवत असे. विवाहासाठी वधूच्या मर्जीचा विचार होत नव्हता. या विवाह प्रकाराला कन्या विक्रयाचा प्रकार मानले जाते.

२) **गांधर्व विवाह :-** या विवाह प्रकारात वधू-वर आपल्या पसंतीने विवाह करीत होते. या विवाहास आई-वडिलांच्या पूर्वसंमतीची गरज नव्हती.

३) **राक्षस विवाह :-** या विवाह प्रकारात वर वधूला तिची इच्छा नसतांना जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्याशी आपला विवाह लावतो. विशेषतः ही पद्धत क्षत्रियात रुढ होती.

४) **पैशाच विवाह :-** या विवाह प्रकारात एखाद्या स्त्रिच्या मजबूरीचा फायदा घेतला जातो. एखादी स्त्री जर एकांतात भेटली तर तिला दारु पाजून नंतर तिचे शील भ्रष्ट केले जाते व नंतर तिच्याबरोबर विवाह केला जातो.

५) **पितृसत्ताक कुटुंबपद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात सामाजिक जीवनात कुटुंब हा घटक सर्वात महत्त्वाचा होता. पुरुषप्रधान कुटुंबपद्धती होती. कुटुंबावर कुटुंब प्रमुख म्हणून गृहपतीची अनियंत्रीत सत्ता चालत असे.

- कुटुंबाचे पालनपोषण करणे
- कुटुंबाला शिस्त लावणे
- कुटुंबाची प्रतिष्ठा वाढविणे
- कुटुंबातील लग्नकार्य करणे
- कुटुंबाचे आर्थिक व्यवहार सांभाळणे
- कुटुंबातील धार्मिक कार्य करणे

ही कामे कुटुंब प्रमुखाला करावी लागत होती.

**६) एकत्र कुटुंबपद्धती :-** उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात एकत्र कुटुंबपद्धती प्रचलित होती. तीन-तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत असत. कुटुंबावर सर्वात वडील मुलाचा अधिकार चालत असे. वडील मुलाला पित्याच्या धनातील जास्त हिस्सा मिळत असे. वडील मुलाला कुटुंबात मानाचे स्थान होते.

- अर्थार्जन पाहाणे
- अतिथी सत्काराकडे लक्ष देणे
- धर्मविधी पार पाडणे
- कुटुंबाची सर्वांगीण जबाबदारी पाहणे

ही त्याची मुख्य कामे होती.

**७) घरे :-** उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात आर्यांनी भटक्या जीवनाचा त्याग केला होता. त्यामुळे त्यांनी निवासी घरे बांधण्यास प्रारंभ केला होता. आर्यांची घरे लाकूड, बांबू व वेतापासून बनविलेली असत. घरात ३ तळखोल्या असत व एक अग्नीशाळा असे. घर बांधणीसाठी दगड, विटांचा उपयोग केला जात होता.

**८) स्त्रियांचा दर्जा :-** पूर्व वैदिक कालखंडाच्या तुलनेने उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात स्त्रियांचा दर्जा खालावला होता. अपत्य संगोपन व गृहकृत्य हीच स्त्रियांची प्रमुख कर्तव्ये राहिली होती. स्त्रियांचा पती निवडण्याचा अधिकार नष्ट झाला होता. बालविवाह पद्धती समाजात रुढ झाली होती. स्त्रियांचा पुर्नविवाहाचा अधिकार नष्ट झाला होता. एकपत्नीत्वा बरोबर बहुपत्नीत्व पद्धती रुढ झाली होती. सती पद्धती अस्तित्त्वात आली होती. पडदा पद्धत, नियोग पद्धत या स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचविणाऱ्या पद्धती सुरु झाल्या होत्या. स्त्रियांचा धार्मिक कार्यक्रमातील अधिकार काढून घेण्यात आला होता. मुलगी जन्माला येणे ही दु:खदायक घटना मानली जात होती. मात्र पत्नी, माता म्हणून स्त्रियांचे कुटुंबातील स्थान कायम होते.

**९) अन्न :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक अन्न म्हणून दूध व दूधापासून बनवलेले पदार्थ, फळे, भाजीपाला तसेच गहू, जव, तीळ, तांदूळ या तृणधान्यांचा वापर करीत होते.

**१०) वेशभूषा :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक वेशभूषेसाठी सूती कपडे वापरत होते. स्त्रि-पुरुष कमरेभोवती जे वस्त्र गुंडाळत त्यास 'नीवी' असे म्हणत. तर अंगावर चढविलेल्या कपड्याला 'वासन' असे म्हणत व डोक्यावर परिधान केलेल्या कपड्याला 'अधिवासन' असे म्हणत. सुताव्यतिरिक्त कापूस, लोकर, कातडी यांची वस्त्रेसुद्धा वापरली जात होती. वैदिक वाङ:मयात अल्क, पेशस, द्रापी या वस्त्रांचा उल्लेखसुद्धा आहे. सर्वसाधारणपणे लोक पांढरी वस्त्र वापरत होती.

**११) केशभूषा :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक केशभूषा करीत होते याचा उल्लेख ऋग्वेदात आहे. पुरुष केस कापत तसेच दाढी ठेवत होते. कधीकधी पुरुष केसांचा चुडा डोक्यावर बांधत तर स्त्रिया केसांचे चार कर्पद बांधत.

**१२) अलंकार :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक अलंकारप्रिय होते. सर्वसाधारणपणे कर्णफुले, कंठमाळ, अंगठ्या, कंकण, बाजूबंद, पैंजण, नथणी, कंबरपट्टे हे अलंकार स्त्रिया वापरत होत्या. अलंकार बनविण्यासाठी सोने, चांदी या धातूंचा वापर केला जात असे.

**१३) मनोरंजनाची साधने :-** उत्तर वैदिक कालखंडातील द्यूत, नृत्य, रथस्पर्धा, शिकार, घोड्यांच्या शर्यती, गायन, वादन, मृदुंग, वीणा, बासरी ही मनोरंजनाची साधने होती.

**१४) वैद्यकशास्त्र :-** उत्तर वैदिक कालखंडात वैद्यकशास्त्र अस्तित्त्वात होते. क्षय, काविळ या रोगांबद्दल माहिती होती. त्यावर उपाय करणारी साधने उपलब्ध होती. जखम शिवणे, लोखंडी पाय बसविणे हे उपचारसुद्धा केले जात होते.

**आपली प्रगती तपासा**

१. ऋग्वेद काळातील सामाजिक परिस्थिती सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.५ वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती

**पूर्व वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती :**

ऋग्वेद व इतर वेद आणि ब्राम्हणे, उपनिषद या ग्रंथावरुन आर्यांच्या आर्थिक जीवनाची माहिती मिळते. ऋग्वेद काळात आर्यांच्या जीवनातला सप्त सिंधूच्या खोऱ्यात प्रारंभ व स्थैर्य प्राप्त झाले. वरील साधनांच्या आधारे आर्यांच्या आर्थिक प्रगतीची माहिती मिळते. त्यामध्ये शेती, पशुपालन, शिकार व युध्द, गृहउद्योग, व्यापार, चलन, दळणवळण इ. ची माहिती मिळते.

**१) कृषी** - आर्यांची **ग्रामीण संस्कृती** असल्याने त्यांच्या जीवनात शेतीला पार महत्व होते. त्यांचा **प्रमुख व्यवसाय** शेती होता. त्यांनी जंगले नष्ट करुन, शेती तयार केली. शेतीजवळच त्यांचे घर असे. ते माती व लाकूड यांनी तयार केलेले असे. त्यातूनच अनेक लहान लहान गावे तयार झाली. बैलाच्या मदतीने शेती मशागत करत असत. गहू, (गोधूमा) धान (ब्रीह) यव (जौ) मूग (मुद्ग), उदद (माप) जंगली धान (नीवार) तीळ, चना, कापूस इ. उल्लेख सापडतो. **तैतितरीय संहितामध्ये** तीन प्रकारच्या धनाचा उल्लेख आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी **विहिरीचा** व **कालव्यांचा** उपयोग केला जात असे. शेतीला खत देण्याची पध्दत होती. दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड, किटक इ. **शेतीचे शत्रू** समजण्यात येत असत. **उर्वरा व खिल्या** हे दोन प्रकार जमिनीचे होते.

**२) पशुपालन** - आर्यांचा  दुसरा प्रमुख व्यवसाय म्हणजे पशुपालन होय. पशुपालनामुळे शेतीसाठी जनावरे व खत मिळत असे. तसेच दुध, मांस, कातडी, लोकर ही प्राप्त होत असे. या काळात **बैल, गाय, घोडे, मेंढी, शेळी, कुत्रा, गाढव, हाती, उंट इ.** प्राण्यांचे पालन करत असे. ऋग्वेदामध्ये अवि (भेड) आणि अजा (बकरी) चा उल्लेख आला. **गाईला** प्रतिष्ठा होती. **पशुधन** हेच माणसाच्या श्रीमंताचे मुख्य साधन होते. जनावरांना चरण्यासाठी  विस्तृत कुरणे असे. त्याला **घोषा** म्हणत तर गुराख्याला **गोपाल** म्हणत असे. **गोधन** चोरीवरुन युध्द होत असे. घोड्याचा उपयोग रथ व लष्करी कामासाठी केला जात. शेळ्या मेंढ्यापासून कातडी व लेकर मिळत होती. **गांधार** प्रदेशाची **लोकर** प्रसिध्द होती.

**३) गृहउद्योग** -ऋग्वेदकालीन उद्योग व व्यवसाय हे **शेतीवर आधारीत** होते. सुती व गरम कापड विणणे त्यावर नक्षीकाम करणे, प्राण्यांच्या कातड्यापासून निरनिराळ्या वस्तु तयार करणे. गवत व वेतापासून चटया व बैठका तयार करीत. **लोहार** लोखंड व तांब्याची हत्यारे बनवत. ऋग्वेदात **अयस** नावाच्या धातूचा उल्लेख केला तो बहुधा लोखंड असावा. लोखंडापासून शेतीची अवजारे, युध्द साहित्य व इतर घरगुती साहित्. बनवले जात. **लाकडाच्याही** विविध वस्तू **सुतार** बनवत. **सोनार** विविध अलंकार सोने, चांदीचे बनवत असे. सोनार, कुंभार, चांभार, लोहार, विणकर, सुतार कारागीर वर्ग या काळात असावा.

**४) विनिमयाचे साधन** - आर्यांनी व्यापारी क्षेत्रात फार प्रगती केलेली होती. तरीपण त्यांनी नाणी प्रचारात आणली नाही. गाई किंवा बैल पैसाच्या रुपात मानून विनिमयाचे साधन म्हणून मान्य केले. ऋग्वेदात **निष्कचा** उल्लेख आहे त्याला काही नाणी तर काही अलंकार मानतात. आर्यांना वजन मापे याची माहिती असावी.

**५) शिकार युध्द** - काही आर्य शिकार करीत असत. भक्ष्य शोधणे, पशुपक्ष्यांचे मांस मिळवणे. क्रूर प्राणी नष्ट करणे व मनोरंजन करणे हा शिकारी मागील **खरा उद्देश** होता. शिकार करण्यासाठी लोखंडाची व तांब्याची हत्यारे व अवजारे बनवीत. शिकार हे **युध्दप्रशिक्षणाचे** प्रात्यक्षिक समजले जात असे. हा राज्यकर्त्या वर्गामध्ये  शिकार विशेष लोकप्रिय होती. खाटकाचा व्यवसायही प्रचलित असावा. कारण जनावरे कापणाऱ्यांचा उल्लेख आढळतो. युध्दात मिळालेली लुट राज्याच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन होते. शत्रूचे पशुधन लुटून आणण्याची पध्दती प्रचलित होती.

**६) व्यापार** -ऋग्वेदात व्यापारांना **पणि** म्हणत. हे अनार्य जमातीचे असून व्यापारावर त्यांचे प्रभुत्व होते. तो अतिशय श्रीमंत वर्ग होता. व्यापार **वस्तुविनिमयाच्या** स्वरुपाचा होता. त्यासाठी गाईचा उपयोग केला जात असे. निष्क नावाचा सोन्याचा तुकडा किंवा अलंकार याचा विनिमय साधन म्हणून उपयोग केला जात असे. व्यापार हा खुष्कीच्या व नदया, समुद्र मार्गे केला जात णसावा. ऋग्वेदात रुंद रस्ते देण्याबद्दल **'पुषन'** नावाच्या देवाची प्रार्थना केलेली होती. अंतर्गत व्यापारातील वाहतुकीचे **मुख्य साधन अनस्** नावाच्या गाड्या व रथ होते. अनस् यास बैल किंवा घोडा जोडत असे. कालवे खोदून होडीने प्रवास केला जात  असे. त्या कालव्यास **कुल्या (खनि-त्रिया आपा)** असे म्हणतात.

**७) वाहतुकीचे साधने** - जमिनीवरुन रथ व बैलगाडीतून आणि नदी व समुद्रातून जहाजामधून व मलाची वाहतूक केली जात असे. बैलगाडी, रथ, बैल,घोडे, गाढव ही वाहतुकीचे साधने होती.

**८) व्यवसायिक संघ** - ऋग्वेदातील **गण** आणि **व्रात** शब्दांचा अर्थ इतिहासकाराने व्यवसायिक संघाशी संबंधीत जोडला आहे. त्यांच्या विचारानुसार काही व्यवसायिक संघ होते. त्यांच्या कार्यपध्दती विषयी आपणाला काही माहिती मिळत नाही.

**९) गुलामांचा व्यवसाय** - ऋग्वेद काळात गुलाम प्रथा प्रचलित होती. ऋग्वेदाच्या अनेक मंत्रामध्ये गुलाम प्रप्तीची प्रार्थना केली आहे. काही लोक दुसऱ्याच्या घरी काम करुन जीवन जगत होते. गुलामाला कुटुंबातील एक सदस्य मानत असे. त्याच्याशी प्रेमाने वागत असे. ऋग्वेदामध्ये गुलामाच्या कल्याणासाठी प्रार्थना केलेली आहे.

**१०) उत्पादनाची साधने** - युध्दात मिळालेली लुट हे प्रमुख उत्पादनाचे साधन होते. व्यक्तीगत जीवनात हुंडा व वधुला दिलेला नजराणा होय. स्थावर मालमत्तेची देवाण-घेवाण, खरेदी-विक्री व दानपत्रे यांच्या साहाय्याने होई. जमिनी खरेदी-विक्री व्यवहार फारसा होत नसे. व्यापार, व्यवसाय, शिकार इ. च्या माध्यमातून उत्पादन मिळत असे.

**११) तंत्रज्ञान प्रगती** - अर्यांची जीवन पध्दती ग्रामीण होती. दगड, लाकूड, ब्रॉंझ, सोने, लोखंड, चांदी, लोहार, कोळी, रंगारी, न्हावी, नर्तक इ. व्यावसायिक तंत्रज्ञानांचा वर्ग अस्तित्वात होता. वास्तुकला, शिल्पकाम यांत प्रगती केली. नीलमण्याचे काम करणाऱ्यांना **'कामरि'** असे म्हणतात. निलमण्याला निष्का असा संस्कृत शब्द आहे. निष्काच्या माळा वसिष्ठ व कण्व यांच्या कुटूंबाचा व्यवसाय होता. शुलबसुत्रामध्ये विटा व यज्ञकुंडाची माहिती सांगितली.

**आपली प्रगती तपासा**

१. आर्यांची आर्थिक परिस्थिती सांगा.

____________________

____________________

____________________

____________________

____________________

**उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक कालखंडात ज्याप्रमाणे राजकीय, सामाजिक परिवर्तन घडून आले त्याचप्रमाणे आर्थिक परिवर्तन घडून आल्याचेही स्पष्ट झाले आहे. या कालखंडात आर्थिक प्रणालीशी संबंधित असणाऱ्या शेती, व्यापार, दळणवळण, चलन, करपद्धती, उद्योग व्यवसाय या सर्वच घटकांचा विकास झाला होता. अशी ही ब्राह्मण कालखंडातील आर्थिक परिस्थिती पुढीलप्रमाणे :-

१) **शेती :-** उत्तर वैदिक कालखंडात शेती हा आर्यांचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीमधून गहू, जव, तांदूळ, तीळ, वाटाणे, तेलबीया, कापूस, ऊस, फळे व भाज्या ही महत्त्वाची पिके घेतली जात होती. शेतीसाठी शेणखताचा वापर केला जात होता. तर मशागतीसाठी ४, ८, १६, २४ नांगरी बैलांचा वापर केला जात होता. शेतीतून निघणारे उत्पादन मुबलक होते. अन्नधान्य गरजेपेक्षा जास्त होते.

२) **पशूपालन, गोपालन :-** उत्तर वैदिक कालखंडात शेतीस जोड व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसाय विकसीत झाला होता. त्याचबरोबर ब्राह्मण कालखंडात गोधनाच्या वृद्धीसाठी गोपालन व्यवसाय विकसीत झाला होता. ब्राह्मण युगात गाईला महत्त्व होते. म्हणूनच हा व्यवसाय विकसीत झाला असावा.

३) **उद्योग-व्यवसाय :-** उत्तर वैदिक कालखंडात जे निरनिराळे साहित्य लिहिले गेले आहे त्या साहित्यावरुन या कालखंडात वेगवेगळे उद्योग-व्यवसाय प्रचलित होते हे स्पष्ट झाले आहे. रथकाम करणारे, धातूकाम करणारे, धोबी, दोऱ्या वळणारे, रंगारी, विणकर, कुंभार, कोळी, संदेशवाहक, सावकार यांचे व्यवसाय प्रचलित परिस्थितीला अनुरुप भरभराटीस आले होते.

४) **व्यापार :-** उत्तर वैदिक कालखंडातील व्यापार शासनाच्या देखरेखीखाली चालत होता. या कालखंडात ज्यांच्या हाती व्यापार होता त्यांना वचाणिक म्हणत. या कालखंडात जे व्यापार करणारे होते त्यांचा एक संघ होता. संघावरचा जो अधिकारी होता त्याला 'श्रेष्ठीन' असे म्हणत. ब्राह्मण कालखंडातील व्यापार जमीन व समुद्रमार्गे चालत असे. या कालखंडातील व्यापाराची माहिती पाणिनीच्या सुत्रामध्ये आहे. व्यापारातील भेसळ, लबाडी, अतिरिक्त नफा यावर शासनाची कडक नजर असे. एकंदरीत विचार केला तर ब्राह्मण कालखंडातील व्यापार सुनियोजित होता.

५) **दळणवळण :-** उत्तर वैदिक कालखंडातील दळणवळणाचे मार्ग म्हणून रस्ते, नद्या, समुद्र यांचा वापर होत असे. रस्ते चांगले होते. तसेच वाईट होते. सूत्रकाळातील माहितीनुसार वाहतूकीसाठी रथ हे मुख्य वाहन वापरले जात असे. तसेच घोडे व हत्ती यांचा वापरसुद्धा माल वाहतूकीसाठी केला जात होता. इतर प्राण्यांचा उपयोग काही ठिकाणी वाहतूकीसाठी झाला आहे असा उल्लेख आहे.

६) **चलन पद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात वैदिक कालखंडातील चलन पद्धती प्रचलित नव्हती. या पद्धतीमध्ये बदल झाला होता. काही विशिष्ट नाणी या कालखंडात प्रचलित झाली होती. या काळात 'निष्क' हे नाणे विशिष्ट किंमतीचे प्रमाण म्हणून जास्त प्रमाणात वापरण्यात येऊ लागले होते. 'पाण', 'कर्षापण', 'पाद' इत्यादी नाण्यांचा उल्लेखही पाणिनीच्या सूत्रात आढळतो. या माहितीवरुन असे स्पष्ट होते की, ब्राह्मणकालखंडात चलनपद्धतीमध्ये बदल झाला होता.

७) **कर पद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात राज्यकारभाराचा खर्च भागविण्यासाठी प्रजेकडून धान्य रुपात कर घेतला जात होता. ब्राह्मण व क्षत्रियांना कर माफ होता. शेती व्यवसाय करणारे तसेच वैश्य व्यापार, उद्योग-व्यवसाय करणारे यांच्यावर कर आकारला जात होता. एकूण लोकसंख्येत वैश्यांचे प्रमाण जास्त असल्याने शासनाला कर रुपाने मिळणारा पैसा जास्त होता.

**आपली प्रगती तपासा**

१. उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती कशी होती.

## ३.६ वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती

ऋग्वेद काळातील आर्यांचा धर्म व त्यांच्या धार्मिक कल्पना, तत्वज्ञान यांची माहिती प्रथम ऋग्वेदात येते. ऋग्वेदातील **प्रथम, व्दितीय आणि सातवे** मंडळामध्ये आर्यांच्या धार्मिक जीवनाची माहिती मिळते. **सृष्टीगीताच्या** स्वरुपातच ऋग्वेदातील धर्माची सुरुवात होते. मनुष्य जीवनाचा जसजसा विकास होत गेला. तसतशा धार्मिक कल्पना व तत्वज्ञानाचा विकास होऊ लागला. वैदिक धर्मकल्पना व धर्म ठराविक साचेबंद स्वरुपाचा व सर्वकाळ स्थिर असा नव्हता. आर्यांचा धर्म सरळ व सहज स्वरुपाचा होता.

**१) आर्यांच्या आरंभीच्या विविध निसर्ग देवता -** सभोवतील पसरलेल्या निसर्गातील विविध घटनांनी आर्यांच्या मनावर मोठा प्रभाव पाडला. निसर्गातील चमत्कृतींच्या बुडाशी चेतनाशक्ती असली पाहिजे. त्या चेतना शक्तींनाच त्यांनी हात, पाय इत्यादींनी युक्त अशा देवतांचे रुप दिले. सभोवताली विस्तृत भूमीस **पृथ्वीदेवता** समजले. डोक्यावर पसरलेल्या नभोवितानाच्या आधारावर त्यांना **घौ :** या देवतेची कल्पना केली. स्पर्शाने कळणाऱ्या वाऱ्याच्या आधारावर **वात देवता**, अनेक कार्यात उपयोगी पडआऱ्या विस्तवाच्या आधारावर **आग्निदेवता**, भूमीस शीतलता प्राप्त करुन देऊन तिला सस्यश्यामला करणाऱ्या पावसाच्या आधारावर **पर्जन्य देवता**, अशी सृष्टीतील घटनांवर आधिष्ठित अनेक देवतांची कल्पना आर्यांनी केली. आडथळा उत्पन्न करणाऱ्या, गैरसोयीच्या होणाऱ्या अशा घटनांच्या आधारावर राक्षस, तायु, द्रुहः अशा अनिष्ठ चेतनांचीही त्यांनी कल्पना केली. देव हवे हवेसे तर राक्षसही अप्रिय होते. सूर्य हा अग्निचेच रुप आहे व अग्नी हा प्रति दिवशी सूर्यरुपानेच जन्माला येत असतो असे विचार **वसिष्ठ ऋषींनी** मांडला आहे. वैदिक देवता संघ **पुरुषप्रधान** आहे. ऋग्वेदात **पृथ्वी, अदिति, उषस्, रात्री** या स्त्री देवता असून त्यांना यज्ञ संस्थेत स्थान नव्हते. आर्यांच्या **प्रमुख निसर्गदेवता** म्हणजे वरुण,इंद्र, पृथ्वी, अग्नी, उषा, सूर्य, यम होय. या शिवाय सोम, श्रध्दा, रुद्र, बहुस्पती, पर्जन्य, मरुत, अश्विन, इ.देवतांचा उल्लेख आहे. **देवता मंडळात प्रमुख देवता म्हणजे** वरुण, इंद्र व सूर्य हे होय.

**२) ऋग्वेदकालीन देवदेवतांचे वर्गीकरण किंवा वास्तव्य** - आर्यांनी सृष्टीचे त्रिविधा त्रिलोकात्मक स्वरुप कल्पिले. ते म्हणजे पृथ्वी, अंतराळ आणि आकाश व त्यामध्ये प्रत्येक विभागात ११ कोटी देवता म्हणजे तिन्ही लोक मिळून ३३ कोटी (प्रकार) देवता आहेत. पूर्व वैदिक काळातील देवदेवतांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**अ) देवतांच्या स्थळानुसार वर्गीकरण** - आर्यांच्या देवतांचे स्थळ कोठे आहे. त्यानुसार त्याचे तीन स्थळात वर्गीकरण केले आहे. हे स्थळ म्हणजे -

**१) पृथ्वी स्थानीय देवता** - पृथ्वी, अग्नी, सोम, बृहस्पती,नदया. २) **अंतराळ देवता** - इंद्र, वायू, मारुत, पर्जन्य, रुद्र, यम,इ. ११ देवता. **३) आकाशातील/स्वर्गातील देवता** - सूर्य, उषा, सावित्री, विष्णू, चंद्र, वरुण, मित्र, विवस्वत, आदित्य, आश्विन, पूषन, इ. ११ प्रकारचे देव होते. तीन लोकातील ३३ प्रकारचे देव होते.

**ब) ऐतिहासिक विभागणीनुसार** - ऐतिहासिक विभागणीनुसार देवतांच्या निर्मितीचा कालखंड विचारात घेतला जातो. त्यानुसार - **इंडो -युरोपियन देवता** व **भारतीय देवता** असे विभाग केले जातात. परंतु ही विभागणी करणे योग्य नाही. कारण त्यास पुरावा प्राप्त होत नाही.

**क) देवदेवतांच्या स्वरुपानुसार** - आर्यकाळातील देवदेवतांच्या स्वरुपानुसार देवतांचे वर्गीकरण केले जाते, ते म्हणजे प्रागैतिहासिक, पारदर्शक, मितपारदर्शक, अपारदर्शक, अव्यक्त किंवा प्रतिकात्मक देवदेवता असे विभाजन काही सिध्दांतनुसार करतात.

**ड) देवतांच्या महत्वानुसार** - देवदेवतांचे जास्त महत्वाचे व कमी महत्वाचे असेही काहीजण वर्गीकरण करतात. परंतु असे वर्गीकरण करणे अयोग्य आहे. अग्नि किंवा सवित् त्यांच्या कृपेमुळे व सोमरसपानामुळे देवना अमरत्व प्रप्त झाले असे मानले जाते. देव आकाशामार्गे रथातून संचार करतात. देवांचे **सोम** हे आवडते पेय आहे. देवदेवता वैश्विक नियमांचे /ऋतू तत्वांचे पालन करतात असे मानले जाते. या शिवाय **सौरदेवतामध्ये** - मित्र, सूर्य, सवित्, **भावात्मक देवतामध्ये** प्रजापति, विश्वकर्मत्, मन्यू, श्रध्दा, **पर्जन्यवातासारखी देवता** युग्मे - मित्र-वरुण, घावा-पृथिवी, इंद्र-सोमा, सूर्याचंद्रमसा, उषारात्री, इंद्राग्नी, **देवतासंघ**, - मारुतांचा, आदित्याचा, **कनिष्ठ देवतामध्ये**- ऋभु, अप्सरा, गंधर्व, इ. ऋग्वेदातील देवतांचे वर्गीकरण करता येईल.

**३)आर्यांच्या विविध देवदेवता आणि त्यांचे महत्व** - आर्यांचे देवदेवता त्रिविध म्हणजे तीन ठिकाणी वास्तव्य करणारे आहेत ते पुढीलप्रमाणे

**अ) स्वर्गातील/आकाशातील देवदेवता -**

**१) सूर्य** - आकाशस्य तेजागोल हा सूर्यदेव होय. तो धौस व अदिती यांचा **पुत्र** असून चराचर जगाचा **आत्मा** आहे. वरुण, मित्र व अग्नी यांचा डोळा आहे. ऋग्वेदात सूर्याच्या **रथाचे व सात घोड्यांचे** वर्णन आढळते. उषाच्या मागून प्रियकराप्रमाणे सूर्य जातो असे वर्णन केलेले दिसते. **दीर्घायुष्य, निरोगी जीवन, शक्ती, संपत्ती,** सूर्याच्या कृपेनेच मानवाला लाभतात. सूर्य हे अग्नीचेच रुप असून देवांनी सूर्याला आकाशात ठेवले अशी कल्पना ऋग्वेदात मांडलेली आहे. मित्र, सविता, विष्णू, पुषन, भग, इ. देवता सूर्याची रुपे मानतात.

**२) वरुण** - स्वर्गातील देवतामध्ये सर्वात **महत्वाची** व **प्रमुख देवता** म्हणजे वरुण होय. तो विश्वाचा **सम्राट** व आपला पिता आहे. वरुण संदर्भात फक्त **१२ सुक्ते** ऋग्वेदात आहेत. वरुण नीतिसंरक्षक असून निसर्गाच्या कायद्याची अंमलबजावणी करतो. पृथ्वी व आकाश त्यानेच निर्माण केले. त्याच्यामुळेच सूर्य, चंद्र, तारे चमकतात. नदया वाहतात. ऋग्वेदात नीतितत्वांना **ऋतू** तत्व मानलेले होते. वरुणदेवता **पर्शु-भारतीय** (इराणी भारतीय) काळातील आर्यांचा वारसा असावा. उत्तरकाळात वरुण केवळ **जलाधिपती दिक्पाल** (पर्जन्याची/सागराची देवता) बनला.

**३) उषस्** - आर्यांच्या सौंदर्यवादी दृष्टिकोनाचे व निसर्गप्रेमाचे प्रतीक म्हणजे उषस् देवता होय. ही उषःकालाची देवता असून ऋग्वेद काळातील स्त्री देवता होय. ऋग्वेदात उषा देवतेची **२० सुक्ते** आहेत. उषस् ही आकाशाची मुलगी, रात्रीची बहिण, अश्विनाची मैत्रीण, सूर्याची प्रिया व जगाची तेजस्वी सम्राज्ञी असून ती सुवर्ण रथातून येते. दुष्ट स्वप्नांचे निरसन करुन भूताखेरीज पळवून लावते व सर्व मानवांना जागृत करते.

**४) विष्णू** - आपल्या त्रिविक्रमणाने त्रैलोक्य व्यापणारा विष्णूत्रिकाल दिसणाऱ्या सूर्याचे स्वरुप होय. विष्णूच्या उच्चस्थानी मधूर अमृताचा झरा आहे. ऋग्वेदात <u>**३-४ सुक्ते**</u> आहे. **मॅक्समुल्लरच्या** मते तीन पावले म्हणजे सूर्याच्या उदय, मध्यान्ह, अस्त होय **डॉ.रा.ना.दांडेकराच्या मते.** ऋग्वेदात विष्णू लावलेल्या <u>**शिपिविष्ट**</u> या विशेषणावरुन विष्णू ही अनार्यांचा किंवा आर्यची बहुजनवर्गाची लैंगिक देवता असावी. इंद्र-वृत्र युध्दात तो इंद्राचा साहाय्यक असून, भक्तांना जवळचा वाटतो. आर्य संघापैकी एक महान जमातीची ती सर्वश्रेष्ठ देवता असावी.

**५) अश्विनौ** -ही ऋग्वेदात **युग्मदेवता वैद्य** म्हणून प्रसिध्द आहे. दोन अश्वीन् देवतांचा समुह म्हणजे अश्विनौ होय. अशक्ताला सशक्त, वृध्दाला तारुण्य, आंधण्याला दृष्टी लाभ, बुडाल्याला वाचविणे इ.अनेक कथा त्याच्या संदर्भात आहेत. पहाटे व सायंकाळी दिसणारा शुक्रतारा किंवा संधिप्रकाश याचे प्रतिक असावे. सूर्यकन्या सूर्या ही त्याची पात्नी असून, ते त्रिचक्र रथातून विश्वसंचार करतात. मधाचे औषधी उपयोग व अश्वाचा शीघ्र वाहतूकीसाठी उपयोग या अश्विनौ **देवाच्या देणग्या** आहेत.

या शिवाय वरुणाच्या ऋतरक्षणाचे साहाय्यक **मित्रदेवता** ही सूर्याच्या हितकारी तेजाचे प्रतिक आहे. सोनेरी वर्णाचा उगवता सूर्य म्हणजे जगाला प्रेरणा व चेतना देणारा **सविता** होय. मेंढपाळांचा मार्गदर्शक **पूषन** हा सूर्याचेच स्वरुप होय. तो कळपांचे रक्षण करतो. हरवलेले पशु सापडवून देतो. सर्व सुखांचा दाता **भग** हाही आदित्य स्वरुपच आहे. वैवाहिक बंधनांचे रक्षण व नियमन करणारा **अर्यमन** आर्यांच्या समाजाची धारणा करणारा **आदित्य** आहे.

**ब) अंतराळ देवता** - ऋग्वेदात ११ देवदेवतांचा उल्लेख अंतराळ देवता म्हणून केलेला आहे.

**१) इंद्र** - ऋग्वेदातील **२५० सुक्तामधून** या अतिशय महत्वाच्या व सामर्थ्यवान पराक्रमी देवाचे वर्णन केलेले आहे. त्याला **वज्रदेही/वज्रबाहू** असे म्हटलेले आहे. देवाच्या गायी व पाणी अडवून

ठेवणाऱ्या **वृत्त** राक्षसास ठार मारले. प्रचंड प्रमाणावर सोमरसाचे प्राशन हे इंद्राचे वैशिष्ट्यं होते. इंद्र ही आर्याची आवडती **राष्ट्रीय देवता** होय. **वादळ-तुफानांचा** देव असा इंद्राचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. ऋग्वेदीय दैवतशास्त्र इंद्र प्रधान आहे. इंद्र हा कश्यप-अदितीचा **पुत्र** व मरुद्रणांचा **नेता** आहे. तो प्राचीन, तरुण, सर्वशक्तिमान, युध्दप्रिय, सर्वविजेता विव्दान व अप्रतिहात शक्ती आहे. इंद्राचे **अमरकृत्य** म्हणजे दानव वृत्तसुराचा वध होय. वृत्रखेरीज शंबर, नमुची,शुष्ण इ अनेक असूरांचा नाश केला. दाशराज युध्दात सुदास शत्रू **चायमान** यास ठार मारले. तर अन्यत्र श्रुतकवष, दुह्यू, देवक यांचा वध केला. पणीचा पराभव केला. शत्रूंची पुरे उध्वस्त करुन **पुरंदर** पदवी मिळविली.

**२) पर्जन्य** - ऋग्वेदातील कनिष्ठ देवतांपैकी ही एक देवता आहे. ऋग्वेदात **३ सुक्ते** आहेत. 'पर्जन्य' या शब्दाचा शब्दशः अर्थ **'पावसाचा ढग'** असून त्यावर मानवी गुण अध्यारोपित केले आहेत. त्याला **वृषभ** असेही म्हणतात. पाऊस पाडणे हे मुख्य कार्य होय. तो उदकाची गाडी घेऊन सर्वत्र फिरत असतो. विद्युत व गडगडाट याच्याशी त्याचा संबंध जोडलेला असतो. वनस्पतीचे उत्पादन व वर्धन करतो त्याला **पिता** असेही संबोधिले आहे. तो स्वर्गाचा **पुत्र** असून पृथ्वीचा **पति** आहे.

**३) यम** - ऋग्वेदात **३ सुक्ते** आहेत. यम हा पितरांचा राजा आहे. यम हा मृतांचा अधिपती, आदिमानव, सर्वप्रथम मृत झालेला मानव आणि पितृलोकाचा अध्यक्ष आहे. पुण्यवान लोकांना तो श्रेष्ठ स्थळी पोहोचवितो. तो सर्वांचे पापपुण्य जाणतो. त्याला यज्ञान येऊन बसण्याचे आमंत्रण दिले जाते, अग्नि हा त्याचा **दुत** होय. त्याचे दोन कुत्रे लोकांवर लक्ष ठेवीत फिरत असत.

**४) रुद्र** - ही उग्र देवता आहे. नटाधारी त्रिनेत्र रुद्राच्या हातात त्रिशूळ व धनुष्यबाण आहेत. रागीट रुद्राचे बाण, रोगराई व मरण आणतात. उपासकाला त्याची भीतीच वाटे व त्याच्या शस्त्रापासून आपणांस मुक्तता मिळावी अशीच उपासकाची प्रार्थना असते. संतुष्ट झालेला रुद्र शिवस्वरुपीही बने व भक्तांना रोगमुक्त करणारा श्रेष्ठ वैद्यराज बने. रुद्र ही आर्यांची पूर्वीच्या लोकांकडून किंवा सिंधू संस्कृतीच्या समाजाकडून घेतलेली देवता असावी. रुद्राला **वादळीदेवता** मानतात. ऋग्वेदात ३ सुक्तामधून रुद्रांची प्रार्थना केलेली आहे.

**क)भू देवता/पृथ्वीदेवता** - ऋग्वेदात ११ भूदेवतांचा उल्लेख झालेला आहे.

**१) अग्नि** - अग्नि ही पृथ्वीवरील **सर्वश्रेष्ठ संस्कार देवता** होय. ऋग्वेदात **२०० सुक्ते** आहेत. देव व मानव यांच्यातील प्रमुख दुवा म्हणून आर्यांनी अग्नी प्रमाणभूत मानला आहे. अग्नीला आपला सुखकर्ता व दुःखहर्ता मानले आहे. दैनंदिन जीवनात व यज्ञ कार्यात अग्नीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अग्नी हा यज्ञामध्ये पुरोहित, घरामध्ये गृहपती, समाजात विश्पती आहे. यज्ञातील हवीर्भाग देवानी पोहचवतो. समिधा, धृत,वा स्तोत्रव्दारा जे अग्नीची उपासना करतात ते शतायुषी,संपत्तिमान,कीर्तीमान होतात. अग्नी प्राचीन असून सदैव तरुण आहे. अग्नीला तीन मुखे, तीन दिहा, तीन पाय व असंख्य नेत्र आहेत. अग्नीची **पाठ** तुपाची, **केश** ज्वालांचे व दाढी तपकिरी रंगाची आहे. बैलाप्रमाणे ओरडतो, धुराने खांबाप्रमाणे आकाशाला आधार देतो. अग्नि जन्मतो तेव्हा त्याला **वत्स** म्हणतात. तो जलपक्षी आहे. त्याचे **मुख्य भक्ष्य**

म्हणजे काष्ठ आणि नवनीत, त्याचे **मुख्य पेय** म्हणजे नवनीत. तो दिवसांत ३ वेळा जेवतो. अग्निला गृहपती म्हणतात. अग्निला मनुष्याचा नातेवाईक, मित्र, पिता, पुत्र, माता, बंधू असे मानतात.

**२) सोम** - सोम ही देखील **संस्कार देवता** आहे. ऋग्वेदात **१२० सुक्ते** आहेत. अग्नीनंतर महत्वाची देवता म्हणजे सोम होय. सोमदेव हा ऋग्वेदातील प्रमुख देव आहे. सोम वनस्पतीचा रस काढून यज्ञप्रसंगी तो देवाला दिला जाई. सोमरस हे **इंद्राचे आवडते पेय** आहे. सोम संस्था पर्शुभारतीय असावी. कारण **अवेस्तामध्ये** हओमाचा उल्लेख येतो. सोम हा औषधीचा राजा व जीवनदाता मानला गेला. सर्व सोम सुक्ते एकत्र करुन ऋग्वेदाचे **नवम मंडळ** बनविले गेले. सोमरसाला **मधु किंवा इंदू** म्हणत. याचा रंग पिवळा, लाल पिंगट किंवा तपकिरी असतो. सोम हे उत्साहवर्धक पीयुष आणि सोमरसाने ताकद वाढते, अमरता प्राप्त होते. सोम वाचा देतो म्हणून त्याला **वाचस्पति** अथवा वाचेचा नायक म्हटले आहे. सोम हा **बुध्दिवान ऋषि** आहे. सोम हा इंद्राचा आत्मा, परमपावन मित्र होय. सोम ही सर्वात महत्वाची बनली असल्यामुळे त्याला **लसाचा पति** असे म्हणतात. त्याला **वनस्पति** असेही म्हणतात.

**ड) आर्यांच्या देवदेवतांची वैशिष्ट्ये -**

१) निसर्ग शक्तीतून किंवा चैतन्यातून निर्माण झाल्या. २)पुढील काळात पशुंना देवतांचे स्वरुप दिले. ३)देवतांना मानवाप्रमाणे अवयव भावना आहेत असे मानलेले होते. ४)देवदेवताच्या संकल्पनेत साचेबंदपणा नाही. ५)श्रेष्ठ व कनिष्ठ असे देवतांचे प्रकार पाडले नव्हते. ६)सर्व देवदेवता एकाच श्रेष्ठतत्वाची किंवा परमेश्वराची रुपे आहेत असे मानलेले होते. ७)सर्व देवता दयाळू व कृपा करणारे आहेत. ८) पुरोहिताची देवतांच्या पुजनासाठी निर्मिती झाली. ९)पुरुष देवतांना प्राधान्य दिले होते. १०)देवतांची कोठेही मंदिरे नाहीत. ११)मूर्तिपूजा नाही. १२)निसर्गवाद आहे. १३)अनेक देवता मानल्या आहेत. १४)पृथ्वीस्थानीय, अंतरीक्ष स्थानिय, द्युस्थानीय असे वर्गीकरण केलेले होते. १५)सोमरसामुळे देवांना अमरत्व प्राप्त होते असे मानलेले होते. १६)देवदेवता आकाशमार्गे संचार करतात. १७)देवांचे आहुती हे अन्न तर सोम हे आवडते पेय होय.

**४) ऋग्वेद काळातील धार्मिक आचार व कल्पनांचा विकास**

**१) बाह्यतः अनेकेश्वरवाद पण मूलतः एकेश्वरवाद** - आर्य हे अग्नि, मरुत, वरुण या नैसर्गिक शक्तीची उपासना करीत होते. त्यांनाच मानवी रुप दिले. अनेक देवतांची पुजा करत असल्याने त्याला **अनेकेश्वरवाद** (polytheism) म्हणत असे. एकेश्वरवाद (monotheism) म्हणजे ईश्वर एकच आहे. निसर्गातील वेगवेगळेया कारणासाठी वेगवेगळ्या देवतांची उपासना करत. परंतु सृष्टीला निसंत्रित करणारी शक्ती एकच आहे. म्हणजे आर्याचे तत्वज्ञान **अनेकेश्वरवादाकडून एकेश्वरवादाकडे आणि एकेश्वरवादाकडून एकत्ववादाकडे विकसित झाले.** एकच अंतिम तत्व असून शरीर अथवा दृश्य, वस्तु आणि आत्मा, यांच्यात व्दैत नाही असे तत्वज्ञान म्हणजे **अकत्ववाद** (monism) होय. **ऋग्वेदाच्या १० मंडळात यांची** माहिती मिळते. एखादया वेळेस एखादी देवता इष्ट वाटे आणि तीस सर्वश्रेष्ठ अथवा परमेश्वर मानून तो तिचीच उपासना करु लागे. या प्रकृतीला **मैक्समुल्लर इष्टदेवतावाद** (Henotheism)असे म्हणतो. काही ऋषींनी या इष्टदेवता उपासनेच्या पलीकडे जाऊन, ज्या

आदिशक्तीची विविध रुप म्हणजे देवता आहेत. पुष्कळ देवतामध्ये वसत असलेल्या सृजनशक्तीला मानवी गुणारोप करुन तिचीच देवता बनविली.

**२) देवता व्दितय -** ऋग्वेदात इंद्र, वायू, इंद्रग्नी, इंद्रवरुणौ अशा दोन देवता एकत्र आणून त्यांची स्तोत्रेही गायत्री होती. काही देवता एकात दोन अशा स्वरुपाच्या आहेत. अश्विनौ हे उदाहरण होय. वस्तुतः एकत्र, दोन्ही वेळा दिसणारा असे काही आगळेच रुप या देवतांचे आहे. उदा. -ब्राम्हणस्पति, वास्तोष्पति, प्रजापति इ. होय.

**३) समुहात्मक देवता -** एकेकट्या देवता, व्दितयरुप देवता, याप्रमाणे समुहात्मक देवतांचीही कलपना आढळते. इंद्र, वृत्तशी लढण्यास निघतो तेव्हा त्याला **स्फूर्ती देणारी कवने** म्हणणारे, त्याचा उत्साह वाढविणारे **मरुतः** हा होय. बोलण्यासाठी व यज्ञाच्या प्रसंगी कोणी राहू नये यासाठी **विश्वेदेवा** म्हणजे **सर्वदेव** हा गण आमंत्रित करण्यात येऊ लागत.

**४) जीवनाविषयी नीतिसंकल्पना/तत्वज्ञान**

**अ)भौतिक जीवन -** आपले जीवन सुखी व समृध्द तसेच सत्ता, संपत्ती, स्वास्थ्य, सन्मान याच्यासाठी देवाची प्रार्थना करणे. आपले जीवन विविध धार्मिक कृत्यात घालवणे दानधर्म करणे. रंजल्या गांजलेल्यांना अन्नदान देणे. अतिथीचा सन्मान करणे. इत्यादींना ते **आदर्श नैतिक जीवन** समजत. तर मित्रांचा विश्वासघात करणे, मदयपान करणे, धुत खळणे, रागावणे, एखादयाचा व्देष व मत्सर करणे, जादुटोणा करणे याला **पाप समजत**. पापी मनुष्यावर वरुण पाश टाकतो मनुष्य स्वतः आणि पुर्वजांनी केलेले पाप याला तो जबाबदार असतो. आर्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आशावादी होती. जीवन सन्मार्गाने जगण्याची जबरदस्त इर्ष्या होती. दीर्घायुष्य, निरोगी जीवन, पराक्रमी संतती, शक्ती, संपत्ती, तेजस्वी घोडे, भरपूर दूध देणाऱ्या गाई, चांगली पिके, शत्रूचा नाश, संकटातून मुक्तता यासाठी आर्य **परमेश्वराची प्रार्थना करत** असे. धर्म या शब्दाने ज्या भावनेचा व सदाचारपणाचा बोध होतो, ती भावना आणि आचरण याचा उल्लेख ऋत या शब्दाने ऋग्वेदात केला आहे. निसर्ग व मानव यांच्यामध्ये नियमितता, सुसूत्रता आणण्याचे काम ऋत म्हणजे सत्यच करते. वैदिक देव हे **ऋतावान व ऋतावृध** असतात. असा उल्लेख ऋग्वेदात आहे.

**ब) मरणोत्तर जीवन -** ऋग्वेदाच्या **१० मंडळात मरणोत्तर जीवनासंबंधी** विचार मांडले आहेत. मनुष्य गेल्यावर त्याचा पार्थिव देह मातीत मिळून जातो. पण आत्मा अमर राहतो. मृताचे पितर त्याच्यासाठी दुसरे स्थान शोधून ठेवतात. हेच यमाचे निवास स्थान होय. तेथे कर्मानुसार पितृलोक किंवा नकर यापैकी एका ठिकाणी जातो. **पितृलोकात** अमरत्व पावलेले जीव कायम सुखात राहात असत. सोमरस, दुध, मध, सुरा इत्यादींचे पान करुन नृत्यगायनात मग्न असत. **नरक विषयी** तेथे **निर्ऋती** नावाची देवता असते. यमाचा दूत **कपोत** हा पापी अत्म्यांना अंधकारमय व दुःखमय अशा निवासस्थानी आणतो. पुनर्जन्माविषयी फारच पुसट कल्पना ऋग्वेदात आढळतात. आर्यांचा धर्म, कर्म सिध्दांतापेक्षा **उपयुक्ततावादी** होता मरणानंतरच्या जगाचा विचार करण्यापेक्षा या जीवनातील आनंदाचा, निसर्गातील साधनसंपत्तीचा भरपूर आस्वाद घ्यावा. असे त्याचे साधे व सोपे जीवनाविषयीचे तत्वज्ञान होते.

**३) सृष्टी किंवा विश्व उत्पत्ती/निर्मिती संदर्भातील तत्वज्ञान -**

ऋग्वेदातील तत्वज्ञानाची कल्पना आणि विश्वनिर्मिती व विश्वधारणेच्या कल्पना **पुरुषसुक्ता, नासदीयसुक्त, हिरण्यगर्भसुक्त** यामध्ये आढळते. तसेच **वरुण, इंद्र, अग्नि** या देवतांना उद्देशून रचलेल्या सुक्तामधून आढळते. सृष्टी उत्पत्ती संदर्भातील कल्पना पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**अ) पुरुषसुक्तात मांडलेली विश्वाच्या उत्पत्तीची कल्पना** - सृष्टीच्या उत्पत्तीविषयीच्या कल्पना ऋग्वेदाच्या **दहाव्या मंडळातील पुरुषसुक्तात** सांगितलेली आहे. ती म्हणजे प्रारंभी काही होते असे नाही किंवा काही नव्हते असे नाही. वातावरण, आकाश नव्हते मग त्यावर आवरण कसले होते ? अथांग जलाची खोल दरी होती काय ? मृत्यू नव्हता किंवा अमरत्व नव्हते. दिवस-रात्र नव्हती. देवांनी विराट पुरुषाला बळी दिला. त्याच्या अवयवापासून बहुविध सृष्टी निर्माण झाली . काही ठिकाणी पाणी हे सर्व सृष्टीचे मूळ बीज आहे. भूत, वर्तमान, भविष्य काळचे जगत् हे सर्व हा परमेश्वर आहे. हे सर्व दृश्य जग या परमेश्वराचा महिमाच आहे. परमेश्वरापासून हे जग उत्पन्न झाले आणि या ब्रम्हांडामध्ये जीव उत्पन्न झाला. त्यातूनच **औपनिषदिक तत्वज्ञानाला** प्रेरणा मिळाली विश्व, आत्मा, जीव, अस्तित्व, अनास्तव सत्य, माया यावर विचार मांडले जाऊ लागले.

**उत्तर वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक कालखंड व पूर्व वैदिक कालखंड यामधील धार्मिक परिस्थिती बदलली होती. पूर्व वैदिक कालखंडातील निसर्गदेवतांवरील निष्ठा कमी होऊन यज्ञाशी संबंधित देव-देवतांचे महत्त्व वाढले होते. पूर्व वैदिक कालखंडातील देव देवतांचे स्वतंत्र अस्तित्त्व या कालखंडात नष्ट होऊन देव-देवतांबद्दल श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेदभाव सुरु झाले होते. त्यामुळे देवता विश्वातील जिवंतपणा नष्ट झाला होता. यज्ञ संस्थेचे महत्त्व वाढल्याने संपूर्ण मानवी जीवनच यज्ञ कल्पनेभोवती गुंतले गेले होते. प्रत्येक इच्छीत गोष्ट प्राप्त करण्यासाठी यज्ञ करणे आवश्यक आहे असे सांगण्यात येऊ लागले होते. त्यातून या कालखंडात यज्ञाचे एकूण तीन प्रकार रुढ झाले होते.

१) **नित्य यज्ञ :-** अन्नदान, अग्नीहोत्र, दर्शपूर्णमास, पिण्डपितृय,चार्तुमास्य इत्यादी यज्ञांचा समावेश नित्य यज्ञामध्ये होतो.

२) **कामेष्ठी यज्ञ :-** पुत्रेष्टी, जयेष्टी, धनेष्टी या सारख्या यज्ञांचा समावेश कामेष्टी यज्ञामध्ये होतो.

३) **सोमयाग यज्ञ :-** एक दिवस, दोन किंवा बारा दिवस, तर काही वेळा एक ते दोन वर्ष किंवा त्यापेक्षा दिर्घकाळ चालणारे यज्ञ अशा यज्ञांचा समावेश सोमयाग यज्ञामध्ये होतो.

- **राजसूय यज्ञ :-** हा राज्याच्या व प्रजेच्या कल्याणासाठी केला जात होता. हा यज्ञ १ वर्षापेक्षा जास्त काळ चालत होता.
- **अश्वमेघ यज्ञ :-** राजाच्या कर्तृत्वाचे, पराक्रमाचे प्रतिक म्हणून हा यज्ञ केला जात होता. साम्राज्यवाढ व ऐश्वर्यवाढ यासाठी हा यज्ञ केला जात होता.
- **यज्ञसंस्था :-** उत्तर वैदिक कालखंडात यज्ञसंस्था सर्वस्पर्शी झाल्यामुळे सामान्य लोकांचीसुद्धा यज्ञसंस्था श्रद्धेची गोष्ट बनली होती. व्यक्तिगत सुख, समाजसुख व राष्ट्र सुखासाठी यज्ञसंस्था श्रद्धेचे स्थान बनली होती.

**ब्राह्मण पुरोहितांचे महत्त्व वाढले :-**
उत्तर वैदिक  कालखंडात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढलयाने आपोआपच ब्राह्मण पुरोहितांचे महत्त्व वाढले.

- पुरोहित देवता व यज्ञयजमान यांच्यातील दुवा ठरला.
- पुरोहिताची समाजावर स्वतंत्र छाप पडली.
- पुरोहितांचे राज दरबारातील महत्त्व वाढले.
- क्षत्रियांपेक्षाही पुरोहित समाजात श्रेष्ठ ठरला.
- पुरोहिताची गणना भूदेव म्हणून होऊ लागली.

**यज्ञविधीतील गुंतागुंत :-** उत्तर वैदिक  कालखंडात यज्ञ ही इच्छित गोष्ट प्राप्त करण्याचे साधन ठरले होते. यज्ञ हे देव, दानव, मानव या सर्वांनीच केले आहेत. मात्र यज्ञांच्या नावाने होणारे पशूसंहार, हत्या, हिंसा या सर्व प्रकारामुळे यज्ञविधीतील गुंतागुंत वाढली. पुढे यज्ञाचा आकार, यज्ञ मंडपाची लांबी-रुंदी, यज्ञातील आहुती, आहुती यज्ञकुंडाच्या कोणत्या भागात टाकावयाची, कोणत्या क्षणी कोणता मंत्र म्हणावयाचा याबाबत गुंतागुंत वाढत होती.

उत्तर वैदिक कालखंडात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढले होते. या संस्थेचा अतिरेक झाल्याने या संस्थेला व्यावहारीक रुप प्राप्त झाले होते. परिणामी ही धार्मिक प्रक्रिया पुढे सर्वसामान्य लोकांना न परवडणारी होऊन बसली होती. परिणामी निरनिराळ्या प्रकारचे यज्ञ केवळ प्रतिष्ठित, धनसंपन्न, श्रीमंत लोकच करु लागले. परिणामी यज्ञ करणे ही श्रीमंत लोकांची मक्तेदारी होऊन बसली.

**आपली प्रगती तपासा**
१. उत्तर वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती कशी होती.

## ३.७ सारांश

वैदिक संस्कृतीचा कालखंड परिवर्तनाचा कालखंड असून या संस्कृतीने प्राचीन भारताच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. म्हणूनच भारतीय चिरंतन संस्कृती असे म्हटले जाते.

## ३.८ दिर्घोत्तरी प्रश्न

१. वैदिक कालखंडातील जनपदाबाबतची माहिती सांगा.
२) पूर्व वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती सांगा.
३) उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती सांगा.
४) पूर्व वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती सांगा.
५) उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती सांगा.
६) पूर्व वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थितीची माहिती सांगा.

❖❖❖❖

# ४

# इ.स. पूर्व सहाव्या शतकानंतरचा भारत

**प्रकरणाची रचना:**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ सोळा महाजन पदे
४.३ महाजनपदीची प्रशासन व्यवस्था
४.४ जैनधर्माच्या उदयाची कारणे
४.५ वर्धमान महावीराचे जीवन
४.६ वर्धमान महावीराची शिकवण
४.७ भारतीय संस्कृतीतिल जैनधर्माचे परिणाम
४.८ बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे
४.९ गौतम बुद्धाचे जीवन
४.१० गौतम बुद्धाचे तत्वज्ञान
४.११ बौद्ध धर्माचे पंथ
४.१२ बौद्ध धर्माचा प्रसार
४.१३ बौद्ध धर्माचा ऱ्हास
४.१४ बौद्ध धर्माचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम
४.१५ पर्शियन व ग्रिक आक्रमणे
४.१६ सारांश
४.१७ दिर्घोत्तरी प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये

- सोळा महाजनपदे व त्यांचे प्रशासन जाणून घेणे.
- जैन धर्माच्या उदयाची, महावीरांच्या जीवन कार्याची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या उदयाची, गौतम बुद्धांच्या जीवन कार्याची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या प्रसाराची, ऱ्हासाची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या भारतीय संस्कृतीवरील परिणामांची माहिती जाणून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

प्राचीन भारतीय इतिहासातील इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ३३२ हा कालखंड महाजनपदांचा कालखंड मानला जातो. या कालखंडात १६ महाजनपदांचा विकास झाला. ही महाजनपदे लोकशाही व राजेशाही स्वरुपाची होती. या कालखंडातील राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थिती उत्तम प्रकारची होती. तसेच याच कालखंडात जैन धर्माला महावीराचे नेतृत्व लाभल्याने जैन धर्माचे तत्वज्ञान, प्रसार जनमाणसांपर्यंत पोहचला होता. तर गौतम बुद्धाने नव्याने स्थापन केलेला बौद्ध धर्म, धर्माचे तत्त्वज्ञान व धर्माचा प्रसार व प्रभाव विलक्षण ठरला होता या सर्व माहितीचा आढावा प्रस्तुत प्रकरणातून आपण जाणून घेणार आहोत. तसेच प्रर्शिन व ग्रिक आक्रमणांची माहिती पाहणार आहोत.

## ४.२ सोळा महाजनपदे

इ.स.पू ६०० ते इ.स. ३३२ हा महाजनपदाचा कालखंड समजला जातो. याकाळात जनपद, गणराज्ये टोळीराज्ये अशा प्रकाराची शासनप्रणाली प्रचलित होती. जनपदापैकी १६ जनपदे ही **महाजनपदे** म्हणून ओळखली जाऊ लागली. महाजनपद या शब्दाचा मुळे अर्थ जन होय जन याचा उल्लेख **सर्वप्रथम ऋग्वेदात** आला आहे. जन हा शब्द जनसमूह असा होता एक जन मध्ये अनेक कुटूंब असे. **सर्वप्रथम ब्राम्हण ग्रंथामध्ये जनपद** शब्द आलेला आहे. **जनपदाची व्याख्या** इतिहासकार करतात की,“जेव्हा भ्रमणशील / भटकंती जनाचे सदस्य स्थिर झाले आणि त्यांनी आपले प्रशासकीय संघटन बनवले तेव्हा त्याना **जनपद** अस म्हणतात. गौतम बुध्दाच्या पूर्वी १६ महाजनपदे होती.”

सोळा महाजनपदाची ऐतिहासिक माहिती विविध साधनातून मिळते. ती साधने म्हणजे अष्टाधायी, अर्थशास्त्र, पुराण, रामायण, महाभारत, अंगुत्तरनिकाय, महापरिनिर्वाणसुत्र, जैनभगवतीसुत्र (व्याख्या प्रज्ञापती) ,नाणी इ, होय, पुढील प्रमाणे – सोळ महाजनपद होती.

**१) काशी** - काशीचे राज्य हल्लीच्या **वाराणसीमध्ये** होते. या शहराच्या दक्षिणेला वरुणा व असी या दोन नदया वाहत असत. त्यावरुन वाराणसी नाव पडते. जातक कथानुसार काशीची **राजधानी वाराणसी** होते. **गुत्तिल जातकानुसार** काशीचा विस्तार १२ योजनाच्या क्षेत्रात झालेला होता. जैन तीर्थकार पार्श्वनाथचे वडील **अश्वसेन** राजा होता. कुनाल जातक व महावग्गनुसार बृहदत्तने ने कौशलवर अधिकार स्थापन केले. शेवटी काशी राज्य **कौशल मध्ये** कंसाने समाविष्ट केले. काशी येथील **रेशमी वस्त्राला** जगभर मागणी होती. काशी हे व्यापारी, धार्मिक दृष्टया प्रसिध्द होते.

**२) कोसल / कौशल** - कोसलचे राज्य म्हणजे पूर्वीचा **अयोध्द प्रांत** होय. सध्या उत्तरप्रदेशातील **लखनौ,फैजाबाद** जिल्हे होय. राज्याच्या उत्तरेला **श्रीवस्ती** व दक्षिणेला **कुशावती** या दोन राजधान्या होत्या. साकेत व अयोध्या ही नगरे होती. महाकाव्यामध्ये राजा दशरथ व राम यांचे राज्य होते. नंतरच्या काळात अयोध्या हे कोसल नावाने उदयास आले.

**बुध्दाचा समकालीन राजा प्रसेनजित** होता. त्याचे शिक्षण तक्षशिला विद्यापीठात झाले.त्याने आपल्या बहिणीचा कोसलदेवी हिचा विवाह **बिंबिसारशी** केला व काशीनगरचे उत्पन्न भेट दिले.बिंबिसारच्या मृत्यूनंतर अजातशत्रू व प्रसेनजित यांच्यात संघर्ष झाला पराभव झाल्याने प्रसेनजितने आपली कन्या **वजिरा** हिचा अजातशूत्रशी विवाह करुन मैत्री पून्हा निर्माण केली.गौतम बुध्दाबद्दल असलेल्या आदरामुळे प्रसेनजितने शाक्य कुळाशी विवाहाचे संबंध प्रस्थापित केले. परंतु एका गुलाम स्त्रीशी लग्न लावले.त्या स्त्रीपासून **बिड्डूभ** नावाचा मुलगा झाला. अजातशत्रूची मदत घेण्यासाठी राजगृहास गेला पण तेथेच प्रसेनजितचा मृत्यू झाला त्यानंतर बिड्डूभाने शाक्याची मोठी कत्तल केली. नंतर कोसल मगध राज्यात विलीन झाले.

**३) अंग -** अंग राज्य म्हणजे सध्याचा बिहार प्रांतातील **भागलपूर मोघरि** जिल्हाह्याचा भाग होय. अंग हे **गणराज्य** असून **चंपा ही राजधानी** होती. मगध राज्याच्या पूर्वेला गंगेच्या उत्तर खोऱ्यातील **राजमहल पर्वतामध्ये** राज्य होते. चंपा नदी मगध व अंगची सीमा रेषा होती. अश्वपुर व भद्रिका हे शहरे प्रसिध्द होते. **एतरेथ ब्राम्हणा ग्रंथानुसार** अंगच्या राजाने **दिग्विजय** केला होता. **व्यापाराचे** मोठे केंद्र म्हणून प्रसिध्द होते. **मगधा** मध्ये समाविष्ट झाले.

**४) वज्जी -** वज्जी हे ८-९ राज्याचे जमातीचे **संघराज्य** होते. यामध्ये विदेह, किच्छवी आणि वज्जी या महत्वाच्या जमाती होत्या. **वज्जी ग्राम** म्हणजे हल्लीचे **मुज्जफरपूर (बिहार)** हे होय.लिच्छवी घराण्याची राजधानी **वैशाली** होती विदेहची राजधानी **मिथिला** होती मिथिला हे **जनकपूर** नावाने आज ओळखली जाते. सर्व वज्जी संघराज्याची राजधानी **वैशाली** होती. लिच्छवी मध्ये बौध्द धर्म प्रसार झपाटयाने झाला. गौतम बुध्दानी अनेक वेळा वैशालीला भेटी दिल्या होत्या तेथीच बौध्द धर्म परिषद भरवली होती. वैशाली ही महावीराची जन्मभूमी आहे.

**५) मल्ल -** पूर्व भारतामधील एक बलाढय जमात होती.मल्लाच्या दोन शाखा होत्या. कुशीनगर व पावा ही दोन शहरे म्हणजेच दोन शाखा होत्या. या राज्यात ९ टोळ्या असून ९ विभागात पसरलेल्या होत्या भोगनगर, अनुपिया,उरुवेलकप्प ही शहरे होती. येथे **राजसत्ताक** पध्दत होती. गौतम बुध्दानी पावामध्ये **अंतिम भोजन** घेतले व **कुशीनगर येथे** देह सोडला. बौध्द धर्मियाचे पवित्र स्थळे आहेत. बुध्दकाळात गणराज्य होते. भद्रसाल जातक नुसार मल्ला व लिच्छवि याच्या संघर्षाची माहिती मिळते शेवटी मगध राज्यात समाविष्ट झाले. मल्ल हे सध्या उत्तर प्रदेशातील **गोरखपूर जिल्हा** होय.

**६) चेदी -** चेदी राज्य उत्तर प्रदेशातील **कानपूर उनाव** जिल्हयात होते. नेपाळ व बुदेलखंड येथे दोन वसाहती होत्या. **चेतीय जातकानुसार** सोत्थीवती व महाभारतानुसार **शुक्तीमती** राजधानी होती **ऋग्वेदामध्ये चेदी** राज्याचा उल्लेख आहे.

**७) वत्स -** वत्स राज्य म्हणजे सध्याचा **अलाहाबाद व बांदा जिल्हयाचा प्रदेश** होय. यमुना नदीच्या तीरावरील **कोशीबी** ही राजधानी होय. **<u>पुराणानुसार</u>** कुरुची राजधानी हस्तिनापूर गंगेच्या पुरामुळे नष्ट झाले. त्यामुळे कुरुची टोळी वत्सकडे स्थंलातरित झाली. तेथे साम्राज्य स्थापन केले. वत्सराजा उदयन हा बौध्दाचा समकालीन होता. **उदयन** व अवंतीचा राजा

**महासेन चंडप्रतादे** यांच्यात शत्रूत्व होते. पुढे अवनी राजकन्या **वासवादात** हिच्याशी उदयने लग्न केले. त्याने गौतम बुध्दाला चार विहार बांधून दिले होते हर्षवर्धनाच्या रत्नावली व प्रियदर्शिका,भासाच्या स्वप्नवासवदाता नाटक, कालिदासच्या मेधदुतामध्ये उदयनचे वर्णन आलेले आहे. उदयनने मगध राजकन्या **पद्मावती** हिच्याशी लग्न केले.

८) **पांचाल** - पांचालचे राज्य दिल्लीच्या उत्तरेस आणि पूर्वेस हिमाल्याच्या पायथ्यापासून ते चंबळ पर्यत होते. म्हणजे आजच्या **रोहिलखंडचा प्रदेश** व त्याच्या आसपासचा प्रदेश होय. गंगा नदीमुळे उत्तर व दक्षिण पांचाल असे दोन विभाग पडले आहेत. **उत्तर पांचाल** म्हणजे उत्तर प्रदेशातील बदीमू, फरुकाबाद, व त्याच्या आसपासचा प्रदेश होय त्याची राजधानी **अहिछत्र** होती. **दक्षिण पांचाल** म्हणजे कांपील व फारुखाबाद जिल्हा (उत्तर प्रदेश) होय. त्याची राजधानी **कांपिल्य** होती. पांचाल **राजा ब्रम्हादान** याचा उल्लेख रामायण, जातक कथा, उत्तराध्यायनसुत्र, स्वप्नवासवदात यामध्ये मिळतो. कुम्भकार जातकनुसार उत्तर पांचालचा **राजा दुर्मुख** होता. ऐतरेय ब्राम्हण ग्रंथात दिग्विजयी सम्राट म्हटले आहे ब्रम्हादात्तने विदेहवर विजय प्राप्त केल्यानंतर कन्नोज नगर स्थापन केले.

९) **कुरु** - कुरु राज्य सध्याच्या दिल्ली व यमुनेच्या सुपीक प्रदेशात होते महाभारतामुळे हे राज्य प्रसिध्द आहे. पांडवानी कुरुची स्थापना केली. त्याची राजधानी **इंद्रप्रस्थ** होती. कौरव हा बुध्दाचा समकालीन होता. इद्राप्रस्थ, कुरुक्षेत्र, ही प्रसिध्द शहरे होती. कुरु कुळ हे प्राचीन काळापासून शहाणपणा व उत्कृष्ठ शरीरसौष्ठव बददल प्रसिध्द होते. यादव, भोज, पांचाळ याच्याशी वैवाहिक संबंध होते प्रथम राजसत्त शेवटी प्रजासत्ताक होते. मगध साम्राज्यात समाविष्ट झाले.

१०) **मत्स्य** - कुरुच्या दक्षिणेला आणि शूरसेनच्या पश्चिमेला मत्स्य राज्य होते. आजच्या **जयपूर परिसरात** हे राज्य असून, त्याची राजधानी विराटनगर होती. विराट नावाच्या राजाने हे राज्य स्थापन केल्यान। त्याचे नाव राजधानीला विराट नगर (बैराट) असे दिले. त्याचा विस्तार चंबळ पासून ते सरस्वती नदीच्या जंगला पर्यत झालेला होता.

११) **शुरसेन** - यमुना काठावरील मधुरा / मथुरा ही राजधानी होती. ग्रीक लोकांनी याचा उल्लेख **सौरसेन** व राजधानी **मेथोरा** असा केला आहे महाभारत, पुराणात यदुवंशाचा शासक राज्य करतो असा उल्लेख आहे. बौध्द ग्रंथानुसार **अवन्तिपुत्र** हा बुध्दाचा समकालीन राजा होता. तो बुध्दाचा उपासक असल्याने बौध्द धर्माचा प्रसार झाला. शुरसेन हा वासुदेव व कुंती याचा पिता होता. याचा प्रमुख वासुदेव कृष्ण असल्याने मथुरा कृष्ण पंथीयाचे केंद्र होते असा उल्लेख **मेगॅस्थि निसने** केला आहे. कालांतराने शुरसेन मगध साम्राज्यात विलिन झाले.

१२) **अश्मक** - याचा मुळे प्रदेश सिंधू नदीच्या खोऱ्यातील होय. अस्सक, अश्वक, अश्मक असेही म्हणतात. ग्रीक इतिहासकारानी स्वात नदीच्या खोऱ्यात **अस्सेकेनॉय** जमात रहात होती असा उल्लेख केला. पाणिनीने ही याचा उल्लेख केला आहे **भट्टस्वामीने** अश्मकचा संदर्भ महाराष्ट्राशी लावला आहे. गोदावरीच्या खोऱ्यात अस्सक व अलका ही दोन राज्य असून प्रतिष्ठा / पैठण राजधानी होती. **सुत्तपिटक्या** मते अस्सक व अलका म्हणजे आंध्रप्रदेश होय. **वायूपुराणा** नुसार इक्ष्वाक वंशाचा राजा होता. राजर्षि अश्मकने पोदनानगरी स्थापन केल्याचा

उल्लेख महाभारतात येतो. **चुललकलिंग जातक नुसार** अश्मक राजा अरुणने कलिंगवर विजय मिळवला.

**१३) अवंती** - पश्चिम भारतातील माळवा प्रदेशात हे शक्तीशाली राज्य होते. वेत्रवती (बेटवा) नदीमुळे दोन भाग पडले. उत्तर भागाची **उज्जैन** व दक्षिण भागाची **महिसनी /महिस्मती** ही राजधानी होती. राजगृह ते प्रतिष्ठात मार्गावर अवंती असल्याने राजकीय महत्व होते. बुध्दाचा समकालीन अवंती राजा प्रघोत होता. प्रघोत पासून संरक्षणासाठी अजातशत्रूने राजगृहला तटबंदी केली, प्रधोतने चंड, महासेन ही विशेषने घेतली होती. त्याच्या नंतर पालक, विशाखभूप, अजक. नंदवर्धन यांनी राज्य केले शिशूनाग राजाने पराभव करुन मगधात मिळवले.

**१४) गांधार** - गांधार म्हणजे सध्याचा **पेशावर (पुरुषपुर) व रावळपिंडीचा प्रदेश** होय. तक्षशिला ही राजधानी होती हे **व्यापारी व विद्येचे** प्रमुख केंद्र होते. प्रारंभी वैदिक धर्माचे नंतर बौध्द धर्माचे प्रमुख केंद्र होते. पुराणामध्ये गांधार शासकाला **दुहावंशी** मानले आहे. **ऋग्वेदात** याचा उल्लेख आहे. कुम्भकार जातक व शतपथ ब्राम्हण ग्रंथात नग्नजीत नावाच्या सम्राटाची चर्चा आहे. तो विदहेराजा निमि, पांचालराजा दुर्मुख, विदर्भराजा भीमाचा समकालीन होता. ब्राम्हण ग्रंथात गांधार शासक **वैदीक धर्माचे अनुयायी** होते असा उल्लेख आहे. इ,स,पु ६व्या शतकात पुष्करसारिन राजा असून, तो बिंबिसारचा समकालीन होता. त्याने अंवनीचा राजा प्रघोतला पराभू केले.

**१५) काम्बोज** - काम्बोज व गांधार यांचा उल्लेख प्राचीन साहित्य व अशोकाच्या शिलालेखात बरोबरीने उल्लेख येतो. सध्याचा **हजारा जिल्हा** व वायव्य सरहदूर प्रांतातील **काफिरिस्तानचा** काही भाग म्हणजेच काम्बोज होय. संघराज्य म्हणून कौय्ल्याने उल्लेख केला आहे.प्राचीन काळात **राजपुरा** नावाने उल्लेख होत असे. प्रारंभी राजसत्ताक नंतर गणतंत्र पध्दतीचे सरकार होते. **हेनसॉनने** आपल्या प्रवास वर्णनात उल्लेख केला आहे. वैदिक काळात **ब्राम्हण शिक्षणाचे** प्रसिध्द केंद्र होते.

**१६) मगध** - दक्षिण बिहारमधील **पाटणा व गया** परिसरात मगध राज्य होते. गंगा - शोण नदयाच्या पट्टयात हे राज्य होते. महाभारतात जरासंघ या मगध राजाचा उल्लेख येतो. याची राजधानी **गिरिवज्र** होती नंतर **राजगृह** व नंतर **पाटलीपुत्र** राजधानी करण्यात आली. रिपुजय या शेवटच्या व बाहेद्रथ राजानंतर बिबिसार गादीवर आला. असूर, शिशूनाग, नंद, मौर्य, गुप्त पर्यत मगध भारतीय राजनितिचे केंद्र होते.

**आपली प्रगती तपासा**

१. १६ महाजन पदांची माहिती सांगा.

______

______

______

______

______

## ४.३ महाजनपदांची प्रशासन व्यवस्था

बौध्द साहित्य, महाभारत आणि अर्थशास्त्र मध्ये गणराज्याच्या घटनाची माहिती मिळते. बौध्दग्रंथ अट्टा-कथानुसार कुल परिवाराच्या प्रतिनिधीची सर्व सभासदानी अध्यक्ष (राजा), उपाध्यक्ष (उपराजानो), प्रधानसेनापती (सेनापतीनो), वित्तमंत्री (भाण्डागारिका) याची निवड केलेली असते सैनिक, राजनीतिक, व्यापारीक, शेता। समाजसेवा हे सर्व विषय संसदे/परिषदे समोर येऊन सभासद त्यावर निर्णय घेत असे शहराना राज्यकारभाराचे स्वायातंतेचे अधिकार दिलेले असे. शहर परिषदेमध्ये व्यापारी, कारागीर. शेतकरी यांचे प्रतिनिधी असे मध्यवर्ती समिती ही राजधानीच्या ठिकाणी असून ती सर्वश्रेष्ठ असे. त्याचा प्रमुख **गणाध्यक्ष** असे. राजदुत (महत्तक) याची नियुक्ती सभा करत असे.

**गणराज्याची कार्यप्रणाली-** गणराज्यांच्या कार्यपध्दतीमध्ये मध्यवर्ती समिती, मध्यवर्ती कार्यकारी/कायदेमंडळ, उपसमित्या, विविध प्रशासकीय विभाग असून या माध्यमातून गणराज्याची कार्य चालत असे.

**अ) गणराज्याची मध्यवर्ती समिती :-** गणराज्याचा सर्व कारभार मध्यवर्ती समितीतर्फे चालत असे.या समितीच्या सभासदाची संख्या मोठी असे. **शाक्यच्या परिषदेत** ५०० यौधेयच्या परिषदेत -५००० **लिच्छवीच्या परिषदेत** ७७०७ सभासद होते. वेगवेगळ्या गणराज्यात ही जबाबदारी शिष्टसभा, गण, मंत्रिमंडळ याच्यावर सोपवली होती. **शिष्टसभा**-म्हणजे गावातील प्रतिष्ठीत व वृध्दजनांचे मंडळ होय. **गण–म्ह**णजे कोणतेही कार्य सर्व लोकांच्या संमतीने करणे. **मंत्रिमंडळ** -सर्व कारभार मंत्रिमंडळावर सोपवलेला होता. यौधेय गणराज्यात **मंत्रधर** नावाचा अधिकारी होता. त्याचे अधिकार म्हणजे आजच्या मंत्रिमंडळा सारखे होते. मध्यवर्ती समितीतील सर्व प्रकारचे पूर्ण अधिकार होते. उदा. वरिष्ठांची नियुक्ती, अधिकारपदे वंशपरंपरागत चालू ठेवणे. परराष्ट्र व्यवहार, संकट प्रसंगी मदत व निर्णय इ. घेत असे. मध्यवर्ती समितीचे बरेच सभासद राजधानीच्या ठिकाणी राहत असे सभासदांची जेथे सभा होते त्या सभागृहाला **संथागार** म्हणतात.

**मध्यवर्ती / केंद्रिय समितीची कामकाज पध्दत -** केंद्रिय समितीच्या कामकाजाची तुलना आजच्या **लोकसभेच्या कामकाजाशी** करता येईल. संथागार मध्ये राजकीय, धार्मिक, सामाजिक विषयावर चर्चा होत असे. कुशीनगरच्या **मल्ल** गणराज्याच्या सभागृहात बुध्दांच्या अंत्येष्टि संस्काराविषयी चर्चा झाल्याची माहिती मिळते. मध्यवर्ती समिती गणाध्यक्षाची नियुक्ती करते. त्याच्या मदतीसाठी **गणपूरक,शलाकाग्राहक** व **कारकून** असत. सभागृहात आपल्या अधिकाराच्या प्राप्तीसाठी स्वतंत्र पक्ष बनवलेले होते या पक्षांना **वार्य गृहय, व्रपक्ष्य** म्हणतात.

सभेच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी एक अधिकारी प्रत्येक सभासदाला बसण्यासाठी आसन देत असे. सभेच्या कामकाजाला सुरुवात **ठरावाच्या मांडणीतून** होत असे परंतु ठराव मांडण्यापूर्वी सभासद सभागृहात उद्देशून भाषण करत असे त्या भाषणाला **ज्ञप्ती** म्हणत असे. त्यानंतर ठरावाच्या रुपात तो विषय सभे पुढे येत असे. त्या ठरावाला **प्रतिज्ञा** असे

म्हणत. प्रतिज्ञेला अनुमती असेल ते स्वस्थ बसत असे. इतर त्यावर चर्चा करत असे. कधी-कधी तीन वेळा मोठयादा प्रतिज्ञा वाचून दाखविली जात असे सभागृह तटस्थ राहिले ती प्रतिज्ञेला मंजूरी मिळून त्याचे कायदयात रुपातर होत असे.

सभेच्या बैठकीला कामचलाऊ संख्येची आवश्यकता असे. ती संख्या कीती असावी हे अगोदरच ठरविलेले असे. ही सख्या नसेल तर, सभेचा निर्णय ग्राहय मानला जात नसे या **संख्येला वर्ग** म्हणतात. ही संख्या मोजण्यासाठी **गणपूरक अधिकारी** असे आजच्या कायदेमंडळात जो प्रतोद असतो त्याच्याशी गणपूरकाची तुलना करतात.

सभासदाच्या मताला **छंद** म्हणत एखादया सभासदाला मतदानाचा अधिकार असेल पंरतु तो सभेला हजर राहू शकत नसेल तर, आपले मत सभेकडे पोचविण्याची व्यवस्था करता येत असे. पंरतु अश्या मतांचा विचार करावयाचा की नाही हा अधिकार सभागृहावर अवलंबून होता. ठराव पास झाला तर त्याची गरज नसे. प्रतिज्ञावर मतभेद होत असे, त्या वेळी मतदानासाठी सभासदांना विविध रंगाच्या मतपत्रिका वाटल्या जात. त्या मत पत्रिकेला **शलाका** म्हणत **शलाकाग्राहक** नावाचा अधिकारी असे. गुप्त पध्दतीने मतदान होई. त्यास गुहाक म्हणत कित्येकदा प्रकट स्वरुपामध्ये मतदान घेतले जाई त्यास **वितरक मतदान** म्हणत शलाकाच्या विविध रंगाचा हेतू सभासदाला समजून सांगतला जात. केंद्रिय समितीच्या कारभाराच्या नोंदीसाठी कारकून असे.

**क) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ /मंत्रिमंडळाची कार्य पध्दत :-** गणराज्याच्या स्वरुपानुसार कार्यकारा मंडळ किंवा मंत्रिमंडळाची संख्या असे मल्ल गणराज्याची चार, **लिच्छवीची नऊ,** संख्या होती प्रशासकीय कारभारात गुप्तता टिकवण्यासाठी योग्या निर्णय जलद घेणे व अंमलबजावणी होण्यासाठी कमी संख्या असावी साधारणपणे ४ ते २० सभासद संख्या असावी त्यांची नेमणूक केंद्रिय समितीकडून होत असे सभासदांच्या अंगी प्रज्ञा, पौरुष, उत्साह, अनुभव, शास्त्र, गणराज्याची परंपरा इ. गुण असावे

कार्यकारी मंडळ सर्व निर्णय प्रधानमंत्र्याच्या नेतृत्वाखाली व एकमताने घेत असे प्रत्येक सभासदाकडे एक स्वतंत्र विभाग असे. उदा. परराष्ट्र विभाग, आयव्यया विभाग, (महसूल विभाग) न्यायदान विभाग त्या त्या विभागातील सर्व कामे त्यांना करावी लागत असे.

**ड)प्रशासकीय विभाग -** गणराज्यातील ग्रामाचा कारभार स्थानिक सभासदाकडे असे. यामध्ये बहुधा क्षत्रिय वर्णाचे सभासद असे. या मध्ये राजकीय, सामाजिक विषयावर चर्चा करत असे. शहाराचा कारभार **शहर परिषदेमार्फत** चालत असे. क्षत्रिय,व्यापारी,सामान्याचे प्रतिनिधी असे शहाराच्या प्रश्ना संदर्भात चर्चा करत असे.

प्रांत हा प्रशासनाचा तिसरा विभाग होता. त्याच्या प्रमुखाची नेमणूक बहुधा **केंद्रीय समिती तर्फे** केली जात असावी त्याच्या मदतीसाठी अधिकारी असे. केंद्रीय समिती राजधानीच्या ठिकाणी असे.

श्री जायस्वालने **हिंदू पॉलिटी** या ग्रंथात इ.स.पू ६व्या शतकात भारतात लोकशाहीचा बीजे राजकीय जीवनात रुजलेली होती त्यावरुन घटनात्मक राजकीय जीवन व जबाबदार राज्य पध्दती इ.स.पूर्व ६व्या शतकात दृढ झालेली होती. काहीच्या मते ६ व्या शतकात पूर्वीच अस्तित्वात असली पाहिजे त्याच्या मते भारतात पूर्वी सार्वमताची पध्दत असावी सार्वमतालाच **परिपुच्छ** असे म्हणतात राईस **डेव्हिडच्या** मते "बळ राजेशाहीबरोबरच कमी अधिक प्रबळ गणराज्य किंवा जनपदे असावी" प्राचीन भारतात लोकशाही माहित नसावी पंरतु लोकशाही पध्दतीने राज्यकारभार करण्याचे ज्ञान प्राप्त होते केवळ अनियंत्रित राजेशाहि होती असे नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. गणराज्याची कार्यपध्दती स्पष्ट करा.

## ४.४ जैन धर्माच्या उदयाची कारणे

### १) वैदिक धर्मातील यज्ञ, पूजाविधी व कर्मकांड :

ब्राह्मणयुगात मोठ्या प्रमाणात यज्ञ केले जात होते. प्रत्येक गोष्टीच्या इच्छापूर्तीसाठी यज्ञ करावा लागे. यज्ञ, पूजाविधी व कर्मकाडांचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढले. उत्तर वैदिक काळात यज्ञाप्रमाणेच मंत्रतंज्ञ, उपास तपास, व्रतवैकल्ये, धर्मविधी, इ. चे महत्त्व वाढून या गोष्टीं म्हणजेच धर्म असा लोकांचा समाज करुन दिला होता. यज्ञविधी, पूजा, कर्मकांड यास लोक कंटाळत होते.

### २) ब्राह्मण पुरोहिताचे वर्चस्व वाढले :

यज्ञविधी, कर्मकांड, पूजाविधी करणारा ब्राह्मण पुरोहितांचा जो वर्ग होता त्याचे महत्त्व फारच वाढले होते. प्रत्येक यज्ञ, पूजा, कर्मकांड हे ब्राह्मण पुरोहिताकडून घ्यावे लागत. धार्मिक क्षेत्रात पुरोहिताचे वर्चस्व फारच वाढले. हा वर्ग स्वतःला समाजाचा मार्गदर्शक समजत होता. राजकिय स्वरुपाचा यज्ञामुळेही हा वर्ग राजकिय क्षेत्रातही स्वतःचे वर्चस्व टिकवून होता. हा वर्ग मनुष्य व ईश्वर यांच्यातील मध्यस्त बनला होता. धर्म, राजकारण व प्रशासन या क्षेत्रात या वर्गाचा दबदबा निर्माण झाला होता. परंतु या वर्गाच्या वर्चस्वाला जनता कंटाळली होती.

### ३) वैदिक साहित्य हे संस्कृत भाषेत होते :

वैदिक साहित्य हे संस्कृत भाषेत असल्याने सर्वसामान्यांना ते वाचता येत नसे. पुरोहितांनी वैदिक मंत्रपठणाचा अधिकार स्वतःकडे ठेवला होता. त्यामूळे धर्मवचनांचा अर्थही

लोकांना कळत नसे. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेतून धर्मग्रंथ असणे आवश्यक होते. समाजाची ही गरज महावीर वर्धमान यांनी पूर्ण केली.

**४) वैदिक धर्मातील खर्चिकता व पशुहत्या :**

विविध देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी पुरोहिताला बोलवावे लागे. त्यास दक्षिणा द्यावी लागे. विविध वस्तुंची आहुती द्यावी लागे. त्या शिवाय यज्ञयुगात पशुबळी द्यावे लागत. म्हणजेच वैदिक धर्म हा खर्चिक बनला होता. सर्वसामान्यांना बिन खर्चिक व प्राणी हत्या नसलेला धर्म हवा होता. ही गरज जैन धर्माने पूर्ण केली.

**५) वैदिक धर्मात शुद्रांना स्थान नव्हते :**

शुद्रांचा वर्ग हा अनाथांचा असल्याने या वर्गास वैदिक धर्मात स्थान नव्हते. उत्तर वैदिक काळात जाति व्यवस्था अत्यंत परिवर्तनिय झाल्याने एका जातीतून दुसऱ्या जातीत जाता येत नव्हते. लोक संख्येतील एक मोठा वर्ग हा धर्मापासून वंचित होता. सर्व समावेशक अशा नव्या धर्माची आवश्यकता निर्माण झाली होती.

**६) वैदिक धर्मातील बहुदेवत्व :**

ऋग्वेदकालीन देवतांची संख्या ३३ कोटी होती. या विविध देवतांची प्रार्थना, उपासना करावी लागे. या विविध देवदेवतांची उपासना प्रार्थना केली नाही तर फल प्राप्ती होत नाही असा समज होता. पण मोक्षप्राप्तीसाठी, आत्म उत्कर्षासाठी विविध देवतांवर विश्वास ठेवण्याची गरज नाही; जीव, परमात्मा, सृष्टी, ईश्वर इ. विषयाचे ज्ञान झाल्यास मोक्ष मिळतो व जीवन समृद्ध होते, हे उपनिषदांनी सांगितले. परंतु उपनिषदांनी सांगितलेला मार्गही कठीणच होता. म्हणूनच ख्रिस्तीपूर्व काळात लोक जैन धर्माकडे वळले.

**७) मंत्रतंत्र व अंधश्रद्धांचा प्रभाव :**

पुरोहिताचा स्वार्थ व सामान्य जनतेचे अज्ञान यातून अंधश्रद्धा वाढण्यास प्रारंभ झाला. तंत्रविद्या, जादूटोणा, वशीकरण, भूतपिशाच्य विद्या या सारख्या आचाराला व त्या विषयीच्या अंध श्रद्धांना महत्व दिले जाऊ लागले. यातून समाजाची सुटका करुन समाजाला दैनंदिन जीवनात सदाचारालाच प्राधान्य देणाऱ्या नविन धर्माची गरज वाटू लागली आणि त्यातूनच जैन धर्माच्या उदय झाला.

**८) वर्णव्यवस्था व वैदिक धर्मातील स्त्रियांचे गौण स्थान :**

वैदिक धर्मात वर्ण व्यवस्था वाढीस लागून त्यात शुद्रांना समाजात कनिष्ठ स्थान प्राप्त झाले. समाजात वर्णव्यवस्थेमुळे विषमता प्रस्थापित झाली. स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली. स्त्रियांना धर्माचरण, मालमत्ता, धर्मग्रंथ वाचने हे अधिकार नव्हते. स्त्रियांना व शुद्रांना समाजात स्थान देणाऱ्या व ब्राह्मण, क्षत्रियांचे अवास्तव महत्त्व नसणाऱ्या धर्माची गरज भासू लागली आणि ती गरज जैन धर्माच्या माध्यमातून पूर्ण होऊ लागली होती म्हणूनच जैन धर्माचा उदय झाला.

सारांश, ख्रिस्तीपूर्व सहाव्या शतकात साधा, सोपा, पशु हत्या नसलेला, बिन खर्चिक धर्मतत्वज्ञान लोकांच्या बोली भाषेत असणारा स्त्रियांना व अस्पृश्यांना स्थान असणारा, अंधश्रद्धा

व बहुदेवत्व इ. पासून दूर असणारा धर्म लोकांना हवा होता. ही गरज पूर्ण करणारा जैन धर्म होता म्हणूनच जैन धर्माचा उदय झाला असे म्हणता येईल.

## ४.५ वर्धमान महावीराचे जीवन (LIFE OF VARDHAMANA MAHAVIRA)

जैनधर्मातील शेवटचे व चोविसावे तिर्थकार वर्धमान महावीर यांचा जन्म जैन परंपरेनुसार इ.स. पूर्व ५९९ मध्ये वैशाली नगराजवळ कुंदग्राम येथे झाला. त्याचे वडील सिद्धार्थ व आई त्रिशाला देवी होते. सिद्धार्थ हे ज्ञातृक नावाच्या क्षत्रिय जमातीचे प्रमुख होते. आई त्रिशाला ही लिच्छवी राजा चेटक याची बहीण होती. वर्धमानचे शिक्षण क्षत्रिय गणराज्याच्या परंपरेत झाले. दिगंबर पंथाच्या परंपरेनुसार वर्धमानाचा विवाह झाला नाही असे मानतात. इतर परंपरेनुसार यशोदा नावाच्या सुंदर तरुणीशी लग्न झाले. तिच्यापासून अनोजा / प्रियदर्शना नावाची मुलगी झाली. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर वयाच्या ३० व्या वर्षी वडील बंधू नंदिवर्धन यांची परवानगी घेऊन संसार त्याग हिवाळ्यात केला.

वर्धमानने बारा वर्ष उग्र तपःसाधना केली. भिसाचार्य, दिंगबरवृत्ती व आत्मक्लेश यावर भर होता. १३ व्या वर्षी ऋजुपालिका नदीच्या काठी जृंभिक नावाच्या गावी एका श्याल वृक्षाखाली एक जुनाट देवळाशेजारी केवळ ज्ञान प्राप्त झाले. या ज्ञानप्राप्तीमुळे वर्धमान कामक्रोधादी इंद्रिय जिंकणारा हरला म्हणून त्याला लोक जीन असे म्हणत. महावीर जीनने ज्या मार्गाचा प्रसार केला त्यास जैनधर्म म्हणतात. केवळ ज्ञान प्राप्तीनंतर धर्मप्रचार व प्रसाराचे कार्य सुरु केले. वर्षाचे आठ महिने प्रसाराचे कार्य करत असे. मक्खली गोशाल याची नालंदा येथे भेट झाली. त्यांनी सहा वर्ष एकत्र कार्य केले. लिच्छवीराज चेटकची मुलगी अथवा चम्पा नरेश द्धिवाहनची पत्नी पद्मावती ही वर्धमानची पहिली शिष्य बनली. त्यानंतर चंपा, वैशाली, राजगृह, मिथिली, क्षवस्ती इ. ठिकाणी फिरुन प्रचार केला. उदायिन (शिंधू), स्तानिक (कैशाम्दी), प्रधोत (अवंती), बिबिसार (मगध), कामदेव, चुलानिपिया, सुरदेव, चुल्लसयग, आनंद, कुंडलोलिया, महासयग, साल्हीपिया, नंदिनीपिया, सैद्धाल इ. शिष्य बनले. धर्मप्रसाराचे कार्य करत असताना वयाच्या ७२ व्या वर्षी राजगृहीजवळ पावा येथे इ.स. पूर्व ४६८ मध्ये मृत्यू झाला.

## ४.६ जैन धर्माचे / वर्धमान महावीराचे उपदेश / शिकवण

**१) त्रिरत्ने / रत्नत्रयी :** जैन धर्माच्या शिकवणीचे सार म्हणजे त्रिरत्ने होय. उमा स्वामीने तत्वाथीधिगम सुत्र मध्ये त्रिरान म्हणजे मोक्षमार्ग सांगितले आहे.

**२) सम्यक्दर्शन :** महावीर व तीर्थकार सर्वज्ञानी आहेत यावर विश्वास ठेवणे, आगम हेच धर्मग्रंथ, संत हेच खरे धर्मापदेशक आहेत यावर विश्वास ठेवणे आगम हेच धर्मग्रंथ, संत हेच खरे धर्मोपदेशक आहेत यावर विश्वास ठेवणे, सम्यक दर्शनाची आठ अंगे आहेत. ती पुढीलप्रमाणे - संदेहमुक्ती, वाईट मार्गापासून मुक्ती, प्रेमळ, धर्मतत्वाचे महत्व, श्रद्धा, धर्मावर विश्वास इ.

**३) पंचमहाव्रते / पांच याम** - प्रत्येक श्रमणाने पंचमहाव्रताची प्रतिज्ञा घ्यावी लागते. त्यानुसार आचरण करावे लागत असे. पंचमाहव्रते पुढीलप्रमाणे -

**१) अहिंसा :** जीवाची हिंसा रोखणे, कोणालाही दु:ख द्यावयाचे नाही. जळी, स्थळी, हवेमध्ये सर्वत्र सुक्ष्म जीव असल्याने त्यांची हिंसा होऊ नये. यासाठी साधूने फार दक्षतेने वागले पाहिजे. पाणी गाळून प्यावे, नाकातोंडावर नेहमी पडदा लावावा.

**२) सत्य :** खोटे बोलू नये, सत्य सर्वांना प्रिय व कल्याणकारी आहे. सत्यवादीला आदर्श मानतात. सत्य व्रत पाळण्यासाठी लोभ, भय, क्रोध तिरस्कार याचा त्याग करावा.

**३) असत्येय :** बिना श्रद्धेशिवाय कोणतीही वस्तू घेऊ नये. दुसऱ्याच्या द्रव्याचे हरण करणे म्हणजे हिंसात्मक कार्य होय.

**४) अपरिग्रह :** साधूने द्रव्यसंग्रह करु नये. स्वार्थी, सुखरमण राहू नये.

**५) ब्रम्हचर्य :** कामवासना बाळगू नये, स्त्रीसंग टाळावा, पार्श्वनाथाने अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह ही चार तत्वे सांगितली. त्यामध्ये महावीरांनी ब्रम्हचर्य हे पाचवे तत्व आणि दिगंबरवृत्तीची भर टाकली.

**४) पंच अणुव्रते :** संसारी जीवन जगणाऱ्या व्यक्तीला जैन धर्मात श्रावक (गृहस्थ) असे म्हणतात. त्याच्यासाठी जे नियम बनवले त्यास अणुव्रते म्हणतात. ती पुढीलप्रमाणे प्राणी हिंसा, असत्य भाषण, चोरी न करणे, परस्त्रीशी व्यभिचार न करणे, गरजेपेक्षा जास्त द्रव्याचा संग्रह न करणे.

संसारात पाहून प्राणीमात्राला संरक्षण देणे, भोगांना मर्यादा ठेवावी, सामाजिक व्रत पाळणे, साधुजीवनाचा अभ्यास करणे, अभक्ष्य, कंदमुळे आणि रात्रीचे भोजन याचा त्याग करावा.

**५) सात शीलाव्रत :** जैन धर्माच्या त्रिरत्नाचे पालन करणाऱ्या श्रावकासाठी जे नियम तयार केले त्यास शीलाव्रत म्हणतात. ते सात प्रकारचे आहेत. त्यामध्ये तीन गुणव्रते आणि चार शिक्षा व्रते आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**अ) तीन गुणव्रते :** श्रावक व श्राविकांमध्ये संयम व त्यागी वृत्ती जोपासण्यासाठी गुणव्रते सांगितली आहेत.

१) दिग्व्रत : आपल्या प्रवासाच्या दिशांच्या मर्यादा पाळणे.
२) देशव्रत : प्रवासाचे मर्यादित दिवस ठरवणे.
३) अनर्य दंडव्रत : आपला व्यवसाय विनाकारण अपराधाचे भागीदार बनू नये.

**ब) चार शिक्षाव्रते :** शिक्षाव्रत पालनाने व्यक्तीच्या अंगी संन्यासवृत्ती व सामाजिक स्वास्थाची वाढ होते.

**१) सामाजिक स्वविचार :** तत्वज्ञानातील विविध विषयाचे चिंतन केल्यास मन स्थिर होण्यास मदत होते.

**२)** प्रोषधोपणास महिन्यातील पंचमी, अष्म्मी, चतुर्दशी या दिवशी उपवास करणे. त्या दिवशी धर्मग्रंथाचे पठण व आत्मचिंतन करावे.

**३) उपभोप्रतिभाग परिणाम :** दैनंदिन उपयोग वस्तूचा मर्यादित साठा करणे.

**४) अतिथि संविभाग :** घरी आलेल्या अतिथिचा स्वतःच्या जेवणातील काही भाग द्यावा.

**५) पाच समिति :** गृहस्थ जीवनाचे पालन करण्यासाठी जैन धर्माने पाच समित्या स्थापन केल्या त्या म्हणजे १) ईर्या समिती - कोणाच्याही जीवाला त्रास न देणे. २) भाषा समिती - कुणाबद्दलही टिका / कठोर न बोलणे, ३) एकूण समिती - खाण्या-पिण्यामध्ये जीवहत्या नको. ४) आदान निरपेक्ष समिती - वस्तूंचा उपयोग करताना जीवाची काळजी घेणे. ५) उत्सर्ग समिती - लहान मोठ्या शंकाचा वाईट प्रसार करु नये.

**६) जैन धर्माचे दशविध / दश लक्षणे -** जैन धर्माने पुढील दश लक्षणे सांगितली आहेत. क्षमा (क्रोध नष्ट), भार्दव (अहंकाराचा अभाव), आर्जव (कुटिलतेचा अभाव) सत्य, शुचिता (आत्मशुद्धीकरण) संयम, तप, त्याग, ब्रह्मचार्य, अकिंचनत्व (आभ्यन्तरतप)

**७) ब्राम्ह तपे -** तपाचरण, उपवास, अवभोदरिका, भिक्षूचर्या, कालक्लेश इ. होय.

**८) अकरा प्रतिभा -** जैन अनुयायांनी अकरा प्रतिभांचे पालन केल्यास संयम, शिस्त, त्यागाची प्रवृत्ती यामध्ये विकास होतो. ते अकरा प्रतिभा पुढीलप्रमाणे - दर्शन, व्रते, सामाजिक, प्रोषधोवास, सचित त्याग, अवमोदरिका, ब्रम्हचर्य, आरंभ त्याग, परिग्रह त्याग, अनुभति त्याग, उद्दिष्ट त्याग इ. होय.

**९) संन्याशासाठीचे नियम / परिषद :** जैन धर्माने संन्याश्यासाठी एकूण २२ नियम सांगितले आहेत. राग, तृषा, शीत, उष्ण, नग्नता, याचना, अरति, अलाभ, दंशमशकादि, आक्रोश, रोग, मल, तृण स्पर्श, अज्ञान, अदर्शन, प्रज्ञा, सत्कार, शय्या, चर्य्या, कर्मबंध, निषधा, स्त्रीभोग इ.

**१०) सल्लेखना -** उपोषणाच्या मार्गाने हळूहळू प्राण त्याग करणे म्हणजे आत्म्याने मिळवलेला मोठा विजय असे या शिकवणीला सल्लेखना असे म्हणतात.

**११) अष्टविधपुजा :** जैन धर्मात आत्माशुद्धासाठी तीर्थकार, पंचपरमेष्टी यांची पुजा व उपासना प्रचलित होती. पुजेचे प्रकार पुढीलप्रमाणे जलपुजा (जन्म-मृत्यूचे निवारण) चंदन पुजा (भवतापाची शांतीसाठी) अक्षतपुजा (सद्गुण प्राप्तीसाठी) पुष्पपुजा (वजनविकारांचा नाश्यासाठी) नैवेदय पुजा (क्षुधाविजय प्राप्तीसाठी) दीपपुजा (मोहांधकार दूर करण्यासाठी) धूपपूजा (अष्टकर्माच्या नाश्यासाठी) फलपुजा (मोक्षप्राप्तीसाठी) मूर्तिपूजा इ. अष्टविधपुजा होत असे.

**आपली प्रगती तपासा**

१. जैन धर्माचे तत्वज्ञान सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ४.७ भारतीय संस्कृतीवरील जैन धर्माचा परिणाम

**१) साहित्यिक देणगी :**

भारतीय संस्कृतीस जैन धर्माची मोठी साहित्यिक देणगी मिळाली आहे. जैन साहित्यात बारा अंग, बारा उपांगे, दहा प्रकिर्ण, सहा छेदसूत्रे, याशिवाय विभिन्न प्रकारचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. साहित्य या प्रकरणात जैन साहित्याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

**२) दार्शनिक देणगी :**

भारतीय दर्शन शास्त्रात (तत्त्वज्ञान) जैन धर्माची मोठी देणगी लाभली आहे. दर्शनशास्त्रात जैन धर्माच्या 'स्याद्वाद' या सिद्धांतास एक विशिष्ट स्थान आहे. सत्याचे विभिन्न पैलू होऊ शकतात आणि मनुष्याला परिस्थितीनुसार त्याचे आंशिक ज्ञानही प्राप्त होते. अशा प्रकार आपण सत्याचे केवळ एक स्वरुप पाहुनही संपूर्ण सत्याविषयी एकमत करतो. सत्याचे स्वरुप विभिन्न प्रकारचे असते. स्याद्वाद सिद्धांतानुसार प्रत्येक कथन किंवा दृष्टिकोनात आंशिक सत्य असते. त्यामुळे संपूर्ण सत्याच्या प्राप्तीसाठी या सर्व दृष्टिकोनाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. जैन धर्माचा दुसरा प्रसिद्ध दार्शनिक सिद्धांत अनेकात्मवाद आहे. या सिद्धांतानुसार जीवन भिन्न-भिन्न प्रकारचे असू शकते. आत्मा जोपर्यंत राहील तोपर्यँत तो पुनर्जन्याच्या अधीन राहतो. या सिद्धांतापासून भारतीय संस्कृतीची सहिष्णुता व उदारतेची जाणीव होते. धर्माचा पुनर्जन्य आणि कर्मवादाचा सिद्धांतही महत्वपूर्ण आहे.

**३) लेणी :**

लेणीला गृहा असेही म्हटले जाते. जैन धर्माने लेणी स्थापत्याचाही सर्वाधिक विकास केला. ओरिसातील 'हाथीगृहा', महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील वेरुळ येथील लेणी, मध्यप्रदेशातील उदयगिरी येथील लेणी, परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील नेमगिरी लेणी व उस्मानाबाद येथील जैन लेणी ही त्याची उल्लेखनीय उदाहरणे आहेत. ओरिसातील पुरी जिल्ह्यात उदयगिरी व खंडगिरी येथे इ.स. पू १५० च्या आसपासच्या पस्तीस जैन लेणी आहेत. वेरुळ येथे पाच जैन लेणी आहेत. उदयगिरी येथील सिंह लेणी, वेरुळ येथील इंद्रसभा आणि हाथीमुद्रा लेणी प्रसिद्ध आहेत. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथेही एक जैन लेणी आहे. वरील सर्व लेणींच्या दरवाज्यावर जैन तीर्थकारांच्या जीवनांची दृश्ये शिल्पांकित केलेली आहेत.

**४) मंदिरे :**

जैन-मुनीनी अनेक ठिकाणी आकर्षक मंदिरे बनविल. खजुराहो येथे अनेक जैन मंदिरे आहेत. राजस्थानमधील अबू पर्वतावरील दिलवारा मंदिर कलेच्या व सौंदर्याच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. या मंदिरात मूर्तिकला वेलबुट्टी व तोरणद्वारावर शिल्लाकिंत केलेले नक्षीकाम अत्यंत सुंदर आहे. राजस्थानमधील राणकपूर, काठीयावाड मधील (सौराष्ट्र) गिरनार आणि पालीताना आणि बिहारमधील पावापुरी, राजगृह व पारसनाथ इत्यादी जैन मंदिरे प्रसिद्ध आहेत. बुंदेलवाडा येथील जैन मंदिरे कलात्मक दृष्टिकोनातून आग्रा येथील ताजमहाल ची बरोबरी करु शकतो. शुत्रुजय पहाडावर पाचशे जैन मंदिरे आहेत. इ.स. पू. दुसऱ्या शतकात बनविलेले ओरिसातील हाथीगुहा नावाने प्रसिद्ध असलेले गुहामंदिर आकर्षक आहे. राणकपूर येथील मंदिरातील संगमरवरी दगडाचे स्तंभ विभिन्न शिल्पांनी सजविलेले आहे. चितौड येथील चौकोर स्तंभही जैनांचया स्थापत्यकतेवरील प्रेमाचा साक्षीदार आहे.

### ५) अहिंसेचा सिद्धांत :

जैन धर्माच्या अहिंसेच्या सिद्धांताने भारतीय समाजाला फार मोठ्या प्रमाणात प्रभावित केले. महावीर स्वामी यानी मन, वचन कर्म या बाबतीत कोणालाही त्रास किंवा पुष्ट पोहोचणार नाहीत याची दक्षता घेण्याचा मानवाला उपदेश केला. अहिंसेचा सिद्धांताच्या प्रभावामुळे वैदिक धर्मात यज्ञात देण्यात येणारी पशुबळीची प्रथा बंद होण्यास मदत झाली. भारतीय समाजावर अंहिसा परमोधर्म, या जैन धर्माचा सिद्धांताचा प्रभाव जाणवतो. तसेच आधुनिक भारताच्या परराष्ट्र धोरणाचा प्रमुख आधार अहिंसा हाच आहे. अशा प्रकारे धार्मिक क्षेत्रात जैन धर्माची अहिंसेचा सिद्धांत ही फार मोठी देणगी आहे.

### ६) सत्कार्य करण्याची प्रेरणा :

जैन धर्माच्या तत्त्वज्ञानानुसार पूर्व जन्मात केलेल्या कर्मानुसार मनुष्य पुढील जन्म घेत असतो. जर त्याने सत्कर्म केले तरच त्याला मोक्षप्राप्ती मिळते आणि जन्म मरणाच्या बंधनातून त्याची सुटका होते. मोक्षप्राप्ती हेच मनुष्याच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे व ते साध्य करण्यासाठी सत्कर्म करणे आवश्यक ठरते. हा विचार समाजात रुजला आणि त्यामुळेच समाजात सत्कर्म करण्यास समाजातील व्यक्तिंना प्रेरणा मिळाली.

### ७) चित्रकलेच्या क्षेत्रातील योगदान :

जैन धर्माने चित्रकलेच्या विकासातही महत्वपूर्ण योगदान दिले. जैन आचार्याच्या हस्तलिखित पुस्तकात अनेक प्रकारची सुंदर चित्रे उपलब्ध आहेत. चित्र रंगवण्यासाठी चमक देणाऱ्या रंगाचा उपयोग करण्यात येत असे. भारतीय चित्रकलेच्या विकासात जैन धर्मीयांचा चित्रकलेने योगदान दिल्याचे आढळते.

### ८) राजकीय क्षेत्रातील योगदान :

राजकीय क्षेत्रात जैन धर्माचा फार मोठा प्रभाव पडला. जैन धर्माचा अंहिसा या सिद्धांताच्या प्रभावामुळे जनतेने युद्धाचा त्याग करुन शांततापूर्ण जीवन जगण्यास प्रारंभ केला. मगधचा राजा अज्ञातशत्रू आणि नंद शासकाने जैन धर्माचा स्वीकार केल्याने ते युद्धापासुन परावृत्त झाले. याचा परिणाम असा झाला की भारताच्या शत्रूनी भारतावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. काही इतिहासकारांच्या मते अंहिसेमुळे भारताचा पराभव झालेला नाही. भारताच्या पराभवासाठी इतर अनेक कारणे कारणीभूत आहेत.

### ९) भाषा विकासाला प्रोत्साहन :

जैन धर्मामुळे भाषेच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले. जैन अनुयायांनी विभिन्न कालखंडात विभिन्न भाषेत ग्रंथ लिहिले. संस्कृत प्राकृत आणि अपभ्रंश भाषेत काही ग्रंथ लिहिण्यात आले. त्यापासुन पुढे कालांतराने मराठी, हिंदी व गुजराती भाषेचा जन्म झाला. जैन अनुयायांनी कन्नड, तामीळ व तेलगू या दक्षिणी भारतीय भाषांच्या विकासातही महान योगदान दिलेले आहे.

## ४.८ बौध्द धर्माच्या उदयाची कारणे

इ.स.पूर्व ६ व्या शतकात १६ महाजनाची सत्ता होती. हा कालखंड आध्यात्मिक, पारमार्थिक, वैचारिक, आणि चिंतनाचा होता. सामाजिक, धार्मिक जीवनात ज्या वेगवेगळया घटना घडल्या त्यामधून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

**१) ब्राम्हण व पुरोहितांचे वर्चस्व -** ब्राम्हण कालखंडापासून समाजात सर्व क्षेत्रात विशेषता धार्मिक क्षेत्रात ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी वाढली. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सर्व धार्मिक विधी व संस्कार ब्राम्हणामार्फतच केले जात. त्यामुळे ब्राम्हणाचे वर्चस्व वाढले. समाजाला ज्ञान व योग्य मार्गदर्शन करण्यास अज्ञानी ब्राम्हण असमर्थ ठरला त्यामुळे समाजाचा त्यांच्यावरील विश्वास कमी झाला. या परिस्थितीतून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

**२) यज्ञ संस्थेचे प्राबल्य :-** परमेश्वराची कृपा संपादन करण्याचे साधन म्हणजे यज्ञ होय. ऋग्वेदकाळात आर्यांनी निसर्ग देवतांची कृपा प्राप्त करण्यासाठी सज्ञ करत असे. या काळात व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार व शक्तीनुसार स्वतःच यज्ञ करत असे. ब्राम्हण काळात देवदेवताना संतुष्ट करण्यासाठी पशु किंवा प्राण्यांची आहुती देण्यास प्रारंभ झाला. धार्मिक जीवनात गुंतागुंतीच्या धार्मिक रुढ परंपरा निर्माण झाल्याने ब्राम्हण वर्गाचे महत्व वाढते. त्यामुळे समाज सर्व परिश्थितीला कंटाळलेला होता.

**३) आर्य-अनार्य यांच्यातील वैचारिक संघर्ष -** इ.स.पूर्व ६ व्या शतकातील धार्मिक क्रांतीचे प्रमुख कारण म्हणजे आर्य-अनार्य यांच्यातील वैचारिक संघर्ष होय. आर्यांची संस्कृती जेवढी प्रवृत्तिमार्गी होती तेवढीच अनार्याची संस्कृती निवृत्तीमार्गी होती. अनार्य संस्कृतीच्या संसार-त्याग, वैराग्य, आणि काया-क्लेश इ. विचारांना आर्यसंस्कृतीमध्ये महत्व नव्हते. आर्य-अनार्य यांच्यातील जातीय संघर्षाने सांस्कृतिक संघर्षाचे स्वरुप धारण केले. या संघर्षाचे प्रमुख केंद्र भगध होते. या संघर्षातून बौध्द व जैन धर्माच्या रुपाने ब्राम्हण धर्माविरुध्द क्रांती झाली. त्यातून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

**४) वेदवादला विरोध -** भारताचा प्रथम ग्रंथ वेद असून तो अपौरुषेय आहे. प्रत्यक्ष ब्रम्हदेवाच्या मुखातील वचने असल्याने वेदावर भारतीयांची अटळ श्रध्दा व विश्वास आहे. सामाजिक, धार्मिक प्रश्नांचे समाधान करण्याचा प्रमुख ग्रंथ म्हणून वेदाचा स्विकार केलेला आहे. बुध्दीवादी लेकांच्या विचारात क्रांती उत्पन्न झाली. त्यामुळे धार्मिक क्षोत्रात असंतोष निर्माण झाला. त्यातून नवीन धर्म उदयाला आला.

**५) वैदिक वाङमयाची क्लिष्टता -** त्या काळात सर्वसामान्याची भाषा प्राकृत होती. वैदिक वाङमयातील सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याने त्यातील ज्ञान आत्मसात करणे सामान्याला शक्य नव्हते. उपनिषदात विश्वनिर्मिती, ब्रम्हतत्त्व, आत्मतत्व, मोक्षावस्या इ. फ्रश्नांची चर्चा केलेली होती. या ज्ञानाचा सामान्याला उपयोग नव्हता. धर्माचे तत्वज्ञान साध्या, सोप्या भाषेत सांगितले जावे अशी लोकांची मागणी होती.

**६) जाती संस्थेचे स्वरुप** - ऋग्वेदकाळात गुणकर्मावर आधारित वर्णाश्रम व्यवस्था निर्माण झाली. त्यानुसार ब्राम्हण,क्षत्रिय, वैश्य व शुद्र हे समाजात चार वर्ण होते. पहिल्या तीन वर्णामध्ये वर्ग बदलता येत असे, रोटीबेटी व्यवहार चालत असे. उत्तरवैदिक काळात जातीय व्यवस्था ताठर बनली. **जन्मानुसार** वर्ण ठरु लागला. समाजात वरिष्ठाकडून कनिष्ठांची पिळवणूक होऊ लागली त्यामुळे जाती विरहित धर्म निर्माण व्हावा असे सामान्य जनतेला वाटू लागले.

**७) मंत्रावरील अढळ विश्वास** - ब्राम्हण काळात कर्मकांडाबरोबरच मंत्र-तंत्राचा महत्व प्रपत झाले. मंत्रामध्ये दैवीशक्ती आहे की,जी अनेक दुखःद घटना दुर करुन जीवनात आनंद निर्माण करुन देते. त्यामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मंत्राचा प्रभाव आहे असे लोकांना वाटत होते. बुध्दीवादी लोकांनी मंत्र-तंत्रावर टिका केल्या. साधा, सोपा धर्माची कल्पना मांडली.

**८) विकृत देववाद** - वैदिक काळात आर्याने मानवी जीवन नियंत्रित करणाऱ्या प्रत्येक शक्तीला देवताचे रुप दिले. त्या देवताबरोबर मैत्रीचे संबंध कायमचे ठेवले. कारण देवता त्यांची शुभ चिन्तक आणि हितैषी होती. परंतु ब्राम्हणकाळात या विचारायचे बदल झाला. देवतांची संकल्पना मानवी रुपात होऊ लागली. परमेश्वर हा स्वेच्छाचारी, निरंकुश असून माणसाने त्याचा दया कृपापात्र बनून राहिले पाहिजे असा विचार निर्माण झाली, त्यामुळे विचारवंतांच्यात असंतोष निर्माण झाला.

**९) उपनिषद तत्वज्ञानाचा प्रसार** - प्रचलित ब्राम्हण धर्मातून विचारवंताना आत्मशांती मिळाली नाही. आत्मशांतीचा नवा मार्ग उपनिषद तत्वज्ञानाने दाखवला. तप व चिंतनाचे महत्व वाढले. ब्राम्हण कालीन धर्मविधी ऐवजी त्यागी, समर्पित जीवनामुळे तप व चिंतन याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यातून नवीन धर्म उदयाला आला.

**१०) लोकभाषेचा उपयोग** - नव्या धर्मपंथाने आपले विचार, तत्वे लोकभाषेत म्हणजे अर्धमागधी व पाली भाषेत मांडले. त्यांची तत्वे लोकांना समजली. त्यामुळे नव्या धर्मांचा उदय झाला.

**११) राजकीय परिस्थिती** - इ.स.पूर्व ६ व्या शतकामध्ये राजकीय परिस्थिती पुढील प्रमाणे होती. भारतामध्ये अनेक छोटी राज्य असून राजकीय दृष्या दुर्बल होती. या राज्यामध्ये लोकशाही व राजेशाही प्रशासन होते. त्याच्या साम्रज्यवादी प्रवृत्ती असून आपल्या शेजारील राज्यावर हल्ला करुन विजय प्राप्त करणे. परंतु कोणतीही शक्तीशाली प्रशासन आणि जनतेमध्ये ऐक्याची भावना निर्माण केलेली नाही. त्यामुळे भारतात एकसंघ राज्य निर्माण झाले नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माच्या उदयाची कारणे सांगा.

___

___

___

___

___

## ४.१ गौतम बुध्दाचे जीवन (LIFE OF GAUTAM BUDDHA)

इ.स.पू ६ व्या शतकात वेद प्रभावाचा अधिकार नाकारुन आणि साध्या, सोप्या तत्वावर आधारित व लोकभाषेत प्रचार केलेला बौध्दधर्माची स्थापना झाली. बौध्द धर्माचा **संस्थापक** भगवान गौतम बुध्द होय.

**१) गौतम बुध्दाचे घराणे व जन्म:-** कपिल वस्तू येथील **शाक्य वंशीय** राजा शुध्दोदन हे **क्षत्रिय** असून ते शाक्य गणराज्याचे प्रमुख होते. शुध्दोदकाची पत्नी **कोलिय** गणराज्याची राजकुमारी मायादेवी होती. शुध्दोदन व मायादेवी यांच्या पोटी सिध्दार्थ गौतमचा जन्म झाला. त्याचे **जन्मनाव**-सिध्दार्थ, **गोत्रनाम.** गौतम आणि आध्यात्मिक नाव बुध्द याने प्रसिध्द आहेत. मायावती प्रसुतीसाठी माहेरी जात असताना वाटेत नेपाळमध्ये **रोहिणी** नदीच्या काठी लुंबिनी (तिलौराकोट) या गावी शालावृक्षाखाली सिध्दार्थाचा जन्म इ.स.पूर्व ५६३ मध्ये झाला. तो दिवस **वैशाख पौणिमेचा** होता. बुध्दाच्या जन्मस्थाना संदर्भात रुम्मीदरुचा अशोकात शिलालेख, ह्युयुनत्संगचा वृतांत यातून माहिती मिळते. मायावती पुत्रजन्मानंतर सात दिवसांनी मरण पावली. बाल सिध्दार्थनचे संगोपन त्याची मावशी व सावत्र आई महाप्रजापरि गौतमी हिने केले. गौतमीने सिध्दार्थाचा संभाळ केल्याने गौतम या नावाने ओळखला जाऊ लागला. राजपुत्राला शोभेल असे सर्व प्रकारचे शिक्षण दिले. **ललित विस्तारातील** दंतकथेनुसार सिध्दार्थ **धनुर्विद्येत** प्रवीण होता असे कळते.

**२) वैवाहिक जीवन:-** गौतमाच्या जन्माआधी मायावतीला स्वप्न पडले की, कमळ तोंडात धरलेला पांढरा शुभ्र हत्ती आपल्या शरीरात प्रवेश करत आहे. सावरुन ज्योतिषांनी असे भविष्य सांगितले की, राजपुत्र चक्रवर्ती सम्राट बनेल किंवा महान संन्याशी बनेल. ापला मुलगा संन्याशी बनू नये यासाठी शुध्दोदनने सर्व प्रकारच्या सुखाची काळजी घेतली. वयाच्या १६ व्या वर्षी गौतमाचे लग्न **दंडपाणी** यांची अतिशय सुंदर कन्या **यशोधरा** हिच्याशी झाले. तिच्यापासून **राहूल** नावाचा पुत्र झाला.

**३) संसारत्याग :** रोहिणी नदी ही शाक्य व कोलीय या दोन राज्यांची सीमा होती. या दोन्ही राज्यांतील लोक या नदीचे पाणी शेतीसाठी घेत असत. या नदीचे पाणी प्रथम कोणी व किती घ्यावे याबाबत प्रत्येक सुगीच्या हंगामात त्यांचा वाद होत असे. सिद्धार्थ गौतम संघाचा सभासद झाल्यापासून आठव्या वर्षी शाक्य व कोलीयांच्या सेवकांत नदीच्या पाण्यावरुन मोठा संघर्ष झाला. तेव्हा हा प्रश्न आता युद्ध करुनच कायमचा निकालात काढावा असा विचार शाक्य व कोलीय यांनी केला. त्यासाठी शाक्यांच्या सेनापतीने शाक्य संघाचे अधिवेशन बोलाविले व कोली यांना कायमचा धडा शिकविण्यासाठी संघाने कोलीया विरुद्ध युद्ध पुकारावे असा ठराव मांडला परंतु सिद्धार्थाने या ठरावास विरोध करुन पुढील सूचना केली.

"युद्धाने कोणताही प्रश्न सुटत नाही किंवा आपला हेतू साध्य होत नाही. त्यामुळे दुसऱ्या युद्धीचे बीजे रोवली जातील, जो दुसऱ्याची हत्या करतो त्यास त्याची हत्या करणारा दुसरा भेटतो. संघाने युद्ध करण्याची घाई करु नये. प्रथम दोष कुणाचा आहे याची चौकशी करावी. शाक्यातील दोन व कोलीयातील दोन अशी चार माणसे प्रथम निवडावीत आणि या चार माणसांनी

मिळून पाचवा मनुष्य निवडावा व या पाच माणसांनी हे भांडण मिटवावे. वैराने वैर शमत नाही तर वैरावर प्रेमानेच मात करता येते."

सिद्धार्थाची सूचना बहुमताने अमान्य झाली तर सेनापतीचा प्रस्ताव बहुमताने पास झाला. दुसऱ्या दिवशी संघाची दुसरी सभा बोलाविली व त्यामध्ये कोलायाशी युद्ध करण्यासाठी २० ते २५ वर्षे वयाच्या प्रत्येक शाक्य तरुणाने सैन्यात दाखल व्हावे, अशी घोषणा करण्यासाठी संघाने परवानगी घ्यावी असा ठराव सेनापतीने मांडला. या ठरावालाही केवळ सिद्धार्थानेच निर्माण केला. या वेळी सिद्धार्थ म्हणाला, "मित्र हो! तुम्हाला जे वाटेल ते तुम्ही करा. तुमच्या बाजुस बहुमत आहे. पण मला खेदाने म्हणावे लागत आहे की सैन्य भरतीच्या तुमच्या निर्णयास माझा विरोध आहे. मी तुमच्या सैन्यात दाखल होणार नाही व युद्धातही भाग घेणार नाही." यानंतर सेनापती सिद्धार्थला म्हणाले, बहुमताने घेतलेला संघाच्या निर्णयाचे तु पालन केलेच पाहिजे. नसता संघाच्या आज्ञेचा भंग केला म्हणून संघ तुला देहांताची किंवा देहत्यागाची शिक्षा देऊ शकते. याशिवाय संघ तुझ्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकू शकेल व तुझ्या अनुमतीची आवश्यकता संघाला राहणार नाही. (कारण शाक्यांचे राज्य यावेळी कोसल राज्याचे मांडलिक राज्य होते) कोलीयांशी युद्ध करण्याच्या संघाच्या योजनेस विरोध करण्यामुळे दुष्परिणाम भोगावे लागतील याची सिद्धार्थाला जाणीव झाली. त्यासाठी त्याला पुढील तीन पर्यायांवर विचार करावा लागला.

१) शाक्य संघाच्या सैन्यात दाखल होऊन कोलीयांविरुद्धच्या युद्धात सहभागी होतो.
२) देहान्त शासनाला किंवा देश त्यागाला संमती देवो.
३) आपल्या कुटुंबियावर सामाजिक बहिष्कार ओढवून घेणे आणि त्यांच्या मालमत्तेची जप्ती होऊ देण्यास तयार होणे.

सिद्धार्थाने पहिला पर्याय न स्विकारण्याचा निर्धार केला. तिसरा पर्याय असह्य होता. त्यामुळे त्याला दुसरा पर्याय योग्य वाटला. त्यानुसार तो संघाला म्हणाला, "माझ्या कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांना दुःख देऊ नका. त्यांच्या उपजीविकेचे साधन असलेली शेती जप्त करुन त्यांची उपासमार करु नका. ते निरपराध आहेत. मीच अपराधी आहे. माझ्या अपराधाची शिक्षा मला एकट्यालाच भोगू द्या. मला देहांताची किंवा देशत्यागाची यांपैकी तुम्हाला जी योग्य वाटेल ती शिक्षा द्या. मी ती खुशीने स्विकारीन. मी याविषयी कोयल राज्याच्या राजाकडे मुळीच याचना करणार नाही याचे मी आपणास वचन देतो" पण शाक्य संघाच्या सेनापतीने सिद्धार्थाचे म्हणणे अमान्य केले. कारण सिद्धार्थ स्वेच्छेने देशत्याग किंवा देहातांची शिक्षा भोगण्यास तयार झाले असले तरी कोसलाधिपती ही शिक्षा संघानेच दिली असा निष्कर्ष काढील. तो त्याचा जाब संघाला विचारील अशी भीती सेनापतीला वाटत होती. तेव्हा सिद्धार्थ पुन्हा सेनापतीला म्हणाला, "हीच जर अडचण असेल तर मी परिव्राजक होतो व हा देश हा मार्ग चांगला वाटला. पण सेनापती सिद्धार्थाला म्हणाला की, तुला आई-वडील आणि पत्नीच्या संमतीशिवाय परिवाजक कसे होता येईल? यावर सिद्धार्थ म्हणाला, त्यांची संमती मिळो न मिळो हा देश त्वरीत सोडून जाण्याचे मी तुम्हाला वचन देतो. यानंतर संघाने सिद्धार्थाने सुचविलेला हा मार्ग मान्य केला. शाक्य संघाच्या सभेत घडलेला वृत्तांत सिद्धार्थ घरी परतण्यापूर्वीच त्याच्या मात्यापित्यांना समजला. त्यामुळे ते दुःखी होणे साहजिक होते. सिद्धार्थाने देश त्याग करु नये यासाठी शुद्धोदन व महाप्रजापती गौतमीने केलेला प्रयत्न निष्फळ ठरला. यानंतर सिद्धार्थाने यशोधरेच्या महालात जाऊन तिला विचारले. परिव्रज्य घेण्याच्या माझ्या निश्चयाबद्दल तुला काय

वाटते? या प्रश्नाचे उत्तर देताना यशोधरा सिद्धार्थाला म्हणाला मी आपल्या जागी असते तर याशिवाय दुसरे काय करु शकले असते! आपला हा परिव्राजक होण्याचा निर्णय योग्य असून माझी आपल्या निर्णयास अनुमती व पाठिंबा आहे. मी सुद्धा आपल्या बरोबर परिव्रज्य घेतली असती. पण मला राहुलचे संगोपण करावयाचे असल्याने मी परिव्रज्या घेत नाही. आपण परिव्राजक झाले नसते तर बरे झाले असते. परंतु आपण शूर व धाडसी बनुन परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे. आपण आपल्या आई-वडीलांची व राहुलची अजिबात चिंता करु नका. माझ्या शरीरात प्राण असेपर्यंत मी त्याची देखभाल व मानवजातीला कल्याणकारी अशी शुर, धैर्यवान व उदात्त मनाची पत्नी लाभल्याबद्दल आपण किती भाग्यवान आहोत व अशा महान पत्नीचा व आपला वियोग देवाने कसा घडवून आणला याची त्याला प्रथमच जाणीव झाली. यानंतर त्यांने राहूलकडे पाहिले व तो घराबाहेर पडला. या घटनेला बौद्ध साहित्यात 'महाष्क्रिमण' म्हणतात."

**४) ज्ञानप्राप्ती** - आत्म्याच्या साधनासाठी गुरुच्या शोधात अनेक ठिकाणी भटकत राहिला. वैशालीच्या **आडार कलाम** या आचार्याकडून ज्ञान मार्गाचे तंत्र आत्मसात केले. त्यानंतर राजगृहाजवळ **उदक रामपुत्र** या आचार्याकडून ध्यानविधीचे ज्ञान प्रप्त केले. त्यानंतर मगध (गया) येथील उरुवेल येथील निरंजना नदीकाठी अश्वत्थ वृक्षाखाली हटयोगाच्या तपश्चर्येस प्रारंभ केला. सात आठवडे ज्ञानप्रप्तीसाठी समास्यि बसला. कठोर परिश्रमातून **वैशाखपौणिमेला** ज्ञानप्रप्त झाले. तेव्हापासून सिध्दार्थाला **बुध्द** म्हणजे ज्ञाता, असे ओळखले जाऊ लागले. या ज्ञानास **संबोधी** असे नाव असून ज्ञानप्राप्ती झालेल्या अशोकाच्या वृक्षाला **बोधीवृक्ष** असे संबोधले जाते.

**५) धर्मप्रसार व महापरिनिर्वाण–** आपणाला ज्ञानप्राप्त झाले त्याचा प्रसार करण्याच्या कार्याला प्रारंभ केला.यासाठी तो प्रथम आडार कलाम व उदक रामपुत्र यांच्याकडे गेला परंतु ते मरण पावले होते. त्यानंतर तो वाराणसी येथे (सारनाथ) येथील हरिणांच्या वनात पाच भिक्षूना आपले **पहिले प्रवचन** दिले त्याला **धम्मचक्रप्रवर्तन** असे म्हणतात. तर पाच भिक्षू **पंचवर्गीय** म्हणून प्रसिध्द आहेत. गौतम बुध्द काशीला गेला तेव्हा **बौध्द संघाची** स्थापना केली. राजगृह येथील सारिपुत्र, मौद्रल्यायन, कपिलवस्तू येथे राहूल व त्याची आई गौतमी (पहिली स्त्री धर्म स्विकारणारी) धर्म स्विकारला त्याचप्रमाणे मगध, अंग, कोसळ इ राज्यातील अनेक लोकांनी बौध्द धम स्विकारला. धर्मप्रसाराचे कार्य करत णसताना वयाच्या ८० व्या वर्षी मल्लाची राजधानी कुशिनारा येथे इ.स.पूर्व ४८७ मध्ये मृत्यू झाला या घटनेला **महापरिनिर्वाण** असे म्हणतात.

## ४.१० गौतम बुद्धाचे तत्वज्ञान

बुध्दाच्या शिकवणीची माहिती पाली भाषेतील सुत्तपिटक या ग्रंथातून मिळते. मानवी जीवनाची दुःखातून सुटका करणे हाच प्रमुख हेतू होता. यासाठी त्यांनी चार तत्व सांगितली. त्यांना चार आर्य सत्य असे म्हणतात.

**१) चार आर्यसत्य - १) दुःख** - जगात सर्वत्र दुःखाचेच अधिराज्य आहे. जन्म, व्याधी, बुध्दत्व, विरह, मृत्यू, अनिष्ट प्राप्ती, इष्ट विनाश ही दुःखाची कारणे आहेत. सुख हे क्षणभंगूर असते पण दुःख दीर्घकाळ असते.

**२) दुःखाचे कारण** -दुःख जीवनापासून विभक्त नाही. जीवनाचाच तो एकभाग आहे. दुःखाचे मुळ कारण म्हणजे तृष्णा होय. तृष्णा तीन प्रकारची म्हणजे इंद्रिय सुखाची कामतृष्णा, जगाचा मोह म्हणजे भवतृष्णा वैभवाची आकांक्षा म्हणजे वैभव तृष्णा. या तीन प्रकारच्या तृष्णाला त्रिविध म्हणतात.

**३) दुःख निरोध** - दुःखापासून सुटका करुन घेणे कठीण असले तरी अशक्य नाही. तृष्णा नष्ट केल्यास दुःखसुध्दा नष्ट होते. तेव्हा मानव अनंत आत्मसुखाचा उपयोग होऊ शकतो.

**४) दुःख निरोधाचा मार्ग** - आत्यंतिक भोगवाद व त्यागवादाने दुःखाचा शेवट होत नाही तर अज्ञान व तृष्णेचा नाश केल्यास दुःखाचा नाश होतो. यासाठी अत्यंगमार्ग सांगितलेला आहे.

**२) अष्टांग मार्ग/मध्यप्रतिपदामार्ग/मध्यममार्ग -**

बुध्दाचा पहिला संदेश म्हणजे सारनाथ येथे 'धर्मचक्रपरिवर्तन' चा विषयाचे विवेचन होय. तेथेच त्याने अष्टांगमार्ग सांगितला. अष्टांगमार्ग म्हणजे **बौध्दधर्माचे सार** होय. (अष्टांगमार्गातील आठ अवस्था पुढीलप्रमाणे )

१) **सम्यक् दृष्टि** - चार आर्यसत्याचे सर्वांगीण ज्ञान म्हणजे सम्यकदृष्टि होय.

२) **सम्यक् संकल्प** - कोणत्याही फलाची अपेक्षा न करता सत्यदृष्टिनुसार जीवन सुधारण्याचा निर्धार करणे. यासाठी राग, लोभ ऐश्वर्य, सत्ता, कामोपभोग याबद्दल तृष्णा नष्ट झाली पाहिजे.

३) **सम्यक् वाक्/वाणी** - कोणीही दुःखी होणार नाही अशी आपली वाणी असावी. नेहमी सत्यवचनी, मृदुभाषी, मितभाषी असावे. परनिंदा, चहाडी, शिवीगाळ असल बोलू नये.

४) **सम्यक् कर्म** - हिंसा, चोरी, व्यभिचार इ.कर्मापासून दुर रहावे. मनुष्याने सत्य कर्म करावे.

५) **सम्यक् आजीव** - नितीमार्गाने मिळवलेल्या संपत्तीवर उदर निर्वाह करावा. अप्रामाणिकपणे व लाचारीच्या मार्गाने काहीही मिळवू नये.

६) **सम्यक् व्यायाम** - मनांतील दुष्ट भावनांचे दमन करुन आध्यात्मिक व भौतिक उन्नतीसाठी सुविचार व सद,विचारांची जोपासना करावी.

७) **सम्यक् स्मृती** - जगातील सुख, सत्ता, प्रसिध्दी हे सर्व नाशवंत आहेत. याची जाणीव ठेऊन त्यापासून दुर रहाते.

८) **सम्यक् समाधी** - मनाची एकाग्रता वाढवल्यास निर्वाणपद प्राप्त होते. वरील अष्टांगमार्गाचा अवलंब केल्यास दुःखाचे निरोधन होऊन मोक्ष अथवा निर्वाणपद प्राप्त होते.

**३) बुध्दधर्मातील त्रिरत्ने** -अष्टांगमार्गाचा सार म्हणजे प्रज्ञा, करुणा, शील ही बुध्द धर्मातील त्रिरत्ने होय. **प्रज्ञेमुळे** मिथ्यादृष्टिचा नाश होतो. **शील** म्हणजे सर्व पापापासून निवृत्त होऊन शुध्दचरित्र होय. **करुणा** म्हणजे दुःखिताबद्दल दया, कळवळा निर्माण होतो. प्रज्ञा करुणा, शील हे बुध्द धर्माचे **आधारस्तंभ** आहेत.

**४) ब्रम्हा विहार/चित्तशुध्दीचे उपाय -** गौतम बुध्दाने नैतिक व दैनंदिन जीवनातील सदाचाराच्या शिकवणीकीबरोबर चित्त शुध्दीचे चार उपाय सांगितले आहेत. त्याला **ब्रम्हविहार** असे म्हणतात. मैत्री, करुणा,मुदिता व उपेक्षा हे **चार उपाय** होय. प्राणीमात्रा बद्दल प्रेम बाळगणे म्हणजे **मैत्री** होय. दुसऱ्याचे दु:ख पाहून स्वतः दु:खी होणे म्हणजे **करुणा** होय. दुसऱ्याच्या सुखात, आनंदात स्वतः समाधानी होणे म्हणजे **मुदिता** होय. कर्माप्रमाणे सुखदु:खाची निर्मिती होणे याची जाणीव ठेवणे म्हणजे **उपेक्षा** होय. ब्रम्हाविहारामुळे ज्ञान व सद्‌गती प्राप्त होते.

**५) पंचशील तत्वे/सदाचार -** गौतमाने आपल्या पवित्र व उदात्त चारित्र्याने लोकांपुढे काही नैतिक आदर्श ठेवले होते. अनुयायांच्या मार्गदर्शनासाठी जे नैतिक नियम घालून दिले त्यास पंचशील तत्वे म्हणतात. ते पुढीलप्रमाणे.

**१) अहिंसा** - कोणत्याही जीवमात्रास ठार करु नये.
**२) सत्य** - नेहमी सत्य बोलावे.
**३) अस्तेय** - गरजेपुरतेच साहित्य ठेवावे.
**४) ब्रम्हचर्य** - व्यभिचार करु नये.
**५) अपरिग्रह** - मादक द्रव्यांचे सेवन करता कामा नये.

**१) दहाशील आणि नैतिक आचरण :**

गौतम बुद्धांनी एका नवीन जीवन पद्धतीचा पुरस्कार केला. दहा शील मार्गाचे आचरण केल्यास मनुष्याची जन्म-मरणाच्या बंधनातून सुटका होते व तो 'निर्वाण' प्राप्ती करु शकतो. यासाठी खालील दहाशील मार्ग सांगितले आहेत.

१) अहिंसा - कोणत्याही प्राण्याची व जीवाची हिंसा न करणे.
२) अस्तेय - चोरी न करणे.
३) सत्य - असत्य संभाषण न करणे. नेहमी सत्याचीच कास धरण.
४) अपरिग्रह - मादक पदार्थ, द्रव्ये न घेणे.
५) ब्रह्मचर्य - व्यभिचार न करणे व अपवित्र गोष्टी पासून दूर राहणे.
६) सुंगधी द्रव्य वापरु नयेत पुष्पमाला घालू नयेत.
७) नृत्य गायनाचा त्याग करणे.
८) अवेळी जेवण करु नये.
९) जमिनीवर अंथरलेल्या चटईवर झोपावे. कोमल गादीच्या वापर करु नये.
१०) कामिनी व कंचन यांचा त्याग करणे.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माचे तत्त्वज्ञान सांगा.

________________________________

________________________________

________________________________

________________________________

## ४.११ बौद्ध धर्माचे पंथ

गौतमबुध्दाच्या परिनिर्वाणानंतर दोनशे वर्षातच भिक्षूंच्या मतभेद होऊन बौध्दसंघात अनेक गट किंवा पंथ निर्माण झाले. सम्राट अशोकाच्या काळापर्यंत १८ पंथ निर्माण झाल्याचा उल्लेख मिळतो. या काळात स्थविरवादी, काश्यपीय, महीशाष्टक, महासांघिक, सर्वास्तिवादी, हैमावत, माध्यमिक, बहुश्रूतीय, वात्सीपुत्रीय, योगाचार, धर्मगुप्तिक, सौत्रांतिक, चैत्यक इ पंथ असण्याची माहिती मिळते. हीनायान व महायान हे दोन अतिशय महत्वाचे पंथ होते.

**हिनयान व महायान पंथातील फरक :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | हा पंथ सनातनी कर्मठ व संन्यासमार्गी पंथ आहे. | १) | हा पंथ सुधारक, उदार व भक्ति मार्गी आहे. |
| २) | सर्वसंगपरित्याग करुन स्वप्रयत्नाने निर्वाणासाठी झटणारा अर्हंत हा हीनयानांचा आदर्श आहे. | २) | संसारात राहूनही सर्वभूतहितार्थ झटणारा बोधिसत्व हा महायानाचा आदर्श आहे. |
| ३) | हीनयानाचा आत्मक्लेशवर भर आहे. | ३) | भक्ती हे महायानाचे साधन आहे. |
| ४) | गौतम हा मृत धर्मगुरु आहे. प्रत्येकास बुद्धत्व प्राप्त होत नाही असे हीनयान मानतो. | ४) | गौतम बुद्ध ही अमर दैवी विभूती असून प्राणिमात्राला बुद्धत्व प्राप्त होते असे महायान पंथ मानतो. |
| ५) | पाली ही हीनयान पंथाची भाषा आहे. | ५) | संस्कृत ही महायान पंथाची भाषा आहे. |
| ६) | स्वप्रयत्नाने याच जन्मी निर्वाण प्राप्त करुन घ्यावे असे हीनयान सांगतो निर्वाण प्राप्ती मनुष्याच्या कर्मावर अवलंबून आहे. | ६) | स्वर्ग हे या जन्मीचे ध्येय असून हे क्रमशः प्राप्त होते अशी महायानाची शिकवण आहे. |
| ७) | सिलोन, ब्रह्मदेश येथे हा पंथ आहे. | ७) | तिबेट, चीन, मध्य व पूर्व आशियात हा पंथ आहे. |
| ८) | स्तूप, चैत्य व प्रतीकोपासना हीनयानास संमत आहे. पण बुद्धाची ईश्वराच्या स्वरुपात उपासना या पंथास मान्य नाही. | ८) | बुद्धावतार बोधिसत्व व बौद्ध मूर्तिपूजा हा पंथ शिकवतो. अवतारी गौतमाच्या जीवनाशी संबंधित असलेली स्थळे ही या धर्माची तीर्थक्षेत्रे आहे. |
| ९) | या संप्रदायाच्या अनुयायंची संख्या कमी आहे. | ९) | या संप्रदायाच्या अनुयायांची संख्या जास्त आहे. |
| १०) | आष्टांग मार्ग, पंचशील यावर श्रद्धा आहे. | १०) | श्रद्धा, भक्ती समर्पण, मूर्तिपूजा यावर भर |
| ११) | बौद्ध धर्मपरिषदांनी वेळोवेळी बौद्ध धर्मात घडवून आणलेले परिवर्तन हीनयानास मान्य नव्हते. | ११) | बौद्ध धर्मपरिषंदानी बौद्ध धर्मात घडवून आणलेले परिवर्तन महायानास मान्य आहे. |

**आपली प्रगती तपासा**

१. बौद्ध धर्माचे पंथ हिनयान व महायान यातील फरक लिहा.

## ४.१२ बौध्द धर्माच्या प्रसाराची कारणे

**१) धर्मस्थापनेवेळची अनुकूल परिस्थिती -** भारतामध्ये बुध्द धर्म स्थापन्यास अत्यंत अनुकूल परिस्थिती होती. हिंदुधर्मामध्ये अनिष्ट रुढी, परंपरा व यज्ञ याचे फार महत्व वाढले होते. त्यामुळे सामान्य जनता अतिशय नाराज होती. त्यांना हिंदूधर्मात बदल किंवा नविन विचार अपेक्षीत होते ते बौध्दधर्माच्या रुपाने मिळाले म्हणूनच धर्माचा प्रसार झाला.

**२) गौतम बुध्दाचे आदर्श प्रभावी व्यक्तीमत्व -** गौतम बुध्द राजघराण्यातील असूनही सामान्य दुःखापासून मुक्त करण्यासाठी सर्व सुख, ऐश्वर्य यांचा त्याग केला. तसेच प्रसन्न व्यक्तीमत्व, अघोम वक्तृत्व, अलौकिक त्याग, प्रखर बुध्दिमत्ता, शांत व हसतमुख स्वभाव, जनहिताची तळमळ या गुणांचा सामान्यावर परिणाम होऊन त्यांना अनेक अनुयायी मिळाले.

**३) साधी शिकवण -**गौतम बुध्दाची शिकवण साधी व सरळ व सामान्याला सहज समजू शकेल अशी सोपी होती. सदाचार, नीतीमत्ता यावर धर्म आधारलेला होता. सत्कर्म केल्यास फळही चांगले मिळते. स्वर्ग, नरक, देवदेवता, मूर्तीपूजा,यज्ञ,संस्कार इ.आचार व विचारांना स्थान नव्हते म्हणून लोकप्रिय झाली.

**४) लोकभाषेत शिकवण -** गौतम बुध्दाने धर्मप्रसारासाठी पाली, प्रकृत या लोकभाषेचा उपयोग केला. त्याच भाषेत वाङमयाची निर्मिती करुन सामान्य जनतेपर्यंत आपले तत्वज्ञान पोहचवले. ह्याचा अधिक परिणाम झाला.

**५) राजाध्यक्ष -** गौतम बुध्द स्वतः राजघराण्यातील असल्याने अनेक घराण्याची संबंध होता. शुध्दोधन, बिंबिसार तसेच शासनातील श्रेष्ठ अधिकारी, मांडलिक राजे यांनी बौध्द धर्म स्विकारला. बुध्दाच्या महानिर्वाणानंतर सम्राट अशोक, मिलिंद, कनिष्क, हर्षवर्धन इ.राजांनी बौध्द धर्म स्विकारुन धर्माला राजाश्रय दिला. त्यांनी धर्मप्रसारासाठी विविध उपाय योजना केल्या. त्यामुळे धर्माचा प्रसार झाला.

**६) समानतेच्या तत्वाची वागणूक** -वैदिक धर्मात जन्मावर आधारलेली जातीय व्यवस्था होती. सामाजात वरिष्ठ व कनिष्ठ अशी विषमता होती. बौध्द धर्माने कोणताही भेदभाव न करता

सर्वांना आपल्या धर्माचे दरवाजे खुले ठेवले. सर्वांनाच प्रेमाची, समानतेची, सन्मानाची वागणूक दिली. त्यामुळे जनतेने त्यांना पाठिंबा दिला परिणामी धर्माचा प्रसार झाला.

**७) बौध्द संघाची कामगिरी** - गौतम बुध्दाने धर्मप्रसारासाठी प्रचारकांची जी संघटना केली त्यास बौध्द संघ म्हणतात. धर्मसंघात सर्वसंग परित्याग केलेले भिक्षू व भिक्षूणीचा समावेश होता. त्यांची आदर्श वागणूक, त्यागी, विव्दान इ त्याच प्रमाणे ते सामान्य लोकांच्यात मिसळत असे. विहार हे मांगल्याची व त्यागाची स्फूर्तिस्थाने असून लेकशिक्षणाचे कार्य करीत असे. त्यामुळे धर्माचा प्रसार झाला.

**८) बौध्दधर्मातील लवचिकता** - बौध्दसंघातील पंडित, आचार्य, भिक्षूंनी धर्माचा प्रसार करताना काळानुसार व गरजेनुसार योग्य तो धर्मात बदल केले. धर्मप्रसार करताना कोणी टिका, निंदा केली. प्रसंगी मार दिला तरीही त्याला प्रतिकार केला नाही. त्यामुळे भारत व परदेशात धर्माचा प्रसार झाला.

## ४.१३ बौध्द धर्माच्या ऱ्हासाची कारणे (CAUSES OF THE DELLINE OF BUDDHISM)

भारतात ७ व्या शतकात बौध्दधर्माचा उदय झाला. त्याच्या प्रसाराची प्रक्रिया ही १३ व्या शतकापर्यंत सुरुच होती. भारताबरोबर जगातही धर्माचा प्रसार व लोकप्रियता मोठी होती. या धर्माच्या ऱ्हासाला विविध कारणे होती ती पुढीलप्रमाणे.

**१) राजाश्रयाचा अभाव** - मौर्यकाळात बौध्दधर्माला राजाश्रय प्राप्त झाल्याने त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. शुंग, गुप्त वाकाटक आणि त्यांचे समकालीन राजांनी शैव, वैष्णव इ पंथाचा स्विकार करुन हिंदुधर्माचा पुरस्कार केला. हर्षवर्धन व पाल राजा शिवाय इतर कोणीही बौध्दधर्माला उत्तेजन दिले नाही. त्यामुळे बौध्दधर्माचा ऱ्हास झाला.

**२) बौध्द धर्माच्या पंथातील मतभेद** - बौध्दधर्माची शिकवण साधी व सोपी असल्याने प्रसार झाला. धर्मातील आचार, तत्वज्ञान यावरुन मतभेद झाले. अनेक पंथ निर्माण झाले. त्यांच्यात वाद निर्माण होऊन त्यांची सर्वशक्ती खर्च झाली. महायान व हिनायान पंथाच्या वादामुळे ऱ्हासाला प्रारंभ झाला.

**३) वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन** - बौध्द धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याने वैदिक धर्माच्या विचारवंत व तत्ववेत्यांनी धर्माचे परीक्षण केले. त्यांनी जुन्या वैदिक धर्माचा कायापालट करुन अधिक सोपा, आकर्षक व सर्व संग्राहक बनवली. इ.स.८ व्या शतकात कुमारिलभट्ट व आद्य शंकराचार्य यांना उदार दृष्टिकोन स्विकारुन वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले. प्रचार कार्यक्रमातून टिका करुन एक प्रकारे धार्मिक क्रांती घडवून आली. त्यामुळे लोकप्रियता वाढली व बौध्द धर्माची पिछाहाट सुरु झाली.

**४) बौध्द संघ अंतर्गत भ्रष्ट** - प्रारंभीच्या काळात बौध्द संघ व भिक्षू विषयी अत्यंत आदर होता. **शाक्त पंथाच्या** सहवासाने संघात स्त्रियांना प्रवेश मिळाला. संघात वामाचार सुरु झाला. संघाला अनेकाकडून विपूल देणग्या मिळाल्या, त्यामुळे आळशी स्त्रीसंग विषयासक्त, व्यसनी जीवन बनले. अंतर्गत भ्रष्टतेमुळे धर्माचा ऱ्हास सुरु झाला.

**५) प्रभावी प्रचारकांचा अभाव** - गौतम बुध्दाच्या मृत्यूर्न्तर च्याच्या तोडीचा एकही प्रचारक झाला नाही. पूर्वीच्या नियमामध्ये शिथिलता आणण्याच्या विचारावरुन मतभेद सुरु झाले. ते मतभेद दूर करुन सर्वांना एकत्र आणण्याचे प्रभावी कार्य कोणीच केले नाही. धर्मप्रसाराचे प्रभावी कार्य करण्यासंदर्भात मार्गदर्शन ही केले नाही.

**६) परकीय आक्रमण** - इ.स ६ व्या शतकापासून भारतात हुण, अरब, तुर्क यांनी उत्तर भारतात आक्रमणे केली. च्यांनी अनेक बौध्द भिक्षूंना ठार मारले त्यांचे विहार, स्तूप नष्ट केले. त्यामुळे बौध्दधर्माचा नाश ओढवला.

**७) रजपूतांचा उदय** - हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर रजपूतांचा उदय झाला. कारण ते शूर व लढवय्ये होते. त्यांना बुध्दाने सांगितलेली अहिंसा मानवण्यासारखी नव्हती त्यामुळे रजपूतांचा उदय हा बौध्दधर्माच्या ऱ्हासाचे कारण होऊ शकते.

**८) बौध्द धर्माच्या मुळ तत्वात बदल** - बौध्द धर्माच्या प्रसाराच्या हेतूने महायान पंथाने मुळ तत्वात बदल केला. संस्कृत भाषा, मूर्तिपूजा, मंत्रतंत्र, श्रध्दा व भक्ति यांचा स्विकार केल्याने तो भक्तिपंथाच्या जवळचा बनला. महायान व वैष्णवपंथ यांच्यात फरक नाहीसा झाला. त्यामुळे बौध्दधर्माचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन तो हिंदूधर्माचा एक गट आहे अशी सामान्यांची धारणा झाली.

**९) बौध्दधर्मात निर्माण झालेले दोष** - गौतम बुध्दाच्या नंतर धर्माचे साधे स्वरुप नष्ट होऊन त्यात क्लिष्टता आली. बौध्द धर्मात ईश्वरी सत्तेविषयी निश्चित कल्पना नसल्यामुळे सामान्य जनता धर्मापासून दूर जाऊ लागली.

**१०) दुःखाचे तत्वज्ञान** - गौतम बुध्दाने आपल्या तत्वज्ञानात दुःखाविषयी विचार मांडला. जीवनात सर्वत्र दुःख आहे. सुखाचा लवलेश नाही. असा आभास उत्पन्न झाला. दुःखमय तत्वज्ञान दिर्घकाळ समाजाला मानवले नाही. जीवनात दुःख असले तरीही त्याच्यावर मात करुन सुखाचा मार्ग शोधला पाहिजे. असा विचार लोकांच्या समोर उदयाला आला. त्यामुळे बौध्द धर्माच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माच्या ऱ्हासाची कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ४.१४ बौध्द धर्माचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम (CAUSES OF THE DELLINE OF BUDDHISM)

भारतीय लोकांच्यावर बौद्धधर्माचा दिर्घकाळापासून प्रभाव होता. तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, साहित्य व स्थापत्य इ. क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्माचा प्रभाव होता.

**१) राजकीय क्षेत्रातील परिणाम** - प्राचीन काळात सम्राट अशोक, कनिष्क आणि हर्षवर्धन यासारख्या थोर सम्राटांनी बौद्धधर्माचा स्विकार केला. बौद्ध धर्माच्या सिद्धांतानुसार त्यांनी राज्यकारभार केला. लोकांच्या मनात अहिंसेबद्दल प्रेम निर्माण केले. अहिंसा, शांती व मानवी कल्याण हा संदेश राजकीय क्षेत्राला बौद्ध धर्माने दिला. अशोक, कनिष्क, हर्षवर्धन यांनी बौद्ध धर्म परिषद आयोजित केल्या. आज स्वतंत्र भारताचा राज्यकारभार व राजनिती तत्वाच्या आधारेच सुरु आहे.

**२) सामाजिक क्षेत्रातील परिणाम** - बौद्ध धर्माच्या उदयापूर्वी वैदिक धर्माचा प्रभाव समाजात होता. त्यामध्ये रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, यज्ञ, जातिप्रथा इ. महत्त्व होते. भारतीय समाजाला सर्वप्रथम समानतेचा संदेश बौद्ध धर्माने दिला, बौद्ध संघात सर्व जाती, धर्मातील स्त्री-पुरुष यांना प्रवेश दिला. समाजात समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बौद्ध संघामध्ये सर्वांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले होते. सर्व धर्म समावेशकतेचे व समानतेचे तत्व स्विकारुन लोकशाहीची बीजे रोवली. अहिंसा, सत्य, सदाचार, दुःख, शांती, क्षमा, संयम, लोकहित इ. आदर्श लोकांपुढे ठेवून भारतीयांची नैतिक पातळी उंचावण्याला मदत केली.

**३) भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार** - भारतीय संस्कृतीचा प्रसार बौद्ध धर्माने जगात केला. बौद्ध भिक्षू आणि सम्राट अशोक यांनी धर्माचा परदेशात प्रसार केला. सुमात्रा, जादा, सयाम, चीन, जपान, इंडोचायना, ब्रह्मदेश इ. देशात भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. त्यामुळे त्यांचे मैत्रीचे संबंध भारताबरोबर निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय जगात प्रेम शांतता, सुख, सहचर्य इ. गुणाची वाढ होण्यास बौद्धधर्माचे मोलाचे कार्य आहे.

**४) धार्मिक क्षेत्रातील परिणाम** - वैदिक धर्माच्या कट्टरते विरोधात बौद्ध धर्माचा उदय झाला. वैदिक धर्मातील कर्मकांड, यज्ञ आणि सामान्य लोकांना न समजणारे धर्म सिद्धांत होते. याउलट बौद्ध धर्माने साधे सोपे व सरळ तत्त्वज्ञान लोकांच्या समोर मांडले. महायान पंथाने गौतम बुद्धाला ईश्वरी अवतार मानून त्याची मूर्ती बनवण्याची परंपरा सुरु केली. त्याची पूजा ही सुर केली. परमेश्वराच्या आराधनेमध्ये नवी पद्धत सुरु झाली. ती म्हणजे मंदिर, मठ, विहार या धार्मिक स्थळांची निर्मिती झाली. वैदिक धर्मामध्ये यज्ञाला महत्व असल्याने ब्राह्मण, पुरोहित वर्गात महत्व वाढले. ते जनतेचे आर्थिक शोषण करत असे. बौद्ध धर्माने त्यांचे समाजातील उच्चस्थान नष्ट केले व सदाचार, शांती सुखी जीवन जगण्याची प्रेरणा दिली. धार्मिक शिक्षणाचे महत्व ओळखून नालंदा विद्यापीठाची स्थापना केली. धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून प्रश्नोत्तर व संवाद शैलीचा उपयोग बौद्धधर्माने केला. सर्व प्रथम धार्मिक संघाची बौद्धधर्माने केली. त्याचे अनुकरण इतर धर्माने ही केले. वैदिक धर्मात संन्यासी व धर्मपालक व्यक्ती एकान्त, चिंतन यासाठी वनाला महत्व देत होते. बौद्ध धर्माने धार्मिक संघाला महत्व दिले.

**५) बौद्ध धर्माचा कला क्षेत्रातील परिणाम** - गौतम बुद्धाचा संदेश लोकांच्यापर्यंत पोहचवण्याच्या हेतूने अनेक स्तंभाची निर्मिती करण्यात आली. बौद्ध भिक्षंच्या निवासासाठी, अध्यापन, चिंतन यासाठी जी वस्तीस्थाने निर्माण केली त्यास **विहार** असे म्हणतात. गौतम बुद्ध व महत्त्वाचे साधू यांच्या अस्थिवर स्मारक बांधले म्हणजे स्तूप होय. कुशिनगर, राजगृह, पावा, वैशाली, कपिलवस्तू इ. ठिकाणी गौतम बुद्धाच्या अस्थिवर स्तूप बांधल्याचा उल्लेख आहे. सांची व भारहुत, अमरावती येथील स्तूप कलेसाठी प्रसिद्ध आहेत. अशोकाने सारनाथ, कनिष्काने पुरुपपुर येथील स्तूप बांधला असावा. पुरुपपुरु हा गांधार शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे.

धार्मिक मूर्ती निर्माण करण्याची परंपरा सर्वप्रथम बौद्ध धर्माने सुरु केली. पाषाणाच्या, ब्राँझच्या अनेक मूर्ती भारतात व शेजारील देशात तयार करण्यात आल्या. गौतम बुद्ध व बोधिसत्वांच्या मूर्ती बनवल्या होत्या. सांची, भारहूत, गया, नागार्जून कोंडा व अमरावती येथे कलापूर्ण मूर्ती आहेत. सारनाथ येथील गुप्तकालीन बुद्धमूर्ती भारतीय मूर्तिकलेचे प्रतिक होय. बौद्ध भिक्षूंच्या तपस्येसाठी, ध्यानधारणेसाठी गुहा तयार केल्या जात त्यांना चैत्य म्हणतात. चैत्य कोरण्याचे कार्य दूसऱ्या शतकापासून सुरु आहे. पर्वत कोरुन कलाकृती निर्माण करणे त्याला लेणी म्हणतात. लेणीमधून गौतम बुद्धाच्या जीवनातील प्रसंग केरले आहेत. अजिंठा, वेरुळ, कार्ले, भाजे, एलिफंटा इ. लेण्या प्रसिद्ध आहेत.

चित्रकलेवर ही बौद्ध धर्माचा प्रभाव होता. पर्वत गुहा, मंदिराच्या भिंती यामधून चित्रकला आढळते. अजिंठा, वेरुळ, वाघ इ. गुंफा चित्रकलेसाठी प्रसिद्ध आहेत. बुद्धाचे जीवन, त्याचा धर्म, धर्मप्रसार आणि तत्कालीन समाज व राजकीय परिस्थितीचे चित्रे कोरलेली आहेत.

**६) साहित्य क्षेत्रातील वरील परिणाम** - बौद्धधर्माच्या तत्वज्ञानावर अनेक ग्रंथरचना झाली त्यामुळे वाङ्मय क्षेत्रातही बौद्धधर्माचे मोठे योगदान आहे. बौद्धधर्मातील त्रिपिटकाची रचना पाली भाषेत आहे. आनंद व उपाली यांनी विनयपिटक व सुत्तपिटक हे दोन भाग तयार केले. विनयपिटकात भिक्षूच्या आचाराचे नियम व तत्कालीन सामाजिक जीवनाची माहिती मिळते. सुत्तपिटकात गौतम बुद्धाची प्रवचने आहेत. धम्मपद हा नितिग्रंथ मानला जातो. अभिधम्मपिटकात बौद्धतत्वज्ञानाचा संग्रह आहे. व्याकरण व तर्कशास्त्राच्या संबंधी ग्रंथाची रचना सर्वप्रथम बौद्ध विद्वानांनी केली. जयादित्य व जितेंद्र यांनी व्याकरण शास्त्राच्या विकासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. नागार्जूनने शुन्यवाद सिद्धांत मांडला. चंद्रगोमिनचे व्याकरण अमरसिहांचे अमरकोश, हर्षवधनाचे नागनंद इ. महत्त्वाचे साहित्य आहे. जातक कथा हे बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या काल्पनिक कथा आहेत. महायान पंथाने समस्कृत भाषेत ग्रंथ निर्मिती केली. सिंहली, तिबेटी भाषेतही मोठ्या प्रमाणात ग्रंथ आहे. श्रीलंका, ब्रह्मदेश, सायम मधील बौध्ध त्रिपटकांना आपले धर्मग्रंथ मानतात.

## ४.१५ पर्शियन आक्रमणे

### ४.१५.१ पर्शियन आक्रमणे :

**१) पर्शियन/इराणी साम्राज्याचा संस्थापक - कैखुश्रू/कुरुष/सीरस/सायरस** - इ.स.पूर्व ५५८ ते ५३० भारतामध्ये मगध साम्राज्याचा उदय झाला. त्यावेळी पर्शिया/पारसी/इराण मध्ये **अरब मनोशीय** या नवीन आर्य वंशाचा उदय झाला. या वंशाचा **पहिला राजा कैखूश्रू** याने

अखमनोशीय/अकमेनियन/एकेमेनियन साम्राज्याची स्थापना केली. त्याच्या समकालीन शासकांनी त्याचा **'महान'** या शब्दात उल्लेख केला. त्याने इ.स.पूर्व. ५५८ ते इ.स. पूर्व ५३० या काळात राज्य केले. **हेरोडोटस, कैसियस, जैनोफोन, स्ट्रेबो, ऐरियन** यांच्या लेखनातून त्याच्या विषयी माहिती मिळते. कैखुश्रू याने बॅक्ट्रिया, आशिया, मायनर, मेडिया, बॅनिलोनिया, ॲसीरिया लिडिया, सीरिया या राज्यांचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. **प्लिनीच्या मते** त्याने पूर्वेकडील स्वारीत वायव्य सरहद्द प्रांताचा काही भाग आणि गांधार देश जिंकला असावा. या स्वारीत **कापिशी** नगरीचा विध्वंस केला. या वेळी गांधार राजा **पुक्कुसाति** याने प्रतिकार केला असावा. त्यामुळे पूर्व गांधार जिंकता आले नाही. याचवेळी **पुक्कुसातिने** बिंबिसारकडे मदतीची याचना केली होती. **प्लिनीच्या मते** कैखुश्रूचे भारतावरील पहिले पर्शियन आक्रमण होय. **क्टेशियास** या **इतिहासकाराच्या मते** या युध्दात एका भारतीय योध्याच्या हातून सायरस मारला. **झेनोफेनच्या** मते एका भारतीय राजाने त्याच्या दरबारी आपला वकील पाठवून त्याला खंडणी दिली. **एरियनच्या विवरणानुसार** अष्टक व अश्वक या राज्यावर त्याने वर्चस्व स्थापन केले. दारयवोष/दारीद्र्याच्या बेहिस्तून शिलालेखात २३ ब प्रांतात गांधार प्रांताचा उल्लेख आहे. डॉ. मजुमदारने बौध्द ग्रंथाच्या आधारे मत मांडले की, कुरुषच्यावेळी गांधार दोन भागात विभागले होते. तक्षशिलाचा राजा पुक्कुसाति होता आणि पश्चिम गांधार मध्ये अश्वक व अष्टक होते कदाचिय पश्चिम गांधार कुरुषच्या नियंत्रणाखाली असावा.

**२) दारियस/दारयवोष पहिला (इ.स.पूर्व ५२२ - इ.स.पूर्व ४८६)** - सायरस नंतर पर्शियाचा राजा त्याचा मुलगा **कांबीसेस** हा झाला. त्याच्या काळात भारतावर आक्रमण झाले नाही. कांबीसेस नंतर त्याचा मुलगा दारियस पहिला सत्तेवर आला. तो अतिशय महत्वाकांक्षी होता. **पर्सेपोलिस बेहिस्तून, नक्शे-रुस्तम** शिलालेखातून त्याच्याविषयी माहिती मिळते. **बेहिस्तून** (इ.स.५१९) **शिलालेखावरुन** कंबोज, पश्चिम गांधार, सिंध प्रदेशावर आक्रमण करुन तो प्रदेश साम्राज्याला जोडल्याचे दिसून येते**. पर्सेपोलिस** (इ.स.पूर्व ५१६) नक्शे-रुस्तम (इ.स.पूर्व ५१५) येथील शिलालेखात हिंदूचा उल्लेख आहे. हिरोडोटस या ग्रीक इतिहासकाराच्या लिखाणावरुन असे दिसते की, सिंधू नदीचे खोरे व राजपुतान्यातील काही वाळवंटी प्रदेश मिळून त्याच्या साम्राज्याचा २० वा प्रांत होता. सिंधू प्रांतातून दरवर्षी १० हजारापेक्षा जास्त स्टलींग पौंड किमतीचे सोने मिळत असे. इ.स.पूर्व ५१७ मध्ये **स्कायलैक्सच्या** अधिपत्याखाली सिंधू नदीच्या खोऱ्यात नाविकदल पाठविले होते. **पंजाबी-सिंधी** सैनिकही पर्शियन सैन्यात होते. इराणी राज्यात भारतीय सैन्याला अतिशय महत्व होते.

**३) क्षयार्थ/झरसीस/जर्गजीज - (इ.स.पूर्व ४८६ ते इ.स. पूर्व ४६५)** - दारियसनंतर त्याचा मुलगा **झरसीस** सत्तेवर आला. त्याने ग्रीक देशावर स्वारी केली. यावेळी त्याच्या सैन्यात **भारतीय सैन्याची** एक तुकडी होती. भारतीयांनी युरोपच्या भूमीवर लढलेले हे **पहिलेच युध्द** होते. या सैनिकांचा तत्कालीन शिलालेखात **गांधारियन** (गंधारवासी) आणि **भारतीय** (सिंधू नदीच्या पूर्वेकडे प्रांत) असा उल्लेख केलेला आहे. **थर्मापिलीच्या लढाईत** भारतीय इराणच्या बाजूने **ग्रीकांविरुध्द** लढले. **प्लासीच्या लढाईत** (इ.स.पूर्व ४७९) इराणचा पराभव झाल्याने त्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली.

**४) भारतातील पर्शियन सत्तेचा शेवट** - दारियस/डॅरीयसनंतर क्षयार्थ, दुसरा दारियस, तिसरा दारियस सत्तेवर आला. प्लासीच्या युध्दात (इ.स.पूर्व ४७९) पराभव झाल्याने साम्राज्यावरील पकड सैल झाली. **तिसरा दारियसच्या** काळात इ.स.पूर्व ३३१ मध्ये अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली. **अरवेलच्या लढाईत** इराणीचा पराभव करुन, सर्व साम्राज्य जिंकून घेतले. त्यामुळे इराणी सत्तेचा शेवट होऊन ग्रीक सत्ता भारतात स्थापन झाली. **बाल्टीक देशाच्या क्षत्रपाच्या** नेतृत्वाखाली भारतीय सैन्याच्या एका तुकडीने दारियसच्यावतीने अलेक्झांडरशी निकराचा लढा दिला होता.

**४.१५.२ पर्शियन आक्रमणांचे परिणाम :**

बॅक्ट्रियाच्या ग्रीकांनी जवळ-जवळ १५० वर्ष वायव्य भारतात (पंजाव, सरहद्दीवरील प्रदेश) शासन केले. शक, पहलव कुशाणाच्या काळात ग्रीकांचा भारताशी संपर्क होता यामुळे भारतावर त्यांचा प्रभाव किती पडला का नाही याची चर्चा करणे गरजेचे आहे. **रॉलिन्सच्या मते** - 'ग्रीक-भारत यांचा पूर्वीपासून संबंध होता त्यामुळे दोन्ही संस्कृतीने एकमेकांना वेळोवेळी प्रभावित केले आहे.' वेगवेगळ्या क्षेत्रात ग्रीकांचा प्रभाव पडला होता काय याची चर्चा करुया.

**१) साहित्य** - ग्रीक भाषेत एकही आलेख नाही. भारतीय भाषेत कोठेही ग्रीक भाषेचा वापर नाही. संस्कृत नाटकात **थवनिका** हा शब्द आढळतो तो ग्रीकामुळे आला नसावा असे वाटते. यावरुन ग्रीक भाषेपासून सामान्य जनता अलिप्त होती. **संत क्रिसोस्टमच्या मते - 'होमरने** रचलेल्या **ओडेसी व इलिया** या महाकाव्याचे भाषांतर **रामायण व महाभारतात** केलेले आहे.' प्लटार्क, एलियनने पाठिंबा दिला आहे. इलियट व रामायणच्या कथेत काही साम्य आहे. परंतु भाषांतर केले हे म्हणणे चुकीचे आहे. कारण हे दोन ग्रंथ अतिशय प्राचीन आहेत. केवळ नाट्यकलेवर प्रभाव पडलेला होता. नाटकातील जवनिकेचा (पडदा) उपयोग करण्यात आला.

**२) धर्म व तत्वज्ञान** - ग्रीक तत्ववेत्ता **सॉक्रेटीसवर** भारतीय तत्वज्ञानाचा प्रभाव पडला होता. **डॉ. त्रिपाठी** - 'जेव्हा भारतावर परकियांची आक्रमणे झाली, तेव्हा भारतीयांनी डोळे खाली झुकवले. त्यांनी पाहिले की भारत आपल्या स्वाभाविक विचार-चिंतनावर पुढे वाटचाल करु लागला या त्यांच्या नीतीमुळे विजेत्यांना भारतीयांनी **आध्यात्मिक क्षेत्रात** दास बनविले. ग्रीकामुळेच वैदिक धर्मात **मूर्तिपूजेचा शिरकाव** झाला असावा. पण ते **चुकीचे वाटते**. वेद काळात मूर्तिपूजा नव्हती हे निश्चित परंतु इ.स.पूर्व **७ व ६ शतकात** मूर्तिपूजेचा उल्लेख आहे. ग्रीकांनीच भारतीय धार्मिक सांप्रदायांना आत्मसात केले. **मिनँडरने बौध्द धर्म, हेलिओडोटसने** वैष्णव (भागवत) धर्माचा स्विकार केला. परंतु एकाही भारतीयांनी ग्रीक धर्माचा स्विकार केलेला नाही.

**३) ज्योतिष व विज्ञान** - ज्योतिष व विज्ञान क्षेत्रात ग्रीकांचा **मोठा प्रभाव पडल्याचे आपणांस दिसून येते.** संपन्न, **रोमक सिध्दांत, पुलिश सिध्दांत** चे भारतावर पडलेल्या प्रभावाचे सुचक आहेत. ज्योतिष व खगोलशास्त्राचे ज्ञान ग्रीकांनी **खाल्डीयन लोकांपासून** घेतले होते. ग्रीकांमुळे भारतात शास्त्रशुध्द अभ्यास सुरु झाला. **गार्गी-संहितेमध्ये** म्हटले आहे की 'जरी ग्रीक लोक जंगली असले तरी ते ज्योतिषशास्त्राचे **जन्मदाते असल्यामुळे** देवते प्रमाणे ते पुजनीय आहेत.

**४) व्यापार** - ग्रीकामुळे युरोप खंडाशी **नवीन व्यापारी मार्ग सुरु झाला**. तुर्कानी या मार्गावर वर्चस्व प्रस्थापित करेपर्यंत. **आयात-निर्यात** होऊ लागली. ग्रीकमधून लिहिण्याची **सामग्री आयात** तर भारतातून हस्तिदंताच्या वस्तू व मसाल्याचे पदार्थ निर्यात होऊ लागले. **सोन्याचे** दारिक, चांदीचे शेकेल नाणे प्रसिध्द होते.

**५) नाणी** - नाणकशास्त्रावर ग्रीकांचा प्रभाव होता. भारतात पूर्वी **आहत (पंचमार्क)** नाणी होती. ही नाणी आबडधोबड असून, त्याचे आकारमान, क्षेत्रफळ निश्चित नव्हते. चांदी, तांबे, सोने इ.मुद्रा होत्या. ग्रीकामुळे त्यामध्ये सुधारणा झाली. भारतीय **नाण्यांना द्रम्म** हा शब्द ग्रीक **डॅक्म** या शब्दावरुन वापरला आहे. नाण्यावर ग्रीक ऐवजी **खरोष्ट्री** लिपीचा अधिक वापर केला यावरुन भारतीयांना ग्रीक भोषेचे ज्ञान नव्हते.

**६) स्थापत्य व कला** - यावर ग्रीकांचा प्रभाव भारतीयांवर पडला होता. तक्षशिला येथील **सूर्य मंदिरात,** ग्रीक पध्दतीची उंच इमारती, स्तंभ दिसतात. मात्र त्याचा वापर **दुसरीकडे नाही. भारत-ग्रीक कलांचा** संयोग होऊन **गांधार शैलीचा विकास** झाला. यालाच **इंडो-ग्रीक कला** म्हणतात. मूर्ती, कलाकुसर, कोरीव काम यावर ग्रीकांचा प्रभाव होता. चमक (ओप), प्रस्तरलेख, चौमुख, स्तंभशीर्ष, गुहालेख, इ. प्रभाव होता.

**७) सांस्कृतिक देवाण-घेवाण** - परस्परांच्या सामाजिक रुढी, परंपरा, धार्मिक आचारविचार, तत्वज्ञान याची देवाण-घेवाण झाली. राजदरबाराबाबतचे रीतिरिवाज, समारंभ विषयक प्रथा, दरबारात खास प्रसंगी अग्नी ठेवणे, स्त्री शरीरसंरक्षकांची योजना इ.चंद्रगुप्ताने स्विकार केला. आलेख लेखनाची कला इराणपासून घेतली. अशोकाच्या स्तंभावर सिंह, बैल, इतर प्राण्यांचे शिल्प हा इराणी **प्रभावाचा परिणाम** होय. मौयाचे लाकडी राजवाडे व अशोक काळातील कला यावर इराणी प्रभावाचा परिणाम होय.

**८) खरोष्ट्री लिपीचा स्विकार** - भारताच्या वायव्य सरहद्द प्रदेशात खरोष्ट्री लिपी वाढली. इराणच्या अरेमिक लिपीपासून तिचा विकास झाला.

**९) युध्दशास्त्र व युध्दतंत्र** - पंजाब, सिंध मधील लोकांचे दारियसने सैन्यदल निर्माण केले. त्यांनी प्रथम युरोपच्या भूमीवर ग्रीकांविरुध्द लढाईत भाग घेतला होता. इराण युध्दतंत्राची ओळख भारतीयांना झाली. **मौर्यकाळात इराणी सैन्य** पध्दतीचा स्विकार केला.

**१०) प्रशासन व साम्राज्याची संकल्पना** - प्रजेच्या हितासाठी विविध प्रशासकीय अधिकार नेमून कार्यक्षम प्रशासन राबण्यावर मौर्यकाळात भर दिला. त्याचे श्रेय **इराणी लोकांना** द्यावे लागते. विशाल साम्राज्यची निर्मिती ही संकल्पना उदयास इराणीमुळे आली.

**११) इराण्यांचे ग्रीकांना मार्गदर्शन** - भारतीय संपत्तीची माहिती ग्रीकांना मिळाली. अलेक्झांडर या ग्रीकाला मार्गदर्शन इराण्यांनी केले.

**१२) भारतीय राजामध्ये दिग्विजयाची प्रेरणा** - भारताच्या इराणव्यात प्रदेशात अश्वयान, अश्वकयान, भद्र, अभिसार, क्षुद्रक व अन्य गणराज्यांनी लष्करी सज्जता राखली.

**१३) साम्राज्याचे विभाज प्रांत/सत्रयी -**

**आपली प्रगती तपासा**

१. ग्रीक आक्रमणाचे परिणाम सांगा.

**४.१५.३ ग्रीक आक्रमणे :**

आर्यवंशीय ग्रीक लोक प्रारंभी टोळ्यांच्या स्वरुपात भटकत होते. इ.स.पूर्व १८०० ते इ.स.पूर्व १२०० च्या काळात आपल्या वसाहती ग्रीकमध्ये स्थापन केल्या. ग्रीकला पूर्वी हेलास असे म्हणत आणि ग्रीक स्वतःला **हेलेन्स** म्हणवीत. स्वतःला ते श्रेष्ठ व इतरांना रानटी समजत. ग्रीक कवी **होमरच्या 'इलियट' व ओडेशी** या दोन महाकाव्यातून ग्रीक संस्कृतीची माहिती मिळते. इ.स.पूर्व ५ व्या शतकात स्वतंत्र नगरराज्य स्थापन झाले. प्रथम स्पार्टा व अथेन्स ही दोन नगरराज्य उदयास आली. या दोन राज्यात तीन युध्द झाली. **स्पार्टाने** इ.स.पूर्व ४०५ च्या ॲगॉसपोट्यानीच्या युध्दात असेन्यचा पराभव केला.या विजयामुळे स्पार्टाची सर्व ग्रीक राज्याचे नेतृत्व करण्याची महत्वाकांक्षा वाढली. ॲरगॉस, कॉरिन्थ, अथेन्स, थिब्ज ही राज्ये संयुक्तपणे स्पार्टावर चालू गेली. स्पार्टा व थिब्ज यांच्या संघर्षात स्पार्टाचा पराभव इ.स.पूर्व ३७१ मध्ये झाला. त्यामुळे ग्रीकचे **नेतृत्व थिब्जकडे** आले. याच काळात मॅसिडोनियाच्या प्रदेशावर **फिलिप दुसरा राजा** असून तो शूर सेनापती, मुत्सद्दी व कर्तबगार होता. त्याने इ.स.पूर्व ३३४ मध्ये ग्रीकांवर आक्रमण करुन, आपले वर्चस्व स्थापन केले. फिलिपने नगरराज्यांना अंतर्गत स्वातंत्र्य व शांतता यांची हमी दिली. इ.स.पूर्व ३३६ मध्ये एका समारंभात त्याचा खून झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा **अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर** हा मॅसिडोनियाचा राजा झाला. त्याने भारतावर आक्रमण केले. त्यामुळे भारत-ग्रीक संबंध आले.

**१) अलेक्झांडर ऊर्फ सिकंदरचा पूर्व वृत्तान्त - इ.स.पूर्व ३३६ ते इ.स.पूर्व ३२३ –**

ग्रीकच्या उत्तरेला असलेल्या बलाढ्य मॅसिडोनिया राज्यात, राजा दुसरा फिलीप याचा मुलगा अलेक्झांडर याचा जन्म इ.स.पूर्व ३५६ मध्ये झाला. सुप्रसिध्द तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल हा अलेक्झांडरचा गुरु होता. परंतु त्याच्या मनावर, विचारावर ॲरिस्टॉटलचा फार फ्रभाव पडला नाही. तत्वज्ञान, साहित्य यापेक्षा युध्दशास्त्राकडे अधिक ओढ त्याची होती. लहानपणापासून सेनापतीची जबाबदारी, भविष्यात प्रबळ व विस्तारित साम्राज्य निर्माण करणे, हे त्याचे ध्येय होते. वडिल राजा दुसरा फिलिप याचा खून झाल्याने वयाच्या विसाव्या वर्षी इ.स.पूर्व ३३६ मध्ये साम्राज्याचा प्रमुख बनवला. याच वेळी त्याच्या विरुध्द निरनिराळ्या ग्रीक संस्थांनी बंड केले. ते

कठोरपणे मोडून काढले. यासाठी ३० हजार पायदळ, ५ हजार घोडदळ निर्माण केले. त्याची **जग जिंकण्याची महत्वाकांक्षा** होती. त्याने इराणच्या सत्तेवर असलेल्या तिसरा दारियस याच्यावर आक्रमण केले. इ.स.पूर्व ३३१ मध्ये अरबेलच्या युध्दात पराभव केला. त्याची राजधानी पर्से पोलिस जाळून नष्ट केली. यानंतर त्याने आशिया मायनर, सिरिया, इजिप्य पॅलेस्टाईन, मेसोपोटेमिया, पर्शियन, बॅक्टेरिया इ प्रदेशाचा मालक बनला. अफगाणिस्तान प्रदेशात **अलेक्झांड्रिया** हे शहर बसविले आज हे शहर **कंदहार नावाने** प्रसिध्द आहे. यानंतर त्याने **'इराणचा महान सम्राट'** ही पदवी धारण केली. यानंतर त्याने आपले लक्ष भारताकडे वळविले.

**२) अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या वेळची भारताची राजकीय परिस्थिती** - अलेक्झांडरच्या स्वारी वेळी भारताची राजकीय परिस्थिती मोठी शोचनीय होती. वायव्य भारतात सुमारे लहान **मोठी १५० राज्ये** होती. ती सर्व स्वतंत्र असून त्यात प्रजासत्ताक श्रेष्ठजनसातक, राजसत्ताक स्वरुपाची होती. त्यांच्यात सतत संघर्ष होत असे. त्याचा फायदा अलेक्झांडरला झाला. यावेळी काही महत्वाची राज्य होती. ती म्हणजे **काबूल नदीच्या** उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशात **अश्वक व अश्वकायन** राज्य असून **मसाक/मशकावती** राजधानी होती. **गांधार प्रदेशात** सिंधू नदीच्या पश्चिमेला खैबर खिंडीच्या तोंडाशी **हस्ती राज्य** असून **पुष्कलावती** राजधानी होती. **सिंधू व झेलम** नद्यांच्या परिसरात तक्षशिला राज्य असून **अंभी राजा** होता. त्याचे पोरस हा शत्रू असल्याने **अंभीने अलेक्झांडरला** आमंत्रण दिले. **झेलम व चिनाब** नद्याच्या दुआबात व तक्षशिलेच्या पूर्वेस **पुरु राज्य** असून **पोरस** राजा होता. तो अत्यंत स्वाभिमानी होता. तक्षशिलेच्या उत्तरेस **अभिसाराचे** राज्य होते. पंजकोर नदीच्या खोऱ्यात गौर/गुरोईन राज्य होते. **रावी व व्यास** नद्यांमध्ये **कढ/कथेवाई** राज्य असून **संगाला** ही राजधानी होती. **चिनाब व झेलम** या नद्यांच्या संगमाच्या प्रदेशात **शुद्रकाचे** राज्य होते. रावी नदीच्या मुखाकडे मालव राज्य होते. चिनाब नदीच्या पश्चिम भागात ग्लागनीकाम राज्य होते. चिनाब व ढेलम नद्यांच्या मधल्या भागात **सीओई** राज्य होते. **चिनाब व रावी** प्रदेशात **शिबी** राज्य असून त्याच्या दक्षिणेला **अग्रश्रेणी, मालव** त्यापलिकडे कंठ व शुद्रक राज्ये होती.

**३) अलेक्झांडरची भारतावरील स्वारी -**

**१) पहाडी प्रदेशावर वर्चस्व -** इ.स.पूर्व ३२७ च्या मे महिन्यामध्ये हिंदुकुश ओलांडून काबूल नदीच्या खोऱ्यात आला. **निकाय** येथून आपल्या सैन्याचे दोन गट केले. एका गटाचे नेतृत्व स्वतः **अलेक्झांडरने** केले तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व **हेफिस्तियन व पेरीडाफस** या सेनापतीकडे दिले. त्यांनी काबूल नदीच्या उत्तर काठावरुन खैबर खिंडीतून सिंधू नदीच्या रोखाने वाटचाल करु लागला. **तक्षशिलचा राजा अंभीच्या** मदतीने पेशावरच्या प्रदेशात पोहचले. सिकंदर स्वतः डोंगराळ प्रदेशातून प्रवास करत काबूल, पंजकोर नद्यांच्या प्रदेशातील पर्वतीय गणराज्यावर विजय प्राप्त केला. अलेक्झांडर विरोधी **सर्वप्रथम हस्ती/अत्ती राज्याने** आघाडी उभारली. हस्त येथील हस्तीक जमातीचा राजा **हस्तक** याने प्रचंड विरोध केला. परंतु ठार झाला. यानंतर **आश्वक** राज्यावर चाल केली. येथे मोठे युध्द झाले. अलेक्झांडरने ४० हजार लोकांना कैद केले. २ लाख ३० हजार बैल पकडले. यानंतर **अश्वकायन** राज्यावर हल्ला केला. **मसकावती** नदीच्या काठी **मस्सग** हा अभेदी किल्ला होता. ३० हजार घोडदळ,

३५ हजार पायदळ, ३० हत्ती, ७ हजार भाडोत्री सैन्य होते. **राणी क्लिओर्फिसच्या नेतृत्वाखाली** अश्वकायननी अलेक्झांडरशी संघर्ष केला परंतु पराभव झाला. ग्रीक इतिहासकार अलेक्झांडरचा हा विजय **भारतातील पहिला मोठा विजय** म्हणून गौरवतात. यानंतर अलेक्झांडरने और्नस, ओश किंवा दिती, बजीरा इ प्रदेश जिंकला. ग्रीकांच्या दोन्ही गटाचे सैन्य **ओहिंद** येथे एकत्र झाले. **ओहिंद** या ठिकाणी पूल बांधून सिंधू नदी ओलांडली. आणि सिंधू नदीच्या खोऱ्यात प्रवेश केला.

**२) देशद्रोही तक्षशिलचा अंभी राजा** - अलेक्झांडरने पहाडी प्रदेशावर वर्चस्व स्थापन केले.इ.स.पू ३२६ च्या उन्हाळ्यात ओहिदंजवळ सिंधू नदी ओलांडून भारताच्या भूमीवर पाऊल ठेवले. खैबरमार्गे तो तक्षशिलेच्या राज्यात घुसला. तक्षशिलेच्या अंभी राजाने त्याचे स्वागत केले. अलेक्झांडरने तक्षशिला येथे भव्य दरबार भरवून आपल्या ऐश्वर्याचे व शक्तीचे प्रदर्शन केले. अनेक लहान-मोठया राजांनी मांडलिक स्विकारून अलेक्झांडरची अधिसत्ता मान्य केली. तसेच नजराणेही स्विकारले. पंरतु **झेलम व चिनाब** या दोन नदयांच्या मध्ये **पोरसचे** राज्य होते. त्याने ग्रीकांपुढे शरणागती स्विकारण्यास नकार दिला.

**३) झेलम नदी काठावरील कारी मैदानावरील युध्द** - अनेक राजे अलेक्झीडरला शरण गेल्याने पोरस दुःखी झाला.त्याचा मित्र अभिसार यानेही दगा दिला. अलेक्झांडरने पोरसला बोलणी करण्यासाठी बोलवले त्यावेळी पोरसने कळवले की "मी केवळ एक सार्वभौम राजा म्हणून बरोबरीच्या नात्याने अलेक्झांडरने मला सीमेवर भेटावे". त्यामुळे उभय पक्षानी युध्दाची तयारी केली. यावेळी पावसाळा असूनही, झेलम नदी पार करुन पोरसवर हल्ला करण्याचे ठरवले. अलेक्झांडर आपल्या अफाट सैन्यानिशी पश्चिम तीरावर तळ देऊन बसला. नदीच्या पुरामुळे दोन महिने वाट पाहिली. आपल्या तळाच्या उत्तरेस सतरा मैलावर प्रवाहातील एका बेटाच्या आश्रयाने निवडक सैन्यासह नदीपार केली. यावेळी त्याच्या बरोबर ११हजार सैनिक व घोडदळ होते. पोरसला माहिती मिळताच आपल्या मुलाजवळ दोन हजार सैन्य व १२० रथ देऊन पाठवले. पंरतु ग्रीकांच्या पुढे निभाव लागला नाही. या युध्दात मुलगा ठार झाला. त्यानंतर पोरसने लढण्याचा निश्चिय केला. २०हजार पायदळ, चार हजार घोडदळ, तीनशे रथ व दोनशे हत्ती ऐवढे सैन्य पोरसजवळ होते, **असे ॲरियन सांगतो**. झेलमकाठी **कारीच्या मैदानावर** ग्रीक व भारतीय सैन्याचे घनघोर युध्द झाले. रात्रीच्या पावसामुळे जमीन घसरटी झाली. असल्याने, मोठाली धनुष्ये वापरता आले नाहीत. चिखलामध्ये रथाची चाके रुतली. त्यामुळे पोरसचा पराभव झाला. या युध्दात पोरसचे दोन मुले ठार झाली. स्वतः जखमी झाला. पोरसला युध्द कैदी म्हणून अलेक्झांडर समोर उभे केले. त्याला कशी प्रकारची वागणूक हवी असे अलेक्झांडरने विचारले, **तेव्हा पोरसने उत्तर दिले** की,"आपल्याला राजासारखे वागवावे. अलेक्झांडर त्याच्यावर संतुष्ट होऊन पोरसला सोडून दिले व त्याचे राज्यही परत देऊन त्याच्याशी मैत्रीचे संबंध जोडले. तसेच पूर्वेकडील पंधरा संघराज्ये त्यास जोडले.

**४) अलेक्झांडरचे इतर विजय :-** कंदाहारच्या हिंदू राजाने बंड केले. अश्वकांनी त्यांचा **सत्रप निकेनरला** ठार मारलो. याच वेळी इराणमधून आशियन फौजेची मदत मिळाली. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले. अलेक्झांडरने चिनाब व रावी यांच्या दुआतील दुसऱ्या पोरस याचा पराभव करुन राज्य हस्तगत केले. हा प्रदेश पोरसच्या राज्यास जोडला. त्यानंतर त्याने रावीच्या काठावरील कठ लोकाच्या संघराज्यावर हल्ला चढवला. १७ हजार कठ योध्द ठार

झाले. ७हजार युध्द कैदी झाले. या युध्दात पोरसने मदत केली होती. म्हणून हे राज्यही पोरसला देण्यात आले. त्यानंतर सॅहुनी व भगल या दोन राजांचा पराभव करुन बियास नदीच्या तीरावर येऊन पोहचला.

**५) अलेक्झांडरचा परतीचा प्रवास व मृत्यू :-** सतत युध्दामुळे सैन्य थकले होते. त्यामुळे सैन्यात बंडाळी सुरु झाली. पूर्वेकडे नंदाचे अतिबलाढय राज्य असल्याने त्याच्यावर आक्रमण न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्याने परत फिरण्याचा निर्णय घेतला. बियास व झेलम या दोन नदयांनधील प्रदेश **पोरसच्या स्वाधीन** केला. झेलमच्या पश्चिमेकडील भाग आंभी राजाला दिला. अभिसरला काश्मिरचे राज्य दिले. इ.स.पू ३२६ मध्ये झेलम व चिनाव संगमावर आला. त्यावेळी मालव व क्षूद्रक यांच्याबरोबर संघर्ष झाला. त्यामध्ये अलेक्झांडर जखमी झाला. त्यामुळे सैनिकांनी मोठया प्रमाणात कत्तल सुरु केली. शिबी आणि अर्जुनायननेही विरोध केला. पंरतू पराभव झाला. इ.स.पू३२५च्या सप्टेंबंरमध्ये अलेक्झांडर बाबिलोनमार्गे मायदेशी परत जाण्यास निघाला. इ.स.पू ३२३ मध्ये बाबिलोन येथे मरण पावला. भारतामध्ये अलेक्झाडरचा मुक्काम **फक्त १९ महिने** होता.

**४.१५.४ ग्रिकांच्या स्वारीचे परिणाम :**

मॅसिडोनियाच्या अलेक्झांडरने इ.स.पू ३२६ मध्ये स्वारी केली. त्याच्या स्वारीच्या परिणामाबाबत इतिहासकारांच्या मतभेद आहेत. तरीपण जे काही परिणाम दिसून येतात ते पुढील प्रमाणे

**१) भारतामध्ये राजकीय ऐक्याची भावना वाढली** - अलेक्झांडरच्या स्वारी वेळी छोटी-छोटी व कुचकामी राज्य होती. त्यामुळे पराभव झाला. परकीय आक्रमणापासून सरंक्षण आपण करु शकत नाही या जाणवीत न चंद्रगुप्त मौर्याने राज्य स्थापन केले. या स्वारीमुळे मौर्याच्या साम्राज्य विस्ताराची पार्श्वभूमी तयार झाली.

**२) ऐतिहासिक घटनांच्या नोंदी** - अलेक्झांडर बरोबर सैन्य, कारागीर, इतिहासकार होते. इतिहासकारानी त्याच्या स्वारीचे सविस्तर वर्णन, तारीख, वार लिहिला त्यामुळे त्याचे लिखाण केले. ते लिखाण एक विश्वसनिय ऐतिहासिक साधन म्हणून उपयोग पडले. त्याचे अनुकरण भारतात सुरू झाले.

**३) आर्थिक परिणाम** - स्वारीमुळे ग्रीकांशी पर्यायाने युरोपशी संबंध आला व्यापाराची भरभराट झाली. दळणवळणासाठी भूमार्ग, जलमार्ग, खुला झाला भारतात ग्रीक प्रमाणे सुबक नाणी पाडली जाऊ लागली.

**४) सांस्कृतिक परिणाम :-** विद्वानांची वैचारिक देवाण-घेवाण सुरु झाली. विद्वान, अभ्यासू मंडळी पश्चिम आशिया, युरोपमध्ये जाऊन तत्वज्ञानाचा अभ्यास करु लागले.

**५) गांधार शिल्पशैलीचा विकास :-** ग्रीकाकडून मूर्तीकला शिकले त्यातून गांधार शिल्पकलेच विकास झाला.

**६) गणराज्यातील जीवन विस्कळीत झाले/नामशेष झाली** - ग्रीकांनी पश्चिम पंजाबामधील गुराढोराची लुट केली ग्रीकांनी जिंकलेल्या प्रदेशातून असंख्य लोकांना गुलाम म्हणून नेले त्यामुळे गणराज्यातील जीवन विस्कळीत झाली.

७) शस्त्रे, डावपेच याचे ज्ञान प्राप्त झाले-
८) ग्रीकांच्या सामाजीक चालीरीतीचा भारतीयावर प्रभाव पडला.
९) भारतात नाणी पाडण्याची प्रक्रिया सुरु झाली.
१०) पाश्चात्य देशातील विचारांची भारतीयांना ओळख झाली.
११) कलाक्षेत्रात प्रभाव - गांधारशैलीचा, मुर्तीकला.

**६) ग्रीक संस्कृतीचा भारतावर प्रभाव न पडण्याची कारणे-**

१) ग्रीकांची सत्ता भारताच्या एका कोपऱ्यात - वायव्येकडे होती
२) ग्रीक सतत आपापसात लढत होते -
३) भारतीय ग्रीकांना दुष्ट - युध्दखोर विजेते समजत असे -
४) भारतीयांनी ग्रीकांना संस्कृती व कलेचे प्रसारक कधीच मानले नाही
५) भारतीय संस्कृती मुळातच प्रौढ व समृध्द होती.
६) भारतीय संस्कृती व समाज व्यवस्था काही सामावून न घेणारी होती.
७) भारतीय जीवनात प्रचंड आत्मसात केल्याने स्वतंत्र अस्तित्वातच राहिले नाही.

## ४.१६ सारांश

इ.स.पूर्व सहाव्या शतकानंतरच्या भारताचा विचार करता भारत या कालखंडात राजकीय, आर्थिक व धार्मिक दृष्टिकोनातून समृद्ध होता. महानजपदाने स्वतंत्र राजप्रणाली निर्माण केली होती. त्याचे स्वतंत्र प्रशासन होते. परिणामी या महाजनपदाना स्वतंत्र असे स्थान निर्माण झाले होते. तर धार्मिक प्रवाहात जैन व बौद्ध धर्माने स्वतंत्र असे अस्तित्व निर्माण केले होते. धमयोगापेक्षा कर्म योगाला महत्व देव महावीर व गौतम बुद्ध या नेतृत्वात समाजमनावर आपापल्या नेतृत्वाचा व आपापल्या धर्माचा स्वतंत्र ठसा उमटविला होता. परिणामी हा सर्वच कालखंड भारतीय इतिहासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला. तसेच आपण प्रर्शियन व ग्रिक आक्रमणाची माहिति सुद्धा यात अभ्यासली आहे.

## ४.१७ दिर्घोत्तरी प्रश्न

१. सोळा महाजनपदांवर सविस्तर माहिती लिहा.
२. महाजनपदांच्या प्रशासनावर भाष्य करा.
३. जैन धर्माच्या उदयास जबाबदार घटक सांगा.
४. महावीराचे जीवन व कार्य सांगा.
५. बौद्ध धर्माच्या उदयास जबाबदार घटक सांगा.
६. गौतम बुद्धाचे जीवन व कार्य सांगा.
७. बौद्ध धर्माच्या भारतीय संस्कृतीवरील प्रभावांवर भाष्य करा.
८) प्रर्शियन व ग्रिक आक्रमणांची माहिती सांगा.

❖❖❖❖

# ५

# मौर्य कालखंड
# (इ.स. पू. ३२२ ते इ.स.पू. १८५)

**प्रकरणाची रचनाः**

५.० उद्दिष्ट्ये
५.१ प्रस्तावना
५.२ मौर्य साम्राज्य स्थापना
५.३ साम्राज्य विस्तार
५.४ मौर्य प्रशासन
५.५ सारांश
५.६ दिर्घोत्तरी प्रश्न

## ५.० उद्दिष्ट्ये

- मौर्य साम्राज्याच्या उदयाचा अभ्यास करणे.
- मौर्य साम्राज्यातील राजकर्त्यांच्या कारकीर्दीचा अभ्यास करणे.
- मौर्यांच्या प्रशासनाचा अभ्यास करणे.

## ५.१ प्रस्तावना

प्राचीन भारतीय राजवटीतील इ.स.पूर्व ३२२ ते इ.स.पूर्व १८५ हा कालखंड मौर्य राजकर्त्यांच्या राजवटीचा कालखंड मानला जातो. या कालखंडात भारत मौर्यांच्या अधिपत्याखाली होता. मौर्यांच्या राजवट नेतृत्त्वाने भारतात एका नव्या युगाची सुरुवात झाली होती. संपूर्ण भारतात राजकीय ऐक्य निर्माण झाले होते. भारतात खऱ्या अर्थाने नव्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाची सुरुवात झाली होती. मौर्य राजवटीबाबत डॉ. व्ही. ए. स्मिथ म्हणतात - "The advaent of the Mauryan dynasty makes the passage from drankness to light."

मौर्यकालखंडात भारतात व्यापार, उद्योग, वाङःमय, कला आर्दीची मोठ्या प्रमाणात प्रगती झाली होती. संपूर्ण देशात आदर्श अशी मुलकी प्रशासन व्यवस्था निर्माण झाली होती.

स्वातंत्र्य, श्रेष्ठत्त्व, व वैभवाच्या दृष्टीने भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ कालखंड म्हणजे मौर्य कालखंड असे गौरवाद्गार या कालखंडाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढले आहेत.

## ५.२ मौर्य साम्राज्यस्थापना

मौर्य साम्राज्यस्थापन होण्यापूर्वी मगधांचे साम्राज्य भारतावर होते. हे साम्राज्य गंगेच्या खोऱ्यात उत्कर्षाला पोहचले होते. मौर्य सत्तेच्या उदयापूर्वी मगध साम्राज्य धनानंदाच्या अधिपत्याखाली होते. तो अगणित संपत्ती व अफाट खडे सैन्य यांच्या जोरावर निरंकुश राज्यकारभार करत होता. जुलमी प्रशासन, आर्थिक पिळवणूक, व त्याची शीलभ्रष्ट वागणूक यामूळे त्याची राजवट अप्रिय बनली होती. त्याच्या राजवटीच्या विरोधात प्रजेत असंतोष घुमसत होता. याच परिस्थितीचा फायदा त्याचा सेनापती असणाऱ्या चंद्रगुप्ताने घेण्याचे ठरविले व त्यांनी लष्करी क्रांती करण्याचा निर्णय घेतला. पण त्याचा लष्करी क्रांतीचा पहिला प्रयत्न फसला त्यामुळे त्याला राज्याबाहेर परागंदा व्हावे लागले. सुदैवाने या सुमारास त्याची भेट चाणक्य नावाच्या धोरणी ब्राह्मण मुत्सद्याशी पडली. तक्षशिलेच्या या थोर विद्वानाचा नंदराजाने अपमान केला होता व त्याचा सूड घेण्याची घोर प्रतिज्ञा या ब्राह्मणाने केली होती.

नंदाच्या विरोधात क्रांती करण्यासाठी सर्व प्रथम या दोहोंनी पंजाबात सैन्यांची जमवाजमव सुरु केली. पर्वतीय राजांची मदत घेतली. तेव्हा भारतावर चाल करुन आलेला ग्रीक सेनानी अलेक्झांडरची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला पण त्याबरोबर पटलयाणे त्याची मदत नाकारली. नंतर अलेक्झांडरच्या स्वारीमुळे दुःखावलेल्या अनेक योध्याना आपलेसे केले. व तो मुक्तीसेनेचा सेनापती बनला. दरम्यांच्या काळात अलेक्झांडरचा मृत्यु झाला. त्याचे सेनापती साम्राज्य वाटणीकरता भांडू लागले. चंद्रगुप्ताने या संधीचा फायदा घेवून पौरस सख्य जोडले व डोंगरी जमातीची मदत मिळवून थेट पाटलीपुत्रवर चाल केली व नंदसैन्यांचा पराभव केला. व धनानंदाला ठार मारुन मौर्य साम्राज्य स्थापन केले.

**आपली प्रगती तपासा**

१. मौर्य साम्राज्य स्थापना कशी झाली.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ५.३ साम्राज्य विस्तार

**अ) चंद्रगुप्त मौर्य :-** मौर्य साम्राज्याचा संस्थापक समजल्या जाणाऱ्या चंद्रगुप्ताची राजकीय कारकीर्द भारतीय इतिहासात प्रसिद्ध आहे. तो साध्या सैनिकापासून सेनापतीपदापर्यंत पोहचला होता. तो अत्यंत हुशार व राजलक्षणी होता. धनानंदाची सत्ता उळथून त्यांनी मौर्याचे साम्राज्य

स्थापन केले होते. राजकर्ता बनल्यानंतर त्यांनी आपले साम्राज्य वाढविले. त्याच्या साम्राज्य विस्ताराबद्दलची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१) पंजाब व सिंधवरील विजय :-** अलेक्झांडर आक्रमणानंतर पंजाब व सिंधवर ग्रीक सेनानायकांचे वर्चस्व होते. या सेनानायकांना भारतीय जनतेनेही विरोध केला होता. याच संधीचा फायदा चंद्रगुप्त व चाणक्याने घेवून ग्रीक सेनानायक (क्षत्रप) निकोनोरच्या हत्येचा कट रचला. व या कटातूनच त्याची हत्या झाली असे मत डॉ. आर. के. चौधरी यांनी मांडले आहे या हत्तेने ग्रीकांची परिस्थिती कमजोर झाली. म्हणूनच चंद्रगुप्ताने हे दोन्ही प्रदेश ग्रीकांच्या ताब्यातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला. व हे प्रदेश मुक्त करण्यात त्याला यश आले. सिंधचा क्षत्रप पियानाचा पराभव करण्यात चंद्रगुप्ताला यश आले.

**२) पाटलीपुत्र शहरावर विजय :-** चंद्रगुप्ताने सर्वप्रथम मगध जिंकले. मगध जिंकल्यानंतर मगधांची राजधानी पाटलीपुत्र जिंकले व धाननंदाचा वध केला व मगधांची गादी मिळविली. साम, दाम, दंड, भेद या कुटनितीचा वापर करुन नंदसत्तेचा शेवट केला. नंतर त्यांनी नंदाचा पराभव करण्यासाठी ज्या 'पवर्तक' राजाची मदत घेतली होती. त्याचा ग्रीक सेनापती युडेमॉस याने खुन करविला आणि त्यामुळे चंद्रगुप्ताचा भावी प्रतिस्पर्धी ठार झाल्यामुळे त्याचा साम्राज्य निर्मितीचा मार्ग मोकळा झाला.

**३) सेल्युकस निकेटरचा पराभव :-** सेल्युकस निकेटर हा अलेकझांडरचा नामांकित सेनापती होता. अलेकझांडरच्या मृत्यूनंतर तो अलेकझांडरचा विशाल साम्राज्याचा स्वामी बनला होता. अलेकझांडर प्रमाणेच तो महत्त्वाकांक्षी होता. अलेकझांडरच्या ताब्यात असणारा, तसेच सिंधचा पूर्वेकडील प्रदेश नव्याने जिंकावा अशी त्याची महत्त्वकांक्षा होती म्हणूनच भारतावर स्वारी करण्याचा निर्णय घेतला व तो भारताकडे स्वारु करण्यासाठी निघाला. चंद्रगुप्ताला याची माहिती मिळताच चंद्रगुप्ताने त्याला सिंधूनदीपलीकडेच अडविले. उभयतात युद्ध झाले सेल्युलस निकेटरचा पूर्णपणे पराभव झाला. उभयतात नंतर तह झाला. या तहातील अटी अशा होत्या –

१) काबूल, कंदाहर, बलुचिस्तान, हिरात हे प्रांत चंद्रगुप्ताला देण्यात आले.
२) सेल्युकसने आपली मुलगी हेलेना चंद्रगुप्तास द्यावी व त्याद्वारे उभयतांत मैत्रीचे संबध जोडले जावेत.
३) मॅगेस्थेनीस हा ग्रीक वकील चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात राहिल.
४) चंद्रगुप्ताने ५०० हत्ती सेल्युलसला भेट द्यावे.

या तहाने चंद्रगुप्ताचा दरारा, राजकीय प्रतिष्ठा वाढली. चंद्रगुप्ताचे साम्राज्य भारताबाहेर इराणपर्यंत पोहचले.

**४) दक्षिण भारतावरील विजय :-** चंद्रगुप्तमौर्याने साम्राज्य विस्तार करतांना दक्षिण भारत जिंकला होता किंवा नाही याबत इतिहासकारांत मतभेद आहेत. दक्षिण भारतातील कोणकोणते प्रदेश जिंकले होते याबाबत निश्चित कोणतेही लिखित पुरावे नाहीत. प्लुटार्क या ग्रीक इतिहासकाराच्या मते, चंद्रगुप्ताने ६ लाख सैन्यांच्या जोरावर संपूर्ण भारत जिंकला होतो. डॉक्टर रायचौधरी यांच्या मते, नंदाचा साम्राज्यविस्तार दक्षिण भारतात झाला होता. नंदाला

चंद्रगुप्ताने पराभूत केल्यामुळे आपोआपच तो प्रदेश चंद्रगुप्ताच्या ताब्यात आला. जैन व तामिळ साहित्यामध्ये चंद्रगुप्ताने दक्षिण भारत जिंकला होता असा उल्लेख आहे. डॉ. आर. के. मुखर्जी डॉ. त्रीपाठी या इतिहासकारांनी त्यास दक्षिण भारत विजेता असे म्हटले आहे.

**५) पूर्व व पश्चिम भारतावरील विजय :-** कलिंग (ओरिसा) राज्य वगळता संपूर्ण पूर्व भारत तसेच बंगाल प्रांतावर चंद्रगुप्ताने सत्ता प्रस्थापित झाली होती. महास्थान आलेखावरुन चंद्रगुप्ताचे राज्य बंगालवर होते हे सिद्ध झाले आहे. डॉ. रायचौधरी यांच्या मते, सौराष्ट्रावर चंद्रगुप्ताची सत्ता होती. एकंदर संपूर्ण भारतावर चंद्रगुप्ताने वर्चस्व प्रस्थापित केले होते त्याच्या साम्राज्यात पंजाब, सिंध, नेपाळ, गुजरात, माळवा, मगध म्हैसूर या प्रांताचाही समावेश होता.

**६) भारताबाहेरील साम्राज्य विस्तार :-**चंद्रगुप्ताने आपल्या राजवटीत भारताबाहेरही साम्राज्यविस्तार केला होता. काबुल, कंदाहर, अफगाणिस्तान, हिरात ही ठिकाणे त्यांनी आपल्या राजवटीत जिंकला होती. ही सर्वच ठिकाणे भारताबाहेरील आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. चंद्रगुप्त मौर्याने साम्राज्य विस्तार कोठे कोठे केला.

**७) चंद्रगुप्ताची योग्यता :-**

**१) मौर्य साम्राज्याचा संस्थापक :-** चंद्रगुप्त मौर्याने नंदाचे साम्राज्य नष्ट करुन मौर्य साम्राज्य स्थापन केले होते. त्यामुळेच साम्राज्य संस्थापक म्हणून त्यांची योग्यता श्रेष्ठ प्रतिची आहे. त्याही पुढे जावून त्यांनी भारतामधील छोटी छोटी राज्य जी आपापसात लढत होती त्यांना जिंकून मौर्याच्या विशाल साम्राज्याच्या छत्राखाली आणले व मौर्याचे बलाढ्य साम्राज्य निर्माण केली. त्यामुळे त्यांची साम्राज्य संस्थापक म्हणून योग्यत आपणास नाकारता येणार नाही.

**२) परकीय सत्तेचे उच्चाटन :-** चंद्रगुप्ताने भारतावर होणारी ग्रीकांची आक्रमणे थांबविली. पण त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे ग्रीकांचे जे क्षत्रप होत त्यांच्या विरोधातही बंड पुकारले व त्यांच्याबरोबर युद्ध पुकारुन त्यांचा पराभव केला. ग्रीकांच्या सेल्युकस निकेटरचा पराभव करुन भारतातील ग्रीक सत्तेचा शेवट केला. चंद्रगुप्ताने ग्रीकांचा जो पराभव केला या बाबत विनायक दामोदर सावरकरानी असे म्हटले आहे की हा प्रसंग म्हणजे भारतीय इतिहासातील एक सोनेरी पान आहे.

**३) भारताबाहेरील प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली :-** चंद्रगुप्ताने केवल भारतातील प्रदेशांवरच सत्ता प्रस्थापित केली असे नव्हे तर भारतबाह्य प्रदेशांवर सुद्धा आपली

प्रस्थापित केली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे काबूल, कंदाहर, बलुचिस्तान व हिरात या प्रदेशावरील सत्ता होय.

**४) महान सेनानी :-** चंद्रगुप्त मौर्य हा महान सेनानी होता. लष्करी गुणावरच तो साध्या सैनिकावरुन तो सेनापती पदापर्यंत पोहचला. याहीपुढे जावून त्यांनी धनानंदाच्या सत्तेविरुद्ध बंड करुन त्याच्या सत्तेचा शेवट केला. तो उत्कृष्ट सेनानी होता म्हणूनच तो मौर्याचे विशाल साम्राज्य उभे करु शकला. येवढेच नव्हे तर ग्रीकांसारख्या परकीय सत्ताधिशाना सुद्धा भारताबाहेर त्यानी हाकलून दिले म्हणूनच तो महान सेनानी होता हे आपणास नाकरता येणार नाही.

**५) श्रेष्ठ प्रशासक :-** चंद्रगुप्त मौर्य हा श्रेष्ठ दर्जाचा प्रशासक होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनव्यवस्था संपूर्ण मौर्य राजवटीत प्रचलीत होती. एवढेच नव्हे तर मुसलीम आक्रमणे होईपर्यंत त्यांनी निर्माण केलेली प्रशासनव्यवस्था प्रचलीत होती. त्याच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती मॅगेस्थेनिसच्या 'इंडिका' ग्रंथात आहे. त्याची प्रशासन व्यवस्था कार्यक्षम होती.

**६) लोककल्याणकारी सम्राट :-** चंद्रगुप्त मौर्य केवळ योद्धा, साम्राज्यसंस्थापकच नव्हे तर तो लोककल्याणकारी सम्राटही होता. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर जनकल्याणासाठी केला. स्थानिक संस्थाचा कारभार जनतेच्या हाती देऊन त्यांनी जनतेला सत्तेचे वाटेकरी करुन घेतले. त्याची न्यायव्यवस्था उत्कृष्ट होती.

**७) राजकीय ऐक्य निर्माण करणारा सम्राट :-** चंद्रगुप्त मौर्याने संपूर्ण भारत मौर्यांच्या सत्तेखाली आणला होता. फक्त कलिग (ओरीसा) चा अपवाद वगळता मौर्याचे सार्वभौम राज्य निर्माण केले होते. संपूर्ण उत्तर भारत, दक्षिणेत म्हैसूरपर्यंत, पश्चिमेकडे सौराष्ट्र, पूर्वेकडे ओरीसा वगळता बंगालपर्यंतचा प्रदेश अधिपत्याखाली आणून राजकीय ऐक्य निर्माण केले होते.

**८) विद्या व कलेचा भोक्ता :-** चंद्रगुप्त मौर्य विद्या व कलेचा भोक्ता होता. त्यांनी भारतात समृद्ध व संपन्न साम्राज्य निर्माण केले होते. त्यांनी विद्या व कलेच्या विकासाला प्राधान्य दिले होते. परिणामी त्याच्या राजवटीत शिल्पकला, मूर्तीकला व बौद्ध विहारांच्या निर्मितीला चालना मिळाली.

९) जगाच्या इतिहासातील नामवंत इतिहासकारानी चंद्रगुप्त मौर्याबद्दल अभिप्राय व्यक्त केले आहेत.

- "जगाच्या इतिहासात साम्राज्यसंस्थापक, श्रेष्ठ प्रशासक व लढवय्ये सेनापती दिसतात, पण हे तिन्ही गुण एकाच व्यक्तीमध्ये दिसणारी व्यक्ती म्हणजे चंद्रगुप्त मौर्य होय." - डॉ. आर. सी. मुजुमदार.
- "१८ वर्षात चंद्रगुप्ताने नंद सत्तेच्या विरोधात संघर्ष करुन या सत्तेचा शेवट केला व पंजाब व सिंधमधून ग्रीकांच्या सत्तेचे उच्चाटन करुन भारताबाहेर ही त्यांनी साम्राज्य निर्माण केले त्यामुळेच थोर व यशस्वी सम्राटांच्या मालिकेत त्याला स्थान द्यावे लागेल." – डॉ. व्ही. ए. स्मिथ.

- "Chandragupta Maurya ranks as one of India's Greatest rulers. He was unique. He is earliest Emperor indian history."
- "चंद्रगुप्ताची कारकीर्द म्हणजे भारतीय इतिहासातील सोनेरी पान होय." - वि. दा. सावरकर.

**आपली प्रगती तपासा**

१) चंद्रगुप्त मौर्याची योग्यता कशी तपासाल.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**ब) बिंदुसार :-** मौर्य साम्राज्यातील दुसरा कर्तबगार सम्राट म्हणून बिंदुसाराकडे पाहिले जाते. चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर तो गादीवर आला. त्यांने भारतावर २५ वर्ष राज्य केले. त्याच्या कारकिर्दी विषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. पुराण ग्रंथात त्याचा उल्लेख बिंदुसार, भद्रसार व नंदसार असा आह. जैन व बौद्ध साहित्यात त्याचा उल्लेख 'बिंदुसार' असा आहे. ग्रीक लेखकाने त्याचा उल्लेख 'अमित्रचारेस' असा केला आहे. 'अमित्रघात' हा मूळ शब्द संस्कृत मधला असून त्याचा अर्थ शत्रुंचा नाश करणारा असा होतो.

बिंदुसाराने त्याच्या राजवटीत मौर्यांचा कोणताही प्रदेश गमावला नाही. यावरुन तो समर्थ सम्राट होता हे सिद्ध होते. ग्रीक सम्राटांबरोबर त्याचे मैत्रीपूर्ण संबंध होते. सेल्युकस निकेटरचा पुत्र सिरीयाचा राजा अँटिओकस प्रथम याच्याबरोबर बिंदुसाराचे संबंध मैत्रीचे होते.

मॅगेस्थेनीसनंतर ग्रीकांना डायमेकस हा राजदूत बिंदूसाराच्या दरबारात पाठवला होतो. इजिप्तचा राजा टाल्मी फिलेडेल्फस याच्याबरोबर त्याचे मित्रत्वाचे संबध होते. एयिनिअस या ग्रीक लेखकाने बिंदुसार याने ग्रीक सम्राटाना मदिरा, अंजिर व फिलॉसॉफर तत्त्वज्ञ पाठवण्याची विनंती केली होती अशी नोंद आहे.

बिंदुसाराने कोणता धर्म स्वीकारला होता याची माहिती उपलब्ध नाही. त्याच्या काळात चाणाक्य हाच प्रधानमंत्री होता. परिशिष्टपर्व या ग्रंथातील नोंदीनुसार बिंदुसाराने चाणक्याचा अपमान केल्यामुळे चाणक्याने मगधराज्य कायम सोडून दिले. प्रशासकीय कार्यात मदत करण्यासाठी बिंदूसाराला ५०० सदस्यांची एक समिती कार्यरत होती. असा उल्लेख 'दिव्यावदान' या बौद्धग्रंथात आहे.

बिंदुसाराच्या काळात जनतेने भ्रष्ट अधिकाऱ्यांना कंटाळून बंड केली. तक्षशिला येथे प्रथम बंड झाले. तेव्हा या बंडाचा विमोड करण्यासाठी अशोकाला पाठविले. तक्षशिला येथे दुसऱ्यांदा बंड झाले होते. काही इतिहासकार दक्षिण विजयाचे श्रेय बिंदुसाराला देतात. दक्षिण

भारतात चंद्रगुप्ताने नव्हे तर बिंदुसाराने मौर्यांची सत्ता प्रस्थापित केली होती असा युक्तिवाद काही इतिहासकाराने केला आहे बिंदूसाराच्या दक्षिण विजयाची नोंद समकालीन इतिहासात कोठेही नाही. एस. आर. त्रिपाठी व बहुतांशी इतिहासकारांनी दक्षिण विजयाचे श्रेय चंद्रगुप्ताला दिले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) बिंदूसारा बदलची माहिती जाणून घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**क) अशोक :-** भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ राजकर्ता, जागतिकी इतिहासातील एक जेष्ठ राजकर्ता म्हणून अशोकाकडे पाहिले जाते. भारतीय इतिहासात अशोकाचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. तो द्विग्वीजयी, धोरणी व शासनकुशल सम्राट होता. त्याचे कार्य अद्वितीय होते. त्याच्या कर्तुत्वाची माहिती आपण पुढील माहितीच्या आधारे स्पष्ट करणार आहोत.

**१) पूर्व वृत्तांत :-**बिंदुसाराच्या मृत्यूनंतर सम्राट अशोक सत्तेवर आला होता. 'दिपवंश' व 'महावंश' या दोन ग्रंथात त्यांनी आपल्या ९९ भावाना ठार मारुन मगधांची गादी बळकावली अशी कथा आहे. तथापि या कथा यथार्थ नाहीत असे म्हटले जाते.

बिंदुसाराला सुशीम, त्रिश्य व अशोक हे तीन पुत्र होते. बिंदसारानंतर जेष्ठ पुत्र म्हणून सुशीमचा राजगादीर हक्क होता. मात्र अशोकाची त्रिष्याने बाजू घेतल्याने या भावंडामध्ये दोन गट निर्माण झाले. सुशीमवर नाराज असलेल्या लोकांनी अशोकाची बाजू उचलून धरली परिणामी दोन गटात युद्ध अटळ होते. शेवटी या गटात युद्धा होऊन अशोकाने हे युद्ध जिंकले. व इ.स.पूर्व २६९ मध्ये त्यांनी स्वतःचा राज्याभिषेक करुन तो मौर्य सत्तेचा सर्वाधिकार बनला.

सम्राट अशोक सुरुवातीला प्रचंड क्रुर होता म्हणून त्यास चंद्राशोक किंवा छंदाशोक असे संबोधले जात होते. राज्याभिषेकानंतर त्यांने स्वतःस 'देवानाप्रियम' 'प्रियदर्शनी' अशा बिरूदावलया लावल्या. कलिंग युद्धानंतरच्या परिवर्तनानंतर त्याने जे महत्त्वपूर्ण कार्य केले त्यामुळे त्यास धर्माशोक असे संबोधले जावू लागले.

**सम्राट अशोकाचे कार्य :-**

**१) काश्मिर विजय :-** राज्याभिषेकानंतर सम्राट अशोक मौर्यसत्तेचासर्वाधिकारी बनला होता. सत्ताधीश बनल्यानंतर त्यांनी आपल्या पूर्वजांप्रमाणेच साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. या

पाठीमागचा त्याचा उद्देश "भारतात एकछत्री सत्ता" यावी असा होता. यासाठीच सर्वप्रथम त्यांनी काश्मिरची निवड केली. अशोकाच्या काश्मिर विजयाची माहिती कल्हणाच्या राजतंरगिणी या ऐतिहासिक ग्रंथात उपलब्ध आहे. या प्रदेशावर विजय प्राप्त केल्यानंतर स्वतः अशोकाने स्तुप व चैतगृह उभारली होती. यावरुनच अशोकाने आपल्या कारकिर्दीत काश्मिर विजय मिळविला होता हे सिद्ध होते.

**२) कलिंगचे युद्ध :-** भारताच्या पूर्व किनाऱ्यावर दुआबातील हा समृद्ध प्रदेश होता. या प्रदेशात आर्थिक सुबता मोठ्या प्रमाणात होती. चंद्रगुप्त मौर्याच्या कारकीर्दीत हा प्रदेश स्वतंत्र होता. बिंदुसाराने ही कलिंग जिंकण्याचा विचार केला नाही. मात्र अशोकाने राज्याभिषेकानंतर आठ वर्षांनी कलिंग जिंकण्याचा निर्णय घेतला. व स्वारीची योजना आखून इ.स.पूर्व २६१ मध्ये कलिंगवर चाल केली. कलिंगच्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी अशोकाला कडवा प्रतिकार केला. परंतू अशोकाच्या अफाट सामर्थ्यांपुढे त्यांना शरणागती पत्करावी लागली. कलिंग युद्धात १ लाख सैन्य मारले गेले. $१\frac{१}{२}$ लाख सैन्य कैद करण्यात आले. त्यापेक्षा इतर संहार झाला तो अगणित होता.

**३) कलिंग युद्धाचे परिणाम :-**

- कलिंग युद्धात १ लाख सैन्य मृत्युमुखी पडले.
- कलिंग युद्धात $१\frac{१}{२}$ लाख सैन्य कैद करण्यात आले.
- कलिंग युद्धात जखमी व अपंग झालेल्या लोकांची संख्या १ लाख होती.
- कलिंग युद्धात प्रचंड प्रमणात वित्त हानी झाली.
- कलिंग देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे विसकटली.
- कलिंग युद्धात जी मनुष्यहानी झाली त्याचा अशोकाच्या मनावर परिणाम झाला. त्याचे ह्रदयपरिवर्तन झाले. युद्धभूमीवरच त्याला खूप दुःख झाले.
- कलिंग युद्धानंतर सम्राट अशोकाच्या मनात विविध विचारांचे काहूर निर्माण झाले. तो विचार मग्न अवस्थेत असतानाच बौद्ध भिक्षूक उपगुप्ताची त्यांनी भेट झाली. उपगुप्ताच्या उपदेशानंतर अशोकाच्या आचारात क्रांती झाली व तो शांततेकडे झुकला.
- कलिंग युद्धाने प्राप्त प्रदेशाच्या आधारे मौर्य साम्राज्याला संपूर्ण पूर्णत्व प्राप्त झाले.
- कलिंग युद्धानंतर अशोकाचे मनपरिवर्तन झाल्यानंतर अशोकाची दया, क्षमा, शांती, अहिंसा या विचारांवर श्रद्धा बसली.
- कलिंग युद्धानंतर अशोकाने युद्धनितीचा पूर्णपणे त्याग केला.
- कलिंग युद्धानंतर अशोकाने दिग्विजयाऐवजी धर्म विजयाचे धोरण स्विकारले.

**४) सम्राट अशोकाचा धर्म :-** प्रारंभी अशोक हा शिवाचा उपासक होता. असे स्पष्टकरण कल्हणाच्या राजतरंगिणी या ग्रंथात आहे. उपगुप्त या बौद्ध भिक्षूकाच्या भेटीनंतर अशोकाने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली व बौद्ध धर्माचा स्विकार केला. बौद्ध धर्माच्या स्विकारानंतर अशोकाच्या

वैयक्तिक व प्रशासकीय जीवनात फार मोठा बदल झाला. त्याचा जीवनक्रम पूर्णपणे बदलला. व तो जनकल्याणाकडे लक्ष देवू लागला.

अशोकाला स्वतंत्र धर्म स्थापन करावयाचा नव्हता. त्याची धर्मसंकल्पना बौद्ध धर्मापेक्षा भिन्न नाही. त्याच्या धर्मसंकल्पनेत अहिंसा, भूतदया, परमसंहिष्णूता, सत्यशील, विशुद्ध चारित्र्य या गोष्टींचा समावेश आहे. त्याच्या विचारसरणीचा भर नैतिक आचरणावर व शुद्ध चारित्र्यावर होता.

**अशोकाच्या धर्मसंकल्पनेत खालील मूलभूत तत्त्वांचा समावेश होता.**

१) अंहिसेचे पालन करा.
२) कोणत्याही प्राणीमात्राची हिंसा करु नका.
३) प्राणीमात्रांवर दया करा.
४) सत्य बोला.
५) आई-वडील व इतर वडीलधाऱ्या माणसांची सेवा करा.
६) बौद्ध भिक्षू व ब्राह्मणास दानधर्म करा.
७) शांती, संयम व विनयशीलता इ. गुण अंगी बाळगा.
८) राग, लोभ, मत्सर, व्यभिचार इत्यादीपासून दूर रहा.
९) अनाथ अपंग व वृद्धांचे संरक्षण करा.
१०) पवित्र जीवन जगा.
११) दास सेवक यांच्याशी प्रेमाने वागा.

अशोकांनी आपल्या धर्मसंकल्पनेत धर्म संहिष्णूतेवर भर दिला. सदाचार, उच्च नैतिक आचरण, सत्कर्मे इ. गोष्टींवर भर दिला. तो त्याच्या धर्माबद्दल म्हणतो मनुष्याने पापापासून दूर रहाणे, उत्तम कार्य करणे हा खरा धर्म होय. अशोकाच्या १२ व्या शिलालेखात आपला धर्म व परधर्म संहिष्णूतेबद्दलची माहिती आहे.

**बौद्ध धर्म प्रसारासाठी अशोकाने केलेले कार्य :**

१) अशोकाने स्वतः बौद्धधर्म स्विकारला.
२) अशोकाने स्वतः बौद्ध धर्माला राजाश्रय दिला.
३) अशोकाने शासकीय यंत्रणा बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी राबविली.
४) अशोकाने बौद्ध धर्माला राष्ट्रधर्माचा दर्जा दिला.
५) अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी 'धर्ममहामात्र' व 'धर्मयुक्त' या दोन स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या.
६) अशोकानी त्याच्या प्रशासनातील सर्वच अधिकाऱ्यानी बौद्धधर्माचा प्रसार करावा अशी राजाज्ञापत्रात तरतुद केली होती.
७) अशोकाने बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर स्वतः अहिंसेचा अंगीकार केला. मांसाहराचा त्याग केला. राजदरबारात मांसाहारावर बंदी घातली. साम्राज्यात पशु-पक्षांच्या हत्तेवर बंदी घातली.

८) अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी शिलालेख निर्माण केले. या शिलालेखांवर बौद्धधर्माची नितीतत्त्वे कोरली व याचे वाचन व पालन साम्राज्यातील प्रत्येक नागरिकाने करावे असे सूचविले.
९) अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसाराचे काम सोपे व्हावे म्हणून चैत्य व विहारे बांधली.
१०) अशोकाने बौद्ध धर्मातील भिक्षूंच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मृती जागृत रहाव्या म्हणून ८४००० स्तुप बांधले.
११) अशोकाना बौद्ध धर्माचा प्रसार देशबाह्य व्हावा म्हणून मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा या दोघांना श्रीलंकेला पाठविले.
१२) अशोकाने ब्रह्मदेश, चीन, जपान, सिरीया, इजिप्त, श्रीलंका, ग्रीस या देशात आपल्या प्रतिनिधीमार्फत बौद्ध धर्माचा प्रसार केला.

**अशोकाच्या धार्मिक धोरणाचे परिणाम :-**

१) बौद्ध धर्माचा प्रसार भारत व भारताबाहेर झाला.
२) बौद्धधर्माला राजाश्रय मिळाल्याने हिंदू व जैन धर्माचे लोक नाराज झाले.
३) अशोकाने बौद्ध धर्माचा स्विकार केल्यानंतर युद्धनितीचा कायमचा त्याग केल्याने मौर्य लष्कर दुबळे बनले.
४) मौर्याने बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी प्रशासन व्यवस्था राबविल्याने पुढे मौर्य प्रशासनाचा दरारा कमी झाला.
५) मौर्यांचे सर्व उत्पन्न धर्माच्या कामावर खर्च होवू लागले.
६) चैत्य, विहार, स्तुप, स्तंभ, इ. गोष्टीना उत्तेजन मिळाल्यान शिल्पकलेचा विकास झाला.
७) अशोकाच्या अतिरिकी धार्मिक कार्यामुळे पुढे मौर्य सत्तेचा ऱ्हास झाला.

**३) अशोकाची प्रशासन व्यवस्था :-**अशोकाने आपले विशाल साम्राज्य चालविण्यासाठी आपल्या साम्राज्याचे प्रशासनाच्या सोयीसाठी एकूण सहा विभाग पाडले होते.

१) मूल विभाग (मगध) – राजधानी पाटलीपुत्र
२) हिंदकुश (वायव्य विभाग) – राजधानी दिल्ली
३) मध्य विभाग (अवंती, माळवा) – राजधानी उज्जैन
४) पूर्व विभाग (कलिंग प्रदेश) – राजधानी तोसली
५) दक्षिण विभाग – राजधानी सुवर्णगीरी
६) पश्चिम विभाग – राजधानी गिरीनगर

प्रांताचे प्रमुख राज्यपाल होते राज्यपालांच्या हाताखाली राजूक (जिल्हाधिकारी) गोप (तहसिलदार) ग्रामिणी (ग्रामप्रमुख) हे अधिकारी असत.

प्रशासन व्यवस्थेचा प्रमुख केंद्रबिंदू सम्राट अशोक होता. अशोकाने सत्तेच्या विक्रेंद्रीकरणासाठीच प्रांतीय प्रशासन निर्माण केले होते.

**४) अशोकाची योग्यता :-**

**१) एक आदर्श राजा :-** अशोक एक आदर्श राजा होता. लोककल्याणाकडे त्यांनी लक्ष दिले. लोककल्याणाकडे लक्ष पुरवेल असे शासन देण्याचा प्रयत्न त्याचा लौकीक वाढविणारा होता. प्रजेचा सेवक म्हणूनच सर्व राजसत्ता त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी राबवीली.

**२) कृतिशील सम्राट :-** अशोक हा कृतिशील सम्राट होता कारण त्यांनी जे प्रजेसाठी नियम केले होते ते त्यांनी स्वतःही आपल्या जीवनात आणले. त्यांनी स्वतः मांसाहार बंद केला, शिकार बंद केली, जनतेलाही करणे भाग पाडले. प्रजेसाठी जे कायदे केले ते आपणावरही बंधनकारक आहेत हे स्पष्ट केले. यावरुनच तो कृतिशील सम्राट होता हे स्पष्ट होते.

**३) विजेता :-** अशोक विजेता सम्राट होता हे त्यांनी कलिंग जिंकून सिद्ध केले. कलिंग विजयाने मौर्यांच्या साम्राज्याला पूर्णत्व प्राप्त झाले. तो उत्तम सैनिक होता तसाच तो उत्तम सेनापती व योद्धाही होता. म्हणूनच भारतावर एक छत्री अमल त्याला प्रस्थापित करता आले. तक्षशिला, काश्मीर, कलिग युद्ध जिंकून आपण विजेता आहोत हे त्यांनी स्पष्ट केले.

**४) विद्या व कलेचा आश्रयदाता :-**अशोक विद्या व कलेचा आश्रयदाता होता. हे त्यांनी निर्माण केलेल्या शिलालेख, स्तंभलेख व स्तूपांवरुन स्पष्ट होते त्यांनी आपल्या राजवटीत विद्वानाना व बौद्ध आचार्यांना राजाश्रय दिला होता. त्यामुळे तो विद्या व कलेचा आश्रयदाता होता हे स्पष्ट होते.

**५) धर्मप्रसारक :-** बौद्ध धर्माचा स्विकार केल्यानंतर सम्राट अशोकाने या धर्माच्या प्रसारासाठी जातीने लक्ष घातले. त्याही पुढे जावून या धर्माच्या प्रसारासाठी आपली मुलगी व मुलगा या दोहोंना सोबत घेतले या व्यतिरिक्त या धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी आपली प्रशासनव्यवस्था राबविली. यावरुनच तो श्रेष्ठ प्रतिचा धर्मप्रसारक होता हे सिद्ध होते.

**६) परधर्मसहिष्णू सम्राट :-** अशोक परधर्मसहिष्णू सम्राट होता. कारण त्यांनी जरी बौद्ध धर्माचा स्विकार केला असला तरी त्यांनी इतर धार्मियांवर हा धर्म जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केला नाही किंवा त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने लादली नाही. यावरुनच तो परधर्मसहिष्णू सम्राट होता हे सिद्ध होते.

**७) मानवजातीचा मार्गदर्शक :-** सम्राट अशोक फक्त भारतवासीयांनाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीला मार्गदर्शक आहे. त्यांनी मानवतावादाचा पुरस्कार केला होता. स्वतःकडे सर्व सुख सोयी असूनही साधी राहणी व उच्च विचारसरणी हे जीवनसूत्र त्यांनी आंगीकारले होते. त्यांनी धार्मिक सहिष्णूतेबरोबरच, दया, दान, शुचिता, नैतिकता, आई-वडील व गुरुजनांबद्दलचा आदर या गोष्टींना महत्त्व दिले होते. म्हणूनच तो संपूर्ण मानवजातीचा मार्गदर्शक ठरतो.

पंडित जवाहरलाल नेहरुनी भारताचा शोध या ग्रंथात अशोकाबद्दल असे लिहिले आहे-

"अशोकाचे शिलालेख, स्तंभलेख माझ्याशी सुंदर भाषते बोलतात व अशा विभूतीची माहिती देतात की, जी विभूती सम्राट असूनही सम्राट किंवा राजापेक्षा श्रेष्ठ होती."

व्ही. ए. स्मिथ यांनी 'Early History of India' या ग्रंथात असे म्हटले आहे की "अशोक एकाच वेळी भिक्षूही होता व राजाही होता."

व्ही. ए. स्मिथ यांनी अशोकाच्या बाबतीत असेही म्हटले आहे की, "अशोक हा उत्तम प्रशासक नसता तर आज २००० वर्षानंतरही त्याचे नाव लोकांच्या स्मरणात राहिले नसते."

डॉ. एस. एन. सेन यांच्या मते, "अशोक हा चंद्रगुप्तासारखा पराक्रमी, समुद्रगुप्तासारखा अष्टपैलु व अकबराप्रमाणे धर्मनिष्ठ होता."

एच. जी. वेल्स यांनी त्यांच्या Outline of History मध्ये म्हटले आहे - "Ashoka was the greatest of the kings and that not because of the physical extent of his empire extensive as it was, but because of his character as a man, the ideas for which he stood and the principles by which he governed. As a king the ruled over the greatest empire known to Indian History."

डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, "Ashoka is one of the most remarkable Personalities in history of India. It is not every age it is not every nation, that can produce a king of this type Ashoka still remains without parallel in the history of world."

**आपली प्रगती तपासा**

१. अशोकाच्या कारकिर्दीचा आढावा तपासा.

---

---

---

---

## ५.४ मौर्य प्रशासन :-

प्राचीन भारतीय राजवटीतील मौर्यांचे साम्राज्य बलाढ्य होते. त्यांच्या राजवटीत भारतातील दक्षिणेतील व उत्तरेतील बराच प्रदेश त्यांच्या अमलाखाली होता. कौटिल्याच्या दंडनितीचा प्रभाव मौर्यांच्या प्रशासनावर होता. मौर्यांचे प्रशासन हे जरी राजकेंद्रित असले तरी ते जनकल्याणकारी होते. ते अत्यंत उत्कृष्ट व कार्यक्षम होते म्हणूनच चंद्रगुप्त मौर्याने भारतीय प्रशासन व्यवस्थेचा पाया घातला असे म्हटले जाते. चंद्रगुप्त मौर्याच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती मॅगेस्थेनीसच्या इंडिका व कौटिलयाच्या अर्थशास्त्र या ग्रंथांमध्ये उपलब्ध आहे.

मौर्यांचे प्रशासन हे पुढील भागात विभागले होते.

१) केंद्रिय प्रशासन
२) प्रांतीय प्रशासन
३) नगर प्रशासन
४) ग्राम प्रशासन

५) लष्करी प्रशासन
६) गुप्तचर प्रशासन
७) न्यायव्यवस्था
८) महसूल व्यवस्था
९) कालवे व पाटबंधारे विभाग
१०) लोककल्याण विभाग
११) धर्मपाल विभाग

## १) केंद्रिय प्रशासन :-

**१) राजा :-** मौर्याच्या केंद्रिय प्रशासन व्यवस्थेतील राजपद हे प्रमुख पद होते. या पदाकडे सर्वसत्ताधीशाचे अधिकार होते. साम्राज्याच्या सरसेनापती पदाचे व न्यायव्यवस्थेच्या केंद्रबिंदूचे अधिकार त्याच्याकडेच होते. साम्राज्यातील रुढी परंपराची व मंत्रिपरिषदेची बंधने या पदावर होती.

राजपदावर असणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारची कर्तव्य पार पाडावी लागत होती.

- जनतेचे संरक्षण करणे.
- साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे.
- जनतेच्या सुखी व समृद्ध जीवन जगण्यास हातभार लावणे.
- प्रशासनातील मुख्य अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे.
- अर्थखात्याच्या हिशेबाकडे पाहणे.
- परकीय देशात राजदूत पाठविण्याची व्यवस्था पाहणे.
- दुसऱ्या देशातून आलेल्या राजदूतांच्या भेटीगाठी घेणे.
- हेरखात्यामार्फत साम्राज्यांतर्गत व साम्राज्यबाह्य हालचालींची माहिती मिळविणे.
- शासनविषयक आज्ञापत्रे काढणे.
- युद्धप्रसंगी सैन्यांचे नेतृत्त्व करणे.
- सैन्य रचना सैन्य प्रशिक्षण व साम्राज्य संरक्षणाकडे लक्ष देणे.

मौर्य कालखंडातील केंद्रिय प्रशासनातील राजपद हे जरी अनियंत्रित व सत्ताकेंद्रिय असले तरी ते हिंदूधर्म व नितीशास्त्रा प्रमाणे होते जनकल्याणकारी होते.

**२) मंत्रिपरिषदः**

मौर्यांच्या केंद्रिय प्रशासनातील दुसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे मंत्रिपरिषद होय. राजपद जरी केंद्रस्थानी असले तरी हे पद संपूर्ण साम्राज्याकडे लक्ष देवू शकत नव्हते म्हणूनच राजपदाच्या मदतीसाठी मौर्य प्रशासनात मंत्रिपरिषदेची तरतूद करण्यात आली होती.

मंत्रिपरिषदेतील मंत्र्यांच्या नियुक्त्या स्वतः राजा करत असे. या पदांवर ज्या व्यक्ती नियुक्त होत असत त्या व्यक्ती अनुभवी विद्वान व प्रशासनाचे ज्ञान असणाऱ्या असत.

- साम्राज्याचे धोरण आखणे.
- लष्करी मोहिमांची आखणी करणे.
- साम्राज्याच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कार्याचे नियोजन करणे व या संदर्भात योजना आखणे.

वरील प्रकारची कामे मंत्रिपरिषदेला करावी लागत होती.
मौर्यांच्या मंत्रीपरिषदेतील मंत्री व त्यांच्या कामाबद्दलची संक्षिप्त माहिती –

**अ) मंत्री व पुरोहित** :- ही दोन्ही पदे मौर्यांच्या कालखंडात चाणाक्याकडे होती. परराष्ट्र धोरण, हेरांची नियुक्ती, आमात्याची निवड ही कामे या पदावर असणाऱ्या व्यक्तीला करावी लागत होती.

**ब) समाहर्ता** :- हे पद महसूल व्यवस्थेशी संबंधित होते महसूल जमा करण्याचे काम या मंत्र्याकडे होते. त्याच्या मतीस लुराध्यक्ष, शुल्काध्यक्ष, सिताध्यक्ष, पोताध्यक्ष हे अधिकारी असत.

**क) सन्निधाता** :- हे पद आर्थिक व्यवहाराशी संबंधीत होते. साम्राज्याचे अंदाजपत्रक तयार करणे, आयवयाच्या नोंदी ठेवणे ही कामे त्याला स्वतः करावी लागत होती. या कामी त्यास मदतनीस सहाय्यक असत.

**ड) सेनापती** :- हे पद लष्करीव्यवस्थेशी संबंधित होते. मौर्यांच्या प्रशासनात राजा हा जरी लष्करी व्यवस्थेचा सरसेनापती असला तरी लष्करव्यवस्थेचे प्रत्यक्ष काम पाहण्याची गरज उद्भवली होती त्यातून हे पद निर्माण करण्यात आले. या पदावर काम करणारा व्यक्ती युद्धशास्त्रात निपुण असे. शस्त्रास्त्रांची त्याला चांगली माहिती होती. राजकारणात व युद्धशास्त्रात मुत्सदी असणाऱ्या व्यक्तीची या पदावर नियुक्ती केली जात होती. राजाज्ञेनुसार साम्राज्य संरक्षण, साम्राज्यवाढ व सैन्यव्यवस्थापन इत्यादी कामे त्याला करावी लागत होती.

**इ) कर्मांतक** :- हे पद साम्राज्यातील शेती, जंगल, खाणी, उद्योगधंदे या कामकाजाशी संबंधित होते. या कामकाजाचे व्यवस्थापन व देखरेख ठेवण्याचे काम या मंत्र्याकडे होते.

**च) प्रशस्ता** :- हे पद साम्राज्यातील अभिलेखागाराशी संबंधित होते. साम्राज्यातील सर्वच विभागातील कागदपत्र सुव्यवस्थित ठेवण्याचे काम या पदावर काम करणाऱ्या मंत्र्याला करावे लागत असे. या अभिलेखागारात जे वेगवेगळे दालन होते त्यांना 'अक्षपटल' असे म्हटले जात होते.

**छ) अंतपाल** :- हे पद साम्राज्य सीमा संरक्षणाशी संबंधित असून या पदावर काम करणारा जो मंत्री होता त्याला परकीय आक्रमाणापासून आपल्या साम्राज्याच्या सीमा सुरक्षित कशा राखता येतील याची जबाबदारी सांभाळावी लागत होती.

**ज) दुर्गपाल :-** हे पद राजप्रसाद व राजपरिवार यांच्या निवासी व्यवस्थापनाशी संबंधित होते. राजा व त्याचा परिवार दुर्ग-प्रसादात राहत असे. म्हणूनच या पदाला दुर्गपाल असे नाव देण्यात आले. राजपरिवाराचे रक्षण व व्यवस्थापन ही महत्त्वाची दोन कामे या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला करावी लागत होती. त्याच्या मदतीस इतर मदतनीस असत.

**झ) नायक :-** हे पद सैन्यव्यवस्थेशी संबधित असून या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला सैन्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे व सैन्यांच्या छावण्यांची व्यवस्था पहाणे ही कामे करावी लागत होती.

**न) आन्तर्वशिक :-** हे पद राजाच्या शरीररक्षक दलाशी संबधित असून या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला राजसंरक्षणाची विशेष जबाबदारी सांभाळावी लागत होती.

**ट) पौर :-** हे पद साम्राज्यातील नगरांचे प्रमुख म्हणून जे व्यक्ती काम करत होते. त्या प्रमुखपदाशी संबधित आहे. या पदावर काम पाहणाऱ्या व्यक्ती त्या शासनव्यवस्थेच्या प्रमुख व सर्वोच्चअधिकारी असत. त्यांना नगर व्यवस्थापनाचे काम पहावे लागत असे.

**ठ) आमात्य :-** हे पद साम्राज्य निर्णय अंमलबजावणीशी संबधित असून या पदावर राजव्यवहारतज्ञ व न्याननिपुण व्यक्तींची नियुक्ती केली जात होती. आमात्यपदावर काम करणाऱ्या लोकांची पुढे प्रांताधिकारी, राज्यप्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली जात होती.

**ण) अध्यक्ष :-** हे पद प्रशासन प्रमुख पदाशी संबधित असून आजच्या शासन व्यवस्थेतील सचिवपदाशी हे पद मिळते जूळते आहे. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला प्रशासन सुयोग्य पद्धतीने चालवावे लागत असे.

**आपली प्रगती तपासा**

१. मौर्यांच्या केंद्रिय प्रशासनाची माहिती जाणून घ्या.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**२) प्रांतीय प्रशासन :-** मौर्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील दुसरा महत्त्वपूर्ण विभाग म्हणजे प्रांतीय प्रशासन होय. मौर्यांचे साम्राज्य बलाढ्य व विशाल होते. म्हणूनच मौर्यांने आपल्या साम्राज्य व्यवस्थापनाच्या सोयीसाठी प्रांतीय प्रशासन निर्माण केले होते. प्रांतीय प्रशासनातील जो प्रमुख अधिकारी असे त्याला प्रांताधिकारी असे म्हटले जात असे प्रांताधिकारी म्हणून शक्यतो राजघराण्यातील लोकांचीच नियुक्ती केली जात असे सम्राट अशोकाच्या शिलालेखात मौर्यांच्या प्रांतीय प्रशासन व्यवस्थेची माहिती आढळून आली आहे.

मौर्यानी आपल्या कारकिर्दीत साम्राज्य व्यवस्थापनासाठी आपल्या साम्राज्याचे एकूण पाच भागात विभाजन केले होते. या प्रांतीय पाच भागाची माहिति पुढील प्रमाणे आहे.

**अ) गृहराज्य :-** मौर्यांच्या प्रांतीय प्रशासनातील गृहराज्य हा एक प्रांत असून या प्रांताची राजधानी पाटलीपुत्र होती. या प्रांतात मगध व त्याच्या सभोवतालच्या प्रदेशाचा समावेश होतो.

**ब) उत्तरापथ :-** मौर्यांच्या प्रांतीय प्रशासनातील उत्तरापथ हा दुसरा महत्त्वपूर्ण भाग असून या प्रांताची सूवर्णगिरी ही राजधानी होती. या प्रांतात वायव्यकडील सरहद्दीच्या सर्व प्रदेशाचा समावेश होतो.

**क) दक्षिणपथ :-** मौर्यांच्या प्रांतीय प्रशासनातील दक्षिणपथ हा तिसरा महत्त्वपूर्ण भाग असून या प्रांताची सुवर्णगिरी ही राजधानी होती. या प्रांतात विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशाचा समावेश होतो.

**ड) अवंतीराष्ट्र :-** मौर्यांच्या प्रांतीय प्रशासनातील अवंतीराष्ट्र हा चौथा महत्त्वपूर्ण भाग असून या प्रांताची उजैन ही राजधानी होती. या प्रांतात गुजराथ, काठेवाड, राज्यस्थान व माळवा या प्रदेशांचा समावेश आहे.

**इ) सुराष्ट्र –** मौर्याच्या प्रांतीय प्रशासनातील सुराष्ट्र हा पाचवा महत्त्वपूर्ण भाग असून या प्रांताची राजधानी गिरनार होती.

प्रांताचा कारभार पाहणारा प्रांताधिपती अथवा प्रांताधिकारी असे. त्याच्या मदतीस महाभाग, रज्जूक, प्रादेशिक हे इतर अधिकारी असत. या व्यतिरिक्त प्रांतिक प्रशासनासाठी स्वतंत्र मंत्रीपरिषद असे. केंद्रिय प्रशासन व प्रांतीक प्रशासन यामध्ये समन्वय असे.

**आपली प्रगती तपासा**

१. मौर्याच्या प्रांतीय प्रशासनाची माहिति जाणून घ्या.

**३) नगर प्रशासन :-** मौर्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील तिसरा महत्त्वपूर्ण विभाग म्हणजे नगर प्रशासन होय. मौर्यांच्या नगर प्रशासनाची माहिती आर्य चाणक्य व मॅगेस्थेनीस यांनी लिहून ठेवली आहे. मौर्यांनी नगर प्रशासन व्यवस्थापन निर्माण करुन ती स्थानिक लोकांच्या हातात दिली होती. नगर प्रशासन सुत्रबुद्ध व सुनियोजित होते.

**नगराध्यक्ष :-** नगर व नगरप्रमुख म्हणून नगराध्यक्ष काम पाहत असे. तो नगर प्रशासनाचाही प्रमुख असे त्याच्या मदतीस नगरसेवक असत. नगराचा कार्यभार पुढील समित्यांद्वारे चालवला जात असे.

**अ) उद्योग व शिल्पकला समिती :-** मौर्यांच्या नगर प्रशासनातील या समित्या असून या समित्यांना नगरातील उद्योगधंदे, हस्तोद्योग व शिल्पकला व्यवसायावर देखरेख ठेवावी लागत होती. या समित्या उद्योगातून दर्जेदार उत्पादन होते की नाही, कामगारांना योग्य वेतन दिले जाते की नाही याकडे लक्ष देत असत.

**ब) जनगणना समिती :-** मौर्यांच्या नगर प्रशासनातील ही एक समिती असून या समितीला जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे, नगराच्या लोकसंख्येची गणना करणे ही कामे करावी लागत होती.

**क) वाणिज्य समिती :-** मौर्यांच्या नगर प्रशासनातील व्यापार घटकांशी संबंधित असणारी ही समिती असून या समितीला नगरातील विक्री व्यवस्था योग्य आहे की नाही सुयोग्य वजन मापांचा वापर होत आहे की नाही या कामांकडे लक्ष द्यावे लागत होते.

**ड) कर समिती :-** मौर्यांच्या नगर प्रशासनातील कर प्रणालीशी संबधित असणारी ही समिती असून या समितीला नगरातील खरेदी-विक्रीचा मालावर कर आकारण्याचा अधिकार होता.

**इ) उत्पादित माल समिती :-** मौर्यांच्या नगर प्रशासनातील उत्पादित मालावर देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने ही समिती निर्माण करण्यात आली होती. या समितीचे उत्पादन व विक्री यांचे नियमन करणे हे महत्त्वपूर्ण काम होते.

**प) विदेशी नागरिकांसाठी समिती :-** मौर्यांच्या नगरप्रशासनातील ही एक महत्त्वपूर्ण समिती असून या समितीला विदेशी राजदूत, विदेशी व्यापारी यांच्या निवासाची, भोजनाची व आदरतिथ्याची सोय करण्याचे काम करावे लागत होते.

**आपली प्रगती तपासा**

१. मौर्यांच्या नगर प्रशासनाची माहिती जाणून घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**४) ग्राम प्रशासन :-** मौर्य प्रशासनातील महत्त्वाचा घटक म्हणजे ग्राम प्रशासन होय. मौर्यांच्या प्रशासनात खेड्याला महत्त्वाचे स्थान होते. खेड्याच्या प्रमुखाला ग्रामिक असे म्हटलेजात होते.

अनुभवी व्यक्तीकडे हे पद दिले जात असे. ग्रामिकच्या मदतीला ग्रामसभा होती. खेड्याच्या प्रशासनासाठी ग्रामसभेला भरपूर अधिकार होते. शासनाकडून येणारे अनुदान व ग्रामातून मिळणाऱ्या उत्पन्नातून ग्रामाचा विकास केला जात असे.

**५) लष्करी प्रशासन :-** मौर्य प्रशासनातील लष्करी प्रशासन हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक होता. मौर्यांने जे विशाल साम्राज्य निर्माण केले, वाढविले, टिकविले ते केवळ सुनियोजित लष्करी प्रशासनाच्या जोरावरच. मौर्यांच्या लष्करी प्रशासनाचा राजा हा प्रमुख होता. राजास लष्करी प्रशासनात मदत करण्यासाठी तीन सदस्यंचे एक युद्धमंडळ होते. या युद्धमंडळाच्या एकूण सहा समित्या होत्या व प्रत्येक समितीत पाच सदस्य होते.

**अ) पायदळ समिती :-** मौर्यांच्या पायदळात ६ लक्ष पायदळ होते. पायदळातील सैनिंकाजवळ भाला, तलवार, धनुष्यबाण ही हत्यारे होती. या समितीला सैन्य भरती करणे, सैन्यांच्या खाण्याची व्यवस्था करणे, सैन्याना शस्त्रास्त्रे पुरविणे ही कामे करावी लागत होती.

**ब) घोडदळ समिती :-** मौर्यांच्या घोडदळात ३०,००० घोडे होते तेवढ्याच संख्येचे घोडेस्वार होते. तलवार, ढाल, भाले ही त्यांच्याकडे हत्यारे असत. सैन्यांची निवड, घोड्यांची निवड, घोड्यांची निगा, घोडस्वारांना प्रशिक्षण इत्यादी कामे या समितीला करावी लागत होती.

**क) हत्तीदळ समिती :-** मौर्यांच्या हत्तीदळात ३,००० हत्ती होते. राजा व नामांकित योद्धे युद्धप्रसंगी हत्तीदळाचा वापर करत असत. युद्ध साहित्याच्या वाहतुकीसाठी हत्तीचा वापर केला जात असे हत्तींची निगा राखणे, हत्तींना प्रशिक्षण देणे हे काम या समितीला करावे लागत असे.

**ड) रथदळ समिती :-** मौर्यांच्या रथदळात ८,००० रथ होते. रथांचा वापर युद्धप्रसंगी राजघराण्यातील प्रतिष्ठित योद्धे करत असत. रथ सुव्यवस्थित ठेवणे, रथ सर्व शस्त्रानिशी सुसज्य ठेवणे ही कामे या समितीला करावी लागत असत.

**इ) नाविकदल समिती :-** मौर्य प्रशासनाने नौदलाकडे लक्ष पुरविले होते. युद्धप्रसंगी नद्या ओलांडण्यासाठी आरमार लागत असे म्हणूनच मौर्याने नौका व जहाज बांधले होते. नद्या व समुद्रकिनारे यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी या विभागाकडे होती.

**प) रसद विभाग :-** मौर्यांच्या प्रशासनातील सैन्यांच्या भोजन व्यवस्थापनासाठी हा विभाग निर्माण करण्यात आला होता. भोजन व्यवस्थे व्यतिरिक्त या विभागाकडे सैन्याना वैद्यकीय व्यवस्था पुरविणे, सैनिकांना शस्त्रास्त्रे पुरविणे हे ही काम होते.

मौर्यांचे लष्करी प्रशासन कार्यक्षम, नियोजन बद्ध व युद्धतंत्राच्या दृष्टीने परीपूर्ण होते. हे त्यांनी उभारलेल्या बलाढ्य साम्राज्यावरुन स्पष्ट झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. मौर्यांच्या लष्करी प्रशासनाची माहिती जाणून घ्या.

---

---

---

---

**६) गुप्तचर विभाग :-** मौर्यांच्या प्रशासनातील गुप्तचर विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग होता साम्राज्यातील इत्थंभूत बातम्या काढून राजाला पुरविणे हे या विभागाचे महत्त्वपूर्ण काम होते. राजनिष्ठ प्रामाणिक व कार्यक्षम व्यक्तींची निवड या विभागाच्या कामासाठी केली जात असे. हे लोक राजनिष्ठ असल्याने या लोकांना राजगृहात केव्हाही प्रवेश मिळत असे. शत्रुंच्या हालचालींवर लक्ष, अधिकाऱ्यांच्या वर्तणूकीवर देखरेख व परकीयांच्या वास्तव्याची माहिती राजाला पोहचविणे ही कामेही या विभागाला करावी लागत होती.

**७) न्यायव्यवस्था :-** मौर्य प्रशासनातील न्यायव्यवस्था हा घटक न्यायदानाशी संबंधित होता. राजा हा या प्रशासन व्यवस्थेत सर्वोच्च न्यायाधीश असे अंतिम न्यायालयीन निर्णय हा राजाचा असे. सर्वच न्यायालयीन निवाड्याचे काम राजाला पहाणे शक्य नसल्याने न्यायव्यवस्थेसाठी अनेक मदतनीस न्यायाधीशांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. न्यायव्यवस्थेसाठी मौर्यांने आपल्या साम्राज्यात दिवाणी व फौजदारी न्यायालये, निर्माण केली होती. या दोन महत्त्वपूर्ण न्यायालयांव्यतिरिक्त धर्मशास्त्रीय न्यायालये व कंठशोधन न्यायालये अस्तित्त्वात होती. खेड्यात ग्रामन्यायालये अस्तित्त्वात होती. रुढी, पंरपरा, संकेत या अनुरोधाने न्यायदानाचे काम पार पाडले जात होते. या काळखंडात शिक्षेचे स्वरुप कठोर होते. हातपाय तोडणे, चेहरा विद्रुप करणे, फटके मारणे या सारख्या शिक्षा केल्या जात होत्या. अशोकाच्या कारकीर्दीत या शिक्षेचे स्वरुप सौम्य झाले होते.

**८) महसूल व्यवस्था :-** मौर्य प्रशासनातील महसूल व्यवस्था कार्यक्षम होती. या व्यवस्थेच्या नियोजनासाठी आर्य चाणक्याची मौर्यांना मदत झाली होती. कोणत्याही साम्राज्याचे उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण साधन हे महसूल असते याची जाणीव मौर्यांना होती. शेतसारा, वनकर, पिंजकर सेनाभक्तमकर या करातून महसूल जमा केला जात होता.

या व्यतिरिक्त वस्तूंच्या खरेदी-विक्रिवरील कर, अबकारी कर, वस्तूंच्या आयात निर्यात मालावरील कर, चाकपट्टी, व्यवसाय कर, बाजारकर, पाणीपट्टीकर, पूल कर, द्युतकर, इत्यादी कर मौय साम्राज्यात आकारले जात होते.

खंडणी, नजराणे, सरकारी जमिनी, जंगले, साधनसंपत्ती, गुप्तधन, खाणी आदीमार्गाने साम्राज्याला उत्पन्न मिळत असे. मौर्याकालखंडातील महसूल व्यवस्था कार्यक्षम असल्याने साम्राज्याचे उत्पन्न सतत वाढत होते सर्वत्र असणारी समृद्धी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

**९) कालवे पाटबंधारे विभाग :-** मौर्य प्रशासनातील कालवे पाटबंधारे विभागाची निर्मिती ही शेतीला पाणीपुरवठा व्हावा या उद्देशाने झाली होती. या उद्देशाला अनुसरून या विभागाने शेतीसाठी कालवे व पाटबंधारे तसेच विहिरी तलाव निर्माण केले होते. या विभागास शासनाकडून आर्थिक मदत मिळत असे.

**१०) लोककल्याण विभाग :-** मौर्य प्रशासनात जनहिताची कामे करण्यासाठी लोककल्याण विभाग निर्माण करण्यात आला होता. दळणवळण सुविधा, दवाखाने, धर्मशाळा निर्मिती ही या विभागाची मुख्य कामे होती.

**११) धर्मपाल विभाग :-** मौर्य राजवटीत अशोकाच्या कारकीर्दीत या विभागाची निर्मिती करण्यात आली होती. जनतेच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांना मदत करणे, धर्माच्या शिकवणीप्रमाणे त्यांच्याकडून आचरण करुन घेणे ही महत्त्वाची कामे या विभागाला करावी लागत होती.

## ५.५ सारांश

मौर्यांची प्रशासन व्यवस्ता कार्यक्षम होती मौर्यांनी या प्रशासन व्यवस्थेच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याची संकल्पना राबविली. आर्यचाणक्याच्या अर्थशास्त्रीय मताप्रमाणेच मौर्यांनी प्रशासन व्यवस्था निर्माण केल्याने ही प्रशासन व्यवस्थाता सुनियोजित व सुत्रबद्ध ठरली. पुरोगामी व जनकल्याणकारी प्रशासनव्यवस्था ठरली.

## ५.६ दिर्घोत्तरी प्रश्न

१. मौर्य साम्राज्य संस्थापक या नात्याने चंद्रगुप्त मौर्याची योग्यता स्पष्ट करा.
२. एक आदर्श राजकर्ता या नात्याने सम्राट अशोकाच्या कारकिर्दीचा आढावा घ्या.
३. अशोकाच्या धार्मिक कार्याची माहिती अचूक लिहा.
४. मौर्याच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती थोडक्यात लिहा.

❖❖❖❖

# ६

# मौर्योत्तर राजवट - शुंग - कुशाण - सातवहान (इ.स.पू. १८५ ते इ.स. ३२०)

**प्रकरणाची रचनाः**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ शुंग सत्ता
६.३ शुंग सत्तेचे उत्तराधिकारी
६.४ कुशाण सत्ता
६.५ सातवाहनसत्ता
६.६ सातवाहनकालीन सामाजिक जीवन
६.७ सातवाहन काळातील आर्थिक स्थिती
६.८ सातवाहनकाळातील धार्मिक परिस्थिती
६.९ सारांश
६.१० दिर्घोत्तरी प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये

- मौर्य उत्तर काळातील शुंग, कुशाण सत्तेचा अभ्यास करणे.
- सातवाहन काळातील वेगवेगळ्या राजकर्त्यांच्या कारकीर्दी जाणून घेणे.
- सातवाहन काळातील विविधांगी परिस्थितू जाणून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

मौर्य कालखंडात भारत राजकीय व प्रशासकीय दृष्ट्या एकछत्री अमलाखाली होता. चंद्रगुप्त, अशोक या सारख्या कर्तुत्वान राजकर्त्यांनी या राजवटीला वैभव संपन्न बनवले होते. मात्र त्यांच्या नंतरचे राजकर्ते दुर्बल व अकार्यक्षम निघाल्याने मौर्य साम्राज्याला उतरती कळा लागली व याच संधीचा फायदा घेऊन पुष्पमित्र शुंगाने मौर्यांचे साम्राज्य नष्ट करुन शुंग सत्तेची स्थापना केली. पुढे दक्षिण-उत्तर भारतात ज्या मौर्यात्तर काळातील सत्ता निर्माण झाल्या त्यांचा अभ्यास आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

## ६.२ शुंग सत्ता

**शुंग :-** शुंग हे प्राचीन ब्राह्मण वंशीय होते. या घराण्याचा संस्थापक पुष्यमित्र हा भारद्वाज गोत्री ब्राह्मण होता. शुंग राजाच्या नावात शेवटी मित्र ही संज्ञा आहे. यावरुन ते इराणी वंशाचे असावेत असेअनेक इतिहासकारांनी मत व्यक्त केले आहे. तथापि हे मत सर्वमान्य नाही. मौर्य राजवटीच्या आरंभीच्या काळात हे लोक विदिशा येथे राहत असावेत व ते मौर्यांचे पुरोहित होते. मात्र सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर वैदिक धर्माचे अनुयायी असणाऱ्या या लोकांना शास्त्राचा त्याग करावा लागला व शस्त्र स्विकारावे लागले. मात्र हे लोक मौर्यांच्या दरबारात कायम राहिले. मौर्यांच्या सैन्यात हे लोक सर्वप्रथम सहभागी झाले नंतर आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर मौर्यांच्या सैन्यात अधिकाराच्या जागा मिळविल्या. व मौर्याच्या दरबारात आपले स्वतंत्र वजन निर्माण केले.

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्याची सत्ता कमकुवत होण्यास प्रारंभ झाला. याच काळात परकीय आक्रमणाच्या रुपाने भारतावर नवीन संकट निर्माण झाले होते. याच काळात शुंग सेनापतीपदावर पोहचले होते. या काळात मौर्यांचा शेवटचा राजा बृहद्रथ हा विलासी व अकार्यक्षम होता. आपल्या सत्तेवर येणाऱ्या संकटांची त्याला जाण नव्हती. अचानक एक दिवस पुष्यमित्राने बृहद्रथास सैन्य परिक्षणासाठी बोलावून घेतले व तो बेसावध असताना त्याचा खून केला व मगधावरील मौर्यांची सत्ता नष्ट करुन शुंग घराण्याची संस्थापक ठरला.

**पुष्यमित्र शुंग :-** शुंग सत्तेचा संस्थापक समजल्या जाणाऱ्या पुष्यमित्राचा जन्म ब्राह्मण कुटुंबात झाला होता. तो हुशार होता. तो मौर्याचा सेनापती असल्या कारणे त्याला मौर्यसत्तेची पूर्ण माहिती होती. शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथ हा अकार्यक्षम व विलासी आहे. प्रजेच्या मनामध्ये त्याच्याबद्दल असंतोष आहे हे त्याला माहित होते. याच संधीचा फायदा घेऊन कपट नितीने बृहद्रथाचा त्याने खून केला व त्यांनी मौर्य सत्ता नष्ट करुन शुंगसत्ता प्रस्थापित केली. सत्ता प्रस्थापित केल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी सैन्यांचा पाठिंबा मिळविला व याच सैन्यांच्या मदतीने त्यांनी आपले साम्राज्य स्थिर केले.

**१) आसपासच्या प्रदेशांवर वर्चस्व :-**सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्यांची केंद्रियसत्ता कमकुवत झाली होती. याच संधीचा फायदा घेऊन मगधच्या आसपासच्या प्रदेशातील मांडलीक राजे स्वतंत्र झाले होते. या स्वतंत्र राजांवर आपले वर्चस्व निर्माण करणे आवश्यक आहे असे पुष्यमित्राला वाटत होते. म्हणून सर्वप्रथम पुष्यमित्राने प्राची, कोसल, वत्स, अवंती या राज्यांकडे आपले लक्ष केंद्रित करुन या राज्यांना पराभूत करुन या राज्यांवर आपले नियंत्रण प्रस्थापित केले.

**२) विदिशा येथे दुसऱ्या राजधानीची स्थापना :-**मगधाचा आसपासचा प्रदेश शुंग सत्तेच्या नियंत्रणाखाली आल्यानंतर पुष्यमित्र शुंगाने विदिशा येथे दुसऱ्या राजधानीची स्थापना केली व राजधानीचा कारभार आपला पुत्र अग्निमित्र याच्या स्वाधीन केला. या व्यतिरिक्त आकार-अवंतीचा राज्यकारभारही त्याच्याकडे सोपविला. त्याच्या या धोरणामुळे मगधाच्या आसपासच्या प्रदेशावर शुंगाचे नियंत्रण प्रस्थापित झाले.

**३) विदर्भाच्या प्रदेशावर नियंत्रण :-**मगधाच्या आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण प्रस्थापित केल्यानंतर पुष्यमित्राने आपले लक्ष साम्राज्यविस्ताराकडे केंद्रित केले व सर्वप्रथम विदर्भावर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. विदर्भावर बृहद्रथाचा मेहूणा यज्ञसेन राज्य करत होता. परिणामी त्याचे शुंगाबरोबर वितुष्ट येणे उचित होते. पुष्यमित्राने या मोहिमेची जबाबदारी आपल्या मुलावर म्हणजे अग्निमित्रावर सोपविली. अग्निमित्राने चाणक्य नितीचा वापर करत यज्ञसेन व त्याचा चुलतभाऊ माधवसेन या दोहोत संघर्ष लावून दिला. व माधवसेनेला मदत केली. शेवटी या संघर्षात पराभव नजरेसमोर दिसू लागल्याने यज्ञसेन अग्निमित्राला शरण आला. मग अग्निमित्राने विदर्भाचे राज्य या दोन भावामध्ये वाटून दिले या दोन्ही भावाने अग्निमित्राचे मांडलिकत्व मान्य केले. त्यामुळे विदर्भाचा प्रदेश शुंग सत्तेच्या नियंत्रणाखाली आला.

**४) पश्चिमेकडील प्रदेशावर नियंत्रण :-** विदर्भाच्या प्रदेशावर नियंत्रण प्रस्थापित झाल्यानंतर पुष्यमित्र शुंगाने आपली लक्ष पश्चिमेकडील प्रदेशांकडे केंद्रित केले. व पश्चिमेकडील प्रदेश जिंकण्यासाठी मोहिम हाती घेतली. या मोहिमेत त्यांनी सियालकोट पर्यंतचा प्रदेश ताब्यात घेत पश्चिमेकडील प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. व या मोहिमेत प्राप्त झालेले प्रदेश आपल्या आठ मुलांमध्ये वाटून या प्रदेशांची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली.

**५) पाटलीपुत्र येथे राजधानी :-** पुष्यमित्र शुंगाने साम्राज्यविस्तार केल्यानंतर तो पाटलीपुत्र येथे आला. व पाटलीपुत्र हे मुख्य राजधानीचे ठिकाण ठेवून या ठिकाणाहूनच तो साम्राज्याचा कारभार पाहू लागला.

**६) ग्रीकांच्या आक्रमणाला विरोध :-** मगधाची सत्ता पुष्यमित्राने जरी घेतली असली तरी ती आरंभी कमजोर आहे याची जाणीव ग्रीकाना होती. म्हणूनच ग्रीकानी माध्यमिका, (चितोडजवळ असलेले शहर) साकेत (अयोध्य) या शहरांना वेढा दिला होता. तसेच गंगा-यमुना दुआब व पाटलीपुत्र पर्यंत धडक मारली होती. मात्र या ग्रीक आक्रमकांचा पुष्यमित्र शुंगाने पराभव करुन यांना भारतातून बाहेर पाठविले होत.

ग्रीक आक्रमक कोण होते या बाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. काहींच्या मते, डिमेट्रिअसच्या नेतृत्त्वाने ग्रीकाने भारतावर आक्रमण केले होते तर काहीच्या मते, मिनॅडरच्या नेतृत्त्वाने ग्रीकाने भारतावर आक्रमण केले. मात्र या आक्रमकांचा मोठा पराभव पुष्यमित्राने केला होता हे मात्र सत्य आहे. दिव्यावदान हा बौद्ध ग्रंथ व तिबेटी इतिहासकार तारानाथ याच्या इतिहासामधून या मताला आधार मिळतो.

**७) अश्वमेध यज्ञ :-** पुष्यमित्राने मौर्य सत्ता नष्ट करुन मगधावर शुंग सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यांनी उत्तर व दक्षिण भारतातील काही प्रदेशांवर विजय मिळवला होता. तसेच मगधाच्या आसपासचे प्रदेश जिंकून पुन्हा मगधाचे साम्राज्य बलवान बनविले होते. तसेच आपल्या सत्तेला श्रेष्ठ सत्तेतचे स्थान मिळवून दिले होते. तसेच ग्रीकांच्या आक्रमाणाला चोख उत्तर देत, त्यांच्यावर विजय मिळवत त्याना भारताच्या सिमेपलीकडे पाठविले होते या सर्व विजयाचे प्रतीक म्हणून त्याने अश्वमेध यज्ञ केला होता. काही विचारवंतांच्या मते त्यांनी दोन अश्वमेध यज्ञ केले होते. पुष्यमित्राने केलेल्या अश्वमेध यज्ञाची माहिती मालविकाग्निमित्र ग्रंथात

आहे. अयोध्य येथे आढळलेल्या शिलालेखात पुष्पमित्राने दोनवेळा अश्वमेध यज्ञ केला होता असा उल्लेख आहे.

**८) वैदिक धर्माचा पुरस्कर्ता :-** शुंग हे सर्व प्रथम मौर्य सत्तेत पुरोहित होते. वैदिक धर्माचे ज्ञान देणे हे त्यांचे काम होते. मात्र अशोकाने बौद्ध धर्म स्विकारल्याने वैदिक ज्ञान देण्याचे कार्य त्यांचे खंडीत झाले. परिणामी ते सैनिकी व्यवस्थेकडे गेले व त्या क्षेत्रात प्रगती केली. त्याच्याच पैकी पुष्पमित्र या नेतृत्त्वाने पुढे मौर्य सत्ता नष्ट केली. परिणामी शुंगाना वैदिक संस्कृतीची जाणीव होती. म्हणूनच पुष्पमित्रानेही सत्तेवर येताच वैदिक धर्माला राजाश्रय देत या धर्माचा पुरस्कार केला. वैदिक धर्मातील यज्ञीय परंपरेचे पुनरुज्जीवन केले. वैदिक धर्मातील आचार-विचार परंपराना महत्त्व दिले.

**९) पुष्पमित्राच्या कार्याचे मूल्यमापन :-**

**१) स्वतंत्र सत्ता संस्थापक :-** पुष्पमित्र शुंगाने मौर्य सत्तेचा शेवट करुन शुंगाच्या स्वतंत्र सत्तेचा पाया स्वकर्तृत्वाच्या जोरावर घातला होता यावरुनच तो स्वतंत्र सत्ता संस्थापक होता हे आपणास मान्य करावे लागेल.

**२) उत्तम सेनापती :-** पुष्पमित्र आरंभी मौर्यांच्या सत्तेत साधा सैनिक होता. नंतर तो मौर्यांचा सेनापती बनला. सेनापती या नात्याने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. नंतर मौर्यसत्तेच्या कमजोर परिस्थितीचा फायदा घेत त्यांची राजवट उळथून आपली स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली यावरुनच तो उत्तम सेनापती होता हे सिद्ध होते.

**३) श्रेष्ठ राजकर्ता :-** मगधावर शुंग राजकर्त्यांनी ११२ वर्षे राज्य केले. या घराण्यात एकूण १० राजकर्ते होऊन गेले. मात्र या राजकर्त्यापैकी सर्वश्रेष्ठ राजकर्ता म्हणून पुष्पमित्र शुंगाचे नाव घेतले जाते. या राज्यकर्त्यापेक्षा सर्वाधिक राजवट ही पुष्पमित्र शुंगाची आहे ती म्हणजे ३३ वर्षीय राजवट होय. त्यांनी आपल्या राजवटीत देशांतर्गत साम्राज्यविस्तार केला त्याच बरोबर ग्रीकांच्या आक्रमाणालाही सडेतोड उत्तर दिले त्यामुळे तो श्रेष्ठ राजकर्ता होता हे सिद्ध होते.

**४) उत्तम साम्राज्य विस्तारक :-** पुष्पमित्र शुंगाचे नव साम्राज्य तर निर्माण केले होतच पण त्याही पलीकडे जाऊन त्यानी आपले साम्राज्य वाढविण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. त्याने त्याच्या कारकिर्दीत मगध साम्राज्याच्या सीमा पूर्वेला मगधापासून पश्चिमेस सियालकोट पर्यंत व उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस विदर्भापर्यंत विस्तारित कलेचा होत्या. त्यामुळे तो उत्तम साम्राज्यविस्तारक होता हे सिद्ध होते.

**५) वैदिक धर्माचा पुनरुज्जीवनकर्ता :-** पुष्पमित्र शुंगाने वैदिक धर्माला राजाश्रय दिला होता. तो वैदिक धर्माचा अनुयायी होता. म्हणूनच या धर्माचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. पुष्पमित्राने आपल्या राजवटीत वैदिक धर्म-परंपरा-आचार-विचार यज्ञविधी या सर्व बाबींना आपल्या राजवटीत महत्त्व दिले. परिणामी हा धर्म त्याच्या राजवटीत वाढला. त्यामुळेच या धर्माला महत्त्व प्राप्त झाले.

वैदिक धर्म वाढवत असताना बौद्ध भिक्षूंचा छळ केला, विहार उद्ध्वस्त केले या पाठीमागे धार्मिक कारणापेक्षा राजकीय कारण असावीत असे मत सुप्रसिद्धा इतिहासकार टार्न यांनी व्यक्त केले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. पुष्पमित्र शुंगाच्या राजवटीची माहिती जाणून घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६.३ शुंग सत्तेचे उत्तराधिकारी

शुंग सत्तेचा संस्थापक व शुंग सत्तेतील सर्वश्रेष्ठ राजकर्ता म्हणून पुष्पमित्र शुंगाकडे पाहिले जाते. पुष्पमित्राच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अग्निमित्र सत्तेवर आला. तो युवराज असतानाच त्यांनी विदर्भातील प्रदेश जिंकला होता. त्या बद्दलची माहिती उपलब्ध आहे. मात्र राजा म्हणून त्याच्या कारकीर्दीबद्दलची माहिती उपलब्ध नाही. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा बंधू जेष्ठमित्र सत्तेवर आला त्याच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत. त्याच्या मृत्यूनंतर अग्निमित्राचा मुलगा वस्तूमित्र सत्तेवर आला. तो शूर होता त्यांनी आपल्या आजोबाच्या कारकीर्दीत ग्रीकांचा पराभव केला होता. मात्र त्याबद्दलची जास्त माहिती उपलब्ध नाही. त्याच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत. या तीन राजकर्त्या व्यतिरिक्त या घराण्यातील शुर व पराक्रमी राजकर्ते नव्हते. या घराण्यातील नववा राजा भागभद्र किंवा भागवत हा होता. त्याच्या नंतर सत्तेवर आलेला राजा कार्यक्षम नसल्याने व स्त्रिलंपट तसेच व्यसनी असल्याने त्याच्या साम्राज्या सभोवताली शत्रू वाढले याची त्याला जाणीव नव्हती. अशातच त्याचा मंत्री वसुदेव याने त्याला ठार मारले. व शुंगाची मगधावरील सत्ता नष्ट करुन कण्वांची सत्ता प्रस्थापित केली.

## ६.४ कुशाण सत्ता

मौर्य सत्तेच्या अस्तानंतर भारत सुमारे ५०० वर्षे अस्थिर होता. अशाच परिस्थितीत भारतावर ग्रीक, शक, कुशाण या परकीय सत्तानी भारतावर हल्ले चढवून आपल्या राजवटींची स्थापना केली होती. मात्र कुशाण परकीय असूनही त्यांच्या राजवटीला भारताच्या राजकीय व सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कारण कुशाण सत्ताधीशाने भारतीय धर्म, कला, स्थापत्य, साहित्य व प्रशासन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. या कुशाण सत्ताधीशानी पश्चिम आशिया व उत्तर भारतात फार मोठे साम्राज्य निर्माण केले होते. गांधार कलाशैलीचा जन्म हे कुशाणांचे भारतीय संस्कृतीला मोठे योगदान आहे.

**कुशाण कोण होते?**

कुशाण ही चीनमधील यु-चिन्ह टोळ्यांपैकी एक टोळी होती. ती चीनच्या वायव्य भागात वास्तव्य करत होती. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकात या टोळीला हुंगानी या भागातून हुसकावून लावले. या टोळीतील निम्मे लोक तिबेटमध्ये तर निम्मे लोक शकांच्या पश्चिमेकडील प्रदेशामध्ये सहभागी झाले परंतू पुढे शकांच्या प्रदेशावरही हुणांनी आक्रमण केल्याने या टोळीला शकांचा प्रदेश सोडवा लागला. परिणामी इ.स.पूर्व १४० मध्ये हे लोक ग्रीकांच्या प्रदेशात म्हणजे भारताच्या वायव्य सरहद्दीच्या प्रदेशात आले. येथे या लोकांच्या यु-चिन्ह टोळीचा संघर्ष शकांबरोबर झाला. शकानी मोठा संघर्ष लढा देऊनही या टोळीपुढे त्यांचा निभाव लागला नाही. परिणामी या टोळीने आपली भटकी अवस्था सोडून स्थिर राज्य निर्माण करण्यास प्रारंभ केला. या टोळीतील यु-चिन्ह ही जी टोळी होती. त्या टोळीला कुशाण हे नाव देण्यात आले.

**कुशाण वंशातील प्रमुख राजे :-**

**१) कुजूल कॅडफिसस (इ.स. १५ ते ६५) :-**

हा कुशाण वंशातील पहिला ज्ञात राजा होता. त्यांनी सर्व कुशाण टोळ्यांना संघटीत करुन बॅक्ट्रेलियागतच्या भूप्रदेशात आपले साम्राज्य स्थापन केले होते. त्याने आपल्या कारकिर्दीत ग्रीकांचा पराभव करुन ग्रीकांची सत्ता नष्ट केली होती. ग्रीकांची सत्ता नष्ट करुन काबुल आपल्या साम्राज्याला जोडला होता. ग्रीकांव्यतिरिक्त त्यांनी पर्शियन लोकांचा पराभव केला होता. भारतावर आक्रमण करण्याचा त्याचा विचार होता. परंतु इ.स. ६५ मध्ये तो मृत्यू पावला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत स्वतःला महाराज, राजाधिराज या पदव्या लावल्या होत्या. त्यांनी आपल्या कारकीर्दीत कुशाणांची सत्ता सिंधू नदीपर्यंत पोहचविली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत तांब्याची नाणी पाडली होती. त्यांनी आपल्या नाण्यावर महाराजाधिराज बिरुद कोरले आहे. या बिरुदा व्यतिरिक्त त्याच्या नाण्यांवर बैल, उंट व सैनिक यांची चित्रे कोरल्याचे आढळून आले आहे.

**२) विम कॅडफिसस (इ.स. ६५ ते इ.स. ७८) :-**

हा कुजूल कॅडफिससचा मुलगा. कुजूल कॅडफिससच्या मृत्यूनंतर तो कुशाणांच्या सत्तेवर आला होता. त्यांनी संपूर्ण उत्तर भारतावर कुशाणांची सत्ता प्रस्थापित केली होती. त्यांनी भारताबाहेर खोतान, कारागर येथे सत्ता प्रस्थापित केली होती. येथील राजकर्त्यांनी त्याची सत्ता मान्य केली होती. विम कॅडफिससने चिनवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला होता. त्यात त्याला अपयश आले. कुशाणांचे साम्राज्य त्यांनी वैभवसंपन्न व समृद्ध बनविले होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सोन्याची नाणी पाडली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत पूर्वेकडील देशांबरोबर व्यापारी संबंध जोडले होते. त्याच्या काळात कुशाणांची भारतीयकरण होण्याची प्रतिक्रिया गतीमान झाली होती. त्यांनी स्वतःला महाराज, माहेश्वर, राजाधिराज या पदव्या लावल्या होत्या. त्याच्या नाण्यांवर त्यांनी शिव व शिवलिंगाच्या प्रतिमा कोरल्या होत्या यावरुन असे स्पष्ट होते की त्याच्यावर भारतीय रुढी परंपरांचा पगडा होता. त्याच्या कारकिर्दीत कुशाणाने भारतीय संस्कृती आत्मसात करण्यास सुरुवात केली होती.

**३) सम्राट कनिष्क (इ.स. ७८ ते इ.स. १०१) :-**

कुशाण साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ सम्राट म्हणून कनिष्काकडे पाहिले जाते. विम कॅडफिससच्या मृत्यूनंतर त्याच्या सरदारांमध्ये वारसाबद्दल संघर्ष सुरु झाला. या संघर्षात

मथुरेचा सरदार कनिष्क विजयी झाला. व तो कुशाणां सत्तेचा सत्ताधीश बनला. कनिष्कांने सत्ता हस्तगत केल्यानंतर सर्वप्रथम आपली अंतर्गत सत्ता स्थिर केली. नंतर त्यांनी आपले साम्राज्य वाढावे या उद्देशाने साम्राज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले.

**अ) कनिष्काचा साम्राज्य विस्तार :-**

**१) काश्मीर विजय :-** कनिष्काने राज्यारोहनानंतर सर्वप्रथम आपले लक्ष काश्मीरवर केंद्रित केले व काश्मीरवर आक्रमण करुन काश्मीर जिंकले. काश्मीर जिंकल्यानंतर काश्मीर विजयाची आठवण रहावी म्हणून त्यांनी काश्मीरमध्ये त्यांनी कनिष्कपूर नावाचे एक शहर वसवले. ते शहर आजही कानसपूर नावाने ओळखले जाते. काश्मीरचा इतिहास लिहणाऱ्या कल्हणाने आपल्या राजतरंगिणी या ग्रंथात कनिष्काच्या काश्मीर विजयाचा वृतांत लिहला आहे.

**२) मगध विजय :-** काश्मीर जिंकल्यानंतर कनिष्काने मगध जिंकण्याचा निर्णय घेतला. मात्र कनिष्काने मगध साम्राज्यावर आक्रमण केले होते किंवा नाही किंवा मगध साम्राज्य जिंकले होते किंवा नाही या बाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. मात्र 'बुद्धचरित' लिहणारा अश्वघोष पाटलीपुत्रचा रहिवासी होता. कनिष्काने या आक्रमण प्रसंगी त्याला आपल्या बरोबर नेले होते. पुढे हाच अश्वघोष कनिष्काच्या दरबारात होता. यावरुनच कनिष्काने मगध वियज संपादन केला होता असा निष्कर्ष निघतो.

**३) मध्य व पश्चिम आशिया प्रदेशांवरील विजय :-** मगध साम्राज्य जिंकल्यानंतर कनिष्काने आपले लक्ष मध्य व पश्चिम आशियातील महत्त्वाच्या प्रदेशांकडे केंद्रित केले. व त्यांनी या साम्राज्यातील कारागर, थारकंद, खोतान, काबुल व बॅक्ट्रिया हे प्रदेश जिंकले. या परिसरात जी उत्खननातून नाणी सापडली आहेत ती कनिष्काने निर्माण केली होती हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. यावरुनच हे प्रदेश त्यांनी जिंकले होते हे सिद्ध होते.

**४) माळवा :-** कनिष्काने साम्राज्यविस्ताराचा एक भाग म्हणून माळव्यावर आक्रमण करुन माळवा जिंकून माळव्यावर आपली अधिसत्ता प्रस्थापित केली होती.

**५) सौराष्ट्र :-** माळवा जिंकल्यानंतर कनिष्काने सौराष्ट्रवर आक्रमण करुन सौराष्ट्र ताब्यात घेतले.

**६) राजपुताना:-** सौराष्ट्र जिंकल्यानंतर कनिष्काने आर्थिकदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या राजपुतानाकडे लक्ष केंद्रित केले व राजपुताना जिंकुन आपल्या ताब्यात घेतला.

७) वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, पंजाब, उत्तर प्रदेश हे प्रदेशही कनिष्काच्या ताब्यात होते हे तेथे सापडलेल्या नाण्यावर सिद्ध झाले आहे.

**८) चीन :-** चीनने पॅन-चाऊ या सेनापतीच्या नेतृत्वाखाली कनिष्काविरुद्ध आघाडी उभारली होती. ही आघाडी रद्द करावी यासाठी कनिष्काने आपला दूत चिनला पाठविला होता. मात्र चिनने या दूताला अटक करुन कनिष्काविरुद्ध मोहिम आक्रमक बनवली परिणाम संघर्ष अटल होता. पुढे दोहोत संघर्ष झाला. या संघर्षात कनिष्क पराभूत झाला. युद्धातील पराभवामुळे कनिष्काला चीनला खंडनी द्यावी लागली. पण पुढे पॅन-चाऊचा मृत्यू झाला. त्याच्या जागी

त्याचा पुत्र पॅन-यॉंग हा सेनापती झाला. याच संधीचा फायदा घेवून कनिष्काने चीनवर हल्ला करुन त्याला पराभूत केले व चीनला देण्यात येणारी खंडणी बंद केली. एकंदरीत चीन मोहिमेत कनिष्काला मोठा लाभ झाला. तसेच त्याची राजकीय प्रतिष्ठा वाढली.

**९) पर्शियन व शकांचा बिमोड :-** कनिष्क भारताबाहेर साम्राज्य विस्तार करण्यात गुंतला असताना पर्शियन व शकांनी त्याच्या साम्राज्यावर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. मात्र या बाबीकडे कनिष्काने तातडीने लक्ष घालून त्यांना युद्ध संघर्षाने पराभूत केले.

**१०) पुरुषपूर (पेशावर) :-**कनिष्काने पेशावर जिंकून ते आपल्या राजधानीचे स्थळ बनविले. कनिष्काच्या एकूण साम्राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी हे स्थळ होते.

**ब) कनिष्काची प्रशासन व्यवस्था :-**कनिष्काने जे विशाल साम्राज्य निर्माण केले होते ते साम्राज्य चालविण्यासाठी प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. सारनाथ येथील शिलालेखावरुन कनिष्काच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती समजते. कनिष्काने आपल्या साम्राज्य प्रशासनाच्या सोयीसाठी प्रांतात विभागले होते. प्रत्येक प्रांतावर क्षत्रप व महाक्षत्रप असे अधिकारी नियुक्त केले होते तसेच प्रत्येक प्रांतात क्षत्रप महाक्षत्रपांच्या मदतीला दंडनायक व महादंडनायक हे अधिकारी असत. नागरी प्रशासनासाठी वंशीय शक व क्षत्रपभूमक हे काम पहात असत. प्रशासनातील महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या या कुशाण लोकांनाच देण्यात आल्या होत्या. नगर प्रशासनाबरोबरच स्थानिक प्रशासन सुद्धा प्रचलीत होते. या प्रशासनाच्या जबाबदाऱ्या स्थानिक लोकांना देण्यात आल्या होत्या. एकंदरीत प्रशासनाचा विचार करता कनिष्काचे प्रशासन हे प्रशासकीय दृष्ट्या सुत्रबद्ध होते.

**क) कनिष्काचे धार्मिक धोरण :-** सम्राट कनिष्क हा धर्म-सहिष्णू सम्राट होतो. त्यांनी जरी बौद्ध धर्म स्विकारला असला तरी त्याच्या राजवटीत इतर धर्मियांना धार्मिक स्वातंत्र्य होते. स्वतः त्यांनी जी नाणी निर्माण केली होती त्या नाण्यावर आपल्या कारकिर्दीत हिंदू व बौद्ध देव देवतांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. यावरुन तो सर्व धर्मियांचा व धर्मांचा आदर करणारा होता हे सिद्ध होते.

त्याने जो बौद्ध धर्म स्विकारला तो आपल्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात स्विकारला असावा असा जाणकारांचा अंदाज आहे. अश्वघोशाच्या प्रभावाने त्यांने बौद्ध धर्म स्विकारला असावा असा अंदाज आहे. सम्राट कनिष्काने बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर ज्याप्रमाणे या धर्माच्या प्रसारासाठी सम्राट अशोकाने प्रयत्न केले. तशाच प्रकारचे प्रयत्न कनिष्काने केले. पुढील प्रकारचे प्रयत्न कनिष्काने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी केले.

१) बौद्ध विहारांची डागडुजी केली.
२) बौद्ध चैत्य व विहार नव्याने बांधले.
३) पेशावर येथील जगप्रसिद्ध ४०० फुट उंचीचा व १३ मजले असणारा लाकडी विहार बांधला.
४) बौद्ध संघाना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली.
५) जपान, तिबेट, चीन व मध्य अशियात बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी धर्मप्रसारक पाठविले.
६) सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या असंख्यमूर्ती वेगवेगळ्या प्रदेशात आपल्या कारकिर्दीत निर्माण केल्या.
७) प्रसिद्ध बौद्ध भिक्षूक अश्वघोष, नागार्जुन, वसुमित्र व पार्श्वनाथ यांना राजाश्रय दिला.

**बौद्ध धर्मपरिषदेचे आयोजन :-** सम्राट कनिष्काने आपल्या कारकिर्दीत चौथ्या बौद्ध धर्मपरिषदेचे आयोजन केले होते. या परिषद आयोजनापाठीमागचा त्याचा उद्देश बौद्ध धर्मातील मतभेद मिटविणे व बौद्ध धर्म तत्त्वांविषयी चर्चा करणे हा होता. या बौद्ध धर्मपरिषदेसाठी ५०० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेचे अध्यक्षपद वसुमित्र याच्याकडे तर उपाध्यक्षपद अश्वघोष यांच्याकडे होते. या परिषदेत पुन्हा एकदा बौद्ध धर्माबद्दल सविस्तर चर्चा झाली. चौथ्या बौद्ध धर्म परिषदेला भारतीय इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कारण या परिषदेत बौद्ध धर्मातील महायान पंथाचा उदय झाला.

**ड) कलेचा आश्रयदाता :-**सम्राट कनिष्काने ज्या कलेला आश्रय दिला, उत्तेजन दिला ती कला कुशाण कला किंवा गांधार कला शैली या नावाने प्रसिद्ध आहे. या कलेची लक्षणे जरी ग्रीक असली तरी या कलेचा मूळ पाया मात्र भारतीय आहे. गांधार कलाशैली हे कनिष्काने भारती कलेला दिलेले फार मोठे योगदान आहे.

**विद्या व विद्वानांचा भोक्ता :-**कनिष्क विद्या व विद्वानांची कदर करणारा होता. तो संस्कृतचा गाढा अभ्यासक होता. त्यामुळे कनिष्काच्या काळात संस्कृत वाङःमयात खूप भर पडली. खालील विद्वानाना त्यांनी आपल्या कारकीर्दीत राजाश्रय दिला होता.

१) अश्वघोष – तत्वज्ञ, नाटकार, कवी-बुद्धचरित व सूत्रालंकार या ग्रंथाचा निर्माता.
२) नागार्जुन – तत्वज्ञ, वैज्ञानिक
३) वसुमित्र – साहितीक-'महाविभाषशास्त्र' ग्रंथाचा निर्माता
४) चरक – आयुर्वेदाचा मेरुमणी
५) माथर – राजनितीतज्ञ
६) अगलिसला – ग्रीक इंजिनीअर

या माहितीवरुन हे सिद्ध होते की कनिष्क हा विद्या व विद्वानांचा भोक्ता होता.

**कनिष्काची योग्यता :-**

**१) एक श्रेष्ठ राजकर्ता :-** कनिष्क हा कुशाण राजवटीतील एक श्रेष्ठ राजकर्ता होता. कारण त्यांनी स्वकर्तृत्वाच्या जोरावर उत्तर भारत, पश्चिम भारत व मध्य आशियातील बरेच प्रदेश जिंकले होते व त्या ठिकाणी आपली सत्ता निर्माण करुन टिकविली होती.

**२) एक श्रेष्ठ सेनापती :-** कनिष्काने आपल्या साम्राजविस्तारासाठी जे जे प्रदेश जिंकले त्यावरुन तो उत्तम सेनापती होता हे नाकारता येणार नाही हे त्यांनी चीनवर मिळविलेल्या विजयातून स्पष्ट होते.

**३) उत्तम प्रशासक :-** कनिष्काने आपली स्वतःची प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. केंद्र, प्रांत, नगर व स्थानिक अशा रचनेतून ही प्रशासनव्यवस्था त्यांनी निर्माण केली होती. त्यामुळे तो उत्तम प्रशासन निर्माता व प्रशासक होता हे आपणास नाकारता येणार नाही.

**४) धर्म सहिष्णू सम्राट :-** कनिष्काने जरी आपल्या कारकिर्दीत बौद्ध धर्म स्विकारला असला तरी इतर धर्मियांच्या बाबतीत त्यांनी कोणत्याही प्रकारचे अन्यायकारक धोरण अवलंबिले नाही. उलट त्यांना त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले. म्हणजेच तो धर्मसहिष्णूसम्राट होता हे नाकारता येणार नाही.

**५) लोककल्याणकारी राजा :-** कनिष्काने आपली राजवट जनकल्याणासाठी राबविली म्हणून तो जनकल्याणकारी राजा होता हे स्पष्ट होते.

**६) कलेचा आश्रयदाता :-**कनिष्काने ज्या कलेला आश्रय दिला होता ती कला म्हणजे कुशाण कला किंवा गांधारशैली या कलेचा मूळ पाया भारतीय असल्या कारणे पुढे या कलेला भारतात मानाचे स्थान प्राप्त झाले.

**७) विद्वानाचा आश्रयदाता :-**कनिष्काने आपल्या कारकीर्दीत नागार्जुन, वसुमित्र, चरक, माथर, अगलिसला, अश्वघोष या विद्वानाना राजाश्रय दिला होता. या वरुनच तो विद्वानांचा आश्रयदाता होता हे स्पष्ट होते.

**८) बौद्धधर्माचा आश्रयदाता :-**कनिष्काने आपल्या कारकिर्दीत बौद्धधर्माचा स्विकार केला. हा धर्म वाढविण्यासाठी धर्मपरिषद आयोजन, विहार निर्मिती, आर्थिक मदत, व धर्मप्रसारासाठी प्रशासकीय यंत्रणा राबविली. या धर्माला राजाश्रय दिला. या सर्व बाबीतून असे स्पष्ट होत की कनिष्क बौद्धधर्माचा आश्रयदाता होता.

**९) योग्यतेबाबत इतिहासकारांची मते :-**

१) "सर्व कुशाण सम्राटांमध्ये कनिष्क हा महान सम्राट होता. त्याच्या व्यक्तीमत्त्वात चंद्रगुप्त मौर्यासारखी पराक्रमी वृत्ती व अशोकासारखी धर्मप्रसाराची इर्षा दडली होती. तो एक श्रेष्ठ विजेता व बौद्ध धर्माचा आश्रयदाता होता." – डॉ. रामशंकर त्रिपाठी.

२) "भारतातील गुप्तांच्या सुवर्ण युगाचा पाया कनिष्काने घातला, त्याच्या कारकीर्दीत कुशाण सत्तेने वैभवाचे शिखर गाठले होते." – डॉ. मोरवंचीकर.

३) "The Kushan empire reached its Zenith during the reign of kanishka whose rule lasted for 23 years." – Chatoppadhya.

**आपली प्रगती तपासा**

१. सम्राट कनिष्काची राजवट जाणून घ्या.

## ६.५ सातवाहन सत्ता

मौर्योत्तर काळात ज्या प्रमाणे उत्तर भारतात ज्या काही प्रभावी घराण्याचा उदय झाला त्याचप्रमाणे दक्षिण भारतातही अशा प्रकारच्या घराण्यांचा उदय झाला होता. त्याच पैकी एक घराणे म्हणजे आंध्र किंवा सातवाहन घराणे होय. सातवाहन हा महाराष्ट्रातील पहिला ज्ञांत राजवंश मानला जातो. इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३० असा या राजवंशाचा कालखंड मानला जातो. मौर्य राजवटीला जेवढे उत्तर भारतात महत्त्वाचे स्थान होते तेवढे महत्त्वाचे स्थान दक्षिण भारतात सातवाहनांच्या राजवटीला होते. सातवाहनानी ४६० वर्ष राज्य केले. प्राचीन काळात भारतीय राजकीय सत्तेचे केंद्र मगधात (उत्तर भारतात) होते. मात्र हे सत्तेचे केंद्र महाराष्ट्रातील पैठणला (दक्षिण भारतात) आणले. त्यांनी त्याच्या राजवटीत संस्कृत व प्राकृत भाषांचा विकास केला. ५०० लेण्या कोरल्या शक, पल्लव, यवन या परकीयांना पराभूत केले. दक्षिण भारताच्या बहुतेक भागावर व मध्य भारतातही काही प्रदेशांवर आपले वर्चस्व निर्माण केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराना चालना दिली. या घराण्यानी भारतीय राजकारणावर स्वतंत्र छाप निर्माण केली. सातवाहनानी महाराष्ट्राला भारतीय राजकारणाच्या नकाशावर सन्मानाचे स्थान निर्माण करुन दिले.

**अ) सातवाहनांचे मूळ स्थान :-** सातवाहनांच्या मूळ स्थानाबाबत इतिहासकारांच्यामध्ये मतभेद आहेत. डॉ. आर. जी. भांडारकर, डॉ. सुखटणकर, स. आ. जोगळेकर, डॉ. गोपालाचारी, डॉ. डी. डी. सावरकर, वा. वि. मिराशी, राजवाडे वि. का. या इतिहासकारानी सातवाहनाचे स्थान 'आंध्र' होते असे म्हटले आहे.

डॉ. रा. गो. भांडारकर, बुलहर, रॅपसन, व्ही. ए. स्मिथ, जेम्स बर्जेस या संशोधकानी सातवाहनाचे स्थान आंध्र होते असे म्हटले आहे.

सातवाहनाच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. मोरवंचीकर, डॉ. प्रभाकर देव यांना सातवाहनांचे मूळ स्थान महाराष्ट्र होते असे म्हटले आहे. डॉ. मिराशी यांनी सातवाहनाचे स्थान विदर्भ होते असे म्हटले आहे.

सातवाहनाचे ७५ पेक्षा अधिक शिलालेख पश्चिम महाराष्ट्रात सापडले आहेत. सातवाहनाची राजधानी नंदगिरी (नांदेड) होती असा उल्लेख एका शिलालेखात आहे. ग्रीक प्रवासी टॉलेमी याने असे म्हटले होते की पुलुभावी राजा प्रतिष्ठान नगरीत राज्य करत होता असे म्हटले आहे. सातवाहनांची नाणी नाशिक, तेर, पैठण, भोगवर्धन येथे मोठ्या प्रमाणात सापडली आहेत.

या वरील सर्व उपलब्ध गोष्टींवर सातवाहन हे महाराष्ट्रातील होते असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यांच्या उत्तर काळात त्यांनी आंध्रप्रदेशात राज्य केले असावे असेही म्हटले जाते.

**ब) सातवाहनाची सत्ता स्थापना :-**सातवाहनांच्या सत्ते अगोदर कण्व घराण्याची सत्ता प्रस्थापित होती. कण्व घराण्याचा भारतीय राजवटीवर विशेष प्रभाव नव्हता. वसुदेव कण्व सोडला तर या राजवटीत प्रभावशाली राजकर्ते निर्माण झाले नाही. या घराण्यातील शेवटचा

राजा सुदार्मन हा अकार्यक्षम व दुर्बळ होता. याच संधीचा फायदा घेऊन सिमुख यांनी त्याला पदच्युत केले व आपले राज्य प्रस्थापित केले. यातूनच सातवाहनाची सत्ता भारतावर प्रस्थापित झाली.

**क) सातवाहनाचे राजे :-** सातवाह वंशातील राजांच्या एकूण संख्येबाबत मतभेद आहे. पुराणात एकूण ३० राजानी राज्य केले असे म्हटले आहे. मात्र सातवाहनांचे फक्त ८-१० राजकर्त्याविषयीची माहिती उपलब्ध आहे. सिमुख, सातकर्णी पहिला, गौतमीपुत्र सातकर्णी, वशिष्ठीपुत्र पुलुभावी, यज्ञश्री सातकर्णी, विजयी सातकर्णी हे सातवाहनाचे प्रमुख राजे होते.

**१) सिमुख सातवाहन :-** हा सातवाहनाचा पहिला राजा होता. हा सातवाहनाच्या मूळ पुरुषाचा नातू असावा असे मत वि. वा. मिराशी याने व्यक्त केले आहे. त्याला महाराष्ट्रात सातवाहनांचे राज्य स्थापन करण्यास रथिक व भोज या दोन जमातींनी मदत केली. पुराणातील कथांवरुन त्यांनी कण्व घराण्यातील शेवटचा राजा सुदार्मन याला पदच्चुत करुन आपले राज्य प्रस्थापित केले. त्यानी एकुण २३ वर्षे राज्य केले. नाणेघाटातील लेण्यांमध्ये त्याची प्रतिमा आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत संपूर्ण महाराष्ट्र जिंकला होता. संपूर्ण महाराष्ट्र जिंकून त्यांनी 'दक्षिणापथपति' ही पदवी धोरण केली होती. सिमूखने आपल्या कारकीर्दीत तांब्याची व शिक्क्याची नाणी पाडली होती.

**२) कृष्ण सातवाहन :-** सातवाहन वंशाचा संस्थापक सिमूख याचा कृष्ण सातवाहन हा भाऊ होता. सिमूखानंतर तो सत्तेवर आला. त्याच्या काळात सातवाहन सत्तेचा विस्तार झाला आसावा, कारण त्याच्यात काळात नाशिकच्या लेण्या कोरल्या गेल्या आहेत असा उल्लेख तेथील शिलालेखात आहे. तो जेव्हा सत्तेवर आला तेव्हा सिमुखचा पुत्र लहान होता. त्यामुळेच कृष्ण सातवाहनला सातवाहनाचे राज्य सांभाळण्याची संधी मिळाली. तो १८ वर्षे सातवाहनाचे राज्य चालविले.

**३) श्री सातकर्णी पहिला:-**सातवाहन वंशाचा संस्थापक सिमूख याचा श्री सातकर्णी पहिला हा मुलगा होता. सातवंशातील एक महत्त्वपूर्ण सम्राट म्हणून त्याच्याकडे पाहिले जात होते. श्री सातकर्णीच्या कारकिर्दीत सातवाहनांची राजकीय प्रतिष्ठा वाढली होती. त्याच्या साम्राज्यविस्ताराची माहिती नाणेघाटातील शिलालेखात आहे.

**१) साम्राज्य विस्तार :-** श्री सातकर्णी यांने आपल्या साम्राज्याचा विस्तार मध्य व पश्चिम भारत तसेच दक्षिण भारतात केला होता. सौराष्ट्र, उत्तर कोकण, माळवा, विदर्भ, दक्षिण पठार वगैरे प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणले होते. मध्यभारतातील विदीशा या शुंगाच्या राजधानीवर त्यांनी हल्ला चढविला होता. विदिशावर त्यांनी काही काळ ताबा ठेवला होता.

**२) खारवेल व श्री सातकर्णी यांच्यातील संघर्ष :-** कलिंग देशाचा राजा खारवेल यांनी श्री सातकर्णीच्या सत्तेला आव्हान दिले होते. खारवेलच्या सेनेला वैनगंगातीरी पौनी येथे श्री सातकर्णीच्या फौजेने प्रतिकार केल्यामुळे परत जावे लागले. खारवेल राजाने पुन्हा सातकरणीच्या राज्यावर स्वारी केली नाही. त्यामुळे पुढे खारवेल व श्री सातकर्णी यांच्यामध्ये पुन्हा संघर्ष झाला

नाही. मात्र खारवेलने श्री सातकर्णीचे मांडलीक राजे राठिक व भोजक यांच्यावर आक्रमणे केली, असा उल्लेख हाथी गुंफा शिलालेखात आहे.

३) **दानशूर राजकर्ता :-** श्री. सातकर्णी हा दानशूर राजकर्ता होता. त्याच्याकडे धार्मिक वृत्ती असल्याने त्यानी श्रोतयाग करुन हजारो गायी, घोडे, हत्ती,वस्त्र, कर्षापण नामक तत्कालीन नाणी व धान्याच्या राशी ब्राह्मणांना व यज्ञसेवकांना दान दिल्या होत्या.

४) **श्री. सातकर्णीच्या उपाध्या :-**श्री सातकर्णीने साम्राज्यविस्तार केल्यानंतर आपणास अप्रहितचक्र ही उपाधी लावून घेतली. नाणेघाटातील शिलालेखात याची माहिती उपलब्ध आहे तो 'दक्षिणपथपती' या नावाने सुद्धा ओळखला जात होता.

५) **यज्ञकर्ता :-** श्री. सातकर्णीकडे दानशुर वृत्ती बरोबरच धार्मिक वृत्ती होती. म्हणूनच त्यांनी आपल्या कारकिर्दीत दोन अश्वमेध यज्ञ, एक राजसूय यज्ञ केला होता. त्याच बरोबर त्यांनी आपल्या कारकीर्दीत १५-१६ श्रोतयाग केले हे केवळ शुर वीर, दानशूर व धार्मिक वृत्तीच्या राजकर्त्याला करणे शक्य होते म्हणूनच तो यज्ञकर्ता होता हे स्पष्ट होते.

६) **नागनिका :-** नागनिका ही श्री सातकर्णीची पत्नी होती. ती शूर वीर अजिंक्य अशा दक्षिणपथपतीची स्नुषा, गिरी समुद्रवलयांकित पृथ्वीवर श्रेष्ठ गणलेल्या व अंशीयकुलात जन्मलेल्या पुरुषाची कन्या, सर्वश्रेष्ठ अशा श्रीनामक पुरुषाची भार्या आणि पुर्तकर्भे (लोकोपयोगी) कृत्य करणाऱ्या, इष्ट वर देणाऱ्या, त्याची इच्छा पूर्ण करणाऱ्या, त्याना धनदान देणाऱ्या राजा वेदश्रीची व शक्तीश्रीची माता होती. वरील उल्लेख नाणेघाटातील शिलालेखात नागनिका बद्दल आहे. डॉ. मिराशी यांनी नागनिकेची गणना भारत वर्षातील महनीय स्त्रियांमध्ये केली आहे.

थोडक्यात – श्री सातकर्णीच्या काळात सातवाहनांची सत्ता स्थिर झाली होती. सातवाहन राजवटीला राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या वैभव संपन्नता मिळाल्याने भारतीय राजवटीत या सत्तेला महत्त्व प्राप्त झाले होते.

४) **वेदश्री सातकर्णी :-** वेदश्री सातकर्णी हा श्री सातकर्णीचा मुलगा होता. श्री सातकर्णीच्या मृत्यूनंतर वेदश्रीने सातवाहनाचा राज्यकारभार सांभाळला. मात्र जेव्हा श्री सातकर्णीचा मृत्यू झाला होता तेव्हा वेदश्री सातकर्णी हा लहान होता. त्यामुळे सातवाहनांचा कारभार त्याची माता नागनिका हिने पाहिला. नागनिका वृद्ध झाल्यानंतर वेदश्रीने सत्तेची सुत्रे हाती घेतली त्यांनी त्याच्या कारकिर्दीत अनेक लोकोपयोगी कामे केली. लोकांना आश्वासने देऊन लोकांच्या इच्छा पूर्ण केल्या. अनेक गोर-गरीबांना धनदान देऊन त्यांचे दारिद्र्य दूर केले. वरील सर्व माहितीचा उल्लेख नाणेघाटातील शिलालेखांमध्ये आहे. त्यांनी त्याच्या कारकिर्दीत उत्तम राज्यकारभार करुन आपली कारकीर्द उज्वल बनविली.

५) **शक्तीश्री सातकर्णी :-** शक्तीश्री सातकर्णी हा श्री सातकर्णीचा दुसरा पुत्र होता. शक्तीश्रीचे दुसरे नाव हुकुश्री सातकर्णी असेही होते. हुकुश्री सातकर्णीची प्रतिमा नाणेघाटा कोरली आहे. रत्रो रिरिसतस असा लेख असलेली नाणी नर्मदेच्या उत्तरेस त्रिपुरी येथे सापडली. ही नाणी शक्तीश्रीची असावीत असे जाणकारांचे मत आहे.

**६) द्वितीय सातकर्णी :-** पुराणातील वंशावळीनुसार द्वितीय सातकर्णी हा या वंशातील सातवा राजा असावा. त्याचा कालखंड काय हे निश्चित सांगता येत नाही मात्र तो वेदश्री व शक्तीश्री नंतर सत्तेवर आला असावा असा अंदाज मांडला जातो. त्यांनी ५६ वर्षे राज्य केल्याच्या नोंदी आहेत, पण हे संकुचित व चूकीचे आहे मात्र तो पराक्रमी होता. त्यांनी आपला राज्याचे चांगल्या प्रकारे संवर्धन केले हे नाकारता येणार नाही. पुष्यमित्र शुंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्यात जो गोंधळ निर्माण झाला होता तेव्हा त्यांनी माळवा जिंकून घेतला होता त्या विषयीची माहिति 'हाथी गुंफा' व 'भिलसा' येथील शिलालेखांमध्ये आहे.

**७) लंबोदर :-** द्वितीय सातकर्णी नंतर त्याचा पुत्र लंबोदर हा गादीवर आला. मात्र त्याच्या बद्दलची कोणत्याही प्रकारची माहिति पुराणात अथवा कोरीव लेखात उपलब्ध नाही.

**८) अपिलक :-**लंबोदराचा उत्तराधिकारी अपिलक होता. त्याच्या कारकिर्दीतील तांब्याचे नाणे छत्तीसगडच्या विलासपूर जिल्ह्यातील बालपूर या ठिकाणी महानदीच्या काठी मिळाले. या नाण्यावर 'रत्रो सिवसिरिसा पीलकस' असा उल्लेख आहे.

**९) मेधस्वाती :-** मेधस्वाती हा सातवाहन वंशातील नवव्या क्रमांकाचा राजा होता. त्याचे एक नाणे आंध्रात सापडले आहे.

इ.स.पूर्व पहिले शतक ते इ.स. पहिले शतक या २०० वर्षांचा सातवाहनांचा इतिहास अज्ञात आहे. १० व्या क्रमांकाच्या राजा पासून १६ व्या क्रमांकाच्या राजांची फक्त नावे पुराणग्रंथात सापडतात त्यामुळे या काळात होऊन गेलेल्या राजांची माहिति उपलब्ध नाही. कदाचित या काळातील राजे कर्तृत्वशून्य असावेत. किंवा त्यांच्या कारकिर्दीत विशेष राजकीय अथवा सांस्कृतिक घडामोडी घडलेल्या नसाव्यात, असा निष्कर्ष काढला जातो.

**१०) राजा हाल :-** सातवाहन कालखंडातील नावारुपाला आलेला राजकर्ता म्हणून हाल राजकडे पाहिले जाते त्याच्या कालखंडाला शांतीयुग असे म्हटले जाते. तो उत्तम कवी होता. त्याचा उल्लेख अनेक पुराणात व ग्रंथात आला आहे. लीलावती, गाथासप्तशती, अभिधन चिंतामणी, देशनाममाला हे ग्रंथ त्याच्या कारकिर्दीचा उल्लेख करणारे आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत प्राकृत भाषेला उत्तेजन दिले होते. त्याच्या दरबारात अनेक कवी होते. श्रीपालित, पोट्टीस, तंदीवृद्ध, आढयराज हे त्याच्या दरबारातील नावारुपा आलेले कवी होते.

हाल राजानी १ कोटी गाथांमधून ७०० गाथा निवडून जो काव्यसंग्रह तयार केला तोच ग्रंथ म्हणजे गाथासप्तसई होय. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील तत्कालीन जीवन त्यांनी या गाथामधून चित्रीत केले आहे. या गाथामधून त्यांनी प्रणय, विनोद, निसर्गवर्णन, स्त्री-पुरुषांची सुखदुःखे भावना हळुवारपणे रेखाटल्या आहेत. हाल राज्याने ५ वर्ष राज्य केले असे म्हटले जाते. पण हे असंभव वाटते कारण त्याच्या कारकिर्दीबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत.

**११) हाल राजानंतरचे राजे :-** हाल राजानंतर सातवाहनांच्या सत्तेवर मंटलक, परीद्रसेन, सुंदर सातकर्णी, राजा चकोर यांनी राज्य केले. मात्र हे सर्वच राजे अकार्यक्षम व दुर्बळ होते. याच्याच कारकिर्दीत शकांची आक्रमणे झाली. त्यांनी सातवाहनांना कोकण, महाराष्ट्र, माळवा,

गुजरातमधून जवळजवळ हकलून दिले. या काळात सातवाहनांची प्रतिष्ठा जेमतेम टिकून होती. अशा कठीण परिस्थितीत एक कणखर नेतृत्त्वांची सातवाहनाना गरज होती. ती गरज गौतमीपुत्र सातकर्णीने पूर्ण करत पुन्हा सातवाहनाना गतवैभव प्राप्त करुन दिले.

**१२) गौतमीपुत्र सातकर्णी :-** सातवाहन वंशातील सर्वश्रेष्ठ राजकर्ता म्हणून गौतमीपुत्र सातकर्णीकडे पाहिले जाते. त्यांनी सातवाहन सत्तेला लागलेले ग्रहण सोडवून सातवाहन सत्तेचे गेलेले गतवैभव पुन्हा मिळवून दिले. शातवहान सत्तेची प्रतिष्ठा वाढवीली. सातवहन सत्तेला शकांच्या जोखडातून मुक्त केले. गौतमीपुत्र सातकर्णीचा कालखंड साधारणतः इ.स.१०६ ते १३० असा मानला जातो. त्याने सत्तेवर येताच शक, यवन व पल्लवांचा संहार केला. म्हणूनच त्याला "शक यवन पल्लव निशुंदन" असे म्हटले जाते.

**१) पूर्व परिस्थिती :-** गौतमीपुत्र सातकर्णी सत्तेवर येण्या पूर्वीची सातवाहनांची परिस्थिती अत्यंत बिकट होती. सातवाहन राजकर्ते दुबळे व कर्तृत्वहीन होते. शक-क्षत्रपानी सातवाहनांच्या काही प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केले होते. पश्चिमी क्षत्रप भूमक व नहपाण यांनी गुजरात, काठेवाड, माळवा, कोकण व महाराष्ट्राच्या काही भागांवर ताबा मिळवला होता. एवढेच नव्हे तर तहापणानी जुन्नर येथे आपली राजधानी आणली होती. अशा अवस्थेत सातवाहनांच्या सत्तेला उतरती कळा लागली होती. अशा पार्श्वभूमीवर गौतमीपुत्र सातकर्णी राजा झाला होता. मात्र असे असूनही स्वकर्तृत्वाच्या जोरावर गौतमीपुत्र सातकर्णीने सातवाहन वंशाला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.

**२) क्षहरात वंशाचा नाश :-** गौतमीपुत्र सातकर्णीनी सत्ता हातात घेतल्यानंतर सर्वप्रथम क्षहरात वंशाकडे आपले लक्ष केंद्रित केले. कारण या वंशातील राजकर्त्याने महाराष्ट्रात आपली सत्ता प्रस्थापित करुन सातवाहनांच्या सत्तेला आव्हान दिले होते. म्हणूनच या वंशातील राजकर्त्यांवर हल्ले करुन गौतमीपुत्र सातकर्णीने या वंशाचा समूळ नाश केला. गौतमीपुत्रसातकर्णीच्या या पराक्रमाची नोंद त्याचा मुलगा वशिष्टपुत्र पुलुमावी यांनी नाशिक येथील एका शिलालेखात कोरली आहे. क्षहरात वंशाचा नाश केल्याने सातवाहन वंशाला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त झाली.

**३) शक-यवन-पहलव यांचा नाश :-** गौतमीपुत्र सातकर्णी जेव्हा राजकर्ता बनला तेव्हा महाराष्ट्र व आंध्राच्या भूमीवर शक-यवन-पहलवांचा राजकीय प्रभाव प्रस्थापित झाला होता. मात्र गौतमीपुत्र सातकर्णीने सत्ता हातात घेतल्यानंतर सर्व प्रथम क्षहरात वंशाचा नाश केला. या वंशाचा नाश केल्यानंतर शक-यवन-पहलवांचा नाश केला हे सर्व परकीय सत्ताधीश होते. या विजयाने पुन्हा महाराष्ट्र व आंध्रावर सातवाहनांचा राजकीय प्रभाव वाढला. त्यामुळे आपोआपच सातवाहनांच्या सत्तेची प्रतिष्ठा वाढली.

**४) गौतमी पुत्र सातकर्णीचा साम्राज्य विस्तार :-** क्षहरात, शक, यवन व पहलवांचा नाश करणारा गौतमीपुत्र सातकर्णी हा शूर पराक्रमी योद्धा होता हे त्याच्या वरील विजयावरुन सिद्ध होते. परकीय सत्तांचे उच्चाटन केल्या नंतर त्यांनी आपल्या अंतर्गत साम्राज्यविस्ताराकडे लक्ष केंद्रित करुन साम्राज्य विस्तार केला. या साम्राज्य विस्ताराची माहिती नाशिक लेण्यातील वशिष्टपुत्र पुल्लुभावी यांनी कोरल्या आहेत. या लेखात त्यांनी कोणत्या प्रदेशात आपला

साम्राज्यविस्तार केला होता तसेच कोणते पर्वत काबीज करुन ताब्यात घेतले होते. त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत-

| प्रदेशांची नावे | पर्वतांची नावे |
|---|---|
| १) सौराष्ट्र (काठेवाड) | १) विंध्य |
| २) कुकुर (आग्नेय राजपुताना) | २) ऋक्षवत् (सातपुडा) |
| ३) आकारवन्ती (पूर्व व पश्चिम माळवा) | ३) सह्याद्री कृष्णगिरी |
| ४) अनुप (महेश्वरनगरजवळचा प्रदेश) | ४) मंचगिरी |
| ५) अपरान्त (उत्तर कोकण) | ५) श्रीस्तन (श्रीशैल) |
| ६) ऋषिक (खानदेश) | ६) मलय |
| ७) अश्मक (अहमदनगर जिल्हा) | ७) महेंद्र (पूर्वघाट) |
| ८) मूलक (पैठणजवळचा प्रदेश) | ८) सेटगिरी (श्वेतगिरी) (जुन्नरजवळचा प्रदेश) |
| ९) विदर्भ | ९) चकोर |
| | १०) परियात्र (अबूपर्वत) |

**५) गौतमीपुत्र सातकर्णीची उपाधी :-**गौतमीपुत्र सातकर्णीला 'त्रिसमुद्रतोय पितवाहन' अशी उपाधी लावण्यात आली होती. या उपाधीचा अर्थ "ज्या राजाची वाहने तीन समुद्राचे पाणी पीत होती, म्हणजे दक्षिण भारतास बंगालचा उपसागर, अरबी समुद्र व हिंदी महासागर या तीन समद्रची किनारपट्टी लाभली असून संपूर्ण दक्षिण भारतावर गौतमीपुत्राचे वर्चस्व होते." असा या उपाधीचा अर्थ होतो.

**६) पराक्रमी व मुत्सद्दी सम्राट :-** सातवाहन वंशातील पराक्रमी व मुत्सद्दी सम्राट म्हणून गौतमीपुत्र सातकर्णी ओळखला जातो. "गौतमीपुत्र शरीराने भव्य आणि वृत्तीने गंभीर होता. त्याचे मुखमंडळ पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे सुंदर होते. त्याचे बाहू शेषाच्या शरीराप्रमाणे होते. त्याची चालण्याची ढब हत्तीप्रमाणे गंभीर होती. तो प्रजाजनांच्या सुखदु:खात सहभागी होत होता. व लोकांना आपत्ती प्रसंगी मदत करत होता. प्रजेवर तो योग्य कर लादत होता. त्याचा प्रजेमध्ये दरारा होता." ही सर्व माहिती नाशिकमधील लेणी क्रमांक ३ मध्ये आहे. ही लेणी देवी लेणी म्हणून प्रसिद्ध आहे.

**७) न्यायी सम्राट व उत्कृष्ट प्रशासक :-** गौतमीपुत्र सातकर्णी हा न्यायी सम्राट होता. तसाच तो उत्तम प्रशासकही होता. त्याची ख्याती लोकमानसात अनेक वर्ष होती. चिनी प्रवाशी ह्युएनत्संगच्या प्रवासवर्णनात गौतमीपुत्र सातकर्णीचा उल्लेख आहे. डॉ. के. गोपालाचारी यांच्या मते, "गौतमीपुत्र सातकर्णी सेनापती म्हणून एकपट थोर असला तरी प्रशासक म्हणून दसपट थोर होता. तो मुत्सद्दी होता. त्यास सामाजिक कर्तव्याची जाणीव होती. अनाथ, गरीब, रंजले, गांजले यांचे तो पालन करी."

**आपली प्रगती तपासा**

१. गौतमीपुत्र सातकर्णीची कारकिर्द जाणून घ्या.

**१३) वशिष्ठीपुत्र पुलुमावि :-** गौतमीपुत्र साथकर्णीच्या मृत्यूनंतर त्याचा जेष्ठपुत्र वशिष्ठीपुत्र पुल्लुभावी सातवाहनांच्या सत्तेवर आला. तो शूर व रणकुशल नव्हता. याच संधीचा फायदा घेऊन उज्जैनचा क्षत्रप रुद्रदामन यांनी आपली शक्ती संघटीत करुन सातवाहनानी जिंकलेल्या प्रदेशांवर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. रुद्रदामनाने वशिष्ठीपुत्र पुल्लुभावीचा दोनदा पराभव केला. मात्र या दोहोत संघर्ष जरी होता तरी कायम शत्रुत्व नव्हते. कारण रुद्रदामनानी आपली कन्या विशिष्ठीपुत्र पुल्लुभावीला दिली होती. त्यामुळेच रुद्रदामनाने सातवाहनांच्या सत्तेचे उच्चाटन केले नाही. याचे कारण त्यांच्यातील वैवाहिक संबध.

वशिष्ठपुत्र पुल्लुभावीने आपल्या कारकीर्दीतील उत्तर प्रदेशातील सातवाहनांच्या ताब्यातील प्रदेश गमावले होते. मात्र दक्षिणेत कुंतल प्रदेशावर सत्ता प्रस्थापित करण्यात त्याला यश आले होते. कुंतल प्रदेशाच्या राजकन्येशी त्यांनी विवाह केल्याच्या नोंदी आहेत. त्याच्या कारकिर्दी विषयी माहिती देणारे अनेक शिलालेख नाशिक व कार्ले या ठिकाणी सापडले आहेत. त्याच्या कारकिर्दी विषयी माहिती देणारी नाणी विदर्भ, सांगली, हैद्राबाद संस्थानातील कोंडापूर व आंध्र प्रदेशात सापडली आहेत. उपलब्ध साधनांच्या आधारे दक्षिण व पश्चिम महाराष्ट्र, अश्मक, मूलक, दक्षिण कोसल, आंध्र, कर्नाटक या प्रदेशात वशिष्ठ पुत्र पुल्लुभावीचे साम्राज्य मोडत होते असे सांगण्यात येते वाशिष्ठपुत्र पुल्लुभावीने एकूण २८ वर्ष राज्य केले.

**१४) स्कंद आणि सातकर्णी :-** गौतमीपुत्र सातकर्णीस एकूण तीन पुत्र होते त्यापैकी सर्वप्रथम त्याचा जेष्ठ पुत्र वशिष्ठीपुत्र पुल्लुभावी सत्तेवर आला. त्यांनी २८ वर्ष राज्य केले. त्याची माहिती आपण वरील मुद्या पाहिली आहे.

वशिष्टपुत्र पुल्लुभावीनंतर त्याचे दोन बंधू स्कंद आणि सातकर्णी सत्तेवर आले मात्र या दोन्ही राजकर्त्यांनी केव्हा व कोणत्या प्रदेशावर राज्य केले याचे निश्चित पुरावे उपलब्ध नाहीत.

**१५) यज्ञश्री सातकर्णी :-**यज्ञश्री सातकर्णी हा सातवाहन वंशातील पराक्रमी राजा होता. त्यांनी सातवाहनाच्या राजवटीत ३० वर्ष राज्य केले. त्यांनी सातवाहनांची गेलेली राजकीय प्रतिष्ठा पुन्हा मिळवून दिली. त्यांचे आंध्रवर राज्य होते. आंध्रातील कृष्णा जिल्ह्यातील चीन या गावी कृष्णा नदीच्या दक्षिणेला समुद्रकिनारी यज्ञश्री सातकर्णीच्या राजवटीची माहिती देणारा शिलालेख सापडला आहे. या लेखाची लिपी ब्राह्मी आहे व भाषा प्राकृत आहे. नाशिक, कान्हेरी गुंटूर येथे यज्ञश्री सातकर्णीचे शिलालेख सापडले आहेत या शिलालेखात यज्ञश्री सातकर्णीने शकांपासून जे प्रदेश जिंकले आहेत. त्याच्या कारकिर्दीत सातवाहनांच्या व्यापारात वाढ झाली होती.

**१६) यज्ञश्री सातकर्णीनंतरचे उत्तराधिकारी :-** यज्ञश्री सातकर्णी नंतरचे सातवाहन सत्तेचे सर्व उत्तराधिकारी अकार्यक्षम व दुबळे होते. माठरीपुत्र शकसेन, विजयश्री सातकर्णी चंद्रश्री सातकर्णी, रुद्र सातकर्णी, राजा पुल्लभावी या राजकर्त्यांनी सातवाहनांची राजवट चालविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचे नेतृत्व कमजोर पडल्याने शेवटी या सत्तेचा अस्त झाला.

**१७) सातवाहन सत्तेचा अस्त :-**

सातवाहन सत्तेच्या अस्तास पुढील कारणे कारणीभूत ठरली.

- पश्चिमी क्षत्रपाची सतत सातवाहन सत्तेवर होणारी आक्रमणे.
- यज्ञश्री सातकर्णीनंतरचे अकार्यक्षम व दुबळे राजकर्ते.
- सातवाहन राजकर्त्यांचे नंतरच्या कालखंडात झालेले व्यापाराकडील दुर्लक्ष.
- मध्यवर्ती सत्तेचा दुबळेपणा.
- सरंजामदारांचे वाढलेले वर्चस्व.
- दक्षिणेत वाकाटकांचा झालेला उदय.

## ६.६ सातवाहनकालीन सामाजिक जीवन

सातवाहन कालखंड हा प्रदिर्घ सत्तेचा कालखंड होता. परिणामी या कालखंडाला कार्यक्षम राजकर्ते, राजकीय स्थिरता व प्रशासकीय कार्यक्षमता लाभली होती. याचा फायदा सामाजिक जीवनपद्धतीला झाल्याने या राजवट कालखंडातील सामाजिक जीवन समृद्ध, सुसंस्कृत व सुखी होते.

**१) वर्णव्यवस्था :-** सातवाहन काळात वर्णव्यवस्था प्रचलित होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे समाजात चार वर्ण प्रचलित होते.

वर्णव्यवस्थेला अनुसरुन ब्राह्मणवर्णाला महत्त्वाचे स्थान होते. वेदाध्ययन, यज्ञानुष्ठान व धर्मोपदेश ही कामे त्यांना करावी लागत होती.

क्षत्रिय वर्णाचे कर्तव्य अध्ययन, दान, शस्त्र ग्रहण व प्रजारक्षण हे होते.
वैश्यवर्णाचे कर्तव्य पशुपालन, शेती, व्यापार, दान, अध्ययन हे होते.
शुद्रांचे कर्तव्य वरील तीन वर्गाची सेवा करणे हे होते.

नंतर या पद्धतीत बदल होवून सामाजिक वर्गवारी शासकीय नोकरी व व्यवसाय या घटकाला अनुसरुन होवू लागली.

१) सर्वश्रेष्ठ वर्ग :- महारथी, महभोज, महासेनापती, याचा समावेश सर्वश्रेष्ठ वर्गात होत असे.
२) मध्यम श्रेष्ठ वर्ग :- आमात्य, महापात्र, भाण्डगारिक, व्यापारी यांचा समावेश मध्यम वर्गात होत असे.
३) कनिष्ठ वर्ग :- वैद्य, सुवर्णकार, लेखक, शेतकरी, यांचा समावेश कनिष्ठ वर्गात होत असे.
४) सर्वसामान्य :- लोहार, सुतार, माळी, कोळी यांचा समावेश सर्वसामान्य वर्गात केला जात असे.

**२) कौटुंबिक जीवन :-** सातवाहन काळात समाजात एकत्र कुटुंबपद्धती प्रचलीत होती. घरातील कर्ता पुरुष कुटुंब प्रमुख म्हणून काम पाहत असे. कुटुंबात पुरुषांबरोबरस्त्रियांना मानाचे स्थान होते. राजकीय स्थिरता व आर्थिक समृद्धता सातवाहन साम्राज्यात प्रचलित होती परिणामी लोकांचे कौटुंबिक जीवन चांगले होते.

**३) स्त्रियांचे स्थान :-** सातवाहन काळात स्त्रियांना मानाचे स्थान होते. शिक्षण व राजकारणात स्त्रिया सहभागी होत होत्या. स्त्रियांना संपत्तीचे हक्क होते. धार्मिक विधीत त्यांना सहभागी होण्याचे हक्क होते. सातवाहन राजकर्त्यांनी आपली नावे मातांच्या नावाशी जोडली होती यावरुन स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान होते हे स्पष्ट होते. 'स्त्री ही अनंत काळाची माता आहे' हीच भावना त्याकाळी समाजात होती.

**४) वेशभूषा :-** सातवाहनाच्या वेशभूषेचा विचार करता या समाजातील पुरुष पंचासारखे वस्त्र नेसून डोक्यावर टोपी वापरत होते तर स्त्रिया धोतरासारखे वस्त्र सर्वांगाला परिधान करत होते. पश्चिम क्षत्रपांची जी शिल्पे उपलब्ध आहेत. त्यावरुन या समाजातील लोक पटलोण, कोट, लांब ओर्व्हकोट, टोपी, पगडी अशा प्रकारची वेशभूषा करत होते असे दिसते.

**५) अलंकार :-** सातवाहन काळातील स्त्री - पुरुष वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार वापरत होते. पैंजण, कर्णफुले, बाहुंवर केयुर, कंगण, अंगठ्या, मोती किंवा रत्ने, कमरपट्टे इत्यादी अलंकारांचा वापर होत होता.

**६) मनोरंजन :-** सातवाहन काळात खेळ, नृत्य, गीत, वाद्य, द्यूत आदी माध्यमाचा वापर मनोरंजनासाठी केला जात होता.

**७) आश्रमव्यवस्था :-** सातवाहन काळात समाजजीवन सुसंस्कृत करण्यासाठी आवश्यक असणारी आश्रमव्यवस्था प्रचलित होती.

**८) निवास :-** सातवाहन काळात मोठी नगरे अस्तित्त्वात होती. भव्य, राजवाडे, हवेल्या होत्या नगराच्या सभोवताली तटबंदी होती. नगरात अनेक मजली इमारती होत्या. निवासे बांधण्यासाठी विटा लाकडांचा वापर केला जात होता. मध्यमवर्गीयांची घरे चार खोल्यांची असत.

### आपली प्रगती तपासा

१. सातवाहन काळातील सामाजिक परिस्थिती जाणून घ्या.

## ६.७ सातवाहन काळातील आर्थिक स्थिती

सातवाहनाचा कालखंड आर्थिक दृष्ट्या वैभवाचा कालखंड होता. परिणामी या कालखंडातील आर्थिक परिस्थिती संपन्न होती.

**१) शेती :-** शेती हा या सातवाहन काळातील लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीतून भात, ज्वारी, बाजरी आदी पिके घेतली जात होती.

**२) व्यापार:-** सातवाहन काळात व्यापारदेशांतर्गत व देशबाह्य चालत होता. आयात आणि निर्यात या दोन्ही आर्थिक प्रक्रियेतून या कालखंडातील व्यापार भरभराटीस आला होता.

**३) व्यापार केंद्रे :-** सातवाहन कालात तेर, नाशिक, जुन्नर, भोकरदन, पैठण, कराड, वैजयंती, नेवासे, व कोल्हापूर ही महत्त्वाची केंद्र नावारुपाला आली होती.

**४) व्यापारी बंदरे :-** सातवाहन काळात भडोच, कल्याण, सोपारा, डहाणू ही व्यापारी बंदरे नावारुपाला आली होती. मोठमोठ्या व्यापारी केंद्राबरोबर ही बंदरे जोडल्याने या कालखंडातील व्यापारप्रक्रिया सुत्रबद्ध झाली होती.

**५) निर्यात :-** सातवाहन काळात भारताचा व्यापार इजिप्त, इटली, ग्रीस या देशांबरोबर होत असे. भारतातून या देशांना तिळाचे तेल, साखर, प्राण्यांची कातडी, रेशमी वस्त्रे, मलमल, वेलदोडे, मसाल्याचे पदार्थ, हिरे, माणिक, मोती या वस्तू निर्यात केल्या जात होत्या. भारताचे या देशांबरोबरील आयातीपेक्षा निर्यातीचे प्रमाण जास्त असल्याने या देशांतून येणारा संपत्तीचा ओघ भारताकडे जास्त प्रमाणात येत होता. म्हणूनच या कालखंडातील भारतातील आर्थिक परिस्थिती चांगली होती.

**६) आयात :-** सातवाहन काळात भारताचा व्यापार इजिप्त, इटली, ग्रीस, या देशाबरोबर होत होता. या देशांकडून भारत रोमन मद्य, तांबे, कथील, शिसे, काच, औषधी वनस्पती, मलम, हस्तीदंताच्या वस्तू, रोमन भांडी, रोमन दिवे ब्रांझचे पुतळे. या वस्तूंची आयात करत होता.

**७) कर :-** सातवाहन काळात वेगवेगळी कर प्रणाली प्रचलित होती. वस्तूंवरील कर, जकात कर, अपराधी व्यक्तीवरील दंड, व्यापारीकर आदी माध्यमातून साम्राज्याला मोठ्या प्रमाणात कर रुपाने आर्थिक लाभ होत होता.

**८) व्यापार श्रेण्या :-** सातवाहन काळात जो व्यापार केला जात होता तो व्यापारश्रेण्याद्वारे केला जात होता.

१) धनिक (धान्याचे व्यापारी)
२) गंधिक (सुगंध पदार्थांचे व्यापारी)
३) मालाकार (माल बनविणारे)
४) सुवर्णकार (सोनार)
५) सेलवटकी (पाथरवट)
६) कुलटिक (कुंभार)
७) कोलिक (वस्त्र विणणारे)

या व्यापारी श्रेण्यानुसार व्यापार होत असल्याने व्यापार नियोजनबद्ध होत असे.

**९) विनिमय माध्यम :-** सातवाहन काळात आर्थिक विनिमयासाठी नाणी प्रचलित होती. ही नाणी सोने, चांदी, शिसे, पोटिन या धातूंपासून बनविलेली असत. परिणामी या नाण्यांच्या वापरामुळे व्यापार प्रक्रिया चांगली बनली होती.

**आपली प्रगती तपासा**

१. सातवाहन काळातील आर्थिक परिस्थिती जाणून घ्या.

---

## ६.८ सातवाहन काळातील धार्मिक स्थिती

सातवाहन काळातील राजकर्ते धार्मिक बाबतीत धर्मसहिष्णू वृत्तीचे होते. त्यांनी आपल्या राजवटीत वैदिक, बौद्ध व जैन या तिन्ही परंपराना राजाश्रय दिला होता. सातवाहन राजे स्वतः हिंदू धर्मिय होते सातवाहन काळातील धार्मिक परिस्थितीची माहिती आपणास पुढील माहितीच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) धर्म :-** सातवाहनांचा धर्म वैदिक धर्म होता. ते वैदिक धर्माचे अनुयायी होते म्हणूनच त्यांनी आपल्या कारकिर्दीत या धर्माचे पुनरुज्जीवन घडवून आणले होते. या धर्माला राजाश्रय दिला होता. हा धर्म वाढविण्यासाठी त्यांने प्रयत्न केला होता. या धर्माबद्दल त्यांना अभिमान होता.

**२) देवता :-** सातवाहन काळात देव देवतांची पूजा केली जात होती. सुर्य, चंद्र, यम, वरुण, इंद्र, कुबेर, शिव, नाग, गौरी या देव देवताना मानले जात होते. यक्षपूजाही ही प्रचलित होती. नाणेघाटच्या शिलालेखात अशा प्रकारची माहिती नमूद करण्यात आली आहे.

**३) यज्ञ :-** सातवाहन काळात यज्ञविधी प्रचलित होता. सर्वसामान्यापासून राजकर्त्यांपर्यंत वेगवेगळे नैमित्तीक औचित्य साधून यज्ञ करत होते. सातवाहन सम्राट श्री सातकर्णी व त्याची पत्नी नागनिका हिने अनेक श्रोतयज्ञ केल्याचा उल्लेख आहे. श्री. सातकर्णीने दोनदा अश्वमेध केल्याचा उल्लेख आहे.

**४) पूजा :-** सातवाहन काळात देव-देवतांची पूजा केली जात होती. पूजा विधीसाठी व्रते, यज्ञ, तप, उपवास, सत्यवचन, स्त्रोत पठण, मनन, चिंतन, आदीमार्गांचा वापर केला जात होता.

**५) बौद्ध धर्माबाबतचे धोरण :-** सातवाहन राजकर्त्यांनी जरी वैदिक धर्म स्विकारला असला तरी त्यांनी बौद्ध धर्माला उदार आश्रय दिला होता. सातवाहन राजे, मांडलीक राजे व सरदार यांनी बौद्ध धर्माला उदारहस्ते देणग्या दिल्या. तसेच सर्वसामान्य जनतेलाही या धर्माचा स्विकार

करण्याचे आव्हान केले. विहार-चैत्यग्रह कोरण्यास मदत केली. अजिंठा येथील लेणी क्रमांक २६ मध्ये असा उल्लेख आहे.

सातवाहन राजकर्ते धर्मसहिष्णू असल्या कारणे या काळात हिंदू-बौद्ध व जैन धर्मात सामजस्याचे वातावरण होते.

**आपली प्रगती तपासा**

१. सातवाहन काळातील धार्मिक परिस्थिती जाणून घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ६.९ सारांश

मौर्योत्तर राजवटीतील तीन महत्वपूर्ण सत्ता म्हणजे शुंग, कुशाण व सातवाहन सत्ता होय. या राजवटीतील तीन महत्त्वपूर्ण राजकते म्हणजे शुंग सत्ताधीश पुष्पमित्र शुंग, कुशाण सत्ताधीश म्हणजे कनिष्क व सातवाहन सत्ताधीश म्हणजे गौतमीपुत्र साककर्णी होय. या तिन राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीमुळे हा कालखंड नावारुपाला आला होता. म्हणून या तिन्ही राजवटीना प्राचीन भारताच्या इतिहसात महत्त्वाचे स्थान आहे.

## ६.१० दिर्घोत्तरी प्रश्न

१. शुंग सत्तेचा संस्थापक या नात्याने पुष्पमित्राची योग्यता स्पष्ट करा.
२. कुशाण सत्तेचा एक श्रेष्ठ सम्राट म्हणून कनिष्काच्या कारकिर्दीचा आढावा घ्या.
३. सातवाहन घराण्यातील सर्वश्रेष्ठ राजकर्ता या नात्याने गौतमीपुत्र सातकर्णीची कारकिर्द स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ७

# 'गुप्त कालखंड'
# (इ.स. ३२० ते इ.स. ६००)

**प्रकरणाची रचना:**


७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ गुप्तांचाउदय
७.३ साम्राज्य विस्तार
७.४ सम्राट दुसरा चंद्रगुप्त
७.५ चंद्रगुप्ताची योग्यता
७.६ पहिला कुमार गुप्त
७.७ स्कंदगुप्त व त्याचे वारस
७.८ सारांश
७.९ दिर्घोत्तरी प्रश्न


## ७.० उद्दिष्ट्ये

- गुप्त राज्यकर्त्यांची माहिती पाहणे.
- गुप्राज्यकर्त्यांची प्रशासन व्यवस्था समजून घेणे.
- गुप्तकालखंडातील सर्वांगीण परिस्थितीचा आढावा घेणे.
- गुप्त गुणाच्या सुवर्ण कालखंडाचे निकष तपासणे.
- गुप्त संस्कृतीच्या सांस्कृतिक प्रसाराचा व ऱ्हासाचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

गुप्तकाळ हा भारतातील अतिशय प्राचीन काळ समजला जातो. चंद्रगुप्त मौर्याने गिरनार प्रदेशात शासन करण्याकरिता म्हणून ज्या अधिकाऱ्याला पाठविले होते. त्याचे नाव पुष्पगुप्त असे आढळून येते. याच पुष्पगुप्ताने पलिकडे सुदर्शन नावाचा तलाव बांधून त्यातून पाणी पुरविण्याची व्यवस्था केली. शुंग काळातील प्रसिध्द बाहुन स्तंभलेखासह एक राजा विशदेव याचा उल्लेख

सापडतो. तो गुप्त युग (गुप्तकाळातील स्त्रीचा मुलगा) या गुप्त काळातील वीर पुरषांनी गुप्त साम्राज्याची स्थापना केली असावी. अलाहाबाद प्रशस्तीवरुन श्रीगुप्त काळापासून गुरु घराण्याला प्रारंभ झाला असावा असे दिसते. पुणे येथील ताम्रपटात सुध्दा समुद्र गुप्त हा महाराज श्रीगुप्ताचा पण तू आणि महाराज श्रीधरकोच याचा नातू असे उल्लेख सापडतात. म्हणून यावरुन श्रीगुप्त नावाचा वीरपुरुषाने यागुप्त घरण्याची स्थापना केली असावी. अलाहाबाद येथील प्रशस्तीवरुन श्रीगुप्त हा घरण्याचा मुळ पुरुष मानला जातो.

## ७.२ गुप्तांचा उदय

**१. महाराज श्रीगुप्त ( इ.स. २४० - २८० ) :-** कुशाण साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर उत्तर भारतात जो गोंधळ निर्माण निर्माण झाला त्याचा फायदा घेऊन अनेक प्रांतीय सरदार स्वतंत्र झाले. त्यातील श्रीगुप्त एक सरदार असावा. चिनी यात्रेकरु इत्सिंगच्या याने लिहीलेला वृतांतावरुन श्रीगुप्ताने मगधाच्या पूर्वेला नालंदा विद्यापीठातून पूर्वेकडे चाळीस योजने दूर असलेल्या मृगशिखा वनाजवळ बौध्द यात्रेकरुंना राहण्याकरता म्हणून एक विहार बांधला होता म्हणजे भक्त गण गुप्तांचे बौध्द विषयांचे प्रेम भावनेचा त्यांना आदर होता. श्रीगुप्ताने स्वतंत्र राज्य स्थापन केल्या नंतर स्वतःला महाराज ही पदवी लावून घेतली. श्रीगुप्ताच्या होन मुद्रावर गुप्तराय आणि श्रीगुप्तत्स असे दोन शब्द आढळून आले. यावरुन नाणी आणि मुद्राची माहिती पटते.

**२. महाराज घटोत्कच ( इ.स. २८० ते ३२० ) :-** या काळातल्या काही मुद्रा अशा होत्या की ज्यावर घटत्कोच गुप्स्य ही अक्षरे कोरलेली दिसतात. त्याचे सर्व दृष्टिने परिक्षण केल्यानंतर त्या घटत्कोच कालीन आहेत असे सिध्द झालेले दिसते. या घटत्कोच राजाने सुध्दा महाराज ही पदवी संपादन केली होती. घटत्कोचाची काही नाणी सापडली आहेत त्यावरुन तो कर्तबगार व पराक्रमी होता असे दिसते. वैशाली ही घटत्कोचाची राजधानी होती त्याने इ.स. २८० ते ३२० पर्यत राज्य केले.

**३. महाराजाधिराज चंद्रगुप्त पहिला (इ.स. ३२० ते ३४०) :-** घटत्कोचानंतर त्याचा मुलगा चंद्रगुप्त पहिला हा गादीवर आला त्याच्या कारकिर्दीमध्ये गुप्त घराण्याचा नावलौकीक वाढीस लागला. इ.स. ३२० मध्ये फार मोठया प्रमाणात राज्यरोहण समारंभ केला. यामुहुर्तावर त्याने आपला नवीन गुप्त संवत केला. पराक्रमी राजाच फक्त नवीन कालखंडातला प्रारंभ करीत असत यावरुन चंद्रगुप्त पहिला देखील अतिशय पराक्रमी होता. त्याने स्वतःला महाराजधीराज ही पदवी लावून घेतली होती. यावरुन त्याची लष्करी शक्ती अफाट होती आणि सम्राट या पदाला योग्य होता. यावरुन निश्चितच चंद्रगुप्त पूर्वी पेक्षा बलवान होता असे दिसते. गादिवर आल्यानंतर चंद्रगुप्ताने वैशाली येथील लिच्छवी येथील राजकन्या कुमारदेवी हिच्याशी विवाह केला व चंद्रगुप्ताच्या जीवनातील महत्वाची घटना आहे. कारण तत्कालीन राजकीय जीवनात वैशालीचे लिच्छवी घराणे हे अत्यंत सामर्थ्य संपन्न समजले जात असे.

## ७.३ साम्राज्य विस्तार

**सम्राट समुद्रगुप्त (इ.स. ३३५ ते ३७५) :-** भारताच्या इतिहासामध्ये जे काही थोडे राजे आपल्या अंगाच्या गुणाने संबंध भारतीय संस्कृतीला आदरणीय ठरले आहेत. त्यामध्ये

समुद्रगुप्ताचा वरचा क्रमांक लागतो. गुप्त सम्राट, पहिला चंद्रगुप्त आणि राणी कुमारदेवी यांचा हा राजपुत्र होय. राजा चंद्रगुप्ताने लहानपणापासून या राजकुमाराला आवश्यक असणारे बौध्दिक व लष्करी शिक्षण दिले. समुद्रगुप्त हा लहानपणा पासूनच हुशार व गुणी असल्याने तत्कालीन सर्व विद्या व कला यांचा त्याने अभ्यास केला. युवराज असताना त्याने लढाई जिंकल्या होत्या. दरबारातील सरदारांवर त्याचे वर्चस्व होते. आपल्या पित्याच्या कारकिर्दीतच त्या आपल्या सामर्थ्यांची ओळख करुन दिली होती. सम्राटाला आवश्यक असणारे सर्व गुण त्याच्या जवळ असल्याने तो लोकप्रिय झाला होता. त्याचे हे कर्तुत्वपासून चंद्रगुप्त समुद्रगुप्ताला आपला वारस म्हणून घोषित केले होते. पुढे इ.स. ३३५ मध्ये पहिला त्यानंतर समुद्रगुप्त हा राजा झाला. गुप्त घराण्यातील समुद्रगुप्ताची राजकीय कारर्किद इतिहासामध्ये प्रसिध्द आहे.

**उत्तरेकडील ९ राज्यांचा केलेला पराभव :-** समुद्रगुप्ताने सुरुवातीपासूनच महान सम्राट होण्याचे आपल्या समोर ठेवले होते. आपल्याला सबंध भारतावर राज्य करावयाचे असेल तर उत्तरेकडील शत्रु संघाला नष्ट केले पाहिजे हे लक्षात घेऊनच उत्तर भारतातील राजांविरुध्द मोहिम काढली. आपल्या राजधानीच्या आसपास एकही शत्रु शिल्लक ठेवायचा नाही. हाच उदद्ेश समोर ठेऊन त्याने उत्तरेकडील ९ राजांचा पराभव केला. ते राजे पुढीलप्रमाणेः-

| | | |
|---|---|---|
| १) रुप देव | ५) गणपतीनाग | ९) बलवर्मन |
| २) मातिल | ६) नागसने | |
| ३) नागदत्त | ७) नंदिन | |
| ४) चंद्रवर्मा | ८) अच्युत | |

समुद्रगुप्ताने उत्तेरकडील या ९ राजांचा पराभव केल्यामुळे उत्तरभारतामध्ये भारताचा काही भाग व पश्चिम बंगालचा काही भाग त्यांच्या राज्यात समाविष्ट झाला.

**अन्य राजांवर मिळविलेला विजय :-** समुद्रगुप्ताने उत्तर भारतावर विजय मिळवल्या नंतर पुर्व सरहदद्ीवरील वन्य जमातींची ५ राज्ये जिंकून त्यांना आपले सर्वभौमत्व मान्य करावयास लावले ती ५ राज्ये पुढील प्रमाणे :-

१) दावक – (पूर्व बंगाल)
२) समतर – (बम्हपुत्रच्या मुखाजवळील प्रदेश)
३) कामरुप – (आसाम)
४) कत्रीपूर – (गढवालचा प्रदेश)
५) नेपाळ

**दक्षिणेकडील १२ राजांचा केलेला पराभव / दक्षिण दिग्विजय :-** समुद्र गुप्ताने राजा झाल्यानंतर प्रथम आपल्या राज्यांच्या उत्तर आणि पूर्व सीमा सुरक्षित केल्यानंतर त्याने दक्षिणेकडे लक्ष दिले. यावेळी दक्षिण भारतात अनेक छोटी-छोटी राज्ये होती. दक्षिणेत पूर्वी असलेले सातवाहनांचे राज्य नष्ट झाले होते आणि त्याऐवजी दक्षिणेमध्ये वाकाटकांचे राज्य अस्तित्वात आले होते. समुद्रगुप्ताने उत्तरेकडे विजय मिळविल्यानंतर दक्षिण मोहिम हाती घेतली. समुद्रगुप्ताच्या दक्षिण दिग्विजयाची माहिती अलाहाबाद येथील स्तंभलेखावरुन मिळते.

समुद्रगुप्ताने या मोहिमेमध्ये दक्षिणेतील वाकाटक राजांना न दुखावला लहान लहान राज्ये जिंकून घेतली समुद्रगुप्ताने दक्षिणेतील १२ छोटी राज्ये जिंकून घेतली ती पुढीलप्रमाणे :-

१) महाकोसालचा महेंद्र
२) महाकांतारचा व्याघ्रराज
३) कोसलाचा राजा महेंद्रगिरी
४) पिस्टापूरचा राजा महेंद्रगिरी पिष्ठापूरचा
५) कोटटूरचा राजा स्वामीदत्त
६) एरंडपल्लचा राजा दमन
७) कांचीचा राजा विष्णूगोप
८) अवमूक्तचा राजा निलराजा
९) वेणीचा राजा हस्तीवरमन
१०) पालवकाचा राजा उग्रसेन
११) देवराष्ट्राचा राजा
१२) कुस्थाल पूरचा राजा धनंजय

समुद्रगुप्ताने आपल्या दक्षिण मोहिमेत या १२ राजांचा पराभव केला. समुद्रगुप्ताने ही १२ राज्ये जिंकून घेतली असली तरी ती राज्ये आपल्या ताब्यात न घेता त्यांची राज्ये त्या राजांना परत करण्यात आली. या राजांना समुद्रगुप्ताची फक्त मांडलिकत्व स्विकारावे लागले. सम्राट समुद्रगुप्ताची ही मोहिम इतकी यशस्वी झाली की त्याने ३ वर्षाच्या अवधित ३ हजार मैलांचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. समुद्रगुप्ताची दक्षिण मोहिम अतिशय यशस्वी ठरले.

**शेजारील राज्यांशी संबंध :-** समुद्रगुप्ताने भारतावर राज्य करीत असताना अनेक लहान मोठया राज्याचा पराभव केला. प्रचंड साम्राज्य विस्तार घडवून आणला. साम्राज्य विस्तारांबरोबरच परकीय सत्तांबरोबर मैत्रीपूर्ण व सहाकर्याचे संबंध निर्माण केले. म्हणूनच त्याचे कुशान, शक इ. राजा बरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. तर शिलोरचा राजा मेघवर्ण यांच्या विनंतीला मान देऊन समुद्रगुप्ताने बुध्दगया येथे बौध्द भिक्षूकींसाठी विश्राम गृह बांधण्याची परवानगी दिली.

समुद्रगुप्ताने आपल्या काळात उत्तर, भारत, पंजाब, पूर्वेला ओरिसापर्यत दक्षिण हिंदी महासागरापर्यत विशाल साम्राज्य घडवून आणला यामुळे गुप्त घराण्यातील एक महत्वाचा सम्राट म्हणूनच समुद्रगुप्ताचा उल्लेख केला जातो.

**अश्वमेध यज्ञ :-** समुद्रगुप्ताने राजा झाल्यानंतर आपल्या राजधानीच्या चारही दिशांवर विजय मिळविल्यानंतर आपले प्रभुत्व सिध्द करण्यासाठी व वैधिक धर्माचे पुर्नजीवन करण्यासाठी त्याने अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरविले. अश्वमेध यज्ञ हा श्रेष्ठता निदर्शक आहे. तसेच आर्य परंपरेचे पुर्नजीवन घडवून आणणार आहे. अश्वमेध यज्ञाच्या निमित्ताने समुद्रगुप्ताने सुवर्ण नाणी पाडली आणि या नाण्यावर एका बाजूला यज्ञासमोर उभा असलेला अश्व तर दुसऱ्या बाजूला राणीच्या प्रतिमा आहे. या अश्वमेध यज्ञाच्या निमित्ताने त्याने अपार दानधर्म केले.

**समुद्रगुप्ताची योग्यता :-** प्राचीन भारतीय इतिहासातील समुद्रगुप्त हा एक महान राजा होता. गुप्तकाळामध्ये त्याला अधिक महत्व आहे. समुद्रगुप्ताची योग्यता ठराविक असताना अनेक बाबींचा विचार करावा लागतो.

**महान योध्दा :-** समुद्रगुप्त हा एक धिप्पाड, भरदार छातीचा व अद्‌भूत व्यक्तीमत्व असलेला राजा होता. तसेच तो मोठा व महान योध्दा होता. प्रत्येक लढाई तो अग्रणी राहून स्वतः लढाई करीत. तो शिस्तप्रिय सेनापती होता. समुद्रगुप्ताने तो आखलेल्या लष्करी मोहिमेबदद्‌ल डॉ. मुजुमदार असे म्हणतात की, त्याची कारर्किद एक विशाल लष्करी मोहिमच होती. खरोखरच समुद्रगुप्त शांत संग्रमाचा एक रणधीर होता. तो वाघासारखा पराक्रमी होता. म्हणून त्याचा उल्लेख व्याघ्र पराक्रम असा केला जातो. सेनापती म्हणून त्याने केलेल्या लढाया अतिशय महत्वाच्या आहेत. उत्तर भारतातील ९ राजांचा त्याने केलेला पराभव हे त्याच्या उत्कृष्ट युध्द नितीचे मोठे उदाहरण आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्याने राजधानीपासून दूर असलेल्या प्रदेशात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पण त्या राज्यांना नेस्तानाबूत न करता फक्त मांडलिकत्व स्विकारावे लागले. यामध्ये त्याचा मुत्सदद्‌ीपणा दिसून येतो. त्याच्या लष्करी विजयाला नौदलाची साथ होती. समुद्रगुप्ताने आपल्या काळात जे महान विजय मिळवले. त्याबदद्‌ल इतिहासकार व्हिसेन्टस्मिथ याने भारतीय नेपोलियन म्हणून त्याचा गौरव केला आहे. परंतु नेपोलियन आणि समुद्रगुप्त या दोघांच्याही कारार्किदीचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, सम्राट नेपोलियनपेक्षा समुद्रगुप्त श्रेष्ठ होता कारण समुद्रगुप्ताला त्याच्या जीवनामध्ये पराभव कधी माहितच नव्हता. तो अखंड विजयी राजा होता. म्हणूनच त्याला प्राचीन भारतीय इतिहासातील गुप्त काळातील महत्वाचा सम्राट मानले जाते.

**समुद्रगुप्त एक श्रेष्ठ प्रशासक :-** समुद्रगुप्त जसा महान योध्दा होता तसा उत्कृष्ट प्रशासकही होता. त्याने प्रशासनात अनेक सुधारणा केल्या. त्याने आपल्या कार्यकाळात प्रशासनामध्ये श्रेणीबध्द अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. प्रत्येकाचे अधिकार व कर्तव्य निश्चित केले. न्यायदानाच्या बाबतीत तो अतिशय काटेकोर होता. त्याने लोककल्याणकारी प्रशासन निर्माण करण्याचे कार्य केले. चलायन व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणला. प्रशासनामध्ये शिस्तबध्दपणा आणला. मौर्यकालीन शासनापेक्षा त्याचे शासन वेगळे आणि लोकाभिमुख होते. त्याचा प्रशासकीय वर्ग अतिशय कार्यक्षम होता. त्याच्या अपरोक्ष देखील प्रशासन उत्तमरीत्या चालविले जात असे. प्रशासनाकडे प्रांतिक व ग्राम प्रशासनाच्या माध्यमातून साम्राज्यातील जनतेचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. आपल्या साम्राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याबरोबरच व्यापार आर्थिक विकास, विद्या, कला, साहित्य इ. बाबतीत ही मोठा विकास घडवून आणला. म्हणूनच समुद्रगुप्ताची शासन व्यवस्था लोकाभिमुख ओळखली जाते.

**धर्मशील राजा :-** समुद्रगुप्त हा वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. विद्वान व गुणी लोकांना दान धर्म करणे हे त्याचे नियमित काम होते. समुद्रगुप्ताने अश्वमेध यज्ञ केल्यानंतर हजारो गरीब लोकांना व ब्राम्हणांना दानधर्म केला. तो धर्म सहिष्णू राजा होता. तो जरी वैदिक धर्माचा अभिमानी असला तरी त्याने इतर धर्मांचा द्वेष केला नाही. त्याची सर्व धर्माशी वागणूक धर्मसहिष्णू अशीच होती. म्हणूनच त्याने लंकेचा राजा मेघवर्ण याच्या विनंतीला मान देऊन बुध्दगया येथे त्याने बौध्दविहार बांधण्यास परवानगी दिली. त्याचे कार्य इतके लोकमान्य पावले होते की त्याचा उल्लेख पृथ्वीतलावरील देव किंवा मानवीरुपातील देव अशा शब्दात केला. एकंदरीत समुद्रगुप्त हा सर्वश्रेष्ठ राजा होता. आणि महत्वाचे म्हणजे तो धर्मशाली राजा होता.

**विद्या व कला यांचा आश्रयदाता :-** समुद्रगुप्तच्या काळात भारतामध्ये सुवर्णयुगाचा पाया घातला गेला. स्वतः समुद्रगुप्त हा श्रेष्ठ विद्वान, प्रतिभावना, कवी, ललित कलाचा व्यासंगी व अनेक कलांचा उदार आश्रयदाता होता. समुद्रगुप्ताच्या बुध्दीमत्तेबददल त्यांच्या दरबारातील राजकवी हरिसेन असे म्हणतो की विद्वत्तेच्या बाबतीत समुद्रगुप्ताच्या युगाचे आश्चर्य ठरले. त्याच्या बुध्दिमत्ता बृहस्पतीलाही लाजीरवाणी होती. त्याला इतिहासामध्ये कवीराज म्हणूनही ओळखले जाते. तसेच समुद्रगुप्ताच्या एका नाण्यावर तो विणा वाजविताना दाखविला आहे. म्हणजेच त्याला संगीताची आवड होती. त्याबददल राजकवी हरीसेन असे म्हणतो की संगीत आणि गायनाचे त्याचे ज्ञान नारदाला लाजीरवाण्या इतपत होते. म्हणजेच समुद्रगुप्ताने आपल्या कारर्किदीत विद्या व कला यांना उदारपणे आश्रय दिला होता.

प्राचीन भारतीय इतिहासातील गुप्त घरण्यातील एक अत्यंत महत्वाचा सम्राट म्हणून समुद्रगुप्ताचा उल्लेख केला जातो. काही विद्वानांच्या मते, तो नवयुगाचा अवतार किंवा प्रणेता होता. सज्जनांचे आशास्थान, दुर्जनांचा काळ, श्रेष्ठ विद्वत्ता, निर्व्यसनी, रसिक व उच्च नितीमान म्हणून तो ओळखला जातो. धर्म, राजकारण, संस्कृती आणि शक्ती यांचा मनोहर संगम म्हणजे समुद्र होय. आणि समुद्रगुप्ताच्या काळात भारतात सुवर्ण युगाचा पाया घातला गेला. त्यामुळे प्राचीन भारताच्या इतिहासात समुद्रगुप्ताची कारर्किद अतिशय महत्वाची आहे.

**आपली प्रगती तपासा-**

१. समुद्रगुप्ताच्या कारर्किदीचे व कामगिरीचे वर्णन करा.

---

---

---

---

---

## ७.४ सम्राट दुसरा चंद्रगुप्त (विक्रमादित्य) (इ.स. ३७५ ते ४१४)

**साम्राज्य विस्तारः**

प्राचीन भारताच्या इतिहासात समुद्रगुप्तानंतरचा महत्वाचा गुप्त सम्राट म्हणून दुसरा चंद्रगुप्त याचा उल्लेख केला जातो. चंद्रगुप्त हा पित्याप्रमाणेच अतिशय आक्रमक व पराक्रमी होता. त्याने आपल्या कार्यकाळात साम्राज्याच्या चारही दिशांना विजय प्राप्त केला होता. व गुप्ताचे राज्य अधिकच बळकट केले.

समुद्रगुप्त व सम्राज्ञी दत्तदेवी यांचा हा राजपुत्र होता. राजगुपतानंतर चंद्रगुप्त हा सम्राट झाला. त्याने केलेल्या पराक्रमामुळे त्याला विक्रमादित्य, सिंह विक्रम व शकारी यानावाने ओळखले जाते.

**दुसरा चंद्रगुप्ताचा साम्राज्यविस्तार :-** सम्राट चंद्रगुप्ताला समुद्रगुप्ताकडून राज्याचा वारसा मिळाला होता. इ.स. ३८० ते ४१४ हा दुसरा कालखंड होता. चंद्रगुप्त ज्यावेळी सम्राट झाला त्यावेळी चंद्रगुप्तांना विरोध करणारी अनेक राज्य होती. त्यातच समुद्रगुप्ताचा मृत्यु झाल्यानंतर रामगुप्ता हा राजा झाला. परंतु त्याच्या दुबळया धोरणांमुळे गुप्ताच्या शत्रुंनी पुन्हा कारवाया करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या वेळी पश्चिमेकडील बाकीचे प्रबळ सत्ता होती. या शकांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. तर वायव्य भागामध्ये कुशाणाचे राज्य होते. कुशाण अधिकारी व गुप्त अधिकारी यांच्यात नेहमी संघर्ष होत असे. त्यावेळी वायव्येकडील कुशाणचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. तर राजधानीच्या पूर्वेस समतर, कामरुप या राज्यांनी पुन्हा डोके वर काढले जर दक्षिणेतील असंतुष्ट राजांनी गुप्तांच्या विरुध्द हालचाली करण्यास सुरुवात केली होती. या सर्व शत्रुंचा बंदोबस तर केलाच पण आपले राज्यही बळकट केले. चंद्रगुप्त दुसरा याने सत्ताधीश झाल्यानंतर प्रथम पश्चिमेकडील शकांच्या विरोधात मोहिम काढली.

**पश्चिमेकडील शकांचा बंदोबस्त :-** समुद्रगुप्ताच्या काळातच माळवा, सौराष्ट व गुजरात मध्ये शंक सत्ताधीशांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. या शंकांच्यापैकी माळव्याच्या शक राजा रुद्रसिंह तिसरा हा अतिशय सामर्थ्यशील शासक होता. हा स्वत:ला महाक्षत्रय मानत असे. याने समुद्रगुप्ताच्या मृत्युनंतर गुप्त राज्यांचा काही भाग जिंकला म्हणून चंद्रगुप्ताने त्यांच्यावर स्वारी केली. सम्राट चंद्रगुप्त हा दुसरा व शक सत्ताधीश यांच्यामध्ये १२ वर्षे युध्द चालले. शेवटी चंद्रगुप्ताने पश्चिमेकडील शकांचा पूर्ण पराभव केला व ३०० वर्षापासून भारताच्या पश्चिमभागात असणारी शकांची सत्ता नष्ट झाली. म्हणूनच त्याला शकारी असे म्हणतात. शकारी सत्तेचा नाश केल्यानंतर माळवा, गुजरात आणि सौराष्ट्र हा समृध्द प्रदेश त्याने आपल्या साम्राज्यात विलीन करुन टाकले. म्हणजेच शकांचा पराभव झाल्यानंतर संपूर्ण पश्चिम किनारा गुप्तांच्या नियंत्रणाखाली आला.

**वायव्य भारतातील आक्रमण :-** दुसरा चंद्रगुप्ताने पश्चिमेकडील शकांचा बंदोबस्त केल्यानंतर वायव्य भारताकडे लक्ष दिले. वायव्य सरहद प्रदेशात कुशणांचे राज्य होते. या कुशणांच्या राज्य गांधार पर्यत पसरले होते. आणि गुप्त राज्याच्या सीमा देखील वायव्य सरहददीपर्यत भिडल्या होत्या त्यामुळे सहाजिकच गुप्त अधिकारी व कुशाण अधिकारी यांच्यामध्ये नेहमीच संघर्ष होत असे. या संर्घषाचा शेवट करण्यासाठी दुसऱ्या चंद्रगुप्ताने वायव्य भारतावर स्वारी केली. सम्राट चंद्रगुप्त यांच्या वायव्य भारतातील आक्रमणाची माहिती ''मिहीरोली''येथील स्तंफावरुन मिळते. या मोहिमेमध्ये दुसऱ्या चंद्रगुप्ताने सप्तसिंधुच्या नद्या ओलांडून आपल्या शत्रूंचा नाश केला व वायव्य भारतातील कुशाणांचे राज्य नष्ट करुन तेथे आपली सत्ता प्रस्थापित केली.

**पूर्वेकडील साम्राज्य विस्तार :-** दुसऱ्या चंद्रगुप्ताने पश्चिम आणि वायव्येकडील शत्रूंचा बंदोबस्त केल्यानंतर पूर्व भारताकडे लक्ष वळविले. मोहिमेची माहिती दिल्ली येथील स्तंभावरुन मिळते. सम्राट समुद्रगुप्ताच्या काळीच पूर्व भारतातील राज्याने गुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले होते. परंतु समुद्रगुप्ताच्या मृत्युनंतर गुप्त राज्यांमध्ये जी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली त्याचा फायदा पूर्वेकडील राज्यांनी घेऊन गुप्तांच्या विरुध्द हालचाली करण्यास सुरुवात केली होती. तेव्हा दुसऱ्या चंद्रगुप्ताने पश्चिमेकडील शकांचा बंदोबस्त केल्यानंतर पूर्वेकडे आपले लक्ष वळविले. समतर, कामरुप (आसाम) दावक या राज्यांनी एकत्र येऊन चंद्रगुप्ताच्या विरुध्द एकसंघ निर्माण केला होता. दुसऱ्या चंद्रगुप्ताने या संघावर आक्रमण करुन विरोधकांचे सर्व बेत धुळीस मिळवले होते. यासंघांचा पराभव केला आणि या मोहिमे दरम्यान दुसऱ्या चंद्रगुप्तांच्या

नागवंशीय राज्यांचा संबंध आला. दुसऱ्या चंद्रगुप्ताने नागवंशीय राज्यांशी वैवाहिक संबंध निर्माण केले. नागराज कन्या कुबेरीनाग हिच्याशी दुसऱ्या चंद्रगुप्ताने विवाह करुन नागवंशांवरील राजा बरोबर वैवाहिक संबंध जोडले. याच नागराज कन्येपासून दुसऱ्या चंद्रगुप्ताला प्रभावती गुप्त नावाची राजकन्या झाली आणि या प्रभावती गुप्तचा विवाह दक्षिणेतील वाकाटक राजा रुद्रसेन याच्याशी लाऊन दिला. परिणामी दक्षिणेतील प्रभावी वाकाटाकाशी दुसऱ्या चंद्रगुप्ताने वैवाहीक संबंध जोडले आणि या वाकाटाकामार्फत दक्षिणेतील आपल्या विरोधकांवर नियंत्रण प्रस्थापित केले.

**दक्षिणेतील आक्रमणाचा बंदोबस्त :-** सम्राट गुप्ताने आपल्या कारर्किदीत दक्षिण दिगविजय मोहित काढली. यामोहिमेमध्ये त्याने दक्षिणेतील १२ राज्यांचा पराभव केला आणि हिंदीमहासागरापर्यत आपले राज्य निर्माण केले. दक्षिणेतील १२ राज्ये त्याचे मांडलिक राज्ये होते. परंतु समुद्रगुप्ताच्या मृत्युनंतर या राज्यांनी पुन्हा डोके वर काढले. आणि ते स्वतंत्रपणे वागत होते. समुद्रगुप्ताने दक्षिण मोहिम काढली १२ राज्यांचा पराभव केला परंतु ही राज्ये खालसा न करता त्यांना आपले मांडलिकत्व स्विकारावे लागले. त्यामुळे या राज्यांवर नियंत्रणचा असा कोणताच मार्ग अनुसरला नव्हता. परंतु दुसऱ्या चंद्रगुप्ताने उत्तरेकडील शत्रूंचा बंदोबस्त केल्यानंतर दक्षिण मोहिम काढली यावेळी दक्षिणेमध्ये वाकाटकांची प्रभावी सत्ता होती. दुसऱ्या चंद्रगुप्ताने दक्षिणेतील प्रभावी वाकाटकांशी आपले वैवाहिक संबंध निर्माण केले. आपली राज्यकन्या प्रभावतीगुप्ता ही वाकाटक घराण्यात दिली आणि या वाकाटाकामार्फत दक्षिणेतील राज्यांवर नियंत्रण केले. दुसऱ्या चंद्रगुप्ताने हे दक्षिणेतील धोरण अतिशय यशस्वी केले.

सम्राट समुद्रगुप्ताच्या मृत्युनंतर दुसरा चंद्रगुप्त हा सम्राट झाला. त्याने दक्षिणेतील आणि उत्तरेतील आपल्या शत्रूंचा बंदोबस्त केला. दुसऱ्या चंद्रगुप्तांच्या कारर्किदीत गुप्तांचे राजे अतिशय सामर्थ्यशाली व शक्तीशाली बनले.

## ७.५ चंद्रगुप्ताची योग्यता

प्राचीन भारतीय इतिहासातील गुप्तकाळातील एक महान सत्ताधीश म्हणून दुसऱ्या चंद्रगुप्ताचा उल्लेख केला जातो. समुद्रगुप्ताप्रमाणेच विविध क्षेत्रात चौफेर कर्तृत्व गाजवणारा दुसरा गुप्त सम्राट म्हणून दुसरा चंद्रगुप्ता म्हटले जाते. चंद्रगुप्ताने बालपणापासून समुद्रगुप्ताचे धोरण बारकाईने पाहिले होते त्यामुळे समुद्रगुप्त आणि चंद्रगुप्ता यांच्या धोरणामध्ये नाममात्र फरक जाणवतो. चंद्रगुप्ताच्या ठिकाणी महान योध्दा कुशल प्रशासक, थोर राजनितीज्ञ विद्वानांचा आश्रयदाता व कलागुणांचा चाहता आणि प्रजेवर प्रेम करणारा राजा असे अनेक गुण दिसून येतात. दुसऱ्या चंद्रगुप्ताची योग्यता ठरवित असताना खालील बाबींचा विचार करावा लागतो.

**१) महान योध्दा :-** दुसरा चंद्रगुप्त हा समुद्रगुप्ताप्रमाणे महान योध्दा होता. तो अखंड विजयी राजा होता. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीत विजय मिळवून आपल्या पित्याचा वारस टिकवून ठेवला होता. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीत प्रथम शकांचा बंदोबस्त केला. व पश्चिम भारतातील शकांची ३० वर्षाची सत्ता नष्ट केली. नंतर त्याने वायव्य भारतातील परकीय सत्तांचा बंदोबस्त केला. परकीयांचे आक्रमण होणार नाही याची काळजी घेतली. तसेच पूर्वेकडील छोटया राज्यांचा पराभव करुन त्याने आपली सीमा बंगालच्या समुद्रापर्यंत सोडविल्या.

तर दक्षिणेकडील वाकाटाकांशी वैवाहीक संबंध बंदोबस्त करुन आपली महानता सिध्द केली. दुसऱ्या समुद्रगुप्ताने ज्या मोहिमा काढल्या प्रत्येक मोहिमेत यश मिळवले. याच वरुन तो एक महान योध्दा होता हे सिध्द झाले.

**२) कुशल प्रशासक :-** दुसरा चंद्रगुप्ता हा कुशल प्रशासक ही होता. उत्कृष्ट राज्यकारभार कसा चालवावा याचा वारसा त्याला आपल्या पित्याकडून मिळाला. दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या राज्यामध्ये उत्कृष्ट शासन व्यवस्था निर्माण केली. प्रजेच्या अडीअडचणींना सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांची श्रेणी निर्माण केली. त्याने प्रजेचे हित पाहण्याचेच कार्य केले. न्यायदानाच्या बाबतीत तो अतिशय काटेकोर होता. एक प्रजा दक्ष राजा म्हणून दुसरा चंद्रगुप्त राजा प्रसिध्द आहे.

**३) थोर राजनिती तंत्र :-** दुसरा चंद्रगुप्ता हा महान योध्दा व कुशल प्रशासक ही होता. पण तो थोर राजतज्ञ होता. त्याने तलवारीच्या जोडीबरोबरच कौटील्याच्या राजनितीच्या उत्तम व्यापार केला. त्यानुसार त्याने एकतर शत्रूंचा नाश केला किंवा त्याने आपले मित्र बनविले. शत्रूंचा नाश करत असताना साम, दाम, दंड, भेद या नितीचा वापर केला. तसेच प्रबळ शत्रूंना वंश करुन घेण्यासाठी त्याने विवाह संबंधांचा अवलंब केला. त्यानुसार नागवंशीय राजकन्या कुबेर हिच्याशी विवाह केला तर दक्षिणेतील वाकाटकांशी लढणे शक्य नाही. आपली मुलगी प्रभावती हिचा विवाह वाकाटक राजा दुसरा रुद्रसिंह यांच्याशी लावून दिला यावरुन दुसरा चंद्रगुप्ता हा थोर राजनिती तज्ञ होता हे सिध्द झाले.

**४) कला गुणांचा चहाता :-** दुसरा चंद्रगुप्ता हा कलागुणांचा चहाता असून त्याने विद्या व कला यांना आश्रय दिला होता. त्यांच्या दरबारामध्ये कालीदास (कवी व नाटककार), धन्वंतरी (वैद्यक), वराह मिहीर (भुगोलतज्ञ), वररुची (व्याकरणकार), वेतालभटट् (जादुगार), शंकू (शिल्पकार), क्षपणक (ज्योतिषी), ही कला संपन्न माणसे त्याच्या दरबारात होती. म्हणजे दुसऱ्या चंद्रगुप्ताने आपल्या घराण्याच्या परंपरानुसार विद्या व कला यांना आश्रय दिला होता.

**५) धर्म सहिष्णू राजा :-** दुसरा चंद्रगुप्ताच्या धार्मिक धोरणाची माहिती अनेक नाण्यांवरुन मिळते. त्याचे धार्मिक धोरण सहिष्णु होते, तो वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याच्या काही नाण्यावर महाराजाधिराज व परमभागवत ही बिरुदे त्याने लावली होती. यावरुन तो वैष्णवपंती होता हे स्पष्ट होते. त्याच बरोबर दुसरा चंद्रगुप्त हा परमधर्मीय सहिष्णु असल्यामुळे त्याने जैन आणि बौध्द धर्मीयांना समानतेने व आदराने वागवले. यावरुन चंद्रगुप्ता हा धर्म सहिष्णु राजा होता हे सिध्द झाले.

अशा प्रकारे चंद्रगुप्त हा गुप्त काळातील एक कर्तबगार व पराक्रमी राजा होता. एकंदरीत चंद्रगुप्ता हा पराक्रमी, मुत्सदद्दी, न्यायप्रिय, ललित कलांचा चाहता व प्रजेवर प्रेम करणारा राजा होता.

**आपली प्रगती तपासा –**

१. दुसरा चंद्रगुप्ताचा साम्राज्य विस्तार स्पष्ट करा.

## ७.६ पहिला कुमार गुप्त (इ.स. ४१४ - ४५५ - REF. गाटाळ : २४५-२४६)

हा चंद्रगुप्त दुसरा याचा पुत्र होय. इ.स. ४१४-४५५ या ४० वर्षाच्या काळात तो गुप्ताच्या गादीवर होता. कुमारगुप्ताने अश्वमेध यज्ञ केला होता. व त्या प्रसंगी त्याने नाणी काढली होती. या नाण्यांवर अश्वमेध महो, जयंती देवम् कुमार हे शब्द कोरले होते. दुसरा चंद्रगुप्त याला ध्रुवदेवी पासून झालेला पुत्र म्हणजे कुमारगुप्त होय. त्याच्या काळात गुप्त साम्राज्यात शांतता, सुव्यवस्था व समृद्धी होती. परंतु त्याची शेवटची वर्षे मात्र सुरुवात गेली नाहीत. कारण मध्यभारतात नर्मदा नदीच्या काठावरील पुष्यमित्र नामक जमातीने गुप्तविरुद्ध बंड केले. ते बंड मोडण्यासाठी कुमार गुप्ताने आपला पुत्र स्कंदगुप्त यास लष्करी मोहिमेवर पाठवले. स्कंदगुप्ताला हे बंड मोडून काढण्यासाठी बिकट संकटांना तोंड द्यावे लागले. तरी ते नेस्तानाबूत करण्यात शेवटी यश आले. कुमार गुप्ताच्या कारकीर्दीच्या शेवटी हूण या परकियांची आक्रमणे सुरु झाली. या आक्रमणाच्या प्रतिकारही युवराज स्कंदगुप्ताने केला होता. हुणांची आक्रमणे सुरु असताना कुमार गुप्त मृत्यु पावला. त्याने गुप्तांचे साम्राज्य ४० वर्ष सांभाळले व गुप्तांचा दरारा टिकवला ही त्याची मोठी कामगिरी होय. तो धर्म सहिष्णू होता.

## ७.७ स्कंदगुप्त व त्याचे वारस

स्कंदगुप्ताने वडिलांच्या हयातीतच पुष्यमित्राचे व हुणाचें आक्रमण थोपवून धरल्याने स्कंदगुप्त हा योद्धा व पराक्रमी राजा आहे हे अगदी प्रारंभीच सिद्ध झाले होते. इ.स. ४५५ ते ४६७ या १२ वर्षाच्या काळात तो सत्तेवर होता. त्याने हुणांच्या आक्रमणाच्या यशस्वीरित्या प्रतिकार केला. स्कंदगुप्ताने सोण्याची नाणी काढली नाहीत. यावरुन हुणांशी लढण्यात गुप्तांची खूप शक्ति खर्चि झाली, त्याच्या तिजोरीवर ताण पडला असा अर्थ इतिहासकार काढतात. स्कंदगुप्ताने हुणांचा पराभव करुन जे यश मिळविले. त्यामुळे तो स्वतःला विक्रमादित्य हे बिरुद्र लावतो. गुप्तांचा राज्यपाल असतानाच त्याने सुदर्शन तलावाची दुरुस्ती केली होती. त्याने काशीजवळ भित्तारी येथे एक विष्णू मंदिर उभारले व आपला किर्ती लेख कोरुन ठेवला. परंतु स्कंदगुप्ताच्याच राजवटीपासून गुप्ताच्या ऱ्हासाची प्रक्रिया सुरु झाली होती. त्याच्यानंतर विक्रम पुरुगुप्त, नृसिंहगुप्त, बलादित्य, कुमार गुप्त दुसरा, बुधगुप्त, कृष्ण गुप्त, देवश्री हर्ष गुप्त, जीवीत गुप्त, कुमार गुप्त तिसरा, वगैरे गुप्तांचे राजे झाले त्या प्रत्येकाची कारकिर्द अल्प होती व

अयशस्वी होती. गुप्तांच्या साम्राज्याच्या प्रचंड डोलारा सांभाळण्यास नंतरचे राजे असमर्थ ठरले. काठेवाडमध्ये मैद्रक, कनोजला गोखरी व स्थानेश्वराला वर्धण अशी घराणी उदयास आली. त्यांनी गुप्तांच्या प्रदेशावर हल्ले केले. वाकाटकांनीही गुप्तांचया प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. बंगालमध्ये वैन्यगुप्त व बुंदेलखंडात भानुगुप्त यांनी स्वतंत्रपणे कारभार करण्यास प्रारंभ केला. इ.स. ५५० मध्ये गुप्त सत्तेचा अस्त झाला. पुढे १२ व्या शतकापर्यंत गुप्त घराण्याचे संदर्भ येत असले तरी त्यांचे राज्य नाममात्र व छोटे होते.

## ७.८ सारांश

श्री. गुप्त हा या राजघराण्यातील पहिला राजा गुप्त घराण्याचा साम्राज्याचा खरा विस्तार घटोत्कच गुप्ताच्या काळात झाला. गुप्त साम्राज्य राज्यविस्ताराच्या शिखरावर पोहचले ते समुद्रगुप्ताच्या काळात अधिक संकल्पना, साहित्य शास्त्र, कला इत्यादी भागात प्रगती झाली. महाराजाक्षिराज हा गुप्त साम्राज्यातील सम्राट त्याने गुप्त राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. समुद्रगुप्त हा ही हिग्वीजयी सम्राट होता. तो खूप पराक्रमी होता. त्यांचा उल्लेख भारतीय नेपोलियन म्हणून केला जातो. समुद्रगुप्ताने सर्व प्रदेश आपल्या प्रगल्क राज्याखाली न आणता त्यांना मांडलिक बनवले. सम्राट चंद्रगुप्तनंतर त्याचा मुलगा रामपुत्र सत्तेवर आला परंतू त्याची करकिर्दी अल्पायुषी ठरली.

## ७.९ दिर्घोत्तरी प्रश्न

१. साम्राज्यकर्ता या नात्याने समुद्र गुप्ताचे मूल्यमापन करा.
२. समुद्र गुप्ताच्या कारकिर्दीचे व कामगिरीचे वर्णन करा.
३. साम्राज्यकर्ता व शासक या नात्याने दुसरा चंद्रगुप्त (विक्रमादित्य) यांच्या कामगिरीचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# ८

# गुप्त प्रशासन व सुवर्ण युग

**प्रकरणाची रचना:**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ गुप्तकाळातील प्रशासन व्यवस्था
८.३ गुप्तकाळातील सामाजिक जीवन
८.४ गुप्तकाळातील आर्थिक जीवन
८.५ गुप्तकाळातील धार्मिक जीवन
८.६ गुप्तकालीन सांस्कृतिक जीवन
८.७ गुप्तकाळातील शास्त्रे व शास्त्र
८.८ स्थापत्य कला व शिल्पकला
८.९ गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे
८.१० सारांश
८.११ दिर्घोत्तरी प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये

- गुप्त प्रशासन व्यवस्थेची माहिती समजून घेणे.
- गुप्त कालखंडातील सुवर्ण युगाचा अभ्यास करणे.
- गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना

प्राचीन भारतीय इतिहासामधील गुप्त कालखंड अतिशय महत्वाचा आहे. या काळाला भारतीय इतिहासामध्ये सुवर्ण युग म्हणून ओळखले जाते. गुप्त राज्यांनी आपल्या कार्यकाळात उत्तर भारतातील राजकीय अस्थिरता नष्ट करुन राजकीय क्षेत्रात स्थैर्य निर्माण केले. गुप्तकाळामध्ये राजकीय स्थैर्याबरोबरच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातही बदल घडवून आणला. भारतीय जीवनाचा चेहरा, मोहराच त्यांनी बदलून टाकला त्याचबरोबर विद्वान कलाकार यांना आश्रय मिळाल्यामुळे कला वाङ्मय स्थापत्य त्यामुळे तर भारता संबंध जगाला आदर्श मिळते. म्हणूनच गुप्तकाळास सुवर्ण युग म्हटले. गुप्तकाळातील सर्वांगिण विकासाची माहिती मिळते.

**राजकीय जीवन :** मौर्य काळातील सत्ताधीश प्रमाणेच प्राचीन भारतामध्ये गुप्तराजांनी प्रचंड साम्राज्य विस्तार घडवून आणला आणि या विशाल साम्राज्याच्या प्रशासनासाठी मौर्यांच्या पेक्षाही लोकाभिमुख शासन व्यवस्था गुप्तराजांनी निर्माण केली ती पुढीलप्रमाणे -

## ८.२ गुप्त काळातील प्रशासन व्यवस्था

**१) केंद्रिय शासन व्यवस्था :-** गुप्तकाळामध्ये साम्राज्याचा प्रमुख हा राजा असे परंतु या विशाल साम्राज्याचा राज्यकारभार चालविणे एकटया राजाला चालवणे अशक्य होते. त्यामुळे राजाला प्रशासन मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ असे. तसेच इतर अधिकाऱ्यांच्याही नेमणुका केल्या जात असे गुप्तकाळातील राजे अनियंत्रित असले तरी त्यांनी लोकभिमूख असाच राज्यकारभार केला.

**२) मंत्री परिषद :-** राजाला प्रशासनामध्ये सहकार्य करण्यासाठी मंत्रिपरिषदेची नियुक्ती केली जात असे. या मंत्रिपरिषदेमध्ये विविध खात्याचा व मंत्र्यांचा समावेश केला जात असे. या मंत्री परिषदेच्या प्रमुखाला प्रधानमंत्री असे म्हणत असत. तर इतर मंत्र्यांना अमात्य असे म्हंटले जाई. मंत्रिपरिषदेमधील मंत्र्यांची नियुक्ती वंश परंपरांगत असली तरी एखाद्या मंत्र्यांला बडतर्फ करण्याचा अधिकार राजाला होता. प्रशासनात राजाला सहकार्य करणे, ध्येय धोरण ठरविणे,सल्ला देणे व ठरवलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे ही कामे या मंत्रिपरिषदेला करावी लागत असत.

**३) लष्करी व्यवस्था :-** गुप्तराजांनी आपल्या काळात विशाल साम्राज्य उभे केले होते. त्यामुळे गुप्तकाळात लष्कर प्रभावी असल्याचे दिसले. लष्करामध्ये पायदळ, घोडदळ, हत्तीदळ आणि आरमार असे विभाग होते. या लष्काराचा प्रमुख सेनापती असे गुप्तकाळातील हे अतिशय महत्वाचे खाते होते.

**४) न्याय व्यवस्था :-** गुप्तकाळामध्ये न्यायव्यवस्थेचा प्रमुख राजा असला तरी राजा सर्वच गुन्हयांचा निकाल देऊ शकत नसे त्यामुळे न्यायदानासाठी न्यायालये असत त्यावर न्यायाधीशाची नेमणुक केलेली असत. आणि त्याच्या मार्फत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयन्त केला जात होता. त्या व्यतिरीक्त प्रशासनामध्ये हेर खाते अतिशय महत्वाचे होते. गुप्तकाळामध्ये प्रचंड विस्तारलेले जे साम्राज्य होते. त्या साम्राज्यातून अंतर्गत व बाहय हालचालीचे माहिती गुप्तहेरांना मिळवावी लागत असे त्यामुळे गुप्त साम्राज्यामध्ये हेर खाते अतिशय महत्वाचे असे.

**५) प्रांतिक प्रशासन व्यवस्था :-** गुप्त राजांनी भारतामध्ये विशाल साम्राज्य निर्माण केले राज्य कारभाराच्या सोयीच्या दृष्टिने साम्राज्याची विभागणी निरनिराळया प्रांतात करण्यास आली होती. या प्रातांच्या प्रमुखास राज्यपाल असे म्हंटले जाते. प्रातांचा राज्यकारभार व्यवस्थित चालवणे आणि केंद्रिय प्रशासनाकडून सहाकर्य करणे ही राजपालाची जबाबदारी आहे. प्रशासनाची सोयीच्या दृष्टिने प्रातांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आली होती.

**१) जिल्हा प्रशासन (भुक्ती प्रशासन) :-** प्रातांचे अनेक भुक्तीमध्ये म्हणजेच जिल्हयामध्ये विभागणी केली जात असे. या भुक्तीचा कारभार राजाने नेमलेल्या उपरिक्त नावाच्या अधिकारी पाहत असे. याउपरिकाला म्हणजेच जिल्हयाचा कारभार पाहणाऱ्याला मदत करण्यासाठी अनेक अधिकारी असत आणि त्याच्या मदतीने जिल्हा प्रशासन चालत असे.

**२) तालुका प्रशासन :-** गुप्तकाळामध्ये भुक्तीची विभागणी म्हणजेच जिल्हयाची विभागणी अनेक तालुक्यांमध्ये केलेली असे. या तालुक्यालाच विषय असे म्हंटले जात असे. आणि या विषयाचा जो प्रमुख असे त्या अधिकाऱ्याला विषय पती असे म्हणत असत. तालुका प्रशासन चालविण्याची जबाबदारी या विषयी पतीवर असे.

**३) ग्राम व्यवस्था :-** गुप्तकाळातील प्रशासन व्यवस्थेमधील शेवटचा महत्वाचा घटक म्हणजे खेडयाची प्रशासन व्यवस्था होय. खेडयाचे प्रशासन चालविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे असे गावचा जो प्रमुख असे त्याला ग्रामीक असे म्हंटले जाते. आणि या ग्रामिकाला ग्रामपंचायतीच्या मदतीने गावाचा कारभार पाहावा लागत असे.

**४) नगर प्रशासन :-** गुप्त काळामध्ये साम्राज्यामधील मोठी शहरे आणि नगरे यांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र नगर पालिका असत या नगर पालिकेच्या प्रमुखांना नगर रक्षक असे म्हंटले जाते. गुप्त काळामध्ये पाटलीपुत्र, अयोध्या, उजैन अशा मोठया शहरामधून नगर पालिका अस्तित्वात होत्या.

गुप्त काळातील राजांनी विशाल साम्राज्य तर उभे केलेच आणि त्या साम्राज्यामध्ये उत्कृष्ट शासन व्यवस्था निर्माण करुन जनकल्याण साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच गुप्तकाळातील शासन व्यवस्था अतिशय महत्वाची आहे.

## ८.३ गुप्त काळातील सामाजिक जीवन

गुप्तकाळातील सामाजिक जीवन किंवा स्थिती कशा प्रकारची होती. त्याची माहिती अनेक ग्रंथामधून मिळते. गुप्त काळातील समाज व्यवस्थेची वैशिष्टये पुढील प्रमाणे

**१) चार्तुवर्ण पध्दती :-** गुप्त कालीन समाजाचे पहिले महत्वाचे वैशिष्टय म्हणजे चार्तुवर्ण पध्दती होय. समाजामध्ये चार वर्ण होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र हे चार वर्ण होते. आर्य काळापासून या चार वर्णांसाठी जी कामे सांगितली असत तीच कामे गुप्तकाळात त्या त्या वर्णांकडून करुन घेतली जात असत. गुप्तकाळामध्ये समाजावर ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते. समाजात अनेक जाती निर्माण झाल्या असल्या तरी ब्राह्मण वर्गाला विशेष हक्क आणि अधिकार असत. क्षत्रियांकडे राज्याची आणि संरक्षणाची जबाबदारी असे वैश्य वर्गाकडे व्यापार उदीम होता. तर अस्पृश्य वर्गाची स्थिती अतिशय वाईट होती.

**२) दास :-** हे गुप्त कालीन समाजाचे दुसरे महत्वाचे वैशिष्टय होय. समाजामध्ये दास पध्दती अस्तित्वात होती. समाजामध्ये आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे अनेक लोक श्रीमंत लोकांच्या घरी दास म्हणून राहत असत. या दासावर त्याच्या मालकाचे पूर्ण वर्चस्व असे. दास झालेलया व्यक्तीबरोबर लग्न करण्यास स्वतंत्र स्त्रीला परवानगी असे.

**३) विवाह संस्था :-** गुप्त कालीन समाजाचे तिसरे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे विवाह संस्था होय. समाजामध्ये ब्राह्मण काळामध्ये जी विवाह संस्था होती तीच थोडयाफार फरकाने गुप्त कालीन समाजामध्ये अस्तित्वात होती. आई-वडील, मुला-मुलींची लग्न ठरवत असे. साधारणपणे विवाहाच्यावेळी वधु-वरामध्ये ३ किंवा ५ वर्षाचे फरक अंतर असावे असे मानले जाते. असे सहसा जातीबरोबर लग्न होत असे. म्हणजे आपल्या जातीतीलच विवाह होत असे. आई-वडीलच विवाह ठरवत असत त्यामुळे लग्न केल्याचे आढळते.

**४) सामाजिक स्त्रियांचा दर्जा :-** गुप्त कालीन समाजाचे ४ थे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे समाजामध्ये स्त्रीयांना वैशिष्टपूर्ण स्थान होते. गुप्त राजे स्वतः सहिष्णु वृत्तीचे असल्यामुळे त्याचा प्रभाव स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर झालेला दिसून येतो. धार्मिक किंवा इतर महत्वाच्या कार्य प्रसंगी पत्नी आपल्या पती बरोबर भाग घेत असे. समाजामध्ये बालविवाहाची पध्दत होती. कुटुंबामध्ये बालविवाहीची पध्दत होती. कुटुंबामध्ये स्त्रियांना पतीच्या बरोबरीने महत्त्वाचे स्थान होते. पतीव्रता हा स्त्रीयांचा मुख्य गुण होता. स्त्रीने कोणत्याही परिस्थितीत आपला पती त्याग करु नये असा रिवाज होता. स्त्रीयांवर नैतिक बंधने होती. समाजामध्ये बालविवाहची पध्दत असल्यामुळे बालविवाहाची परिस्थिती अतिशय वाईट होती. समाजामध्ये सतीची चाल अस्तित्वात होती. विधवा विवाहास मान्य्त नसली तरी काही विवाह झाल्याचे दिसुन येते. एकंदरीत गुप्त कालीन समाजामध्ये स्त्रीयांचा दर्जा चांगला होता.

गुप्तकालनी लोकांचे राहणीमान उच्च दर्जाचे होते. लोकांची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे लोक चैनीच्या वस्तु वापरत असत. हत्ती, घोडा पालख्या यांचा वापर होत असे. श्रीमंत लोक किंवा वरच्या दर्जाचे लोक यांच्या घरामध्ये मोठी प्रासादयुक्त असत. त्यामध्ये खुर्च्या, कोच, लोड, तक्के ठेवलेले असत. सौदर्य प्रसाधनाच्या साधनांचा वापर होत असे. लोक रेशमी आणि सुतीचे कापड वापरत असत. स्त्रीया आणि पुरुष दोघांनाही दागिन्यांची आवड होती. सोन्या चांदीच्या अलंकार वापरले जात असे. गुप्त काळामध्ये वेशभुषा वैशिष्टयपूर्ण अशी होती. लोकांचा नटण्याकडे कल होता. सुगंधी तेल वापरले अशा अनेक सौदर्य प्रसाधनाचा वापर केला जात असे. म्हणजेच गुप्त काळातील सामाजिक जीवन सुखी, समाधानी आणि समृध्द् होते. समाजामध्ये शाकाहार आणि मासांहार प्रचलित होते. ब्राह्मण सोडून इतर वर्गातील लोक मांसाहार व मद्यपान करत असत. भोजनामध्ये तांदुळ, गहू, डाळी, दुध, तुप, साखर इत्यादीचा वापर होत असे. एकंदरीत गुप्तकाळातील सामाजिक जीवन वरील स्वरुपाचे होते.

## ८.४ गुप्तकाळातील आर्थिक जीवन (परिस्थिती)

गुप्तकालीन आर्थिक जीवन सुखी आणि समृध्द् होते. शेती आणि पशुपालन हे मुख्य व्यवसाय असले तरी अनेक लहान मोठै उद्योग धंद्यांचा या काळात विकास झाला होता. शेती विकासासाठी गुप्तराजाने पाटबंधारे, कालवे इ. च्या सोयी करुन शेती मालाची उत्पन्न वाढविण्याचा प्रयन्त केला. रेशीम, सुतीकापड, मलमल इ. प्रकारचे कापड तयार होत असे. म्हणजेच गुप्त काळात कापड उद्योगाचे मोठा व्यवसाय होत होता. गुप्त काळात अर्तगत आणि परदेशाबरोबरील व्यापारात मोठी प्रगती झाली आहे. पाटलीपुत्र, तक्षशिला, पैठण या प्रसिध्द् बाजारपेठा म्हणून ओळखल्या जातात. एकंदरीत गुप्तकाळातील आर्थिक जीवन प्रगतशील आणि वैभव संपन्न होते.

प्राचीन भारतीय इतिहासामध्ये गुप्तकाळात हिंदुस्तानात राजकीय स्थैर्य निर्माण झाले. लोकाभिमुख प्रशासनव्यवस्था निर्माण झाली. परकीय आक्रमणापासून देश सुरक्षित झाला. धार्मिक क्षेत्रामध्ये उन्नती झाली. साहित्य, संगीत, स्थापत्य, शिल्पकला, मुर्तीकला या वेगवेगळया क्षेत्रात भारताने विकासाचा परमोच्च बिंदु गाठला. तर आर्थिक बाबतीत सर्व सामान्य माणूस सुखी आणि समाधानी होता. म्हणून गुप्तकाळाला प्राचीन भारतीय इतिहासामध्ये सुवर्ण युगाचा काळ मानला जातो.

## ८.५ गुप्तकाळातील धार्मिक जीवन

**१) वैदिक धर्माला उत्तेजन :-** गुप्तकालखंडात वैदिक धर्माचा फार मोठा विकास झाला. गुप्त राजांनी जुन्या यज्ञपरंपरेला उजाळा देण्याचा प्रयन्त केला. विविध प्रकारचे वैदिक यज्ञ या काळात व्यापक प्रमाणात झाल्याचे उल्लेख आलेख व दानपत्रातून मिळतात. अश्वमेध यज्ञाचे पुनरुज्जीवन गुप्त सम्राटांनी केले. गुप्तकाळात लोकांच्या मनात पंचमहायज्ञ व वैदिक धर्माबदद्ल आदर होता.

**२) वैष्णव पंथ :-** गुप्तकाळात हिंदु धर्म हा प्रामुख्याने वैष्णव, शैव, सौर इ. विविध पंथात विभागला गेला होता. विष्णुची उपासना करणाऱ्यांना वैष्णवपंथीय म्हंटले जाऊ लागले. विष्णुचे अनेक अवतार समजण्यात येऊन पुढे ही संख्या १० पर्यंत गेली. मत्स्य, कुर्म, वशल, वासुदेव, कृष्ण, परशुराम, राम,बुध्द व कल्ही हे विष्णूचे १० अवतार समजण्यात येतात. त्यापैकी कल्की हा अवतार अजून व्हावयाचा आहे. गुप्त सम्राट हे वैष्णव धर्माचे अनुयायी होते.

**३) शैव पंथ :-** शिव हा श्रेष्ठ देव आहे असे समजून त्याची पूजा करणाऱ्यांचा शैव पंथ गुप्तकाळात उदयास आला. नंदी हे शिवाचे वाहन आहे म्हणून त्याची पुजा व पार्वती ही शिवची पत्नी आहे म्हणून तीचीही पूजा करण्यात येऊ लागली. गुप्तांचे काही मंत्री, सेनानायक व उच्च पदाधिकारी हे शैवपंथीय होते. अलाहाबाद शिलालेखाचा लेखक हरिषेण हा शैवपंथीय होता. गुप्ताच्या काळात शिवाची अनेक मंदिरे बांधली गेली.

## ८.६ गुप्तकालीन सांस्कृतिक जीवन

वाङ्मय / साहित्यिक साधने :- प्राचीन भारतीय इतिहासामध्ये गुप्त काळाला सुवर्ण युगाचा काळ मानले जाते. गुप्त काळामध्ये वाङ्मय किंवा साहित्यामध्ये प्रचंड विकास घडून आला. साहित्य क्षेत्राच्या विकासाबाबत गुप्त काळ निश्चितच सुवर्ण युगाचा काळ होता. गुप्तकाळामध्ये अनेक साहित्यिक निर्माण झाले. त्यांनी श्रेष्ठ दर्जाच्या साहित्यिकृती निर्माण केल्या.

**१) काव्य व नाटक :-** गुप्त काळाला संस्कृत वाङ्मयाच्या दृष्टिने सुवर्ण युग मानले जाते. गुप्त काळामध्ये संस्कृत भाषेचा विकास घडून आला. श्रेष्ठ दर्जाचे संस्कृत मधील साहित्य निर्माण झाले. गुप्तकाळामध्ये वांङ्मयातून कालीदासची काव्ये व नाटय प्रसिध्द् आहेत. त्यामध्ये मेघदूत, ऋतृसंहार, कुमार संभव, रघुवंशी ही चार काव्ये प्रसिध्द् आहेत. तर शाकुंतल व मालविका अग्नी

मित्र ही अजरामर नाटये कालिदासानेच लिहीली आहेत. कालीदासाची भाषाशैली साधी सोपी, सौदर्यपूर्ण भावनाप्रधान व कल्पना तरंग यांनी ओतप्रित भरलेली आहे. म्हणूनच डॉ. व्हि.ए.स्मिथ या इतिहासकाराने गुप्तकाळाची तुलना इंग्लंडमधील राणी एलिझाबेथ व स्टुअर्ट काळाशी केली आहे. ज्याप्रमाणे इंग्लडमध्ये शेक्सपिअर्स पुढे इतर लोकांनी दुय्यम ठरतात. थसेच भारतातही काही दासाच्या बुध्दिमत्तेपुढे इतर लेखक नेस्तनाबुत झाले आहेत. संस्कृत साहित्याच्या विकासाच्या दृष्टिने गुप्त कालखंड अतिशय महत्वाचा आहे. कालिदासानंतर गुप्तकाळात होऊन गेलेल्या दुसरा महत्वाचा नाटककार म्हणजे विशाखादत्त होय. त्याने मुद्रा राक्षस व देवीचंद्रगुप्तम हे नाटक लिहीले तर क्षुत्रंकाने मृच्छकटीत हे नाटक लिहीले आहे या नाटकामधून आपल्याला गुप्त काळातील अनेक चालीरीतींवर प्रकाश पाडले तसेच गुप्तकाळाची माहिती या नाटकामधून मिळते.

**२) कथा :-** गुप्त काळामध्ये लोक शिक्षण कथेच्या माध्यमातून दिले जात असे. त्या कथा पंचतंत्र व नृहकथा या नावाने इतिहास प्रसिध्द् विष्णुशर्मा याने लिहीला तर बृहकथा हा कथा संग्रह गुणाढयाने लिहीला.

**३) पुराणे :-** पुराणे एकंदर १८ असून गुप्तकालीन पंडितांनी पुराणाचे संस्कार करुन ती काळानुरुप बनविली आहेत. या पुराणामध्ये विष्णु आणि शंकर या देवताची स्तुती केली आहे. उदा. वायुपुराण, मत्सपुराण, विष्णुपुराण, भगवतपुराण इत्यादी.

**४) स्मृतीग्रंथ :-** स्मृतीग्रंथ म्हणजेच समाजाचे नीतीबंधन करणारे ग्रंथ होत. या ग्रंथातून धर्म, न्याय, समाज आणि नीतीची माहिती मिळते. या स्मृतीग्रंथामध्ये नादरस्मृती, याज्ञव ल्करस्मृती, व्यासरस्मृती.

## ८.७ गुप्तकाळातील शास्त्रे व शास्त्र

**१) खगोल शास्त्र :-** वराह मिहीर याने खगोलशास्त्रच्या संदर्भात पंचसिध्दातील बृहज्जातक लघूज्जातक हे प्रसिध्द ग्रंथ लिहीले आहेत. तर आर्यभटट् याने आर्यभटट्रीय हा ग्रंथ लिहून गणित आणि ज्योतिष शास्त्रावर प्रकाश टाकला स्वतःच्या आसाभोवती पृथ्वी फिरते म्हणून दिवस रात्र होतात. हे आर्यभट्ट याने सांगितले यानंतर ब्रह्मगुप्त या शास्त्रज्ञाने गुरुत्वकर्षणाचा प्रभाव या विषययी माहिती सांगितली.

**२) गणित शास्त्र :-** गुप्त काळामध्ये अंकगणित, बिजगणित आणि भुमिती या क्षेत्रात भरतीयांनी फार मोठी प्रगती केली आहे. आर्यभटट् याने आर्यभटट्रीय या गणित शास्त्रावरील महत्वाचा ग्रंथ लिहीला. तसेच दक्षमान पध्द्ती, त्रिकोणमिती, क्षेत्रफळ,घनफळ याविषयाचे माहिती देणारे चांगले ग्रंथ गुप्त काळात उपलब्ध झाले.

**३) वैद्यक शास्त्र :-** गुप्तकाळामध्ये भारतीय वैद्य शास्त्रातील प्रगती वाखण्याजोगी होती. वागःभटट्ाने अष्ठांग संग्रह या औषधावर ग्रंथ लिहीला तर पालकाश्य यांनी 'इस्ती आयुवैर्द' हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथातून वनस्पती, खनिज पदार्थ,पारा, लोह इ. उपयोग करुन औषध कशी बनवली जातात यांची माहिती दिली आहे.

**४) धातु शास्त्र :-** गुप्त काळामध्ये लोखंड, सोने, तांबे, चांदी इ. धातु विज्ञानामध्ये आश्चर्यकारक प्रगती झाली.

**५) भाषाशास्त्र :-** अमरसिंह याने गुप्तकाळात आपला शब्दाकोश प्रसिध्द् केला. गुप्तकाळातील राजे धर्मसहिष्णू असल्यामुळे जैन आणि बौध्द वाङ्मयाची निर्मिती होण्यास मदत झाली. या गुप्त काळात उमास्वामी,सिध्दसेन, जिनचंद्रमुनी हे जैन विद्वान होऊन गेले. तरवसूबंधू हा समुद्रगुप्ताच्या काळातील प्रसिध्द् बौध्द् विद्वान असून त्याने महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

**कला :-** गुप्तराजाचे हे कलाप्रेमी असल्यामुळे त्यांनी विविध कलांना प्रोत्साहन दिले, त्यामुळेच गुप्तकाळामध्ये श्रेष्ठ दर्जाचे कलावंत व कलाकृती निर्माण झालेली दिसून येतात. गुप्तकालीन कलांमध्ये प्रामुख्याने संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला या विविध कलांचा विकास झाला होता.

**१) संगीत आणि नृत्य कला :-** गुप्तराजे संगीतकलेचे चाहते असल्यामुळे या काळात संगीत व नृत्य कला पूर्णपणे विकसित झालेली होती. गुप्तराज्याच्या संगीत व नृत्य प्रेमाचे दिग्दर्शक त्यांच्या अनेक नाण्यावरुन दिसून येते. कालीदास शुद्रक याने जी काव्य रचना केली. त्यामध्ये संगीत व नृत्य कलेला पूर्ण वाव आहे.

**२) चित्रकला :-** गुप्तकाळामध्ये चित्रकलेची मोठया प्रमाणावर विकास घडवून आला होता. याची प्रचीती अजंठा येथील चित्रावरुन दिसून येते. गुप्तकाळातील विविध ठिकाण, मंदिरे, भित्ती व दरबारामध्ये काढलेल्या चित्रावरुन गुप्तकाळात चित्रकलेचा फार मोठा विकास झाला होता हे दिसून येते. या चित्रामधून आनंद, राग, शैर्य इत्यादी गुणांचे दर्शन होते.

**३) नाणी :-** गुप्तकाळातील सम्राटांनी सोने, चांदी, तांबे या धातुपासून नाणी बनविली आहेत. या गुप्तराजांची शेकडो नाणी सापडली आहेत. या नाण्यावरुन आपणांस गुप्ताचा इतिहास समजण्यात मदत होते. गुप्तकालीन नाणे ही सुंदर व प्रमाणशील असून नाण्यातील धातुचे प्रमाण, वजन याबाबत एकवाक्यता दिसून येते. गुप्तराजांनी काढलेल्या नाण्यावर वाघ, सिंह, धर्नुधारी, अश्व, गरुड, विणावादन असे अनेक विषय कोरलेले आहेत. भारतीय इतिहासामध्ये गुप्ताचा कालखंड नाणक शास्त्राच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा कालखंड आहे.

## ८.८ स्थापत्य कला व शिल्पकला

गुप्तकाळामधील स्थापत्ये कलेत उत्कृष्ट कलेचा विकास झाला होता. परकीयांकडून आक्रमणांच्या आक्रमणामुळे गुप्तकाळातील मंदिरे पाडण्यात आली असली तरी झाशी जिल्हयात देवगड या ठिकाणी असलेल्या दशअवतारचे मंदिर, जबलपूर जिल्हयातील विष्णूचे मंदिर ही मंदिरे गुप्तकालीन स्थापत्याचा उत्कृष्ट नमूना समजण्यात येतो ही मंदीरे बांधताना कुठेही चुन्याचा वापर केलेला नाही. बौध्द् शिल्प कलेचाही या काळात मोठा विकास झाला होता. गुप्तकाळात मोठा विकास झाला होता. गुप्त काळात बांधलेले कित्येक बौध्द् स्तुप, चैत्यविहार यांचय स्थापत्य शैलीत मोठी प्रगती घडून आली होती. अजंठा आणि वेरुळ येथे सुंदर मुर्ती कोरण्यात आल्या आहेत. अजंठा येथील बौध्द् कालीन लेण्यामध्ये बुध्दाच्या जीवनातील अनेक प्रसंग कोरलेले

आहेत. त्यामुळे गुप्त कालखंड हा स्थापत्य कलेच्या विकासाच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा समजला जातो.

गुप्तकाळामध्ये शिल्पकलेचाही विकास घडून आला होता. पूर्णकृत मानवी प्रतिमा तयार करण्याची कला याकाळात अवगत झाली होती. गुप्तकाळामध्ये मयुरा या ठिकाणी मुर्ती शिल्पामध्ये मोठी प्रगती घडून आली होती. मुर्ती बनविताना मुर्तीच्या चेहऱ्यावर उत्कंठ आणि उदात्त भाव व्यक्त होतील याची काळजी घेतली जात असे तसेच या गुप्तकाळामध्ये सारनाथ येथे गौतमबुध्दाची जी मूर्ती आहे ती उत्कृष्ट मूर्ती समजली जाते. यावरुन गुप्त कालखंड हा स्थापत्यकला व शिल्पकलेच्या बाबतीत प्रगतशील होता असे दिसून येते.

इतर कालखंडा प्रमाणेच गुप्त काळात स्थापत्य व शिल्प कलेचा विकास घडून आला आहे. गुप्तकालीन शिल्पामध्ये जी पूर्ण कृती मानवी प्रतिमा असून त्या मुर्तीच्या चित्रावर शांती व धीर गंभीरता ही वैशिष्टये आहेत. याच काळात बांधकामासाठी दगड व भाजलेल्या विटांचा वापर केला होता. गुप्तकाळातच मंदिरावर शिखर बांधण्याची कला सुरु झाली होती. अजंठा व वेरुळ येथील लेण्या गुप्तकाळातच कोरल्या गेल्या आहेत. गुप्तकाळात स्थापत्य आणि शिल्पकला, मूर्तीकला याबाबत विकासाचा परमोंचा बिंदु गाठला गेला त्याबारोबर गुप्त राजे हे धर्मसहिष्णु असल्यामुळे बौध्द् धर्मीयांनी अनेक ठिकाणी विहार आणि स्तुप बांधले आहेत. सागरनाथ येथील दगडी स्तंभ हे तर इतिहासातील मोठे वैशिष्टय ठरले अशा प्रकारे गुप्तकालीन परकीय आक्रमणाची मालिका यापासून भारताला मुक्त करुन कार्यक्षम प्रशासन व्यवस्था निर्माण केली. तसेच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्थैर्य निर्माण केला आणि सर्वांगिण विकास घडवून आणला म्हणून गुप्तकाळाला सुवर्णयुग असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :-**

१. गुप्तांच्या युगास प्राचीन भारताचे सुवर्णयुग असे का म्हणतात ?

## ८.९ गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे

चंद्रगुप्त पहिला गुप्त घराण्याचा संस्थापक मानला जातो. त्याचा मुलगा समुद्रगुप्त यांनी आपल्या अंगी असलेल्या शौर्य धैर्य व कर्तव्य या गुणांमुळे गुप्ताचे साम्राज्य विशाल केले. चंद्रगुप्त विक्रमादित्य याने या साम्राज्यात भर घालण्याचे प्रयत्न केले परंतु त्याशिवाय त्याने आपल्या साम्राज्यात उत्तम व कार्यक्षम प्रशासन निर्माण केले तसचे त्याचे साम्राज्य फार मोठया कळसास पोहचले होते. परंतु स्कंद गुप्ताच्या मृत्युनंतर त्या बलाढय साम्राज्याच्या ऱ्हासास सुरुवात झाली. त्यानंतर सहाव्या शतकाच्या मध्यकाळात त्याचे पतन झाले.

**१) कर्तव्यहीन राज्ये :-** समुद्रगुप्त व चंद्रगुप्त या सारख्या राजांनंतर राज्य कारभारांची सुत्रे हाताळण्यास राजे कर्तव्यहीन झाले. स्कंदगुप्तानंतर साम्राज्याला उतरती कळा लागली. बहुतांशी राजे चैन आणि विलास हयातच दंग होते. असे त्यामुळे गुप्त साम्राज्याचा नाश होऊन आला.

**२) वारसाची भांडणे :-** राजघराण्यातील मंडलीच्या स्वार्थामुळे संघर्षास तोंड फुटले एखाद्या राज्याच्या मृत्युनंतर कोणी राजा व्हावे याबाबत एकमत नव्हते. समुद्रगुप्ताच्या कथेवर आपण विश्वास ठेवला तर समुद्रगुप्तास ठार मारुन चंद्रगुप्ताने विक्रमादित्याने गादी मिळविली. व या कुमार गुप्ताच्या काळात ज्यावेळी स्कंदगुप्त हुणाशी युध्द करताना गुंतला होता त्यावेळी त्याचा सावत्रभाऊ पुरुगुप्त याने गुप्ताचे सिंहासन बळकावले होते. त्यामुळे या दोघांत भांडणे होत होती. थोडयाच अवधीत गुप्तांचा ऱ्हास घडवून आला.

**३) वंश परंपरांगत पध्दती उपायकारक :-** गुप्तकाळामध्ये वंशपरंपरांगत पध्दती होती. त्यामुळे अनेक राज्यावर विपरित परिणाम झाले. राज्यकारभारामध्ये गुणी लोकांचा भरणा पाहिजे असे परंतु तेथे सद्‌गुणी लोकांचा भरणा नसून वंशपरंपरागत पध्दती होती. त्यामुळे प्रशासन दुर्बल बनले आणि शत्रूचा शिरकाव झाला.

**४) लष्करी सामर्थ्यावर अवास्तव भर :-** गुप्ताचे साम्राज्य हे लष्करी ? सामर्थ्य संपन्न होते. जो पर्यंत लष्करी वर्ग ? होता. तो पर्यंत राज्य टिकाव करु शकते नाहीत. परंतु नंतर पलीकडे ज्यावेळी शासन दुर्बल बनले त्यावेळी गुप्त साम्राज्याला उतरती कळा लागली.

**५) बौध्द् धर्माचा स्विकार :-** प्रारंभीच्या काळातील राजांनी बौध्द् धर्माचा स्वीकार केलेला नव्हता समुद्रगुप्तासारखे सम्राट तर वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. बुध्द् गुप्तकाळापासून शकांनी बौध्दांना आश्रय दिल्यामुळे ? पराक्रमी आणि कर्तबगार सम्राट लोप पावल्यामुळे गुप्त साम्राज्याचा पाडाव घडून आला.

**६) आर्थिक दुर्बलता :-** आर्थिक दुर्बलतेमुळे गुप्त साम्राज्याचे पतन झाले. गुप्तांच्या आखेरचा राजांचा अर्थशास्त्रात आणि कर पध्दतीचे ज्ञान नव्हते. पूर्वी गुप्त साम्राज्यामध्ये मोठया प्रमाणाात संपन्नता नांदत होती परंतु काही निरनिराळया रानटी टोळयांनी मिळून हल्ले चढविले. सहाजिकच दुर्बल असे राजे त्यास सामोरे जाऊ शकले नाही. समुद्रगुप्ताने व चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीमध्ये सुवर्णाची नाणी पाडली होती. परंतू अखेरच्या काळामध्ये नाणी तांब्याची होती. त्यामुळे आर्थिक स्थिती ढासाळली गेली.

**७) दळवळणाच्या साधनात अभाव :-** गुप्त साम्राज्य अफाट पसरलेले होते मगध राजधानीमधून सर्व प्रदेशातील लक्ष ठेवणे ही गोष्ट अशक्य होती. त्या काळात दळवळणाच्या साधनांचा मोठया प्रमाणामध्ये अभाव होता. त्यामुळे एका प्रदेशातील माहिती दुसऱ्या प्रदेशामध्ये आवश्यक वेळी पोहचू शकत नव्हती.

**हुणांचे आक्रमणे :-** गुप्ताचा नाश होण्यात प्रमुख कारण म्हणजे हुणांची आक्रमणे हे होय. पहिल्या कुमार गुप्ताच्या काळात हुणांनी भारतावर आक्रमण केले परंतु स्कंदगुप्ताने आपल्या पराक्रमामुळे हुणांचा पराभव केला.

तोरणमाळ आणि मिहीरगुल यांच्या आक्रमणामुळे गुप्ताची ? खिळखिळी होऊन गेली गुप्त सम्राट हुणांच्या ? वचकन असत याचा फायदा हुणांनी घेतल्यामुळे गुप्तांचा पाडाव झाला.

**८) गुप्तांचे अदुरदृष्टी धोरण :-** स्कंदगुप्तानंतरचे राजे अदुरदृष्टिचे निपजल्यामुळे गुप्त सत्ता टिकाव धरु शकली नाही अशा रितीने हिंदुस्तानातल्या इतिहासातील गुप्ताच्या कामगिरीचे एक तेजस्वी पर्व संपुष्टात.

## ८.१० सारांश

श्री. गुप्त हा या राजघराण्यातील पहिला राजा गुप्त घराण्याचा साम्राज्याचा खरा विस्तार घटोत्कच गुप्ताच्या काळात झाला. गुप्त साम्राज्य राज्यविस्ताराच्या शिखरावर पोहचले ते समुद्रगुप्ताच्या काळात अधिक संकल्पना, साहित्य शास्त्र, कला इत्यादी भागात प्रगती झाली. महाराजाक्षिराज हा गुप्त साम्राज्यातील सम्राट त्याने गुप्त राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. समुद्रगुप्त हा ही हिग्वीजयी सम्राट होता. तो खूप पराक्रमी होता. त्यांचा उल्लेख भारतीय नेपोलियन म्हणून केला जातो. समुद्रगुप्ताने सर्व प्रदेश आपल्या प्रगल्क राज्याखाली न आणता त्यांना मांडलिक बनवले. सम्राट चंद्रगुप्तनंतर त्याचा मुलगा रामपुत्र सत्तेवर आला परंतू त्याची करकिर्दी अल्पायुषी ठरली.

## ८.११ दिर्घोत्तरी प्रश्न

१. गुप्तकालीन प्रशासन व्यवस्था विस्ताराने लिहा.
२. गुप्तकाळास सुवर्णयुग असे का म्हणतात.
३. गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासास कारणीभूत असलेले घटक विशद करा.

❖❖❖❖

# १

# गुप्त कालखंडानंतरचा भारत

**प्रकरणाची रचनाः**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ वर्धन घराण्याचा उदय
१.३ हर्षवर्धनाची शासनव्यवस्था
१.४ आर्थिक परिस्थिती
१.५ न्यायव्यवस्था
१.६ लष्करी व्यवस्था - सैन्य व्यवस्था
१.७ धार्मिक धोरण
१.८ सारांश
१.९ दिर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

- वर्धन घराण्याचा सत्ता स्थापनेची माहिती अभ्यासणे.
- वर्धन घराण्याचा प्रारंभिक अवस्थेचा अभ्यास करणे.
- हर्षवर्धनाच्यासाम्राज्य विषयक धोरणाचा अभ्यास करणे.
- हर्षावर्धनाच्या प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.
- वर्धन कालखंडातील सर्वांगिण प्रगतीचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

प्राचीन भारताच्या इतिहासातील प्रभावी गुप्त साम्राज्याच्या नाशानंतर भारतात अव्यवस्था आणि गोंधळ निर्माण होऊन लहान मोठया राज्यांची निर्मिती झाली.

यामधील सौराष्ट्रातील वल्लभीचे मैनक घराणे तर कनोजचे मौखरी घराणे तर बंगालमध्ये गौंड घरणे व माळवा ही उत्तरेकडील महत्वाची राज्ये होती. तर बदामीच्या चालुक्याने दक्षिणेकडे आपली बलाढय सत्ता निर्माण केली होती. भारतामध्ये वरील राज्ये उदयास येऊन उत्कर्षास पोहचत असतानाच इ.स. ५ व्या शतकाच्या शेवटी हुणाची प्रभावी सत्ता निर्माण झाली होती. म्हणजेच भारतामध्ये एक प्रकारचा गोंधळच होता. अशा परिस्थितीत हर्षवर्धनाने

भारतातील हे राजकीय अराजक नष्ट करुन एक संघराज्य स्थापन केले. उत्कृष्ट शासनव्यवस्था निर्माण केली. आणि आपल्या राज्यातील प्रजेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच प्राचीन भारताच्या इतिहासातील हर्षवर्धन हा महत्वाचा सम्राट आहे.

## १.२ वर्धन घराण्याचा उदय

प्राचीन भारताच्या इतिहासात उदयास आलेल्या वर्धन घरण्याविषयीची माहिती आपणांस हर्षवर्धनाच्या दरबारातील विद्वान पंडीत, बाणभटट् यांच्या हर्षचरित या ग्रंथामधून व चीनी प्रवासी एयू.एन.त्संग यांच्या ता-तांग-सियूकी या प्रवास वर्णनावरुन देखील तसेच या व्यतिरीक्त वर्धन घराण्याविषयीची माहिती हर्षवर्धन कालीन नाणी व शिलालेख यावरुनही मिळते. ठानेश्वराच्या वर्धन घराण्यातील आदित्य वर्धन हा राजा करता होता. त्याने साम्राज्य विस्ताराचे धोरण स्विकारले होते. आदित्य वर्धन नंतर त्यांचा मुलगा प्रफाकर वर्धन हा राजा विस्ताराचे धोरण स्विकारले होते. आदित्य वर्धन नंतर त्यांचा मुलगा प्रभाकर वर्धन हा राजा झाला. हा अतिशय पराक्रमी राजा होता. यांच्या काळातच वर्धन घराण्याच्या राज्याचा मोठा विस्तार घडून आला. याची सत्ता सिंध पंजाब, माळवा या प्रदेशात होती प्रथाकर वर्धनाच्या कारकिर्दीच्या शेवटी त्यांच्या राज्यावर आक्रमकांनी आक्रमण केले (इ.स. ६०४) या आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी प्रभाकर वर्धन याने राज्यवर्धन व हर्षवर्धन या आपल्या दोन मुलांना पाठविले. परंतु याच वेळी प्रभाकर वर्धनानंतर राज्यवर्धन हा राजा झाला सत्ता हाती आल्यानंतर राज्यवर्धनाने माळवा व बंगालचा शासकाचा बंदोबस्त करण्याचे ठरविले कारण माळव्याचा शासक देवगुप्त व बंगालचा शासक शशांक यांनी संयुक्तपणे कनोजवर आक्रमण केले. यावेळी कनोज येथे राजा गृहवर्मन हा राज्य कारभार करीत होता. देवगुप्त आणि शशांक दोन राजांना कनोजचा शासक गृहवर्मन यांच्यावर स्वारी करुन त्याचा पराभव केला आणि नंतर गृहवर्मनला ठार मारले व हर्षवर्धनची बहीण राजश्री हिला कैदेत टाकले म्हणून राज्यवर्धनाने माळव्याच्या शासक देवगुप्तावर स्वारी करुन त्याचा पराभव केला परंतु बंगालचा शासक शशांक याने विश्वासघाताने राजवर्धनाचा खून केला आणि नंतर हर्षवर्धन इ.स. ६०६ मध्ये राजा झाला.

**हर्षवर्धनाची कामगिरी –** प्राचीन भारताच्या इतिहासातील वर्धन घराण्यातील हर्षवर्धन हा सर्वश्रेष्ठ सम्राट होता त्याची कामगिरी इतिहासामध्ये महत्वाची होती. हर्षवर्धनाच्या कारकिर्दीची माहिती आपणांस बाणभटट्‌च्या हर्षचरित या ग्रंथात आणि चीनी प्रवासी हयू-एन-त्संग यांच्या ता-तांग-सियुकी या प्रवासवर्णनावरुन मिळते. इ.स. ५९० मध्ये हर्षवर्धनाचा जन्म झाला. प्रभाकर वर्धन व राणी यशोमती यांचा हा राजपुत्र होय. प्रभाकर वर्धन हा पराक्रमी राजा होता. तर राणी यशोमती ही मगधची राजकन्या होती वधु राज्यवर्धनाच्या मृत्युनंतर इ.स. ६०६ मध्ये, हर्षवर्धनांचा राज्यभिषेक होऊन तो राजा झाला. हर्षवर्धनाने जेव्हा सत्ता हाती घेतली घराण्यावर एका पाठोपाठ एक संकटे कोसळत होती. त्यामुळे हर्षवर्धन देखील हादरुन गेला होता. अशा कठीण परिस्थितीमध्ये हर्षवर्धनाने राज्याची सुत्रे हाती घेतली आणि आपल्या समोर असणाऱ्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. राज्यभवनासमोर हर्ष वर्धनासमोर अनेक समस्या होत्या. त्या पुढील प्रमाणे –

१) बंधू राज्यवर्धनाला कपटाने ठार मारणाऱ्या शशांकचा बंदोबस्त करणे आणि कनोजचा राजा गृहवर्मन याचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या राज्याला कोणी वारस नव्हता गृह वर्मनला मूलबाळ

नसल्यामुळे कनोजच्या गादीवर कोणाला बसवावे हा देखील हर्षवर्धनासमोरील महत्वाचा प्रश्न होता कारण गृहवर्मन हा हर्ष वर्धनाचा मेव्हणा होता.

२) परकीय सत्तांचा विशेषतः हूणांच्या आक्रमणाचा राज्य सारखा उपद्रव होत होता. आणि त्यामुळे राज्याला स्थैर्य प्राप्त होत नव्हते आणि ते येण्यासाठी हुनांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते.

३) बहीण राजश्रीचा शोध घेण हर्षवर्धनाने सत्ता हाती घेतल्यानंतर प्रथम आपले स्थिर केले आणि नंतर आपल्या समोरील समस्या सोडवण्याचा प्रयन्त केला.

**राजश्रीचा शोध –** हर्षवर्धनाने सत्ता हाती घेतली त्यावेळी त्याच्यासमोर अनेक समस्या होत्या त्यापैकी सर्वात महत्वाची समस्या म्हणजे बहिण राजश्रीचा शोध घेण ही होय. कनोजचा राजा गृहवर्मन याची राजश्री ही पत्नी होती. परंतु गृहवर्म्याच्या राज्यावर माळव्याचा शासक देवगुप्त आणि बंगालचा शासक शशांक या दोघांनी आक्रमण करुन गृहवर्माचा खून केला व राजश्रीला देवगुप्ताने कैदेत टाकले. पण नंतर राजश्रीने स्वतःची कैदेतून सुटका करुन घेतली आणि ती विंध्य पर्वताकडे निघून गेली आणि हर्षवर्धनाने राजा झाल्यानंतर प्रथम प्रभावी लष्कराची निर्मिती केली लष्कराला योग्य ते प्रशिक्षण दिले आणि आपल्या बंधूचा खून करण्याच्या कटात सामील असलेल्या देवगुप्ताचा बंदोबस्त करण्यासाठी हर्षवर्धन सैन्य निघाला यावेळी त्याने बंगालचा शासक शशांक याची देवगुप्ताला मदत होऊ नये म्हणून हर्षवर्धनाने आपला सेनापती भंडीयास शशांकचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविला यासर्व घडामोडी घडत असतानाच राजश्री ही देवगुप्ताच्या कैदेतून पळून गेल्याची बातमी हर्षवर्धनाला समजली तेव्हा हर्षवर्धनाने ही मोहिम आटोपती घेतली व आपली बहीण राजश्रीचा शोध घेण्यासाठी तो स्वतः विंध्य पर्वताकडे निघाला यावेळी राजा गृहवर्मनाचा बालपणीचा मित्र दिवाकर या बौध्द भिक्षूचीही फार मोठी मदत हर्षवर्धनाला झाली आणि दिवाकरच्या सहाय्याने बहीण राजश्रीचा शोध लावला. राजश्री आणि हर्षवर्धनाची भेट झाली त्यावेळी पतीच्या मृत्युनंतर ती सती जाण्याच्या तयारीत होती. परंतु हर्षवर्धनाने तीचे सात्वन केले तीला सती जाण्यापासून परावृत्त केले आणि बहीण राजश्रीला मोठया सन्मानाने हर्षवर्धनाने आपल्या राज्यामध्ये परत आणले अशा प्रकारे बहिण राजश्रीचा शोध घेऊन हर्षवर्धनाने आपल्या समोरील एका समस्येचे निराकरण केले.

**हर्षवर्धन कनोजचा राजा –** हर्षवर्धन बहीण राजश्रीला घेऊन आपल्या राज्यामध्ये परत आला. नंतर तो राजश्रीला घेऊन कनोजला गेला तेव्हा कनोजच्या जनतेने व सरदार वर्गाने त्या दोघांचे भव्य स्वागत केले. राजा गृहवर्मनला मृत्यु झाल्यानंतर त्याला मुलबाळ नसल्यामुळे कनोजची गादी रिकामीच होती. शेवटी कनोजच्या मंत्री परिषदेने अत्यंत दूरदृष्टीचा विचार करुन हर्षवर्धनास कनोजचे राज्य बहाल केले. हर्षवर्धनाने कनोजचे राज्य बहाल केले. हर्षवर्धनाने राजश्रीबरोबर संयुक्तपणे राज्यकारभार करण्याचे मान्य केले अशाप्रकारे ननेश्वर आणि कनोजही दोन राज्य एकत्रित आली या दोन राज्यांमधील गंगा यमुने सुपिक प्रदेश हर्षवर्धनाच्या ताब्यात आला आणि त्यानंतर हर्षवर्धनाने आपली राजधानी स्थानेश्वर या ठिकाणाहून कनोज या ठिकाणी आणली.

**बंगालचा शासक शशांक याचा पराभव-** हर्षवर्धनाने कनोजचा राजा झाल्यानंतर त्याने अनेक लष्करी मोहिमा काढल्या त्याच्या लष्करी मोहिमांसंबंधीची माहिती सुसंगतपणे उपलब्ध होत नाही. परंतु चीनी प्रवासी हयू-एन-त्संग यांच्या प्रवासवर्णनावरुन लष्करी मोहिमांची माहिती मिळते हर्ष वर्धनाने जेव्हा सत्ता हाती घेतली तेव्हा राजकीय परिस्थिती अराजकाची होती माळण्याचा शासक देवगुप्त व बंगालचा शासक शशांक या दोघांनी संयुक्तपणे कनोजवर स्वारी करुन राजा गृहवर्मनाला कनोजवर स्वारी करुन राजा गृहवर्मनाचा खून केला आणि हर्षवर्धनाची बहिण राजश्रीला कैदेत टाकले राजा झाल्यानंतर हर्षने प्रथम माळव्याचा शासक देवगुप्त याचा पराभव केला बहिण राजश्रीचा शोध घेतला आणि नंतर त्याने बंगालचा शासक शशांक याच्यावर मोहिम काढली. कारण याच शशांकने हर्षवर्धनाचा मेव्हणा यास विश्वास घाताने ठार मारले. तेव्हा या शशांकचा पराभव करणे आवश्यक होते. म्हणून हर्षवर्धनाने शशांकवर स्वारी केली या आक्रमणाची सविस्तर माहिती मिळत नाही. तरीपण हर्षाने प्रथम आपला सेनापती भंड याला बंगालवर पाठविले नंतर स्वतः हर्षवर्धन पराभव केला परंतु हर्षवर्धनाला शशांकचा पूर्ण बिमोड करता आला नाही. इ.स. ६३० मध्ये शशांकचा मृत्यू झाला. आणि त्यानंतरच हर्षवर्धनाने त्याचे राज्य आपल्या राज्यामध्ये विलीन करुन टाकले.

**हर्षवर्धनाचा दक्षिण दिग्विज –** हर्षवर्धनाने उत्तर भारतात हिमालयापासून नर्मदेपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. उत्तर भारतामध्ये आपले आसन स्थिर झाल्यानंतर हर्षवर्धनाने दक्षिण मोहिम हाती घेतली या मोहिमेसाठी त्याने प्रचंड लष्करी तयारी केली चीनी प्रवासी हयू-एन-त्संग यांच्या मतानुसार हर्षवर्धनाने दक्षिण मोहिमेस डी. २००० हत्तीदल, २०,००० चे घोडदळ व ५०,००० चे पायदळ एवढी मोठी सीमेवर सेना उभी केली. एवढया प्रचंड सेन्यानिशी त्याने दक्षिण मोहिम हाती घेतली यावेळी दक्षिणेमध्ये बदानामीच्या चालुक्य घरण्याचे राज्य अतिशय महत्वाचे आहे आणि दुसरा पुलकेसी हा चालुक्य घराण्यातील पराक्रमी राजा यावेळी राज्यकारभार करीत होता. तो चालुक्य घराण्यातील महारपराक्रमी पुरुष होता. तो राजा किर्तीवर्मनचा मुलगा होता. दुसरा पुलकेसी राजा झाल्यानंतर त्याने प्रथम आपल्या राज्यातील अराजक नष्ट केले आणि स्वत:चे लष्करी सामर्थ्य वाढविले त्यामुळे दुसऱ्या पुलंकेसीला दक्षिण भारतातील बलाढय राजा मानले जाई. आणि याचवेळी हर्षवर्धनाने प्रचंड लष्करानी दक्षिणेवर स्वारी केली. हर्षवर्धनाच्या मोहिमेची माहिती कळताच चालुक्य राजा दुसरा पूलकेसी हर्षवर्धनाबरोबर लढाई करण्यासाठी निघाला या दोघांमध्ये नर्मदा नदीच्या परिसरात मोठे युध्द घडून आले या युध्दात स्वतः हर्षवर्धन आपल्या फौजेचे नेतृत्व करत होते. परंतु हर्षवर्धनाला दुसऱ्या पूलकेसीवर निर्णायक विजय मिळवता आला नाही. शेवटी या दोघांच्यामध्ये तह झाला आणि नर्मदा नदी ही दोघांच्या राज्याची सरहद् झाली. परंतु या युध्दातील हर्षवर्धनाच्या जय पराजयाबदद्ल एकमत नाही. कारण त्याचे दुसऱ्या पुलकेसी बरोबर झालेले युध्द त्याची सविस्तर माहिती उपलब्ध होत नाही. तर बदामीचा चालुक्य राजा दुसरा पुलकेसी याने एक आलेखामध्ये या युध्दात हर्षवर्धनाचे अनेक हत्ती कामी आले. त्यामुळे हर्षवर्धन भीतीग्रस्त झाला होता. एवढाच उल्लेख आहे. तर चीनी प्रवासी हयू-एन-त्संग याने आपल्या प्रवासात हर्षवर्धनाला दुसऱ्या पूलकेसीचा पराभव मरता आले पाही असे मत मांडले आहे.

**पूर्व भारत-** हर्षवर्धनाने दक्षिण मोहिमेनंतर पूर्व भारताकडे लक्ष दिले. आणि पूर्व भारतातील अनेक राज्ये त्याने जिंकून घेतली बंगालचा शासक शंशाक याचा मृत्यु झाल्यानंतर बंगाल प्रांत हर्षवर्धनाच्या ताब्यात आला या कामी त्याला भास्करस्वामीची मदत झाली नंतर त्याने मगधावर

आपले वर्चस्व प्रस्थापित केले त्यानंतर हर्षवर्धनाने ओरिसा प्रांतावर आपले वर्चस्व निमार्ण केले पुढे त्याने बौद्ध धर्मामध्ये महायान पंथीयांची परिषद याच भागात भरली.

हर्षवर्धनाने साम्राज्य कोणकोणत्या प्रदेशात पसरले हाते. हे निश्चित सांगणे अवघड आहे. कारण या संदर्भात निश्चित माहिती देणारी साधणे उपलब्ध होत नाहीत तरी देखील त्याचे साम्राज्य उत्तरेकडे हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेकडे नर्मदा नदीपर्यत पसरले होते. पूर्वेकडे बंगाल आरीसा पर्यत पसरले होते.पूर्वेकडे बंगाल ओरिसा पर्यतच सिंध पर्यत त्याचे साम्राज्य पसरले होते.

हर्षवर्धनाच्या साम्राज्या कनोज, पंजाब ,रोहिलखंड, नेपाळ, आयोध्या, प्रयाग,मगध, बंगाल माळवा आणि ओरिसा इ. प्रदेश होते. गुप्त साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर भारतात राजकिय अराजक अदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. ती नष्ट करुण हर्षवर्धनाने भारतात विशाल साम्राज्य उभे केले होते. म्हणून प्राचीन भारतीय इतिहासमध्ये सम्राट हर्षवर्धनाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१. हर्षवर्धन सम्राट बनणयास कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा मागोवा घ्या.

## ९.३ हर्षवर्धनाची शासनव्यवस्था

हर्षवर्धनाने भारतातील विस्तृत भागावर आपले वर्चस्व प्रस्थापित करुन विशाल साम्राज्य उभे केले हर्षवर्धन हा उत्कृष्ट शासक होता त्याने आपल्या राज्यांमध्ये उत्कृष्ट शासनव्यवस्था निर्माण करुन आपल्या राजतील प्रजेचे हित साधण्याचा प्रयत्न केला. त्याने एकंदरीत ४० वर्ष राज्य केले हर्षवर्धनाच्या शासनव्यवस्थेची माहिती आपल्याला बाणभटट्ाचे हर्षचरित आणि हयू-एन-त्संग याच्याप्रवास वर्णनातून मिळते. त्याने आपली शासनव्यवस्था गुप्तकालीन शासन व्यवस्थेप्रमाणेच ठेवली होती. फक्त त्याने गुप्तकालीन शासनव्यवस्थेमध्ये आवश्यक तेवढाच बदल केला आणि एकनवीन राज्यपध्दती आपल्या राज्यात निर्माण केली. त्याच्या शासनव्यवस्थेचे केंद्रिय प्रशासन प्रांतीय प्रशासन व ग्राम प्रशासन असे विभाजन केले होते. कनोज ही त्याच्या राज्याची राजधानी होती. हर्षवर्धनाने गुप्त साम्राज्याच्या विनाशानंतर उत्तर भारतामध्ये निर्माण झालेली अन्य व्यवस्था नष्ट करुन राजकीय ऐक्य निर्माण केले. राज्यामध्ये शातंता आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली हर्षवर्धनाची शासनव्यवस्था पुढीलप्रमाणे

**अ) केंद्रिय प्रशासनव्यवस्था :-** हर्षवर्धनाने जी केंद्रिय प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. त्या व्यवस्थेमध्ये राजाला राज्यकारभरामध्ये मदत करण्यासाठी एक मंत्री परिषद असे त्या मंत्री परिषदेची माहिती पुढीलप्रमाणे :-

**१) मंत्रीपरिषद :-** हर्षवर्धन हाच त्याच्या राज्याचा प्रमुख होता आणि सम्राटाला राज्यकारभारामध्ये मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी त्याने एक मंत्रीपरिषद नेमली होती. या मंत्रीपरिषदेमध्ये अनुभवी आणि कर्तबगार लोकांचा समावेश होता. राजाला सल्ला देण्याबरोबरच आपल्याला दिलेल्या खात्याचा कारभार या मंत्र्यांना पहावा लागत असे आणि राज्यकारभारावर या मंत्रीपरिषदेचे राजा इतकेच नियंत्रण असे आणि ही परिषद व्यवस्थेतील अतिशय महत्वाची व जबाबदार समजली जात असे कारण हर्षवर्धनाचा राज्यभिषेक सुध्दा मंत्रीपरिषदेच्या सल्यानेच झाला होता. आणि कनौजची गादीसुध्दा हर्षवर्धनाने मंत्री परिषदेच्या सल्यानुसार स्वीकारली. संस्थेमध्ये या मंत्री परिषदेला अत्यंत महत्वाचे स्थान होते.

**ब) प्रांतीय प्रशासन व्यवस्था :-** हर्षवर्धनाने आपल्या साम्राज्याचे प्रशासनाच्या सोयीसाठी विभाजन केले होते. आणि ही व्यवस्था गुप्कालीन प्रादेशिक विभागाप्रमाणेच होती. हर्षवर्धनाने साम्राज्याचे प्रशासनाच्या सोयीसाठी पुढीलप्रमाणे विभाजन केलेले होते.

१) प्रांत – मुक्ती
२) विषय – जिल्हा प्रशासन
३) भोग – तालुका
४) खेडे – ग्राम प्रशासन

हर्षवर्धनाने आपल्या राज्याचे प्रशासनाच्या सोयीसाठी असे विभाजन केलेली प्रत्येकी विभागावर कारभार पाहण्यासाठी अधिकारी नेमलेले असत. प्रांताचा कारभार पाहण्यासाठी अधिकारी नेमलेले असत. प्रांताचा कारभार राजप्रतिनिधी किंवा उपरिका (राज्यपाल) याच्या मार्फत चालवला जात असे तर काही ठिकाणी प्रांताचा कारभार सामंत किंवा माहसामंत याअधिकाऱ्यांमार्फत चालवली जात असत. याशिवाय साम्राज्याचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी त्याने आर्दश अधिकाऱ्यांची एकश्रेणी निर्माण केली हर्षवर्धनाने आपल्या कार्यकाळात उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था निर्माण केली व राज्यातील प्रजेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला होता.

**क) ग्राम प्रशासन :-** हर्षवर्धनाच्या काळी प्रांताचा व जिल्हयाचा कारभार गुप्त काळाप्रमाणेच चालत असे हर्षवर्धनाच्या शासन व्यवस्थेतील शेवटचा महत्वाचा घटक म्हणजे ग्रामप्रशासन होय त्याने ग्रामप्रशासनाकडे विशेष लक्ष पुरविले होते. ग्रामप्रशासन व्यवस्थेतील महत्वाचे अधिकारी पुढील प्रमाणे :-

**अ) ग्रामीक –** ग्रामचा प्रमुख

**आग्रधारीक –** ब्राम्हणांना दान दिलेल्या गावाचा कारभार पाहणारा अधिकारी तसेच जकात वसूल करणारा अधिकारी /जंगल निरिक्षक/जमिन महसूल वसूल करणारा अधिकारी कोठाराचा

प्रमुख (भांडार प्रमुख) जमाखर्च पाहणारा अधिकारी या अधिकाऱ्यांमार्फत ग्रामचे प्रशासन चालविले जात असे यावरुन हर्षवर्धन कालीन ग्रामव्यवस्था उत्कृष्ट होती. हे दिसून येते. ग्राम प्रशासन हा शासन व्यवस्थेतील महत्वाचा व शेवटचा घटक आणि त्याचा कारभार लोकांनीच निवडून दिलेल्या अधिकाऱ्यांमार्फत चालवला जात असे. यावरुन हर्षवर्धनाने फक्त साम्राज्याच उभे केले नाही. असे तर आपल्या राज्यामध्ये उत्कृष्ट शासन व्यवस्था निर्माण केली तर प्रजेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. गुप्त साम्राज्याच्या प्रयत्न केला. गुप्त साम्राज्याच्या विनाशानंतर हर्षवर्धनाने भारतामध्ये निर्माण झालेले राजकीय अराजक नष्ट केले. शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. म्हणून भारतीय इतिहासामध्ये हर्षवर्धनाची कारकिंद अतिशय महत्वाची मानली जाते.

## ९.४ आर्थिक परिस्थिती

हर्षवर्धनाच्या काळी राज्याच्या उत्पन्नाची ४ प्रमुख साधने होती. परंतु राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन हे जमिन महसूल हेच होते त्याच्या काळी जमिन महसूल एकूण उत्पन्नाच्या १/६ इतका आकारला जात असे हा कर रोख रक्कम किंवा धान्याच्या रुपात घेतला जात असे याशिवाय वस्तूंच्या आयात-निर्यातीवर कर आकारला जात असे गुन्हेगारांकडूनही दंडाची रक्कम वसूल केले जात नसत तर सरकारकडून शेतकऱ्यांसाठी जमिनीची व्यवस्था पाहणे, पाणी पुरवठा यासारख्या कल्याणकारी योजना आखल्या जात असे खाणी आणि भूमिगत संपत्ती यावर सरकारची मालकी असे. हर्षवर्धनाच्या काळी राज्याचे जे एकूण उत्पन्न होते. त्याचे खर्चासाठी ४ भाग केले होते १ भाग राज्यकारभारावर खर्च केला जात असे १ भाग सैन्यावर खर्च केला जात असे. राज्याच्या उत्पन्नाचा एक भाग विद्या व कला यांच्या उन्नतीसाठी खर्च केला जात असे. तर उत्पन्नाचा ४ था भाग दान-धर्मासाठी खर्च केला जात असे म्हणजेच हर्षवर्धनाने राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या खर्चाचे योगय नियोजन केले होते आणि त्याच्या काळी राज्याची आर्थिक स्थिती अतिशय चांगली होती.

## ९.५ न्यायव्यवस्था

हर्षवर्धनाच्या काळी न्याय व्यवस्था चांगली होती. न्यायधीशाला न्याय कर्णिक असे म्हणत असत. गुन्हेगाराला राजाकडे शेवटचे अपिल करता असे त्याच्याकाळी राज्यात गुन्हयाचे प्रमाण कमी होते शिक्षेचेही वेगवेगळे मृत्युंदंडाची शिक्षा दिली जात असे सामाजिक नितिमत्ते विरुध्द करणे हददपार करणे जंगलात पाठविण्याची शिक्षा होती. बाणभटट्ाच्या लिखाणावरुन आनंदोत्सवाप्रसंगी गुन्हेगारांना सोडून देण्याची पध्दती होती. सम्राट अशोकाप्रमाणेच हर्षवर्धन आपल्या राज्यामध्ये पशुहत्येस बंदी घातली होती. एकंदरीत हर्षवर्धन कालीन न्यायव्यवस्था अतिशय चांगली होती.

## ९.६ लष्करी व्यवस्था – सैन्य व्यवस्था

सम्राट हर्षवर्धनाने उत्कृष्ट प्रशासन तर निर्माण केलेच पण उत्कृष्ट लष्करही निर्माण केले. गुप्त काळानंतर भारतामध्ये जी अराजकता निर्माण झाली ती नष्ट करण्यासाठी त्याने उत्कृष्ट सैन्य उभारले. हर्षने आपल्या कार्यकाळात जे विशाल साम्राज्य उभे केले ते या उत्कृष्ट

लष्काराच्या सहाय्यानेच म्हणजे त्याला साम्राज्य उभारण्यासाठी व साम्राज्याच्या संरक्षणासाठी विशाल लष्काराची आवश्यकता होती. त्याने आपल्या कार्यकाळात विशाल लष्कराची उभारणी केली. चीनी प्रवासी हयू-एन-त्संग याने आपल्या प्रवास वर्णनात हर्षवर्धनाच्या लष्कराची संख्या दिली आहे. त्याच्याजवळ ६० हजाराचे हत्तीदळ, १ लाखाचे घोडदळ व प्रचंड पायदळ उभे केले. सैन्यामध्ये भरती करताना गुणांचा व शौर्याचा विचार केला जात असे सैन्याला रोख रक्कमेच्या स्वरुपात वेतन मिळत आले आणि त्याने जे लष्कर निर्माण केले त्या लष्कराचा हर्षवर्धन स्वतः प्रमुख होता आणि या विशाल लष्काराच्या जोरावर त्याने आपल्या साम्राज्यात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण केली.

**सार्वजनिक कल्याणाची कामे :-** सम्राट हर्षवर्धनाचे शासन लोक कल्याणकारी होते. त्याने प्रजेच्या हिताकडे विशेष लक्ष पुरविले. प्रजेच्या कल्याणासाठी त्याने अनेक योजना राबविल्या त्याने रस्ते बांधले. शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून कालवे खोदले दवाखाने उभे केले, धर्मशाळा बांधल्या, रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावली पाणपोया, अन्नछत्रे उघडून अपंग, विधवा आणि वृध्द यांच्या चारितार्थाची सोय केली म्हणजेच हर्षाने जी शासनव्यवस्था निर्माण केली. त्या प्रशासन व्यवस्थेच्या माध्यमातून त्यानं जनतेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला.

## १.७ धार्मिक धोरण

हर्षवर्धन हा प्राचीन भारतीय इतिहासातील महत्वाचा सम्राट आहे. त्याचबरोबर तो दानशूर आणि धर्मशील राजा म्हणूनही प्रसिध्द आहे. वर्धन घराणे हिंदू धर्माभिमानी होते. हर्षवर्धन सुध्दा हिंदू धर्माचा अभिमानी होता परंतु नंतर मात्र हर्षवर्धनाने बौध्द धर्माचा स्विकार केला. त्याने बौध्द धर्माच्या प्रसारासाठीही प्रयत्न केला. हर्षवर्धनाच्या काळी बौध्द धर्मामध्ये मतभेद निर्माण झाले होते. ते मतभेद मिटविण्यासाठी त्याने कनोज येथे बौध्द धर्माची परिषद बोलाविली होती व बौध्द धर्मीयांना एकसंघ ठेवण्याचा प्रयत्न केला. या बौध्द धर्म परिषदेला त्याने सर्वोत्तपरी सहाकार्य केले.

हर्षवर्धन हा धर्मशील आणि दानशूर सम्राट होता आपल्या राज्यात एकूण उत्पन्नापैकी ४ था भाग तो दानधर्मासाठी उपयोगात आपण असे. हर्षवर्धन दर ५ वर्षांनी गंगा-यमुनेचया संगमावरील प्रयाग या ठिकाणी सर्वधर्मीयांचे संमेलन भरवत असे आणि या ठिकाणी भिक्षू, ब्राम्हण, अनाथ लोक यांना दानधर्म केला जात असे दर ५ वर्षांनी सर्वस्वाचे दान करणारा जगाच्या इतिहासातील हा एकमेव सम्राट होय. त्याचे धार्मिक धोरणही धर्म सहिष्णू असेच होते.

प्राचीन भारताच्या इतिहासातील श्रेष्ठ सम्राटांच्या मालिकेत हर्षवर्धनाचा समावेश केला जात होता. गुप्त साम्राज्याच्या पतनानंतर भारतात निर्माण झालेले राजकीय अराजक व अव्यवस्था नष्ट करुन त्याने एक विशाल साम्राज्य उभे केले. या साम्राज्यामध्ये उत्कृष्ट शासन व्यवस्था निर्माण केली प्रशासन व्यवस्थेमार्फत त्याने जनतेचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. त्याने उदार आणि धर्मसहिष्णू धोरणाचा स्विकार केला त्याला दानधर्माची फार आवड होती त्याने एकंदरीत ४० वर्ष राज्य केले प्राचीन भारताच्या इतिहासातील शेवटचा साम्राज्य निर्माण करणारा एक शूर हा सामर्थ्य संपन्न सम्राट उत्तम प्रशासक, न्यायी, राजा बौध्द धर्माचा प्रचारक व अनुयायी, उत्तम, साहित्यिक व दानशील राजा म्हणून इतिहासात प्रसिध्द आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. हर्षवर्धन कालीन प्रशासकीय धोरणाचा आढावा घ्या.

## ९.८ सारांश

गुप्त सत्तेच्या ऱ्हासानंतर अनेक नव्या सत्ता उदयास आल्या अशा अनेक सत्तापैकीच पंजाब परिसरात ठानेश्वराचे वर्धन घराणे सत्तेवर आले हर्षवर्धन हा या घराण्यातील सर्वश्रेष्ठ होय. तत्पूर्वी प्रफाकर वर्धन, राजवर्धन सत्तेवर होते. हर्षवर्धनाने संकर काळात राज्याला मोठ्या धिटाईने संभालले व विस्तार केला तो बौध्द प्रसाद हा बौध्द परिषदेचे आयोजन केले त्यांने आपली संपूर्ण संपत्ती दान म्हणून वाटून टाकली व सर्वसत्संग परित्याग केला.

## ९.९ दिर्घोत्तरी प्रश्न

१) सम्राट हर्षवर्धनाचे चरित्र व कामगिरीचा आढावा घ्या.
२) हर्षवर्धन सम्राट बनण्यास कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा मागोवा घ्या.
३) हर्षकालीन प्रशासकीय धोरणाचा आढावा घ्या.
४) टीपः
    अ) हर्षकालीन धार्मिक परिस्थिती
    ब) हर्षवार्धनाची शासन व्यवस्था

❖❖❖❖

# १०

# रजपूतांचा उदय व सिंधमधील अरब साम्राज्य

**प्रकरणाची रचना:**

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ रजपूतांचा उदय
१०.३ अरब आक्रमण
१०.४ अरबांच्या आक्रमणावेळच्या वेळची सिंधची परिस्थिती
१०.५ अरब आक्रमणाची कारणे
१०.६ अरब आक्रमणाचे परिणाम
१०.७ सारांश
१०.८ दिर्घोत्तरी प्रश्न

## १०.० उद्दिष्ट्ये

- रजपूतांच्या उदयाची माहिती जाणून घेणे.
- अरब आक्रमणाची कारणे जाणून घेणे.
- अरब आक्रमणाचे परिणाम स्पष्ट करणे.

## १०.१ प्रस्तावना

प्राचीन भारताच्या इतिहासातील रजपूतांच्या उदयाचा कालखंड व अरब आक्रमणाचा कालखंड असा हा दुहेरी कालखंड. रजपूत सत्ता आपल्या उदयाबरोबरच परस्पर संघर्षामध्ये गुंतल्या होत्या तर अरब आक्रमक धर्म प्रसार, लूट व सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न करत होते. या सर्व बाबींची माहिती प्रस्तूत प्रकरणातून आपण अभ्यासणार आहोत.

## १०.२ राजपूतांचा उदय

गुप्तोचर काळात राजपुताना, मारवाड, माळवा व गुजराथ या भागांत अनेक लहान लहान राज्ये निर्माण झाली ती राजपुत घराणी म्हणून पुढे प्रसिद्धीस आली. हे राजपुत कोण या बद्दल निद्धानांमध्ये विविध मते आढळतात. शल, कुशान, हूव या आक्रमकांच्या बरोबर आलेल्या इतर जमाति व आक्रमकांच्या हिंदूकरणातून निर्माण झालेल्या जातिमधून राजपूत घराणी निर्माण

झाली असावीत असा दाट समज आहे. बौद्धधर्माच्या चलतिच्या, बौद्धधर्माच्या उत्कर्षाच्या काळात वर्णसंकट सुरु झाला. या वावटळी पासुन स्वत्वरक्षणासाठी कोसलाच्या इक्ष्वाकुवंशीय क्षत्रियांनी पश्चिमेस स्थलांतर करुन अखळी व विथ्यं पर्वताच्या आश्रय घेतला. गुप्तोचर काळात हिंदूधर्माच्या आम्युत्याबरोबरच ते पुढे आले. स्वतःची क्षात्रशुद्धता चालविण्यासाठी ते स्वतःला राजपुत्र म्हणवू लागले. त्यामुळेच त्यांच्यात वांशिक व सांस्कृतिक शुद्धता व उदात्तता दिसते. असे श्री. चिं.वि. वैद्य यांचे मत आहे. गुर्जर, चालुक्य, राष्ट्रकुट यांचे मांडलिक म्हणून ते उदयास आले व कालांतराने स्वतंत्र झाले. या राजपुत घराण्यानि मुसलमानांचि भारतावरील व हिंदुधर्मावरील आक्रमणे थोपवून धरण्याचे पराकाष्टेचे प्रयत्न केले. उत्तर भारतात राजपुतांनि मुसलमानांना कडवा प्रतिकार केला व प्रसंगी रत्वसिंचन करुन भारतात संस्कृति जिवंत ठेवली. राजपुतांचे शौर्य, दाक्षिण्यप्रियता, कडवा स्वधर्मभिमान, चिकाटी, स्वाभिनिष्ठा व तेजस्विता इ. गुणांनि भारतीय इतिहासात त्यांचे नाव व कार्य अमर झाले आहे. हे राजपुत स्वतःस आर्यकालीन वीरांचे वंशक म्हणविण्यात धन्यता मानित. सर्व राजपुत भगवान एक लिंगगजीचे उपासक आहेत.

**मेवाडचे गृहिलोत :**

राजपुत घराण्यात मेवाडच्या गृहिलोत घराण्याला आग्रपुजेचा मान मिळतो. इसवीसनाच्या सहाव्या शतकात युद्धात यांने या घराण्याची स्थापना केली. या घराण्यातील पहिला प्रसिद्ध पुरुष बाधा रावळ हा होय. इ.स. ५३५ च्या सुमारास अरबांच्या राजपुतान्यावरील आक्रमणाला त्याने शर्थीने यशस्वी तोंड दिले व मेवाडच्या वैभवाच्या पाया घातला. बाधाने इ.स. ७५३ मध्ये राजसन्यास घेतला. दुसरा खोम्मान याने सिंधच्या अरबी सुभेदाराबरोबर संघर्ष केला. इ.स. ९४३ च्या एका शिलालेखात महाराजधिराज मतृपट्टाचा उल्लेख येतो. त्यावरुन मेवाडचे राज्य त्या सुमारास स्वतंत्र झाले असावे. आघाट (उदेपुरच्या उत्तरेस) ही मेवाडची राजधानी होती व तेथे मोठे व्यापारी केंद्र असल्याचा उल्लेख शिलालेखात मिळतो. परमार मुजाने आघाट नगरीचा विध्वंस केला. तरीही गुहिलोतांचे राज्य मध्ययुगातही टिकून राहिले.

**बुंदलखंडाचे चंदेले :**

गुर्जरप्रतिहारांचा पडत्या काळात बुंदेलखंडात खर्ज्रवाहक येथे इ.स. वी सनाच्या नवव्या शतकात चंदेले घराणे उदयास आले. या घराण्यातील, वाण्यति, जयशक्ती या राजंनि आपल्या कर्तबगारीने घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. पहिल्या यशो-वर्म्याने राष्ट्रकुटांचा पराभर करुन कलिंजर किल्ला जिंकला. उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर यशस्वी मोहीम केल्या व चंदेले घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. त्याने खजुराहो येथील प्रसिद्ध विष्णुमंदिर बांधले. थंगाच्या कारकीर्दित (इ.स. ९४५-१००२) चंदेलांनी प्रतिहारांचे सार्वभौमत्व झुगारुन देऊन आपले स्वातंत्र्य पुकारले व स्वातंत्र्य निदर्शक महाराजधिराज ही पदवी आपल्या नावामागे लावली. चंदेलों राज्य ग्वाल्हेर, भिलासा, यमुना, जबळपुर एवढ्या प्रदेशात पसरले होते. त्याने कोसला, पश्चिम बंगाल, आंध्र येथील राजांचाही पराभव केला होता. इ.स. ९९१ मध्ये गझनिच्या सबक्तगीनाबरोबर झालेल्या रणसंग्रामात थंगराजाने विशेष पराक्रम गाजविला. खजुराहो येथील वैथनाथ व जिननाथमंदिर त्याच्या कारकीर्दित बांधली गेली. विद्याधर राजाने (इ.स. ११९९-१०५१) कनौज्या प्रतिहार घराण्याचा शेवट केला. त्याचे राज्य चंबेलेपासून नर्मदेपर्यंत पसरले होते. गझनिच्या महमुदाशी त्याचा संघर्ष झाला. व त्यात दोन्ही पक्षांना फारसे यश मिळाले नाही. महमुदांचे पुर्वेकडील आक्रमण थोपवुन धरणारा हाच एक हिंदू राजा झाला. पुढील चाळीस वर्षे चंदेले राजे कलचुरीचे मांडलिक बनले. अकराव्या शतकाच्या अखेरीस कीर्तिवर्मा चंदेलाने चेदिराजा कर्णाचा पराभव करुन चंदेलांचे स्वातंत्र्य पुनः प्रस्थापित केले. त्याचा आश्रित

कृष्णामिश्राने 'प्रबोध चंद्रोदय' हे रुपकात्मक संस्कृत नाटक लिहिले. बाराव्या शतकात मदन वर्मा हा प्रसिद्ध राजा होवून गेला. त्याने भिलसापर्यंत राज्यविस्तार करुन चंदेलांची प्रतिष्ठा वाढविली. खजुराहो येथील जैनमंदिरे यांच्या कारकीर्दित बांधली गेली. त्याचा वारस व नातु परमर्दी यांचे दिल्लीच्या पृथ्वीराज चाहमानाशी वितुष्ट आले. पृथ्वीराजाने परमर्दीचा अनेकदा पराभव केला. महंमद घोरीने कलिंजर घेऊन चंदेला राजधानी महोबाचा विध्वंस केला. दिल्लीच्या मुलनांचे अंकित म्हणून चंदेलांचे राज्य सोळाव्या शतकापर्यंत टिकले.

**त्रिपुरीचे कलचुरी घराणे :**

नर्मदा व गोदावरी यांच्यामधील कलचुरींचे राज्य पसरले होते. या घराण्यातील पहिला ऐतिहासिक राजा कोकल्ल होय. (इ.स. ८४५-८९५ त्याने कनौजच्या प्रतिहारांचा पराभव केला व तुर्किना राजपुतान्यातुन हुसकावून लावले. पुर्वेकडे बंगालच्या राज्याचा पराभव केला. तर दक्षिणेत राष्ट्रकुट दुसऱ्या कृष्णाचा पराभव करुन उत्तर कोकणापर्यंत दिग्विजय केला त्याने चंदेला राज्यकन्येशी विवाह केला व अपालि कन्या राष्ट्रकुट राजाला दिली. त्यामुळे भारताच्या सत्ताधीशांत कलचुरीचे महत्त्व वाढले. पहिल्या युवराजाच्या कालकिर्दीत मध्यभारत मंदिर शिल्पाची निर्मिति झाली. त्याने अनके शैवमंदिरे बांधली व मत्तमथुर शैवांना राजाश्रय दिला. नंतरच्या राजांना आपले प्रभुत्व टिकविता आले नाही चंदेले व राष्ट्रकुट यांच्यापुढे कलचुरींना नमते घ्यावे लागले. दहाव्या शतकात परमार व चालुल्यांनिही त्रिपुरी राजधानिचा दोनदा विध्वंस केला. दुसरा कोकल्ल (इ.स. ९९५-१०३०) याने दक्षिणेतील चालल्यांचा पराभव केला. गांगेयदेव विक्रमादित्य (इ.स. १०३०-१०४१) याने काश्मिर, कांगडा, पंजाब, बंगाल, ओरिसा व दक्षिणेस कुंतल देश येथपर्यंत मुलुखगिरी केली. त्याचा पुत्र लक्ष्मीकर्ण (इ.स. १०४१-१०७३) याने कनोज, माळवा, गुजराथ, बिहार येथील विस्तृत मुलुख जिंकून भारतातील चोलाचा पराभव केला. त्याचे साम्राज्य बंगालपासून गुजराथपर्यंत व गंगेपासून महानदीपर्यंत पसरले होते त्याने कर्णावति ही नदी, राजधानी स्थापन केली व राज्यात अनेक शैवमंदिरे बांधली. उत्तरभारतात साम्राज्य स्थापणारा हाच शेवटचा राजपुत राजा होय. उत्तरयल्यात त्याला अनेक पराभव सहन करावे लागले. कलचुरींचे राज्य तेराव्या शतकात मुस्लिम आक्रमणाला बळी पडले. त्यांनी स्थापन केलेल्या चेदिशन (सुरुवात इ.स. २४८-४९) सोळाव्या शतकापर्यंत मध्य भारतात प्रचलित होता.

**माळव्याचे परमार घराणे :**

राष्ट्रकुटांनि आपले आश्रीत म्हणून परमारांना माळव्याची सुभेदारी दिली. (इ.स.वी सनाचे नववे शतक) या घराण्यातील प्रसिद्ध राजा मुंज वाव्यतिराज (इ. ९७४-९९७) याने कलचुरींचा पराभव केला. गुहिलोतांना नमविले. हुणांना शरण आणले. चाहमांनापासून अबू प्रदेश जिंकला. त्याने अन्हिलपाटणच्या चालुक्यांचा पराभव करुन लाट देश जिंकला. राष्ट्रकुटांचा पाठलाग करीत गोदावरी ओलांडली. पण त्यात मुंजाचा पराभव होऊन तो शत्रुच्या कैदेत पडला. मजुराच्या स्वतः नवी असुन धनंजय, धनिक, हलायुथ इ. अनेक संस्कृत पंडितांचा आश्रयदाता होता. यानंतरचा प्रसिद्ध राजा पहिला भोज (इ.स. १०००-१०५५) होय. त्याने कल्याणीच्या चालुक्यांना पराभव केला. तसेच बलिंग, उत्तर कोकण, कनौज येथपर्यंतचा मुलुक जिंकला. तो स्वतः जातिवंत कवी असुन त्याने विविध विषयांवर ग्रंथरचना केली आहे. त्यात 'सरस्वतिकंठाभरण' व 'शृंगारप्रकाश' हे साहित्यग्रंथ, 'युक्तिकल्पतरु' हा नितिग्रंथ समरांगणसुत्रधार हा शिल्पशास्त्राचा ग्रंथ तत्त्वप्रकाश हा शेवर्दनग्रंथ व भोजचम्पू हा चम्पग्रंथ हे विशेष प्रसिद्ध आहेत. त्याने अनेक विद्वानांचा राजाश्रय दिला होता. प्रमाचंद सुरी शांतिसेन व

धनपाल हे जैन पंडित मिताक्षरेचा कर्ता, विज्ञानेश्वर प्रसिद्ध कवि पद्यगुप्त हे त्याच्या पदरी होते. धारानगरीमध्ये त्याने अनेक सुंदर इमारती बांधिल्या. तसेच भोपालजवळ भोजपुरीनगरी वसवून जवळच २५० चौरस मैलांचे प्रचंड सरोवर निर्माण केले. धारानगरीत त्याने अनेक पाठशाळा व विद्यालये चालविली. शैव असुनही त्याने अव्यधर्मियांना साहाय्य केले त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीश चेदी व चालुक्य यांच्या संयुक्त सेनेने त्याचा पराभव केला व लढाईत तो मारला गेला. भोजानंतर उदयादित्याने (इ.स. १०६०-१०८७) कलचुरी यशः कर्णाचा पराभव करुन माळव्याचे वैभव वाढविले. त्याने उदयपुर येथे बांधलेले शिवमंदिर अद्यापही सुस्थितित आहे. या राजाच्या कारकीर्दित उना (इंदूर संस्थान) येथे बांधलेली अनेक हिंदु व जैन देवळे उपलब्ध होतात. यानंतर गुजराथच्या सोंलकीनी माळवा जिंकून त्यावर आपले प्रभुत्व स्थापिले. तेराव्या शतका अखेर हे राज्य अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणाला बळी पडले.

**सांबरचे चाहमान घराणे :**

गुर्जर - प्रतिहारांचे मांडलिक म्हणून हे घराणे राजस्थानात शाकंभरी (सांबर) येथे राज्य करीत होते. या घराण्याचा प्रसिद्ध पुरुष चौथा विग्रहराज (इ.स. ११५३-११६४) याने गझनीच्या सुलतानांना पश्चिमेस रेटून पंजाब मध्ये आपला अंमल बसविला. त्याने दिल्ली जिंकून आपला दरारा वाढविला. त्याचा नातु तिसरा पृथ्वीराज रैस (हिंदी) या काव्यातुन वर्णिले आहे. याने जयचंद्र गढवालाची कन्या संयोगिता पळवून आणून तिच्याशी विवाह केला. परमर्दी चंदेलाचा पराभव केला. व इ.स. ११९१ मध्ये महमंद होरीचा पराभव करुन त्यास पिटाळून लाविले. पुढील वर्षी महंमदाने पुनः चढाई करुन पृथ्वीराजाचा पराभव केला. त्यानंतर या घराण्यास उतरती कळा लागली.

या राजपुत राज्यामधल्या शत्रुत्वाच्या संबधामुळे पंजाबामधून गझनवीचा हुसकावून लावले. त्यांना अशक्य झाले. ह्या राज्यामधल्या राज्यकारभारविषयक फारशी माहिती उपलब्ध नाही. पण संरजामी पद्धतीच्या प्रवृत्ति मात्र प्रामुख्याने आढळतात. समाजामध्ये जमातीचा प्रभाव होता. जमातीच्या प्रमुखाला मोठा मान दिला जाई. कोणीही राजपुत आपले कुटुंब आणि वतन यांचा फार आदर करीत असे. पण ह्या राजपुतामध्ये एक वैगुण्य होते की ते आपल्या जमातीच्या समुह बनवित. दुसऱ्या समुहाशी संबंध टाळीत. या समुहापैकी प्रत्येक समुह दुसऱ्या समुहाशी संबंध टाळीत. अशा समुहापैकी प्रत्येक समुह दुसऱ्या समुहाहुन वरचढ असल्याचा दावा करी. अशा स्वयंशासित समुहामध्ये आणि राजपुत व्यतिरिक्त प्रजेमध्ये समानता अशी कोणतीच नव्हती. राजपुत राज्यकर्त्यांनी हिंदुधर्म आणि जैनधर्म ह्या दोघांनाही राजाश्रय दिला. धर्मस्थळांना त्यानी उदाहरणे अनुदाने दिली. कित्येक सुंदर मंदिराची रचना ह्या काळात झाली. स्थापत्य कला ह्या काळामध्ये बरीच भरभराटली. कोणार्कचे सुर्यमंदीर, पुरीचे जगन्नाथ मंदिर अबु दिलवाडा येथील मंदीरे या प्रगतीची साक्ष देतात. कित्येक संस्कृत ग्रंथ रचले गेले. परमार राज्यकर्त्यांची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेली उज्जैन आणि धारा ही शहरे ही विद्यांची प्रसिद्ध केंद्रे होती. प्राकृत आणि अपभ्रंश भाषांमधुनही भरपुर ग्रंथरचना ह्या काळी झाली हेमचंद्र हा जैन धर्माचा मोठा प्रसिद्ध विद्वान होता. त्याने अपभ्रंम भाषेत ग्रंथरचना केली. अर्वाचीन उत्तर भारतीय भाषांपैकी हिंदी, मराठी किंवा बंगाली या भाषांचा उगमही ह्याच काळात झाला.

## १०.३ अरब-आक्रमण

**अरबांची सिंध प्रांतावरील स्वारी –** अरबस्तानात ईस्लाम धर्माचा प्रचार आणि विकास झाल्यानंतर अरबांनी या धर्माचा प्रसार करण्याकरीता फार मोठा प्रयत्न चालविला. त्यामुळेच इराण पासून स्पेनपर्यंत या धर्माचा प्रसार होऊ शकला. अरबांचे सुरुवातीपासूनच हिंदुस्थानातील श्रीमंत बंदराकडे लक्ष होते. हि सधन बंदरे त्याबात घ्यावीत. ही त्यांची महत्वकांक्षा होती. म्हणून अरबांनी इ.स. ६३६ मध्ये समुद्रमार्गाने दुसरा पूलकेशी यांच्या कारकिर्दीत मुंबई जवळील ठाणे बंदरावर आक्रमण केले. पण अरबांना अपयश आले. यानंतर अरबांनी भडोच व सिंधवर पुन्हा आक्रमणे केली पण सुरुवातीला त्यांना यश आले नाही. अरबांनी प्रथम बलुचिस्तान मध्ये यश मिळाले. आणि पुन्हा अरबांनी सिंध प्रांताकडे लक्ष वळविले.

## १०.४ अरबांच्या आक्रमणाच्या वेळची सिंधची परिस्थिती

सिंध राज्याचा विस्तार उत्तरेला काश्मिरपर्यत पूर्वेला कनोजपर्यत आणि दक्षिणेला अरबी समुद्रापर्यंत झाला होता. इ.स. ७ व्या शतकात इराणचा राजा निमरोज याने सिंध प्रांतावर आक्रमण करुन राजा शेरीयाज यास ठार केले. त्यानंतर रायद्वितीय हा सिंधचा राजा झाला. याच्या कार्यकाळात त्याचा ब्राहमामंत्री चच यानं क्रांती करुन सर्व सत्ता स्वतःच्या हाती घेतली त्यानंतर या चचा भाऊ चंद्र हा सिंध प्रांताचा राजा झाला. आणि याच्या मृत्युनंतर मात्र सिंधमध्ये यादवी होऊन मुलगा दाहिर हा सिंधचा राजा झाला. परंतु यादवी युध्दामुळे सिंधमध्ये आक्रमणाला योग्य राजकीय परिस्थिती निर्माण झाली नाही आणि अरबांनी सिंध प्रांतावर आक्रमण केले.

## १०.५ अरब आक्रमणाची कारणे

अरबांची सिंध प्रांतावर जी आक्रमणे झाली आहेत. त्याची कारणे पाहता अरबांना सिंध प्रांतामध्ये ईस्लाम धर्माचा प्रसार करावयाचा होता. हे एक प्रमुख कारण होते. त्याचबरोबर पश्चिम हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावरील समृध्द बंदरे जिंकली तर आपणांस भरपूर लूट मिळेल. म्हणजेच अधिक धन मिळविण्याकरीता त्यांनी सिंध प्रांतावर आक्रमण केले ही शक्यता नाकारता येत नाही. अरबांनी सिंध प्रांतावर स्वारी करण्याकरीता जे तात्कालीक कारण घडून आले ते म्हणजे लंकेचे मुस्लिम व्यापारी मक्केच्या यात्रेला जात असताना वाटेत मोठे वादळ झाल्यामुळे त्यांना सिंध मधील देवल बंदराच्या आश्रयास जावे लागले. तेथे चाचांनी त्यांची जहाजे लुटली यावेळी देवल बंदरावर सिंधचा राजा दाहीर याची सत्ता होती. तेव्हा बसऱ्याचा शासक अलहजाज याने दाहीरकडे नुकसान भरपाईची मागणी केली राजा दाहीरने नुकसान भरपाई देण्यास नकार दिला. तेवहा अल्-हजाज याने सिंधवर आक्रमण केले पण त्याचा पराभव झाला तेव्हा अल्-हजाजने दाहीरला शासन करण्याची जबाबदारी आपला जावई व पुतण्या महम्मदबीन कासीमवर सोपविली आणि कासीमने प्रचंड फौजनीशी तिघांवर आक्रमण केले.

**महम्मद-बीन-कासीमची सिंधवरील स्वारी -** (इ.स. ७१२ ते ७१३) महम्मद बीन कासीमला सिंधवरील स्वारीत मोठा विजय मिळाला. प्रथम त्याने सिंधमधील देवल नगराला वेढा दिला. तेव्हा राजा दाहिरच्या पुतण्याने महम्मद बीन कासीमचा मोठा प्रतिकार केला. पण दाहीरच्या सैन्याचा

प्रतिकार केला. पण दाहीरच्या सैन्याचा पराभव झाला. त्याला देवलमध्ये मोठीलूट मिळाली त्यानंतर कासीम हैद्राबादकडे वळला. तेथेही त्याला विजय मिळाला. कासीम सिंधू नदी ओलांडून सिंध नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन पोहचला. आणि येथेच त्याची आणि दाहीरच्या सैन्याची रणक्षेत्रावर समोरा-समोर गाठ पडली आणि त्यांच्यात युध्द घडून आले. या युध्दाला रेवरचे युध्द असे म्हणतात.

**रेवरचे युध्द (इ.स.७१२)** - रेवरचे युध्द सिंधचा शासक दाहीर आणि कासीम यांच्यामध्ये घडून आले. या युध्दामध्ये दाहीरने मोठा पराक्रम केला. पण या युध्दामध्ये शेवटी तो मारला गेला. त्यामुळे इतिहासामध्ये शेवटी तो मारला गेला. त्यामुळे इतिहासामध्ये हे रेविरचे युध्द अतिशय महत्वाचे आहे कारण या युध्दातील विजयानंतर कासीमची सिंध प्रांतावर सत्ता प्रस्थापित झाली. रेविरच्या युध्दानंतर कासीमने ब्राह्मणाबाद आणि यलोश ही दोन ठिकाणे जिंकून घेतली. नंतर मूलतानचा किल्ला ही जिंकून घेतला. अशा रितीने सिंधू नदीच्या संपूर्ण दक्षिण वर्चस्व प्रस्थापित केले.

**दाहीरच्या अपयशाची कारणे –** सिंधचा शासक दाहीर अत्यंत बलशाली व पराक्रमी असूनही मुस्लिम आक्रमण पुढे त्याचा पराभव झाला त्याची कारणे पुढील प्रमाणे –

१) अरबांची धर्म भावना अतिशय प्रखर होती.
२) अरबांचे युध्दतंत्र श्रेष्ठ प्रकारचे ठरले होते.
३) भारतीयांमध्ये एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव होता त्यामुळे दाहीरला इतर भारतीय राज्यकर्त्यांचे सहकार्य मिळू शकले नाही.
४) या काळातील हिंदू शासकाने आपल्या आरमारांकडे दुर्लक्ष केले त्यामुळेही पराभव घडून आला.
५) अरबांचे क्रोर्य हे शांततावादी हिंदू प्रजेला धक्कादायक वाटून लागले. त्यांच्यात दहशत निर्माण झाले त्यामुळेही दाहीरचा पाडाव घडून आला.
६) महम्मद बीन कासीमचे राजकारण व कूटनीती दाहीरपेक्षा वरचढ होती. उरलेले सिंध प्रांत हिंदूस्थानच्या एका बाजूला असल्याने या प्रदेशावरील संकट म्हणजे हिंदूस्थानावरील संकट आहे  कधीच वाटले नाही. त्यामुळे दाहिरला इतरांची मदत मिळू शकली नाही आणि त्याचा पराभव झाला.
७) अरबांजवळ युध्द साहित्याच्या पुरवठा भरपूर होता. त्यामुळेही त्यांना विजय मिळू शकला.
८) महम्मद कासीम सिंधवर विजय मिळवल्यास नंतर अरबांचे तेथे जवळ-जवळ १५० वर्ष शासन केले.

## १०.६ अरब आक्रमणाचे परिणाम

भारतीय इतिहासांमध्ये अरब आक्रमणे व त्यांना मिळालेले विजय हि महत्वाची घटना आहे. सिंधवर जरी अरबांना विजय मिळाला असला तरी इतर प्रदेशावर आपले वर्चस्व अरबांना निर्माण करता आले नाही. याबदद्ल सर स्टॅन्ले लेनपूल या इतिहासकाराने अरब विजयाचे वर्णन करताना भारताच्या इतिहासावर कोणताही दूरगामी परिणाम घडवून न आणणारा विजय असे वर्णन केले आहे. परंतू हे मत ग्राहय धरता येत नाही. कारण या अरब आक्रमणामुळेच इतर मुस्लिम आक्रमकांचा मार्ग मोकळा झाला असे म्हणता येईल.

अरब आक्रमणाचा भारतीय संस्कृतीवर व भारतीय संस्कृतीचा अरब संस्कृतीवर परिणाम घडून आला. भारतीयांच्या मानाने अरब संस्कृती विशेष प्रगत नव्हती. अरबांनी भारतीयांपासून ज्योतिष, रसायनशास्त्रे, गणित व खगोलशास्त्र शिकण्याचा प्रयन्त केला. तसेच अनेक भारतीय ग्रंथांचा अरबी भाषेत अनुवाद करण्यात आला. अरबांनी भारतीयांपासून संगीत, चित्रकला, स्थापत्यकला, युध्दकला इ. कला शिकून घेतल्या.

थोडक्यात अरब आक्रमणामुळे भारत व अरबस्तान यांच्यात फार मोठी संस्कृती भारतीय इतिहासामध्ये अरब आक्रमणास अतिशय महत्वाचे स्थान आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. अरबांच्या सिंधवरील आक्रमणाचा आढावा घेऊन परिणाम सांगा.

## १०.७ सांराश

प्राचीन कालखंडाचा उत्तरार्धाच्या कालखंडात रजपूत सत्तानी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. मात्र या सत्ता बळवात असूनही एक संघ नव्हत्या. परस्पर संघर्षात अडकल्या होत्या. याच संधीचा फायदा अरब आक्रमकांनी घेवून भारतात सत्ता स्थापनेच्या महत्वाकांक्षा बाळगल्या होत्या. यातूनच अरब आक्रमणे भारतावर झाली व या आक्रमणाचे भारतावर पुरोगामी परिणाम झाले.

## १०.८ दिर्घोत्तरी प्रश्न

१. रजपूत सत्तेच्या उदयावर भाष्य करा.
२. अरबांच्या आक्रमणाचा आढावा घ्या.
३. महमेदबीन कासिमची सिंधवरील स्वारी स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ११

# दक्षिण भारताची राजकीय व सांस्कृतिक वाटचाल

**प्रकरणाची रचनाः**

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ चालुक्य घराणे
११.३ राष्ट्रकुट घराणे
११.४ पल्लव घराणे
११.५ चोल घराणे
११.६ सारांश
११.७ दिर्घोत्तरी प्रश्न
११.८ संदर्भ ग्रंथ

## ११.० उद्दिष्ट्ये

- भारताच्या दक्षिण भागात उदयाला आलेल्या राज्यांची माहिती घेणे.
- चालुक्य राज्यकर्त्यांनी भारतीय इतिहासात बजावलेल्याकामगिरीची माहिती घेणे
- राष्ट्रकूट घराण्याचा उदय अस्त व महत्व लक्षात घेणे.
- पल्लव घराण्याच्या प्रगतीची माहिती घेणे
- चोल राज्यकर्त्याची माहिती घेणे.

## ११.१ प्रस्तावना

भारतामध्ये दक्षिण भारतात मानवी समाज अनेक वर्षापासून रहात आहे. इ.पूर्व चौथ्या शतकापासून दक्षिणेकडील समाजाचा उत्तरेकडे संपर्क सुरु झाला होता. उत्तरेकडील प्रगत समाजाची ओळख होण्यास सुरुवात झाली होती. उत्तरेकडून आलेले व्यापारी तसेच हिंदू, बौध्द् व जैन धर्माचे शिष्य व अनुयायी यांनी संपर्क केला होता. व्यापाऱ्यांना दक्षिणेतील सोने, मोती व रत्ने यांचे आकर्षण होते. सामाजिक, आर्थिक जीवनाच्या विकासाबरोबरच राजकीय जीवन विकसित होत गेले. निरनिराळया काळात व प्रदेशात काही राज्ये उदयास आली होती.

आधुनिक काळातील संशोधन, उत्खनने,संगम, साहित्य, अशोकाचे शिलालेख, तामिळी साहित्य, प्रवास वर्णने या ऐतिहासिक साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन करता येते. दक्षिण भारतातील चालुक्य राष्ट्रकूट पल्लव व चोल घराण्यांच्या इतिहासाची माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

## ११.२ चालुक्य

इ. सनाच्या ६ व्या शतकापासून दख्खन व दक्षिण भारतामध्ये अनेक राजकीय घराण्यांचा उदय झाला होता. त्यापैकी पश्चिम भारतातील बदामी (कर्नाटक) कल्याणी व वेगी या ठिकाणी चालुक्य सत्ता स्थापन झाल्या होत्या. त्यांची राजकीय, प्रशासकीय व सांस्कृतिक योगदान महत्वांचे आहे.

चालुक्य घराण्याच्या बाबतीत इतिहासकारांनी आपली मते मांडली आहेत. सी.वी. वैद्यांनी ते महाराष्ट्रातील क्षत्रिय वंशांचे होते. डॉ. वा.ए.स्मिथ यांच्या मते ते परकीय होते. तर डॉ.डी.सी. गांगूळीनी कन्नड भाषिक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

चालुक्य घरण्याचा संस्थापक जयसिंह वल्लभ होता त्याच्यानंतर रणराज सत्तेवर आला. रणराजने महाराष्ट्राचा प्रदेश जिंकला त्याचामुलगा पहिला पुलकेशी (इ. ५३५ ते ५६६) राजा झाला. त्यानंतर पहिला कीर्तीवर्मन ५६७ व मंगळेश ५९८ मध्ये राजे झाले. दुसऱ्या पुलकेशीची कारर्किद ६१० मध्ये सुरु झाली. त्यानंतर पहिला विक्रमादित्य, विनयादित्प, दुसरा विक्रमादित्य, दुसरा कीर्तीवर्मन हे प्रमुख राजे झाले होते. कीर्तीवर्मनाच्या चालुक्य वदामीची सत्ता नष्ट झाली होती.

पुलकेशी पहिल्याने विजापूर राज्यात स्वातंत्र घोषित करुन वातापी ही आपली राजधानी बनवली होती. पुलकेशीने अश्वमेध, हिरण्यगर्भ, वाजपेय इ. यज्ञ केले होते. पुलकेशी पहिल्यानंतर दुसरा कीर्तीवर्मन राजा झाला. गोव्यातील कदंबसत्तेचा तसेच कोकणातील तसेच दक्षिणेतील नलाचा पराभव करुन आपले साम्राज्य वाढवले होते. वातापी नगरीत कीर्तीवर्मनाने मंदिरे बांधली. तसेच अंग वंग कलिंग, मगध छत्तूर, मद्रक व केरळ गंग मूषक राजांशी संपर्क केला होता. कीर्तीवर्मन नंतर त्याचा भाऊ मंगळेश व त्यानंतर पुलकेशी दुसरा राजा झाला होता.

पुलकेशी दुसऱ्याने सन ६०९ ते ६४२ या प्रदिर्घ काळामध्ये राज्य केले होते. त्याने स्वपराक्रमाने कदंबांची राजधानी वनवासी जिंकली होती. म्हैसूरचे गंग, कोकणातील नाविक मौर्य, लाट माळवा गुर्जर ही राज्य जिंकली गुजरातवरुन हर्षवर्धनाशी संघर्ष झाला. त्यामध्ये हर्षवर्धनाचा पराभव केला. ऐहोक येथील शिलालेखामध्ये त्याचे वर्णन आहे. पुलकेशीने शशांक माधववनी वल्लभी व भडोज या शासकांची मदत घेतली होती. नंतर पुलकेशीने दक्षिण कोसक व कलिंग देश जिंकले होते. नवीन जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार पहाण्यासाठी त्याने आपल्या भावास नेमले होते. त्यामधुन वेगीचे चालुक्य घराण्याची स्थापना झाली. पुलकेशीने नंतर महिंद्रवर्मन पहिला या पल्लव राजाचा पराभव केला होता. दक्षिणेमधील राज्यावर विजय मिळवल्यानंतर त्याने स्वतःला ‘सत्याश्रम’ पृथ्वीवल्लभ, परमेश्वर, परममाहेश्वर इ. बिरुदे धारण केली होती. कांचीचापल्लव राजा पहिला नरसिंहवर्मन याने पुलकेशीवर स्वारी करुन त्याचा दारुण पराभव केला. त्यामध्येच त्याचा मृत्यु झाला.

पुलकेशी दुसऱ्याच्या मृत्युनंतर पहिला विक्रमादित्य राजा झाला. त्याने चालुक्यांना पुन्हा राजकीय दृष्टिकोनातून प्रबळ केले होते. विक्रमादित्याचा भाऊ लाटचा शासक होता. त्याने पल्लवाची राजधानी कांची जिंकून पल्लवांकडून कर वसूल केला. दक्षिणेतील चोल,पांडय व केरळांचा पराभव करुन दक्षिणेचा सम्राट बनला होता. त्याने आपला भाऊ नरसिंह याला गुजरातचा शासक बनवले होते. तो गुजरातच्या चालुक्य घराण्याचा संस्थापक झाला.

विक्रमादित्य ६८१ मध्ये मरण पावल्यानंतर विनयादित्य राजा झाला. त्याने दक्षिण दिग्विजय करुन पल्लव केरळ, पांडय, गंग यांना पराभूत केले. शिलोन व पर्शिया येथील राजांना मदत केली होती. त्या नंतर विजयादित्य, दुसरा विक्रमादित्य राजा झाला. त्याच्या मृत्यू नंतर दक्षिण येथील सार्वभौम सत्ता राष्ट्रकुटांकडे गेली.

**कल्याणीचे चालुक्य :-** वातापीप्रमाणेच कल्याणी येथे तैलप राजाने इ.सन ९७३ मध्ये स्वतंत्र चालुक्य घराण्याची स्थापना केली होती. तेलप हा राष्ट्रकुटांचा सरदार होता. नाकुंतल कन्नड जिल्हयाचा स्वामी होता. राष्ट्रकुटांची राजधानी मान्यखेट होती. तैलपाने राष्ट्रकुट राजा कर्कची हत्या करुन कल्याणीच्या चालुक्याची सत्ता स्थापन केली. गुजरातमधील लाट राजावर तैलपाने आक्रमण करुन लाटवर बारप्पाची नियुक्ती केली. परमाराच्या शासकाने तैलपाचा पराभव केला होता.

तैलपानंतर सत्याश्रम हा राजा झाला. त्याने गुजर राजा चामुंडाचा पराभव केला. चोळ राजा राज राजाचाही पराभव केला होता. सत्याश्रयानंतर त्याचा पुतण्या विक्रमादित्य पाचवा राजा झाला त्याने द. कोसलचा राजा मदाभोगगुप्त द्वितीयचा पराभव केला. त्याच्यानंतर जगदेवनल्ल राजा झाला. त्याने माळव्याचा राजा भोजचा पराभव केला.

सोमेश्वर पहिला कल्याणीचा चालुक्य वंशामधील श्रेष्ठ राजा होता. सोमेश्वरने मान्यखेटहून राजधानी कल्याणी येथे नेली. सोमेश्वरने चोल राजा राजेंद्रचा पराभव केल्यानंतर परंतु नंतर त्याच्याकडूनच पराभूत व्हावे लागले. सोमेश्वर पहिल्याने आपला मुलगा विक्रमादित्याला वारस नेमले. त्याने सत्तेचा त्याग करुन सोमेश्वर दुसऱ्याला सत्ता दिली. त्यानंतर विक्रमादित्य सहावा राजा झाला. त्याने शासक वीर राजेंद्रच्या मुलीशी विवाह केला होता. ११९० मध्ये सोमेश्वर ४ थ्याच्या मृत्यूनंतर कल्याणच्या पश्चिमी चालुक्यांची सत्ता संपुष्टात आली होती.

**वेगी चालुक्य / गुजरातचा चालुक्य :-** सम्राट दुसरा पुलकेशी चालुक्य याने पूर्व किनारपटट्रीचा मुलूख जिंकल्यानंतर आपला भाऊ विष्णूवर्धन याला सुभेदार नेमले होते. त्याने इ. सन ६१५ मध्ये स्वतंत्र घराण्याची घोषणा केली होती. त्याची राजधानी वेगी नगरी होती. त्याचे राज्य विशाखापटट्णम पासून नळोरपर्यत पसरले होते. वेगी चालुक्य ब्राह्मणधर्मी होते. विष्णूवर्धन नंतर त्याच्या कालखंडात राष्ट्रकूल राजा दतिदुर्गाने वेगीवर स्वारी करुन त्यांचा पराभव केला होता. ७९९ मध्ये दुसरा विक्रमादित्य वेगीच्या गादीवर आला. तो स्वतःचा उल्लेख 'परम भटटारक-महाराजाधिराज परमेश्वर नरेंद्रमृगराज किभुवनांकुश' अशा बिरुदानी करत होता. अमोघवर्ष राष्ट्रकूट अल्पवयीन असताना विजयादित्याने भडोज पर्यत विजय मिळवला होता. अमोघवर्षाने चालुक्यांचा पराभव करुन वेगी राष्ट्रकुटांची अंकित बनवली होती.

**आपली प्रगती तपासा**

१) प्राचीन भारतीय इतिहासातील चालुक्य राजांचा कार्याचा आढावा घ्या.
२) प्राचीन भारतीय इतिहासातील चालुक्य राजांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करा.

## ११.३ राष्ट्रकूट घराणे

प्राचीन भारतातील चालुक्यानंतर राष्ट्रकूट राज्याचा उदय झाला होता. राष्ट्रकूटांनी इ.सन ७५३ ते ९७५ या कालखंडात राज्य केले. राष्ट्रकूटांनी सर्वांगिण उत्कर्षाचा काळ प्रस्थापित केला होता.

राष्ट्रकूट वंशाचा संस्थापक दंन्तिदुर्ग होता. त्याचे मूलस्थान मराठवाडयातील लातूर (लटट्जौर) होते. त्याने चालुक्यांची सत्ता झुगारुन दिली होती. दन्तिदुर्ग हा चालुक्या राजा विक्रमादित्य या मांडलिक होता. त्याने विक्रमादित्याला वेगवेगळया स्वाऱ्यांमध्ये साथ दिली होती. विक्रमादित्याच्या मृत्युनंतर त्याने आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली. चालुक्य वंशातील कीर्तीवर्माचा पराभव करुन आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली होती. दन्तिदुर्गा नंतर त्याचा चुलता प्रथम कृष्ण गादीवर आला. त्याने कर्नाटकमध्ये आपल्या राज्याचा विस्तार केला होता. प्रथम कृष्णानंतर दुसरा गोविंद राजा झाला. पण तो राजविलासी असल्यामुळे त्याने सर्व राज्यकारभार धाकटा भाऊ ध्रुव याच्याकडे सोपवला. ध्रुव महापराक्रमी राजा होता त्याने वस्तराज व राजधर्मपाल या गुर्जर व पाल वंशातील राजांचा परस्पर संघर्षाचा फायदा घेतला दोघानाही वेगवेगळे गाठून त्यांचा पराभव केला. परिणामी राज्याचा विस्तार कनोज पर्यत झाला होता. दक्षिणेत गंग व पल्लवांचा पराभव केला.

ध्रुवा नंतर तिसरा गोविंद सत्तवेर आला त्याने आपल भाऊ स्तंभ याच्या मदतीने गंगवाडीचा दतिंग शिवमारा पल्लव राजा वेणीचा चतुर्थ विष्णूवर्धन याना मांडलिक केले. गोविंदाने पाल राजांचा पराभव केला. राजकीय पराक्रमा बरोबरीने प.महाराष्ट्र व बंगाल मध्ये सांस्कृतिक दुवा निर्माण झाला गोविंदाने उत्रेकडे बनारस, कनोज, गुजरात व दक्षिणेकडे कन्याकुमारी पर्यत आपल्या राज्याचा विस्तार केला होता.

तृतीय गोविंदानंतर त्याचा अल्पवयीन मुलगा अमोघवर्ष सत्तेवर आला. त्यावेळी राष्ट्रकूट साम्राज्य डळमळीत आले होते. त्यांच्या मांडलिकांनी बंड पुकारले. अमोघवर्षाने स्वतःची मुलगी चन्द्रावलब्बे हिचा विवाह गंग रजा बुनुग यांच्या बरोबर करुन मैत्रीचे संबंध निर्माण केले.

अमोघवर्षानंतर पुत्र द्वितीय कृष्ण राजा झाला त्याने चोल राजांशी वैवाहिक संबंध जोडले त्यांचा चालुक्यांबरोबर सतत संघर्ष सुरु होता. तृतीय इंद्रानंतर तृतीय कृष्ण राजा झाला. तो इ.सन ९३९ मध्ये सत्तेवर आला. आपला मेव्हणा बुतुग याच्या मदतीने कृष्णाने चोळ राजा राजदित्य याचा पराभव करुन तोडमंडल आपल्या राज्यात समाविष्ट करुन घेतले. रामेश्वर पर्यतचा प्रदेश नियंत्रणाखाली होता. कर्क द्वितीय राष्ट्रकूट वंशातील शेवटचा राजा होता. राष्ट्रकूटांचा सामंत तैलप तृतीय याने इ. सन ९७३ ला उठाव करुन चालुक्यांची सत्ता स्थापन केल्याने राष्ट्रकूटांची सत्ता संपुष्टात आली.

**राष्ट्रकूट प्रशासन :-** राष्ट्रकूट राज्यकर्ते कन्नड भाषिक होते. राष्ट्रकूटांनी पूर्वीच्या भारतीय राजापेक्षा वेगळी बिरुदे धारण केली होती. राज्यकर्त्याच्या दरबारामध्ये सामंत, विदेशी दूत व समाजातील श्रेणीचे प्रतिनिधी प्रतिनिधीत्व करत होते. राष्ट्रकूटांमध्ये राजपद वंशपरंपरांगत होते. गोविंद चतुर्थने वंशपरंपरागत नियम डावलून सत्ता हस्तगत केली होती. युवराज व राजांचा वारस प्रतिनिधी म्हणून नियुक्त केला जात होता. त्याला प्रांतिक स्तरावर प्रमुख म्हणून नेमले जात होते. राष्ट्रकूट प्रशासनामध्ये स्त्रीयांना प्राधान्य होते. अमोघवर्षाची मुलगी चंद्र बेलाव्वा हिने ‘रामपूर दोआब’ मध्ये प्रशासक म्हणून काम केले होते. धृवाची पत्नी शिळभटटारीका हिने राज्य प्रशासनासाठी अनुदाने दिल्याचे दाखले आहेत.

राष्ट्रकूट काळातील मंत्र्यांची नावे व कार्य गुप्तकाळाप्रमाणे होते. राष्ट्रकूटांच्या साम्राज्यामध्ये अनेक मांडलिक राजे स्वतंत्रपणे राज्यकारभार करणारे होते. साम्राज्य राष्ट्र व विषयामध्ये विभागले होते. एक विषय किंवाा जिल्हयामध्ये सर्वसाधारण पणे १००० ते ४००० ग्राम किंवा खेडी होती. विषयाच विभाजन भूक्तिमध्ये केले होते. भूक्तिमध्ये ५० ते ६० ग्रामे होती. भूक्तिचे नाव नगर किंवा शहरावरुन ठेवले जात होते.

राष्ट्रप्रमुख राष्ट्रपती म्हणून ओळखला जात होता. त्याच्याकडे सैनिकी व मूलकी अधिकार होते. राष्ट्रपतीचे कार्य विषयपती व भोगपती आपल्या क्षेत्रात करत होते. विषयपती व भोगपती कर वसुलीचे कार्य नगदाकुट अथवा देशग्रामकुट या अधिकाऱ्यामार्फत करत होते.

ग्राम प्रशासन राष्ट्रकूट साम्राज्याचा महत्वाचा हिस्सा होता. ग्रामप्रशासनाचे प्रमुख ग्रामप्रमुख व कोषाध्यक्ष होत. सार्वजनिक परिषदेमार्फत कारभार पाहिला जात होता. उदंग अथवा भोगकर हे उप्तन्नाचे साधन होते. उत्पादनाच्या १/५ पट कर घेतला जात होता. भोगकर अन्नधान्याच्या स्वरुपात तीन टप्यामध्ये वसूल केला जात होता. ब्राह्मणांना किंवा अनुदान स्वरुपामध्ये दिल्या गेलेल्या जमिनीवर अतिशय कमी कर आकारला जात होता. नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये कर माफ करण्याची प्रथा रुढ होती. आयात निर्यात मालावरील जकाती खाणी जंगले यांचे उत्पादन, व्यापारी कर मांडलिकांकडून येणारी खंडणी व युध्दातील लूट ही उत्पन्नाची साधने होती.

**धार्मिक परिस्थिती :-** राष्ट्रकुट राजे हिंदू धर्माचे उपासक होते. राजानी वैदिक परंपरेप्रमाणे यज्ञ केले आहेत. ते हिंदू देवदेवतांचे पुजक होते. तरी देखील त्यांनी जैन धर्माला आश्रय व सरंक्षण देण्याचे काम केले होते. राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्ष हा महाविराचा उपासक होता. दुसरा कृष्ण याच्या कालखंडात जैन मंदिरे बांधली होती. राजानी अरबांना स्थायिक होण्याची व धार्मिक विधी करण्याची मुभा दिली होती.

राष्ट्रकूटांनी शिव व विष्णू यांना प्राधान्य दिले. त्यांच्या शिक्यांवर गरुड, शिव यांच्या प्रतिमा दिसून येतात. सम्राटांनी यज्ञयाग व दानधर्म केले होते. त्यांच्यामध्ये तुळादान हा महत्वाचा विधी दिसून येतो. दंतिदुर्गाने उज्जैन येथे हिरण्यगर्भ यज्ञ केला होता. वेरुळचे कैलास लेणे राष्ट्रकूट कालीन श्रेष्ठ मंदिर मानले जाते.

**राष्ट्रकूट कालीन कला व स्थापत्य :-** राष्ट्रकूट राजांनी भारतीय कला व स्थापत्य मध्ये महत्वपूर्ण कामगिरी केली. वेरुळ व कान्हेरी लेणी राष्ट्रकूट काळामध्ये बांधली गेली. पहिल्या कृष्ण राजाने अखंड खडकामधून लेणे उभे केले आहे. मुख्य मंदिर गर्भगृहावर द्रविड पध्दतीचे शिखर नवरंग मंडप,प्रवेशमंडप, अग्रमंडप, नंदीमंडप व गोपूर पुलानी जोडणे उंच ध्वजस्तंभ, रामायण महाभारतातील कथा उत्तम शिलापट, दशावतार लेण्यामधील पौराणिक कथा नाव्यपूर्ण पध्दतीने कोरलेल्या आहेत.

अमोघवर्षाने कन्नड भाषेमध्ये ग्रंथरचना केली होती. त्याने 'कवि राजमार्ग' हा ग्रंथ लिहिला. अमोघवर्षाच्या दरबारामध्ये 'कु मुदण्डू' हा गणिततज्ञ तर शाकतमाण हा व्याकरण पंडीत होता. जिनासेनाचार्य यानी हरिवंश, आदित्यपुराण, जयधवळ यांची रचना केली महावीराचार्यांनी 'गणित सारसंग्रह' हा ग्रंथ लिहीला होता.

**राष्ट्रकूटांची योग्यता :-** राष्ट्रकूटांची सत्ता दक्षिण भारतातील गौरवशाली कालखंड मानला जातो. त्यानी दक्षिण भारतात वैभवशाली साम्राज्य निर्माण केले होतेच पण उत्तरेकडील राज्यकर्त्यांचा पराभव करुन राज्याचा विस्तार केला. तेथील प्रतिहार व पाल, गुर्जर, पूर्वेचे चालुक्य व दक्षिणेतील चोळांचा पराभव केला होता. प्रशासन पध्दती व कला स्थापत्य मध्ये भरीव स्वरुपाची कामगिरी केली होती. धार्मिक उदारता हा चांगला गुण होता.

**आपली प्रगती तपासा**

१) राष्ट्रकूट घराण्याच्या राज्यकर्त्याच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करा.
२) राष्ट्रकूट प्रशासनाचा आढावा घ्या.
३) राष्ट्रकूट काळातील कला स्थापत्य बाबत माहिती लिहा.

## ११.४ पल्लव घराणे

दक्षिण भारतातील संगम कालखंडानंतर तामिळ देशात पल्लव घराण्याची स्थापना झाली होती. डॉ.कृष्णास्वामी अयंगार यांच्या मते चोळ राजपुत्र व मलिपल्लव बेटावरील नागराज कन्या यांच्या संबंधातून पल्लव घराणे निर्माण झाले होते. 'ताडाइअर' या तामिळ शब्दाचे भाषांतर पल्लव असे होते. डॉ. साथिनाथ अय्यर यांच्यामते ताडादूयर हे संस्कृत पल्लव शब्दाचे भाषांतर आहे. तळगुंड शिलालेखात पल्लवांचा क्षत्रिय राजे म्हणून उल्लेख येतो. सातवाहनांनी तोडमंडलम जिंकल्यानंतर ते सातवाहनांच्या अंकित झाले. पण सातवाहनांच्या अस्तानंतर दक्षिणेत कांची येथे आपले स्वतंत्र राज्य निर्माण केले.

पल्लवांचे गोत्र भारद्वाज होते. ते स्वतःला अश्वत्थामा यांचे वंशज मानत होते. पल्लव सातवाहनांना आपले अधिपती मानत होते. पल्लवाबाबत माहिती देणारे शिलालेख गुंप्टूर जिल्हयातील पलजाद या ठिकाणी असून तो प्राकृत भाषते आहे. रुद्रदामनच्या असल्याचा उल्लेख आहे. पल्लवांच्या प्रदेशाला दंडक म्हणत होते. त्याचा अर्थ दास असा होतो.

पल्लव वंशाची स्थापना शिवस्कंदवर्मा याने केली त्याने कृष्णेपासून पेन्नार नदीपर्यतचा प्रदेश आपला अधिपत्याखाली आणला होता. त्याने अश्वमेध यज्ञ केला होता. विष्णूगोपने पल्लवांची सत्ता विस्तारीत केली पण पुढे राज्यात अराजक निर्माण झाले.

सिंहविष्णू हा पल्लव राज्यकर्त्या मधील महत्वाचा राजा मानला जातो. त्याने अराजकाचा नाश करुन पल्लवांची सत्ता पुन्हा प्रस्तावित केली. त्याने चोलांचा पराभव करुन तोडमंडलम जिंकले. कळभ्र,पांडय,चेर व सिलोनच्या राजाचा पराभव केला. कावेरी पासून कृष्णा नदी पर्यतचा प्रदेश नियंत्रणाखाली आला होता. सिंहविष्णू राजाने स्वतःला अवनिसिंह ही पदवी धारण केली होती.

सिंहविष्णूचा पुत्र महेंद्रवर्मन पहिला कर्तबगार होता. त्याने दक्षिणेत तिरुचिरापल्ली पर्यत आपली सत्ता वाढविली होती. तो स्वतः कवी असून गायन व शिल्पकलेचा भोक्त होता. त्याने चैन्यकारी, चित्रकारपुली मत्तविलास विचित्रचित्त यापदव्या धारण केल्या होत्या तो प्रथम जैन धर्मिय होता. अप्पर शैव संतांच्या शिकवणूकीने राजा शैवपंथी बनला होता. अनेक देवळे बांधली महेंद्रवाडी हे गाव वसवून महेंद्र तलाव बांधला होता. तलावाच्या काठावर विष्णूमंदिर खोदवून हे विटाविरहीत लाकूड विरहित, धातू विरहीत व चुना विरहीत आहे. असा आलेख कोरला होता.

महेंद्रवर्मन नंतर त्याचा मुलगा नरसिंहवर्मन (इ.सन ६३०-६६८) राजा झाला. त्याने प्रसिध्द चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याचा पराभव करुन 'बदामी' ही राजधानी जिंकली त्याचे प्रतिक म्हणून स्वतःला 'वातापीकोड' ही पदवी घेतली. श्रीलंकेवर दोनवेळा स्वारी करुन राज्य प्रभावाखाली आणले.

नरसिंह वर्मननंतर त्याचा नातू परमेश्वरवर्मन (इ.सन ६७०) राजा झाला त्याच्या कारकीर्दीत पहिला विक्रमादित्य कांचीवर चालून आला होता. कांची जिंकल्यावर त्याने त्रिचनापल्लीवर आक्रमण केले तेव्हा परमेश्वर वर्मनाने त्याचा पराभव केला. यानंतर पल्लव वंशात अनेक राजे झाले होते. पल्लव राज्य नवव्या शतकापर्यत अस्तित्वात होते. शेवटचा राजा अपराजित होता. चोल राजा आदित्य याने त्यांचा पराभव करुन पल्लवांचे राज्य नष्ट केले होते.

**पल्लव प्रशासन :-** पल्लव प्रशासन व्यवस्था त्या काळातील अन्य प्रशासनपध्दतीपेक्षा अधिक प्रगतीशील होती. राजाला 'भट्टरका' हा किताब होता. त्यांच्या युवराजाला प्रशासनामध्ये औपचारिक स्थान व अधिकारपद होते. त्याला महायुवराज असा किताब होता. त्यांच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये विविध प्रकारचे अधिकारी असले तरी नेमकी नावे व अधिकार या विषयी संदर्भसाधने उपलब्ध नसल्यामुळे निश्चित विधान करता येत नाही. सरकारकडे मीठ व साखर या सारख्या उत्पादनांची मक्तेदारी होती. ब्राह्मणांना दिल्या जाणाऱ्या दानावर कोणत्याही प्रकारचे कर आकारले जात नव्हते.

**पल्लव कालीन साहित्य व शिल्प कला :-** पल्ला राजापैकी राजा पहिला महेंद्रवर्मन स्वतः कवी असून त्याने गायन व शिल्पकलेला उत्तेजन दिले होते. त्याने 'मत्तविकास' हे संस्कृत प्रहसन लिहिले होते. पल्लव राजे शंकराचे उपासक होते. त्यांनी आपल्या काळामध्ये शिल्पकलेमध्ये आदर्श ठरणाऱ्या वस्तुंची निर्मिती केली होती.

सप्तरथ मंदिरे ही पल्लव कालीन शिल्पाचा उत्तम नमुना आहे. त्यांनी मंदिर स्थापत्याला प्राधान्य दिले होते. त्याना 'रथ' म्हंटले जाते. त्यापैकी पाच मंदिरे पांडव मंदिरे म्हणून ओळखली जातात. ही द्रविड पध्दतीची मंदिरे असून त्याना धर्मराजरथ, भीमरथ, अर्जुनरथे, द्रौपदीरथ व सहदेवरथ अशी नावे आहेत. त्यामध्ये विविध देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

गंगावारण शिल्प एका अखंड पाषाणमध्ये कोरले आहे. त्याची लांबी २७ व उंची ९ मीटर आहे. गंगास्वर्गातून अवतरली असून तीचे पाणी एका छिद्रातून बाहेर पडत असल्याचे शिल्प आहे. भगिरथाने शंकराची तपश्चर्या करुन प्रसन्न केले. वर म्हणून गंगेला भूतळावर आणले अशी कल्पना आहे. शिल्पामध्ये शंभरपेक्षा जास्त आकृत्या आहेत. हत्ती, बैल, गाय, सासरु, मांजर या प्राण्यांबरोबर भागीरथ एका पायावर उभा राहून तपश्चर्या करत असल्याचे शिल्प आहे.

पल्लव काळात महाबलीपूरम येथे सागर किनाऱ्यावर विष्णू व शंकराचे जोड मंदिर आहे. त्याला हरिहरेश्वर म्हणतात माकडाचे शिल्प त्याचा स्वभावधर्म स्पष्ट करणारे आहे. शिवाय डोळे नाक इत्यादी अवयव प्रत्यक्ष न दाखवता उठावदार पध्दतीने शिल्प रेखाटले आहे. यावरुन पल्लव कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकला दिसून येते.

**पल्लव राज्यकर्त्यांचे योगदान :-** दक्षिण भारतात पल्लवांची सत्ता इ.सन ३०० ते ८९८ पर्यत सहाशे वर्षे होती. याकाळात दक्षिण भारतामध्ये आर्य संस्कृतीचा प्रसार झाला होता. आर्याच्या वर्णाश्रम व्यवसाि पल्लवांनी स्वीकारल्या होत्या. ब्राह्मणांना अग्रहार देऊन राज्यात वस्ती करण्यास उत्तेजन दिले होते.

पल्लवांनी संस्कृत भाषेला उत्तेजन दिले ती त्यांची राजभाषा होती. सर्व पल्लव आलेख संस्कृतमध्ये कोरले आहेत. भारावी दण्डी हे विद्वान राज्यामध्ये होते. पललव राजधानी कांची विद्येचे माहेरघर होते. तेथील विद्यापीठामधून वात्स्यायन, दिंडनाग, मयुरवर्मा, धर्मपाल आदी विद्वानांनी अध्यापनाचे काम केले होते.

भारतीय संस्कृतीचा अग्नेय आशियामध्ये प्रसार करण्याचे काम पल्लवांनी केले होते. पल्लवांची सागरी सत्ता अतिशय प्रभावी होती. जावा मधील शैलेंद्र व चीनी राजे यांच्या बरोबर संबंध प्रस्थापित केले. चंपा व कंबोडीया संस्कृतीवर पल्लवांचा प्रभाव दिसून येतो.

धार्मिक क्षेत्रातही पल्लवांचे कार्य उल्लेखनीय आहे. शैव व वैष्णव अशा दोनही पंथांना राजाश्रय मिळाला होता. दोनही पंथामध्ये समन्वय साधण्याचा प्रयन्त केला होता. पल्लव काळातील मंदिर शिल्पे धार्मिक विचारांचा प्रभाव जाणवून देतात.

**आपली प्रगती तपासा**

१) पल्लवांच्या कामगिरीचा आढावा घ्या.
२) पललव कालीन कला व स्थापत्याची चर्चा करा.

## ११.५ चोल घराणे

संगम काळानंतर आठव्या शतकामध्ये बदामीचे चालुक्य व कांचीचे पललव या दक्षिण भारतातील दोन राजकीय घराण्यात झालेल्या स्पर्धेचा फायदा घेऊन चोल घराण्याची सत्ता स्थापन झाली होती. पहिला राजा विजयालय (इ. ८५० ते ८७०) याने तंजावर येथे आपली राजधानी स्थापन केली. पहिल्या आदित्याने तंजावर येथे आपली राजधानी स्थापन केली. पहिल्या आदित्याने (इ.सन ८७१ -९०७) चोलांचा प्रादेशिक विस्तार केला. त्याने पल्लवांविरुध्द बंड करुन पल्लव राजा अपराजिताचा वध करुन तोडमंडलमचे अधिपत्य मिळवले. तळकाडच्या गंगाचा पराभव करुन पांडय राजाकडून सालेम व कोइमतूर पर्यतचा प्रदेश मिळवला आणि चोलांची सत्तास्पर्धा सुरु झाली होती.

पहिल्या परांतकाने (इ.सन ९०७-९५३) मदुराईवर हल्ला करुन शहर लुटले होते. त्याने पांडय व सिंहल यांच्या संयुक्त सेनेचा धुव्वा उडवून पांडय राज्य अधिसत्तेखाली आणले. उत्तरेकडे पल्लवांच्या राज्यावर आक्रमण करुन नेलोर पर्यत विस्तार केला. राष्ट्रकूट राजा तिसरा कृष्ण याने कांचीवर स्वारी करुन पल्लव व चोल राजांचा पराभव केला होता.

पहिला राजराज (इ.सन ९८५ ते १०१४) याने केरळच्या रविवर्म्यांची नाविक सत्ता नष्ट केली. पांडय राजांचा पराभव केला. सिलोनच्या राजाचा पराभव करुन उत्तर सिलोनचा प्रदेश चोल साम्राज्यात समाविष्ट केला. कल्याणीच्या चालुक्य राजावर स्वारी करुन राज्याची सरहदद् तुंगभद्रा नदी पर्यत वाढविली होती.

वजराज राजाचा मुलगा पहिला राजेंद्र (इ.सन १०१४-१०४४) कर्तुत्ववान होता. त्याने सिलोन (श्रीलंका) वर स्वारी करुन संपूर्ण बेट चोल साम्राज्यात समाविष्ट केले. केरळ व पांडय राज्ये बरखास्त करुन आपल्या मुलांची नियुक्ती केली. उत्तरेकडे राजमहेंद्री पर्यतचा प्रदेश जिंकला. त्याच्या सेनापतीनी चोल सैन्याची मदत घेऊन ओरिसामार्गे कोमल दंडमुक्ती बंगाल जिंकून पहिल्या महवालाचा पराभव केला. चोलांच्या आरमाराने अंदमान निकोबार जिंकून कज्ञरम (मलाया) व श्री विजय (सुमात्रा) येथे यशस्वी मोहिमा केल्या होत्या.

राजाधिराज याच्या कालखंडात राज्यविरुध्द पांडय सिंहल व केरळ राजानी केलेले उठाव क्रुरपणे मोडून काढले होते. दुसरा राजेंद्र (इ.सन १०५२-१०६४) वीर राजेंद्र (१०६४-७०) यानी साम्राज्य अथंग राखण्याचा यशस्वी प्रयत्न केला. राजेंद्रानंतर त्याी सत्ता राजेंद्र चालुक्य उर्फ कुलोत्तुंग चोल याने बळकावली (इ.सन १०७०-१११८) त्याच्या कारकिर्दीमध्ये सिलोन स्वतंत्र झाला. त्याने पांडय व चेर राजांचा पराभव करुन लष्करी ठाणी स्थापन केली. उत्तर कलिंगवर स्वारी करुन कनोज व वाराणसी येथील गढवाल राजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले होते. तिसऱ्या कुलोत्तुंगाने (इ.सन ११७८-१२१६) आपले राज्य संभाळले पण पांडयांची वाढती सत्ता व मांडलिकांचे उठाव यामुळे चोलांची सत्ता कोलमडून पडली होती. १३१० मध्ये मलिककफूरने चोल राज्याचा नाश केला होता.

**चोलकालीन प्रशासन व्यवस्था :-** चोल राज्यकर्ते प्रशासनासाठी प्रसिध्द होते. साम्राज्य प्रांतामध्ये विभागलेले होते. चोलांचा प्रशासन प्रणालीमध्ये राजाला अनन्यसाधारण महत्व होते. सर्व सत्ता त्यांच्याकडे एकटवली होती. चोलांनी स्वतःला अनेक बिरुदे धारण केली होती. चोल राजे आपला वारसा म्हणून लायक युवराजाची निवड करत होते. त्याला राज्यकारभाराचे व प्रशासनाचे प्रशिक्षणे देणे हा हेतू होता. योग्यवेळी त्याच्याकडे राज्याची सुत्रे सोपवली जात होती. त्यामुळेच सत्तेसाठी संघर्ष झाला नाही. राजाचे स्थान वंशपरंपरागत होते तरी देखील मोठा मुलगाच राजा होईल असे नव्हते. कार्यक्षमता गुण महत्वाचा होता

चोल राज्यकर्त्यांना मदत करण्यासाठी व प्रत्यक्ष राज्यकारभार पाहण्यासाठी मंत्री नियुक्त केले होते. प्राचीन राजघराण्यांचा विचार करता चोलांनी प्रबळ आरमाराची निर्मिती कली. आरमाराच्या मदतीने अरबी समुद्र व हिंदी महासागरामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्याच्या सहाय्याने श्रीलंका व अग्नेय आशियातील श्रीविजय (मलाया) साम्राज्यावर आक्रमण करुन मांडलिक बनवले होते. आरमारा बरोबरच राजांचा सैन्य विभाग प्रभावी होता. घोडदळे, पायदळ, युध्द हत्ती हे सैन्याचे विभाग होते. घोडदलासाठी अरबस्तानातून घोडे मागवण्याची पध्दत होती चोलांनी आपल्या संरक्षणासाठी 'वेलेक्कर' नियुक्त केले होते. राजसंरक्षक दल म्हणून काम करत होते. राजाचे संरक्षण ही त्यांची जबाबदारी होती.

**प्रशासन विभाजन :-** चोल राजांनी प्रशासनाचे विभाजन करण्यासाठी राज्याचे प्रातांत विभाजन केले. त्याला 'मंण्डलयम' म्हंटले जात होते. मंण्डलयमचे विभाजन कोटटम मध्ये तर कोटटमचे विभाजन नाडू किंवा कुर्रम मध्ये होते. उच्च अधिकारी 'पेरुन्दरम' म्हणून ओळखला जाई. त्याला मंडळाध्यक्ष किंवा व्हॉइसरॉय मदत करत होता.

चोलांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वाधिक महत्व दिले होते. त्यांना कारभारसाठी स्वायतत्ता दिली जात होती. ग्रामस्तरावर 'उर' व 'महासभा' या व्यवस्था होत्या. 'उर' ही

सर्वसाधारण तर 'महासभा' ब्रह्मदेय (ब्राह्मणाला दान केलेली गावे) मध्ये अस्तित्वात होत्या. गावाचा कारभार तीस मान्यवर व्यक्तींकडे सोपवला होता. 'वुदाबोलई' प्रणालीनुसार गावातील शिक्षित तसेच मालमत्ता धारण करणाऱ्या व्यक्तीची सदस्य म्हणून निवड केली जात होती. समिती सदस्यास 'वरियप्पेरुमक्कल' म्हणत होते महासभा 'पेरुगुरी' म्हणून ओळखत होते. समिती सदस्यांची विविध समित्यांच्या अध्यक्ष व सदस्यापदी नियुक्ती केली जात होती. गावातील शेतसारा गोळा करणे कायदा व सुव्यवस्था राखणे, गावातील तलावांचे नियोजन करुन पाणीपुरवठा योजना राबवणे आदी कामे केली जात होती.

**चोलकालीन समाज :-** चोलकाळात समाजात चातुवर्ण्य व्यवस्था होती. समाजात कैकोला चेटटी, कम्मल रथकार याप्रमुख उपजाती होत्या तसेच राजाला मदत करण्यासाठी वळंगी व इंडगी जाती समाज कार्यरत होता. राजाच्या डाव्या बाजूला इंडगी तर उजव्या बाजूला वळंगी जातीच्या लोकांचे स्थान व विशेष अधिकार होते.

स्त्रियांना समाजात आदराचे स्थान होते. सती व पडदा पध्दत अस्तित्वात नव्हती. सामाजिक व धार्मिक उत्सवांमध्ये, राज्यकारभारामध्ये स्त्रियांना महत्वाचे स्थान होते. त्याना संपत्ती बाळगण्याचा, दान देण्याचा अधिकार होता. समाजाने एकपत्नीला प्रथेचा स्वीकार केला पण राज्यकर्त्यांना व प्रतिष्ठितांना बहूपत्नीत्वाचा अधिकार होता. देवदासी प्रथेची सुरुवात झाली होती. मंदिरामध्ये देवासमोर नृत्य करण्याचा अधिकार देवदासीचा होता.

**चोल कालीन साहित्य व स्थापत्य कला :-** चोल काळात तामिळ साहित्याची भरभराट झाली. वैष्णव व शैव संतांनी भक्तीमार्गाच्या पुनरुज्जीवनासाठी धार्मिक साहित्य निर्मितीवर भर दिला. दक्षिणेत शेक्कीकर याने लिहिलेल्या धार्मिक ग्रंथांना पाचवा वेद म्हणतात. शेक्कीकरने 'शिक्कशीब्दमनी' ग्रंथ लिहीला. कम्बन याने तामिळ, रामायणाची रचना केली. जेमजगोडर याने 'कलिंगतुपरानी' ग्रंथामध्ये कुलोत्सुंग या शासकाने दुसऱ्यांदा कलिंगवर आक्रमण केले तेव्हा कलेल्या अत्याचाराची माहिती लिहिली आहे. कवी ओत्तकुटटम हा विक्रमचोळ कुलोत्तुंग व राजराजा दुसरा यांच्या दरबारामधील कवी होता. त्याने राजांचे चरित्रग्रंथ लिहिले होते. नंदी याने 'तिरुविलाई यादल' अनुदनारने 'रामानुजनुरंगादी' जयगोंदरने 'कलिंगटटपूर्णी' हे ग्रंथ लिहून साहित्यात मोलाची भर टाकली होती.

चोलांनी स्थापत्य कलेमध्ये द्रविड शैलीचा विकास घडवून आणला. मोठया प्रमाणात वास्तू उभारल्या तलावे कालवे अतिभव्य मंदिरे गोपुरांची रचना ही चोळ स्थापत्याची वैशिष्टये होती. चोल राजा राजराज याने तंजावर येथे 'वृहददीश्वर मंदिर' बांधले होते. चारही बाजूला प्राकार प्रवेश द्वारावर गोपूर आतमध्ये स्वतंत्र नंदीमंडप बहुस्तंभी प्रवेश मार्ग, विशाल सभामंडप, चबुत्यावर गर्भगृह, गभगृहावर चौदा मजल्यानी चढत जाणारे मनोऱ्यासारखे विमान शिखर व घुमुटकार कळस, विमानार सर्व बाजूंनी कोरीव शिल्पकृती अशी अतिभव्य रचना आहे. पहिला राजेंद्र चोळ याने 'गंगाइकोंडचोळपुरम' येथे बांधलेले शिवमंदिर अतिशय भव्य आहे. दरसुईम येथील 'ऐरावतेश्वर' व त्रिभूवन येथील 'कंपमहेश्वर मंदिर' अशी अनेक मंदिरे चोलकालीन स्थापत्य केलेची वैशिष्टये सांगणारी आहेत. चोलकाळात प्रमाणबध्द, निम्नोत्तीर्ण मूर्ती खोदणे लहान आकाराच्या चित्रपटया, स्त्री-पुरुषांच्या मूर्ती अधिक वास्तववादी आहेत.

**चोलांचे योगदान :-** चोलांनी राज्यव्यवस्थेची कार्यक्षम यंत्रणा निर्माण करुन दक्षिणेत एक नवा आदर्श निर्माण केला. जमिनीची मोजणी व प्रतवारी ठरवून महसूलाची आकारणी सुरु केली. स्थानिक संस्थांना भरपूर स्वायतत्ता देऊन त्यांच्या उपक्रमशीलतेला संधी दिली. त्यांच्यावर देखरेख ठेवण्याची चोख व्यवस्था केली त्यामुळे राजकीय घडामोडींचा तेथील ग्रामीण जीवनावर परिणाम झाला नव्हता.

चोल काळात शैव व वैष्णव मतांचे प्रस्थ वाढले होते. हिंदू मंदिरे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची केंद्रे बनली. चोल राजानी पाठशाला व घटिका यांची स्थापना करुन शिक्षणाची केंद्रे जिवंत ठेवली होती. चोलांनी विद्यावंतांना उदार आश्रय देऊन त्यांची अभिवृत्ती घडवून आणली होती. उत्तुंग शिखर (विमान) हे चोलकालीन मंदिराचे वैशिष्टय आहे. नटराज व इतर हिंदू देवता व तामिळसंत यांच्या मूर्ती चोल काळात निर्माण झाल्या होत्या.

## ११.६ सारांश

इसवीसन पूर्व पाचव्या शतकानंतर दक्षिण भारतात काही राजकीय सत्ता उदयाला आल्या होत्या. इ.सन ३०० ते ७५० या काळात महाराष्ट्राच्या भागात चालुक्य घराण्याचे राज्य स्थापन झाले. त्याची स्थापन जयसिंह वल्लभाने केली. पहिल्या पुलकेशी ने राज्यविस्तार केला. कर्नाटकातील बदामी त्याची राजधानी होती. कल्याणी येथे दुसरे चालुक्य घराणे राज्य करत होते. तैलपाने कल्याणी मधील घराण्याची स्थापना केली. गुजरात मध्ये वेगी येथे चालुक्य घराण्याचे तिसरे राज्य विष्णूवर्धन याने स्थापन केले.

चालुक्यानंतर राष्ट्रकूट घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. राष्ट्रकूट वेगाचा संस्थापक दंन्तिदुर्ग होता इ.सन ९७३ पर्यंत राष्ट्रकूटानी राज्य केले. राष्ट्रकूटानी स्वतंत्र व कार्यक्षम प्रशासन व्यवस्था स्थापन केली होती. गुप्तकालीन व्यवस्थेचा त्यांच्यावर प्रभाव होता. राष्ट्रकूट राजे हिंदू धर्माचे उपासक होते. त्यांनी राज्यांत कला व स्थापत्याला विशेष चालना दिली होती. त्याचा कालखंड गौरवशाली मानला जातो.

दक्षिण भारतात तामिळी भाषिक प्रदेशात पल्लव घराण्याची सत्ता स्थापन झाली. शिवस्कंदवर्मा हा त्याचा संस्थापक होता. राज्याला अराजका मधून बाहेर काढण्याचे काम सिंहविष्णू याने केले. पल्लवानी उत्तर भारतामधील राज्यकत्यार्चे अनुकरण केले. पल्लव उत्तर भारतामधील राज्यकर्त्याचे अनुकरण केले. पल्लव प्रशासन अधिक प्रगतीशील होते. पल्लवानी साहित्य व शिल्पकलेला चालना दिली होती. सप्तरथ मंदिरे पल्लव स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहेत.

संशय काळानंतर आठव्या शतकामध्ये बदामीचे चालुक्य व कांचीचे पल्लव यांच्यामधील संघर्षाचा फायदा घेऊन राजा विजयालय याने चोल वंशाची स्थापना केली होती. चोलानी प्राचीन भारतामधील पहिल्या आरमाराची निर्मिती केली. चोळानी श्रीलंका (सिलोन) अंदमान निकोबार मळाला, सुमात्रा येथे आरमाराच्या साहाय्यादे साम्राज्य विस्तार केला होता. चोल राज्यकर्ते कार्यक्षम प्रशासनासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाना महत्त्व दिले होते. चोळकाळात समाजात चातुवर्ण्य व्यवस्था होती. चोळ काळात तामिळ साहित्याची भरभराट झाली. अनेक साहित्यीक व विद्वानानी ग्रंथ निर्मिती केली. चोलांच्या काळामध्ये द्रविड शैलीचा विकास झाला. अतिभव्य मंदिरे गोपुरांची रचना वास्तववादी शिल्पकला मूर्तीकला यांना प्रोत्साहन मिळाले.

## ११.७ दिर्घोत्तरी प्रश्न

१. चालुक्य घराण्यातील राजांच्या कारकिर्दिचा आढावा घ्या.
२. राष्ट्रकुटांची प्रशासन व्यवस्था सांगा.
३. पल्लव घराण्यातील राजांची कारकिर्दि विषद करा.
४. चोल राजांची प्रशासन व्यवस्था कशा प्रकारची होती स्पष्ट करा.
५. चोल राज्यकर्त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.
६. चोलकालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची चर्चा करा.

## ११.८ संदर्भ ग्रथ


१. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास - प्रा. रं. ना. गायधनी के. के. राहूरकर
२. प्राचीन भारताचा इतिहास सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक - प्रा. गजानन भिडे, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. प्राचीन भारताचा समग्र इतिहास - डॉ. जे. एल. मेहता. डॉ. सरीता मेहेता
४. प्राचीन भारताचा इतिहास - प्रा. प्रशांत देशमुख, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
५. प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती- डॉ. देगळुरकर, ढवळीकर
६. प्राचीन भारत का इतिहास और संस्कृती -डॉ. व्ही. डी. महाजन
७. प्राचीन भारत का इतिहास और संस्कृती -डॉ. महावीर त्यागी
८. प्राचीन भारत का इतिहास व संस्कृती -डॉ. अ. रा. कुलकर्णी
९. प्राचीन भारत -डॉ. प्रभाकर देव
१०. प्राचीन भारत -डॉ. अ. वि. विश्वरुपे
११. वाकाटक नृपती व काळ -डॉ. वि. वा. मिराशी
१२. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास - प्रा. डॉ. जयसिंगराव पवार
१३. प्राचीन भारताचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास-प्राचार्य डॉ.जी.बी.शहा, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.


❖❖❖❖

# १२

# भारतीय संस्कृतिचा अग्नेय आशियातील प्रसार

**प्रकरणाची रचना:**

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ भारतीय संस्कृतीचा अग्नेय आशियातील प्रसार
१२.३ चंपा अनाम
१२.४ कंबोडीया
१२.५ बाली
१२.६ सुमात्रा जावा मलाया (सुवर्णद्विप)
१२.७ सयाम
१२.८ सारांश
१२.९ दिर्घोत्तरी प्रश्न

## १२.० उद्दिष्ट्ये

- अग्नेय आशियामधील देशांच्या इतिहासाची माहिती घेणे
- अग्नेय आशियातील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाबाबत माहिती घेणे
- अग्नेय आशियातील देशामध्ये भारतीयांनी केलेल्या राज्य स्थापनेची माहिती घेणे.

## १२.१ प्रस्तावना

भारतीय संस्कृतीचा इतिहास अतिशय प्राचीन आहे. इ.स.पू. १०,००० वर्षे ऋग्वेदाचा काळ मानला जातो.तेव्हापासून भरतात एक समृध्द सुसंस्कृत व सुसंघटीत समाज आहे. भारतीय संस्कृतीचा प्रसार अग्नेय आशियायी देशांमध्ये झाला होता. अग्नेय आशियायी देशातील उपलब्ध असणारे प्राचीन ग्रंथ, मंदिरे,शिल्पे, नाणी, गुंफाचित्रे, शिलालेख,ताम्रपट व उत्खननात सापडलेल्या पुराव्यावरुन इ.पूर्व ८००० ते इ.सन १५०० पर्यत तेथे भारतीय संस्कृतीचा प्रभाव होता असे सिध्द होते.

इ.सनाचे दुसरे शतक त पाचवे शतक यांच्या दरम्यान अग्नेय आशियातील मलाया, कंबोडीया, ब्रह्मदेश, जावा,सुमात्र,बाली, सयाम यादेशामध्ये पणी या श्रेष्ठ सागरी व्यापाऱ्यांनी व्यापाऱ्याच्या निमित्ताने संपर्क केला होता. त्यांनी व धर्मप्रसारकांनी व्यापारी सांस्कृतिक संबंध निर्माण केले. या संपर्कामधूनच शैव, वैष्णव पंथाचा व बौध्द धर्माचा प्रसार झाला होता. त्यानंतर

संस्कृत भाषा, ब्राह्मीलिपी, शिल्पकला, संगीत, चित्रकला व हजारो विषयाचे ज्ञान पोहचले होते. भारतीयांनी अग्नेय आशियायी देशामध्ये स्थापन केलेली राज्ये इ.सनाच्या पाचव्या शतकापर्यंत नष्ट झाली होती. नंतरच्या काळामध्ये पुन्हा एकदा सुवर्णद्विप (मलाया जावा, सुमात्रा, चंपा (इंडोचिन), कंबूज (कंबोडीया) सयाम व बर्मा (ब्रह्मदेश) इत्यादी देशामध्ये भारतीय राज्यी पुनर्स्थापना झाली होती. आठव्या व दहाव्या शतकानंतर मुस्लिम धर्माचा प्रभाव अग्नेय आशियायी देशांमध्ये निर्माण झाला होता परंतु भारतीय संस्कृतीचे अस्तित्व कायम राहिले होते.

## १२.२ भारतीय संस्कृतीचा अग्नेय आशियातील प्रसार

**बर्मा ब्रम्हदेश :-** बंगाल मधून खुष्कीच्यामार्गाने व दक्षिण भारतामधून समुद्र मार्गाने भारतीय संस्कृतीचा प्रवेश बर्मा किंवा ब्रह्मदेशात झाला. इ.सनाच्या पाचव्या शतकातील एका आलेखामध्ये इ.पू तिसऱ्या शतकापासून दक्षिण ब्रह्मदेशात गोळ (गौड) लोकांचे अस्तित्व असल्याची नोंद केलेली दिसूनयेते. ब्रह्मदेशातील रंगून व पेगू यामधील प्रदेशाला उत्कलदेश असे नाव होते. तेथे रामावती अमिताजनगर, कुसिमनगर,रामपूर, मुत्तिममंडल इ. नावाची हिंदू संस्कृती जपणारी नगरे होती. उत्तर ब्रह्मदेशात ण्यू लोकांचे राज्य होते. तेथील राजांची नावे हरिविक्रम, सिंहविक्रम,सूर्यविक्रम, श्रीप्रभूवर्म, जयचंद्रवर्म अशी शुध्द संस्कृत होती. तेथील राज्यकर्ते स्वतःला 'महाराज' ही पदवी लावत होते.

आराकान येथे काशीच्या राजपुत्राने पहिले भारतीय राज्य स्थापन केले. आराकन राज्याच्या तरुपन व वैशाली या दोन राजधान्या होत्या. इ.सनाच्या आठव्या शतकामध्ये महासेनचंद्र याने वैशाली येथे नवीन राजघराणे स्थापन केले होते. याघराण्यामधील वीरचंद्र,नीविचंद्र, प्रितीचंद्र इ. राजांची नाणी उपलब्ध झाली आहेत. त्यावरुन त्यांचे अस्तित्व सिध्द करता येते. आनंदचंद्र राजाच्या संस्कृत आलेखामध्ये श्रीधर्मराजानुवंशाची वंशावळ दिली आहे. आनंदचंद्र बौध्द धर्मीय असून त्याने अनेक विहार व चैत्य स्थापन केले होते.

इ.सन १०४४ मध्ये मध्य ब्रह्मदेशामधील अरिमर्दनपूर येथे राजा अनिरुध्दाने राज्याची स्थापना केली होती. तो मम्म जातीचा होता. त्याची राजधानी पायन नगर होती. त्याच्या राज्याचा उत्तरेला अरि नावाचा वामाचारी बौध्द पंथ अस्तित्वात होता. अनिरुध्दाने अरि पंथाचा नायनाट करुन बौध्द धर्माचे शुध्दीकरण केले होते. अनिरुध्दाने ब्रह्मदेशात राजकीय ऐक्य निर्माण केले. बौध्द धर्मीय असल्याने पॅगोडांची निर्मिती केली होती. अनिरुध्दच वारसदार कॉन्जिता होता. त्याने स्वतःला 'श्री त्रिभुवनादित्य' ही पदवी धारण केली होती.अकराव्या शतकामध्ये चोल राजा पहिला राजेंद्र याने बर्मावर आक्रमण करुन आपल्या साम्राज्यात समाविष्ट केला होता.

**आपली प्रगती तपासा :-**

१) ब्रह्मदेशातील राज्यकर्ते स्वतःला कोणती पदवी घेत होते ?
२) आनंदचंद्र राजा कोणत्या धर्माचा होता ?
३) ब्रह्मदेशामध्ये असलेल्या बौद्ध पंथाचे नाव काय ?

**आपली प्रगती तपासा- उत्तरे**

१) ब्रह्मदेशातील राज्यकर्ते स्वतःला महाराज ही पदवी घेत होते ?
२) आनंदचंद्र राजा बोद्ध धर्माचा होता.
३) ब्रह्मदेशामध्ये अरि नावाचा वामाचारी बौद्ध पंथ होता.

## १२.३ चंपा अनाम

भारताच्या अतिपूर्वेला चंपा कंबोज जावा हे देश आहेत. अनामचा दक्षिण भागाला चंपा असे नाव होते. तेथील स्थानिक लोकांना चाम म्हणत. चंपा मधील हिंदू वंशाची स्थापना इ.सन १५०-२०० च्या दरम्यान झाली होती. त्याचा संस्थापक श्रीमार होता. त्याची राजधानी अमरावती (उत्तर चंपा) होती. राज श्रीमार याने चीन मधील टोकिन प्रांतावर आक्रमण करुन प्रदेश बळकावला होता. श्रीमारचा उत्तराधिकारी भदवर्मा होता. त्याने 'मैसन' येथे नवीन राजधानी स्थापना केली होती.

चंपामध्ये पांडूरंग वंश इ. ७५७ ते ८६० व भृगूवंश इ.सन ८६० ते ९८५ या काळात सत्तेवर होता. भृगू वंशाचा भदवर्मा हा प्रसिध्द राजा होता त्याने धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती. त्याची सत्ता अमरावती विजय पांडुरंग या प्रांतावर होती. तो शैव पंथीय असून त्याने मैसन येथे भद्रेश्वर स्वामीचे (शिवाचे) मंदिर बांधले होते. चाम लोकांचे ते राष्ट्रीय मंदिर होते. भद्रवर्मा चतुर्वेदी व बहुश्रृत होता. त्यानंतर राजा रुद्रवर्मन सत्तेवर आला त्याचा मुलगा इंद्रवर्मा तिसरा भारतीय साहित्याचा अभ्यासक होता. त्याने भद्रेश्वर मंदिराचा जीर्णोध्दार करुन त्याला इंद्रभद्रेश्वर असे नाव दिले होते. त्यानंतर राजा हरिवर्मन सत्तवेर आला त्याने स्वतःला ''राजाधिराज श्री चंपापूर परमेश्वर वीर जयश्री'' ही पदवी घेतली होती. त्याने हिंदू बौध्द व्याकरण व षःडदर्शने यांचा सखोल अभ्यास केला. तो भगवती देवीचा शाकत उपासक होता.

**सांस्कृतिक परिस्थिती :-** चंपा देशावर हिंदू घराण्यांनी राज्य केले. त्यांची राज्यव्यवस्था हिंदू पध्दतीची होती. राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषद होती. शेती हे उप्तन्नाचे प्रमुख साधन होते. शेती उत्पन्नाचा १/६ भाग सारा म्हणून जमा केला जात होता. मनू व नारद स्मृतीप्रमाणे न्यायदान केले जात होते.

चंपा देशामध्ये शैव, वैष्णव व बौध्द धर्माची उपासना प्रचलित होती. समाजाने चातुर्वण्य पध्दत स्विकारली होती. तेथे ब्राह्मणाला देवा सारखे स्थान होते. भारतीय पूजा पध्दती सतीची पध्दत रुढ होती. संस्कृत ही राजभाषा होती. हिंदू पंचांग व सणवार पाळले जात होते. निसन व पोनगर येथील शिवमंदिरे बदामी कांची येथील मंदिरासारखी होती. इंद्रपूर मध्ये मोठा विहार बांधला होता. बुध्द जीवनातील अनेक प्रसंग कोरलेल आहेत. सिंहपूर शहरामध्ये प्रशस्त रस्ते, द्रविड पध्दतीचे बांधकाम असलेली मंदिरे, मंदिरांमध्ये पौराणिक कथा कोरण्याची पध्दत होती. चंपामध्ये धार्मिक सहिष्णुता असल्यामुळे तेथे धार्मिक संघर्ष झाले नाहीत.

**आपली प्रगती तपासा :-**

१) चंपा मधील स्थानिक लोकाना काय म्हणत होते ?
२) राजा श्रीमारने कोणत्या देशावर आक्रमण केले होते ?
३) चंपा मध्ये कोणते धर्म प्रचलित होते ?

**आपली प्रगती तपासा- उत्तरे**

१) चंपामधील स्थानिक लोकांना चाम म्हणत होते.
२) श्रीमार ने चीनमधील टोकिन प्रांतावर आक्रमण केले.
३) चंपामध्ये शैव, वैष्णव पंथ व बौद्ध धर्म प्रचलित होते.

## १२.४ कंबोडीया

कंबोडीयाचे पूर्वीचे नाव कंबुज होते. कंबोडीयाच्या पूर्वेच्या भागाला चीनी भाषेमध्ये फूनान म्हणत होते. प्राचीन काळामध्ये कंबुज मध्ये जिओचे हया स्त्रीचे राज्य होते. कंबुजच्या सांस्कृतिक जीवनाची सुरुवात कौडिण्य यानी केली होती. कंबुस्वयंभुव याने फुनान साम्राज्याची स्थापना केली. त्याच्या नावावरुन देशाला कंबुज म्हणत होते. त्याचे चीनी साम्राज्याशी निकटचे संबंध होते. राजे 'जयवर्मन'ही पदवी धारण करत होते. फुनानचे चीन, भारत, ग्रीस, रोम व इजिप्त बरोबर व्यापारी संबंध होते.कंबोडीया मधील पहिला ऐतिहासिक राजा श्रृतवर्मन होता. त्याने लिंग पर्वताच्या पायथ्याला श्रेष्ठपूर येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. कुलदैवत भद्रेश्वर शिव याचे मंदिर बांधले होते.

इ.सन ५७० मध्ये रुद्रवर्मन राजा होता. इ.सन ५९० मध्ये भववर्मन राजा झाला त्याने चंपा राज्याचा नाश करुन स्वतःला 'महाराजाधिराज'पदवी घेतली होती. त्याने भवपूर हे नवीन राजधानीचे शहर वसवले. घराण्यातील शेवटचा राजा पहिला जयवर्मन होता.त्याने इंद्रपूर ही राजधानी केली. अमरेंद्रपूर हे शहर वसवले. जयवर्मनाच्या काळात कंबोडीया शैलेद्र साम्राज्याच्या आक्रमणाला बळी पडला होता.

दुसरा जयवर्मन याने शैलेंद्र सत्ता झुगारुन देऊन कंबोडीयाचे स्वातंत्र्य घोषित केले होते. राजाने हरिहरालय व अमरेंद्रपूर या नवीन राजधान्या वसवल्या तो स्वतःला कम्बुराजेंद्र म्हणत होता. इंद्रवर्मन राजाने (इ.सन ७८७-७९९) कंबोडीयामध्ये नवीन राजघराण्याची स्थापना केली त्याने शिवालये बांधली. वजा यशोवर्मन (८८९-९१०) प्रसिध्द राजा होता. यशोधरपूर ही त्याची राजधानी होती. राजा राजेंद्रवर्मन (इ.सन ९४७-९६८) याने महायान पंथाला राजाश्रय दिला. बौध्द धर्माचा प्रचार केला. पहिला सूर्यवर्मन (१००-१०४९) दुसरा सूर्यवर्मन (१११२-११५२) यानी कंबोडीयाचे साम्राज्य व दरारा पुन्हा निर्माण केला. या घराण्यातील शेवटचा थोर राजा सातवा जयवर्मन (इ.सन ११८१-१२२१) याने भोम ही नवी राजधानी

वसवली. नगरी भोवती उंच प्राकार व मोठे खंदक होते. प्राकाराला पाच वेशी होत्या गावाच्या मध्यभागी बेयनचे मंदिर होते. राजाने बांधलेल्या सर्व मंदिरांच्या व्यवस्थेसाठी ६६६२५ कर्मचारी होते. मंदिरातून ४३९ आचार्य शिक्षादान करत होते. राज्यात ७९८ देवळे १०२ आरोग्यशाळा १२१ धर्मशाळा होत्या त्यानंतर कंबूज अवनत झाले होते.

**कंबोडीयामधील प्रशासन :-** कंबोडीयामधील राज्यप्राासन रचना कौटिल्याच्या अर्थशास्त्रावर आधारित होती. राजा सर्वश्रेष्ठ असून मदतीस मंत्री व अधिकारी श्रेणी होती. राजा हा ईश्वरी अंश मानला जात होता. राज्यात ठिकठिकाणी विप्रशास्त्र (पंडीतसभा), सरस्वती (शास्त्र), पुस्तकाश्रम (ग्रंथालय), सत्र (अभ्यागतगृह) आरोग्यशास्त्र व धर्मशाळा होत्या. नवीन राजधान्या बसवणे राजांची आवड होती. प्रशासन व्यवस्थेचे अनेक उल्लेख आलेखामधून समजतात.

**धार्मिक व सामाजिक जीवन :-** कंबोडीयामधील राज्यकर्त्यांनी शैव, वैष्णवपंथ व बौध्द धर्माचे अनुदायित्व स्वीकारले होते. अनेक देवता प्रचलित होत्या. भारतीय धर्मशास्त्रे, उपनिषदे, पुराणे, काव्य, यांचा अीयास केला जात होता. रामायण, महाभारत धार्मिक जीवनाचा व संस्कृतीचा आत्मा होते. देवराजपंथ हे कंबोडीयामधील धर्माचे दुसरे वैशिष्टय आहे. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यात आंतरजातीय विवाहाची परंपरा होती.

**स्थापत्य कला :-** कंबोडीयामधील राज्यकर्त्यांनी भद्रेश्वर शिव, शंभूविष्णू, चर्तुभुजा देवी, शिवालये, अंगकोखट (विष्णूमंदिर) बेयनचे शिवमंदिर यांची स्थापना केली होती. मंदिरामध्ये क्रमाक्रमाने लहान होत जाणारे तीन मजले. प्रत्येक मजल्यावर गॅलरी कठडयावर व भिंतीवर रामायण व महाभारतातील उठावचित्र केले होते. कोरीव शिल्प मध्यभागी द्रविड पध्दतीचे विमान इ. वैशिष्टये होती. भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचे महत्वाचे कार्य तेथील मंदिरानी केले होते.

**आपली प्रगती तपासा :-**

१) फुनानसे कोणत्या देशांबरोबर व्यापारी संबंध होते ?
२) जयवर्मनच्या काळात कंबोडीया कोणत्या साम्राज्याच्या आक्रमणाचा बळी ठरला होता ?
३) कंबोडीया मधील प्रशासन कोणत्या भारतीय राजनिती तज्ञाच्या पुस्तकावर आधारित होते ?

**आपली प्रगती तपासा-**

१) फुनानचे चीन, भारत, ग्रीस, रोम व इजिप्त बरोबर व्यापारी संबंध होते.
२) जयवर्मनच्या काळात कंबोडीया बौलेंद्र साम्राज्याच्या आक्रमणाच्या बळी ठरला होता.
३) कंबोडीयाचे प्रशासन कौटिज्याच्या अर्थशास्त्रावर आधारित होते.

## १२.५ बाली

सुवर्णद्विपातील बाली हे एकमेव बेट आहे. कि जेथे आजही हिंदू संस्कृती अस्तित्वात आहे. चीनी इतिहासामध्ये बालीमध्ये कौडीन्य नामक हिंदू घराणे इ.सनाच्या ६ व्या शतकामध्ये राज्य करत होते अशी नोंद आहे. तेथे सातव्या शतकात बौध्द धर्माचा प्रसार झाला होता. विष्णू शिव नंदी गणेश इंद्र कृष्ण व महाभारतातील शूर योध्दे यांची पूजा केली जाते.

**राजव्यवस्था :-** बालीमधील राजव्यवस्था भारतातील 'कामंदक निती' प्रमाणे चालत होती. राजा हा देवाचा मानला जात होता. अनियंत्रित राजा, मंत्री व अधिकारी प्रशासनाचे घटक होते. मांडलिक राजांना अंतर्गत व्यवहारामध्ये स्वायतत्ता होती. स्त्रियांना पूर्ण राजकीय हक्क होते. पूर्वजावामध्ये गुणप्रिया राणीने स्वतंत्रपणे राज्यकारभार केला होता. काही स्त्रिया राज्यमंत्री झाल्याची उदाहरणे आहेत.

**समाज :-** बाली मधील समाज व्यवस्था चार्तुवर्ण्य पध्दतीची होती. अनुलोम विवाहांना समाजाची मान्यता होती. संततीला पित्याचा वर्ण मिळत होता. प्रतिलोम विवाहांना निशिद्ध मानले जात होते. समाजात भारतीय पध्दतीची धर्मव्यवस्था होती. वैदिक व पौराणिक देवातंची पूजा प्रचारात होती. धर्मातील महाभान पथांचा प्रभाव अधिक होता. धर्मपाल व अतीश दिपंकर या नालंदाच्या कुलगुरुनी येथे येऊन धर्माचा अभ्यास केला. येथील प्रत्येक घरामध्ये देवघर असून पूजा अर्चा चालत होती. पितृपूजा किंवा श्राध्दविधींना महत्वाचे स्थान होते.

**स्थापत्य कला :-** बालीमध्ये देवतांना चंडी म्हणत होते. मंदिर बांधणीमध्ये सशिल्प चौथरा त्यावर चौरस मंदिर विमान पध्दतीचे शिखर चारही बाजूला चार मनोरे अशी रचना होती. लारा जोग्रांग येथील मंदिर प्रसिध्द होते. मंदिरावर रामायण, महाभारत कथा शिल्पपदावर आहेत. देवतांच्या मूर्ती अतिभव्य व प्रेक्षणीय आहेत. मंदिरावर दक्षिण भारतीय स्थापत्य केलेचा प्रभाव जाणवतो.

मलायाच्या शैलेंद्र राजाच्या मदतीने ७५० ते ८५० या काळात बोरोबुदुर येथे नऊ मजल्याचा भव्य व प्रचंड स्तुप बांधला होता. स्तुपाचे सहा मजले चौरस असून वरील तीन मजले वर्तुळाकार आहेत. सर्वात वरच्या मजल्यावर घंटाकृती स्तूप आहे. गोलाकार मजल्यांवर स्तुपाच्या रांगा असून स्तुपांच्या चौकटी जाळीमध्ये बुध्दप्रतिमा स्थापन केल्या आहेत. एकूण ४३२ बुध्दमूर्ती असून कोरीव शिल्पपट पंधराशे आहेत. शिल्पपटामध्ये बुध्दजीवनातील प्रसंग जातक व अवदान कथावरुन कोरले आहेत.

**आपली प्रगती तपासा :-**

१) बालीमध्ये इ. सनाच्या सहाव्या शतकात कोणते हिंदू घराणे राज्य करत होते.
२) बाली मधील राज्यव्यवस्था भारतातील कोणत्या निती प्रमाणे चालत होती.
३) बाली मध्ये देवताना काय म्हणत होते ?

**आपली प्रगती तपासा- उत्तरे**

१) बालीमध्ये इ. सनाच्या सहाव्या शतकामध्ये कौडीन्स नावाचे हिंदू घराणे राज्य करत होते.
२) बाली मधील राज्यव्यवस्था भारतातील कामंदक निती प्रमाणे चालत होती.
३) बाली मध्ये देवताना चंडी म्हणत होते.

## १२.६ सुमात्रा जावा मलाया (सुवर्णद्विप)

सुमात्रा जावा व मलाया या तीन प्रदेशांना सुवर्णद्विप म्हंटले जात होते. सुमात्रा येथे शैलेंद्र शासक श्रीविजयची सत्ता होती. श्री जयनास या राजाच्या कारकिर्दीत श्री विजयचा विस्तार झाला होता. शैलेंद्र राज्यकर्ते बौध्द धर्मीय होते. त्याचे चीन व भारतातील चोळ व पाल राजांचे संबंध होते. नागापटट्म व नालंदा येथील विहार शैलेंद्र राज्यकर्त्यांनी बांधले होते. शैलेंद्राच्या जावीक सत्तेने चोळ राजांशी संघर्ष बांधले होते. शैलेंद्राच्या नाविक सत्तेने चोळ राजांशी संघर्ष केला होता. त्यात राजेंद्र चोळाने शैलेंद्राचा पराभव केला होता. शैलेंद्र शासक महायानपंथी होते. बौध्दकुमार घोष हा शैलेंद्र शासकाचा गुरु होता. जावा मधील स्तुप शैलेंद्र राज्यकर्त्यांनी बांधला होता.

जावा येथे हस्तीनापुराच्या पराशर व्यास पांडुदेव यांनी वसाहती स्थापन केल्या त्यांचा वारस आजिसक याने वसाहतीमध्ये सुधारणा केल्या. जावा मध्ये आजिसकाच्या कारणापासून म्हणजे इ.सन ७८ पासून कालगणना सुरु होते. सन १३२ मध्ये देववर्मा राजाने चीन मध्ये व्यापारी संबंध साधले होते. इ. सन ४२४ साली काश्मिरचा विरकत राजपुत्र गुणवर्मा याने जावाच्या राजाला बौध्द धर्माची दिक्षा दिली होती.

आठव्या शतकात जावा मध्ये हिंदू राज्य होते. त्याला मतराम म्हणत होते. संजय नावाच्या राजाने संस्कृत भाषेमध्ये आलेख कोरले होते. राजा शैव असून त्याने शिवलिंगाची स्थापना केली. त्यानंतर राजा शैलेंद्र साम्राज्याचा भाग बनले होते. ७७८ कळसन येथे तारादेवीचे बौध्दमंदिर बांधण्यात आले. इ. सन ९२५ नंतर शैव घराण्याने पुन्हा सत्ता स्थापन केली. धर्मराजाने शैलेंद्र सत्तेचा पराभव केला. इ. सन १४७४ मध्ये शेवटच्या शासकाने इस्लाम धर्माचा स्विकार केला होता.

मलाया द्विपकलपात भारतयांच्या वसाहती इ. सनाच्या सुरुवातीला स्थापन झाल्या. इ. सन ५१५ च्या सुरुवातीला मलायामधील भगदत्त राजाने चीन बरोबर संपर्क केला. अशोकाच्या एका वंशजाने मलायामधील लिगोर येथे वसाहत स्थापन केली. एका शिलालेखानुसार रंगमृत्तीकेचा (रंगमती बंगाल) रहिवासी महानाविक बुधगुप्ताने भेट दिली होती. मलायामधील वसाहतीची नावे लागकादूसू, कमलांक, कळसपूर, काळ पटांग अशी आहेत. मलायात शैव वैष्णव

पंथ व बौध्द परंपरा प्रचलित होत्या. कंदाद जवळ पाचव्या शतकातील बौध्द स्तुप व संस्कृत ओळख सापडली आहेत.

इ.सनच्या आठव्या शतकामध्ये मलायात शैलेंद्र घराण्याची सत्ता स्थापन झाली होती. त्यांचा चोळ राजा बरोबर संघर्ष झाला होता. इ.सन १०२५ मध्ये पहिल्या राजेंद्र चोळाने आक्रमण करुन मळायाचा पश्चिम किनारा जिंकला होता. १०६३ मध्ये चोळांनी पुन्हा स्वारी करुन खंडणी वसूल केली होती. १०९० मध्ये शैलेंद्राचा वकील चोळांच्या दरबारात आला होता.

**आपली प्रगती तपासा :-**

१) सुवर्णद्विपा मध्ये कोणते प्रदेश समाविष्ठ होते ?
२) जावा मध्ये कोणी वसाहती स्थापन केल्या ?
३) आठव्या शतकामध्ये मलाया मध्ये कोणत्या घराण्याची सत्ता स्थापन झाली होती ?

**आपली प्रगती तपासा - उत्तरे**

१) सुवर्णद्विप मध्ये सुमात्रा, जावा व मलाया या तीन प्रदेशांचा समावेश होता.
२) जावा येथे हस्तीनापुराच्या पराशर व्यास पांडुदेव यानी वसाहती स्थापन केल्या.
३) आठव्या शतकामध्ये मलायात शेलेंद्र घराण्याची सत्ता स्थापन झाली होती.

## १२.७ सयाम

समाय मध्ये इ. सनाच्या पहिल्या शतकापासून वसाहती स्थापन झाल्या होत्या. दूवारावतीच्या वसाहतकारांनी राज्य स्थापन केले. तामीळ वैष्णवांनी व्यापार करताना भारतीय संस्कृतीचा प्रसार केला. सयाममधील अनेक गावांना भारतीय नावे दिलेली आहेत. तेराव्या शतकापर्यंत सयाम कंबोडीयाच्या नियंत्रणाखाली होता. युनान प्रांताला पूर्वी विदेह राज्य म्हणत होते. त्यांची राजधानी मिथिला होती. नवव्या शतकामध्ये माधव चंद्रगुप्त याने सयाममध्ये बौध्द धर्माला प्रोत्साहन दिले होते. तेराव्या शतकामध्ये इंद्रदित्य याने स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याच्या राजधानीचे नाव 'सुखेदोय'होते. त्याचा मुलगा रामकामांग याने सयामला राजकीय स्थैर्य मिळवून दिले. प्रजेला सुखसोयी देतानाच न्याय देण्यासाठी त्याने राजवाडयाबाहेर घंटा बांधून ठेवली होती. रामकामांग बौध्द धर्मीय असून त्याने विहार व चैत्यगृहे बांधले होते. इ. सन १३४७ मध्ये श्रीसुर्यवंश राममहाधर्म राजधिराज हा राजा झाला. तो बौध्द असूनही त्याने शिव व विष्णू यांच्या मूर्ती स्थापन केल्या होत्या. त्याच्या मृत्यू नंतर अयोध्या येथे नवे राजघराणे स्थापन झाले.

सयामचा राष्ट्रिय ग्रंथ रामायण असून राजे स्वत:ला राम ही पदवी घेत होते. सयाममध्ये बौध्द धर्माचे प्राबल्य होते. सयाममध्ये धर्म, भाषा, लिपी, रिती-रिवाज यांच्यावर भारतीय

संस्कृतीची छाप आहे. सयामची लिपी गुप्त लीपी मधून निर्माण झाली आहे. सयाममध्ये जुन्या ग्रंथाचे जतन व अभ्यास केला जातो. तेथील कायदे मनुस्मृतीवर आधारीत आहेत. तेथे आजही दसरा उत्सव साजरा केला जातो. श्रीदेव या ठिकाणी हिंदू देवदेवतांच्या मूर्ती उत्खननात सापडल्या आहेत. त्यांच्यावर सारनाथ मथुरा अजिंठा शैलीचा प्रभाव दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा :-**

१) युनान प्रांताची राजधानी कोणती होती ?
२) रामकामांग राजा कोणत्या धर्माचा होता ?
३) सयामचा राष्ट्रीय ग्रंथ कोणता आहे.
४) युनान प्रांताची राजधानी मिथिला होती.
५) रामकामांग राजा बौद्ध धर्माचा होता.
६) रामायण हा सयामचा राष्ट्रीय ग्रंथ आहे.

## १२.८ सारांश

भारतीय संस्कृती इ.पू. १०,००० वर्षापासून समृद्ध, सुसंस्कृत व सुसंघटीत मानली जाते. भारतीय संस्कृतीचा प्रसार मळाया, जावा, ब्रह्मदेश, कंबोडीया सयाम या अग्नेय आशियायी देशामध्ये झाला होता. इसवी सनाचे दुसरे ते पाचवे शतक संस्कृतीचा प्रसाराचा कालखंड मानला जातो. भारतातील सागरी व्यापाऱ्यांनी संस्कृती प्रसाराचे कार्य केले.

ब्रह्मदेश हा भारताचा निकटचा शेजारी आहे. तेथे तिसऱ्या शतकापासून भारतातील गौड लोकांनी वसाहत केली होती. आराकन येथे काशीच्या राजपुत्राने भारतीय राज्याची स्थापना केली. तेथील राजे बौद्धधर्मीय होते. आठव्या शतकामध्ये चोल राजा राजेंद्र याने ब्रह्मदेशावर आक्रमण करुन प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ठ केला होता.

चंपा अनासमध्ये हिंदू वंशाची स्थापनः राजा श्रीमार याने सन १५० ते २०० या काळात केली होती. तेथील राज्यकर्ते हिंदू धर्माचे अनुयायी होते. त्यानी शंकराची अनेक मंदिरे बांधली होती. राजे हिंदूधर्मीय असले तरी सर्व धर्माला मानाचे स्थान दिले होते.

कंबोडीयामध्ये सांस्कृतिक जीवनाची सुरुवात कौडिण्य यानी केली. कंबोडीया मधील पहिला ऐतिहासिक राजा श्रुतवर्मन होता. जयवर्मनच्या काळात कंबोडीया शैलेंद्र साम्राज्याच्या, आक्रमणाचा बळी ठरला पण राजा दुसऱ्या जयवर्मनाने पुन्हा राज्य प्राप्त केले. कंबोडीया मधील प्रशासन व्यवस्था कौटिज्याच्या अर्थशास्त्रावर आधारित होती.

बाली मधील राज्याची स्थापना कौडिन्य नामक हिंदू घराण्याने केली. तेथील राजे शैव व वैष्णव पंथाचे अनुयायी होते. बालीमधील राज्यकारभार भारतामधील कामंदक निती प्रमाणे

चालत होता. समाजामध्ये चार्तुवर्ण्य पद्धत रुढ होती. बाळीमधील स्थापना कला यांच्यावर द्रविड संस्कृतीचा प्रभाव होता.

सुमात्रा मध्ये शैलेंद्र शासकांची सत्ता होती. शैलेंद्र शासक बौद्ध धर्मीय असून महायान पंथी होते. जावा येथे पराशर व्यासानी वसाहती स्थापन केल्या असे मानले जाते. आठव्या शतकामध्ये जावा येथे हिंदू राज्याची स्थापना झाली. त्यानी संस्कृत भाषेत ओळख कोरले होते. त्या दर्जेदार साहित्य निर्माण झाले.

सयाम मध्ये इ. सनाच्या पहिल्या शतकापासून भारतीयांचा संपर्क होता. तामीळ वैष्णवानी भारतीय संस्कृतीचा प्रसार केला. सयामचा राष्ट्रीय ग्रंथ रामायण आहे. तेथील धर्म, भाषा, रितीरिवाज यावर भारतीय संस्कृतीची छाप आहे.

## १२.९ दिर्घोत्तरी प्रश्न

१) अग्नेय आशियातील विविध देशामध्ये भारतीयांनी स्थापन केलेल्या राजकीय सत्तांचा आढावा घ्या ( कोणतेही दोन देश)

२) अग्नेय आशियातील देशामध्ये हिंदू व बौध्द धर्माचा प्रभाव दिसतो यावर भाष्य करा.

३) टिपा लिहा :-
   १) बर्मा
   २) कंबोडीया
   ३) चंपा अनाम
   ४) बाली
   ५) सुवर्णद्विप

❖❖❖❖